मधुकराया विरचित

# सुक्तिमुक्तावली

(इ.स. १८१२ मध्ये रचलेले मराठी तात्विककाव्य)

संशोधक व संपादक

प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

मधुकराया कृत

# सुक्तिमुक्तावली

(इ.स. १८२३ मध्ये रचलेले मराठी तात्विक काव्य)


संशोधक व संपादक

**प्रा.डॉ. गोमटेश्वर पाटील**



प्रकाशक

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

इ. सन २०२०

➢ **पुस्तकाचे नांव :** सुक्तिमुक्तावली

➢ **मूळ लेखक :** मधुकराया

➢ **संपादक :** प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील

➢ **प्रथमावृत्ती :** **२०२१**

➢ **प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :** व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे – ४११ ००१.

➢ **किंमत :** **३०५/–**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. निवेदन ०५

२. ऋणनिर्देश ०७

३. सुक्तिमुक्तावली संपादकीय प्रस्तावना ०९

४. हस्तलिखिताची मूळ आवृत्ती ३५

५. हस्तलिखिताचे मराठी लिप्यंतर १७७

प्रथम अध्याय १७९

द्वितीय अध्याय १८६

तृतीय अध्याय १९३

चर्तुथ अध्याय १९९

पंचम अध्याय २०४

षष्ठ अध्याय २१०

सप्तम अध्याय २१६

अष्टम अध्याय २२२

नवम अध्याय २२९

दशम अध्याय २३५

एकादश अध्याय २४१

द्वादश अध्याय २४७

त्रयोदश अध्याय २५३

चतुर्दश अध्याय २५९

| | |
|---|---|
| पंचदश अध्याय | २६६ |
| षोडष अध्याय | २७२ |
| सप्तदश अध्याय | २७८ |
| अष्टादश अध्याय | २८४ |
| एकोणविंशतीतम अध्याय | २९७ |
| विशंतीतम अध्याय | ३०३ |
| एकविशंतीतम अध्याय | ३१२ |
| पारिभाषिक शब्द | ३२० |
| शब्दार्थ | ३२३ |

# निवेदन

भारतीय भाषा आणि साहित्य समृध्द करण्यामध्ये जैन साहित्याचे फार मोठे योगदान आहे. विशेषतः प्राचीन भारतीय प्राकृत भाषा आणि लिप्यांचे संवर्धन जैन साहित्याने केले आहे. अर्धमागधी, पैशाची, शौरसेनी आणि महाराष्ट्री या प्राचीन भाषांमध्ये जैन साहित्य भारतीय साहित्य समृध्द केले आहे. तसेच इसवीसनाच्या चौथ्या पाचव्या शतकानंतर संस्कृत भाषेतही जैन साहित्य लिहिले गेले आहे. उत्तर मध्ययुगीन प्रादेशिक भाषांच्या काळातही सर्वच भारतीय प्रादेशिक भाषांमध्ये जैन साहित्य मोठ्या प्रमाणात रचले गेले आहे. इसवीसनाच्या सातव्या शतकापासून अकराव्या शतकापर्यंत अपभ्रंश भाषांचा काळ समजला जातो. या काळातही जैन साहित्याची रचना सर्वच भाषांमध्ये झालेली आहे. मराठी साहित्याच्या पूर्व परंपरेचा शोध घेताना मराठी, महाराष्ट्री अपभ्रंश आणि महाराष्ट्री प्राकृत असा शोध घेतल्यास मराठी भाषेची जननी महाराष्ट्र ठरते. या महाराष्ट्री भाषेत भारतीय साहित्यात सर्वाधिक जैन परंपरेतील कवी लेखकांच्या रचना आहेत. म्हणूनच पिशेल या पाश्चात्य भाषा अभ्यासकाने महाराष्ट्री भाषेला 'जैन महाराष्ट्री' असे म्हटले आहे. हिच महाराष्ट्री उत्तर काळात अपभ्रंश महाराष्ट्री (मराठी) झाली आहे. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी शोधलेल्या सर्वच हस्तलिखित प्रतीमध्ये लेखक आणि महाराष्ट्री किंवा मराष्ट्री भाषेत रचना करत असल्याचे सांगतात. अगदी एकोणिसाव्या शतकातील हस्तलिखित प्रतींमध्ये ते मराठी हा शब्द न लिहिता मराष्ट्री हाच शब्द लिहितात. यावरुन मराठी आणि महाराष्ट्रीच्या परंपरेचे नाते दृढ होताना दिसते.

मध्ययुगीन मराठी साहित्याचा ग्रांथिक इतिहास बाराव्या शतकापासून सुरु होतो. मराठी जैन साहित्याचा इतिहास चौदाशे पन्नास पासून सुरु होतो. तेराव्या शतकातील महानुभाव आणि वारकरी साहित्याच्या रचनानंतर एकनाथ पूर्वकाळात मध्यवर्ती धारेतील मराठी साहित्यात पोकळी निर्माण झालेली दिसते. नेमके याच काळात, ज्याला मराठी साहित्याचे अंधारयुग म्हटले जाते, त्या काळात जैन कवी आपली मराठीतील प्रचंड रचना करताना दिसतात. महानुभावीयांच्या गद्य साहित्य नंतर खंडित झालेली मराठी गद्याची परंपराही गुणकीर्तींच्या धर्मामृत या ग्रंथाने भरुन निघालेली दिसते. चौदाव्या शतकानंतर मराठीतील मुख्य साहित्य परंपरेच्या समांतर अशी जैन साहित्याची परंपरा दिसते. संख्येच्या दृष्टीने मोजमाप केल्यास तुकाराम, रामदासादि शिवकाळात मराठी जैन कवींची गर्दी अधिक दिसते. ही साहित्य परंपरा दुर्दैवाने आजही अप्रकाशित मठा-मंदिरामध्ये बंदिस्त आहे.

महराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने हाती घेतलेल्या या

संशोधन प्रकल्पामुळे मराठीतील फार मोठे साहित्यिक भांडार खुले होणार आहे. 'मध्ययुगीन कालखंडातील जैन साहित्यातील दुर्मिळ अप्रकाशित हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन व प्रकाशन' या ब्रहद् संशोधन प्रकल्पांतर्गत डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी मध्ययुगीन काळातील सतरा हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन व संपादन केले आहे. या ग्रंथांचे मूळ हस्तलिखित शोधून त्यावर विस्तृत प्रस्तावना लिहिल्या आहेत. या १७ ग्रंथांमध्ये पंधराव्या शतकातील गुणकीर्तींचा 'रामायण' हा ग्रंथ तीन खंडात संपादित केला आहे. पुढे नामा जिनदास यांचा सोळाव्या शतकातील 'हरिवंश पुराण' व अठराव्या शतकातील 'हरीलीळाप्रकाश' हे दोन ग्रंथ तीन खंडात जैन महाभारताची कथा मांडताना दिसतात. ही दोन्ही महाकाव्ये व वैदिक रामायण आणि महाभारत काव्ये अशी तुलना करता मराठी वाचकांची अभिरुची संपन्न करणारे हे ग्रंथ आहेत. 'यशोधरचरित्र','सुदर्शनचरित', 'शीलपताका', 'हनुमंत पुराण', 'श्रीपालचरित्र', 'कर्णामृत कथा' या कथा मध्ययुगीन पंडिती वळणाच्या सुंदर आख्यान कथा आहेत. 'उपदेश रत्नमाला' व 'धर्मामृत कथा' ही दोन कथाकाव्य आहेत. भारतीय कथा परंपरेतील कथामालिका अथवा साखळी कथा या प्रकारच्या या कथा आहेत. आधुनिक मराठीतील कथासाहित्यपूर्व, ही कथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'आदिपुराण', 'अष्टकर्म प्रकृती', 'सुक्तिमुक्तावली' हे ग्रंथ जैन तत्त्वज्ञानाची मराठी भाषेत सोप्या पध्दतीने उपमा दृष्टांतांनी मांडणी करणारे ग्रंथ आहेत. या सर्वांमध्ये 'सुमतिप्रकाश' हा सोळाव्या शतकातील एक महत्त्वाचा जैन ग्रंथ आहे. कोणतेही कथानक नसलेला एकनाथकालीन सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणारा वऱ्हाडी भाषेतील हा ग्रंथ मराठी साहित्यातील महत्त्वाचा दस्ताऐवज आहे.

मराठी जैन साहित्य हे विशिष्ट साहित्य असले तरी ते इथल्या मराठी माणसांनी लिहिलेले साहित्य आहे. मराठी भाषा आणि साहित्यांचे दालन समृध्द करणारी ही महाराष्ट्रीय माणसांची व साहित्याची महत्त्वाची परंपरा आहे. या सर्व परंपरेची ओळख मराठी वाचकांना करून देण्याची संधी या संशोधन प्रकल्पाच्या निमित्ताने डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी दिली आहे. मराठी साहित्य परंपरेचा नव्याने उलगडलेला हा इतिहास मराठी परंपरा समृध्द करणारा ठरेल, असा विश्वास वाटतो.

**सदानंद मोरे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# ऋणनिर्देश

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'मध्ययुगीन कालखंडातील जैन साहित्यातील दुर्मीळ व अप्रकाशित हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन व प्रकाशन' हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी २१ व्या शतकात मला मान्यता दिली याचाच मला अत्यंत आनंद होत आहे. मराठीतील मौलिक ऐतिहासिक साहित्याला पुनर्जिवीत करण्याच्या माझ्या संकल्पाला त्यांनी मूर्त स्वरूप दिले त्याबद्दल मंडळाच्या प्रत्येक सदस्याचे जितके आभार मानावे तितके कमीच आहेत. अभिजात असलेली मराठी भाषा अखंडपणे कशी प्रवाहित होती हे स्पष्ट करण्यासाठी हे संशोधन निश्चितच महत्त्वाचे ठरेल.

हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी अनेक व्यक्ती आणि संस्थाचे सहकार्य लाभले. **प्रा. महावीर कंडारकर** यांनी या प्रकल्पाचे संशोधन सहाय्यक म्हणून काम पाहिले. संशोधन सहाय्याबरोबरच मार्गदर्शन, हस्तलिखिताचे वाचन आणि डी.टी.पी. करण्याचे महत्त्वाचे काम अखंड दोन वर्षे सातत्याने केल्यामुळेच हा प्रकल्प वेळेत पूर्णत्वास जाऊ शकला. या प्रकल्पाचे मूळ प्रेरणास्थान **डॉ. राजन गवस** यांची मराठीतील दुर्लक्षित असलेल्या जैन साहित्याबद्दलची आस्था या संशोधनास कारणीभूत झाली. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष **मा. बाबा भांड** यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना आणि मार्गदर्शनामुळे अभ्यासास दिशा मिळाली. साहित्य संस्कृती मंडळाच्या सचिव **डॉ. मीनाक्षी पाटील** यांचा प्रकल्पाविषयीचा सकारात्मक व आश्वासक दृष्टीकोन संशोधन व संपादनास प्रेरक ठरला. संशोधन संपादनाचे कार्य चालू असताना **डॉ. रामेश्वर रोकडे** यांचे सहकार्य मोलाचे राहीले. संशोधनाचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी साहित्य संस्कृती मंडळाने नियुक्त केलेले तज्ञ परिक्षक **प्रा.डॉ. महावीर शास्त्री, सोलापूर** यांनी संपूर्ण प्रकल्प बारकाईने तपासून वेळोवेळी केलेल्या सूचना व दुरूस्त्यांमुळे हे संशोधन-संपादन अधिक दर्जेदार झाले. प्रत्यक्ष दुर्मिळ हस्तलिखितांचा महाराष्ट्रभर धांडोळा घेताना मला सहाय्य करणारे व तांत्रिक सहकार्य करणारे माझे मित्र **सचिन पाटील, राहुल मगदूम, विनोद पाटील, दिपक पाटील व माझी पत्नी प्रा. सौ. सुजाता पाटील** यांनी मोलाची साथ दिली. त्यामुळे हस्तलिखितांचे फोटो, झेरॉक्स, सूची करण्याचे काम सहज शक्य झाले. जैन साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक **डॉ. विद्याधर जोहरापूरकर,** नागपूर आणि भंडारकर इन्स्टिट्यूट, पुणे येथील **डॉ. कमलकुमार जैन** यांच्याबरोबर झालेल्या चर्चा संशोधनास पूरक ठरल्या. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर साहित्य संस्कृती मंडळाचे विद्यमान अध्यक्ष **डॉ. सदानंद मोरे** यांनी याचे महत्व जाणून त्याकरिता निवेदन लिहून प्रकल्प अग्रेषित केला. या सर्वांचे मी ऋण व्यक्त करीत आहे.

मध्ययुगीन काळातील दुर्मिळ जैन साहित्यातील मराठी हस्तलिखिते उपलब्ध होण्यासाठी अनेक संस्थानी आणि व्यक्तींनी मोलाचे सहकार्य केले. कारंजा लाड, जि.वाशिम येथील महावीर ब्रह्मचर्याश्रम मंदिरातील हस्तलिखिते **श्री. भारत भोरे** यांनी उपलब्ध करुन दिली. तसेच कारंजा येथील सेनगण मंदिराचे ट्रस्टी व बालात्कारगण मंदिराचे ट्रस्टी यांनी हस्तलिखिते पाहण्यास दिली. श्री काष्ठासंघ आदिनाथ मंदिर-अंजनगाव सुर्जी, सैतवाल मंदिर-अंजनगाव सुर्जी, परतवाडा जैन मंदिर, मुक्तगिरी मंदिर ट्रस्ट, आदिनाथ मंदिर-भातुकली, जि. अमरावती, रामटेक मंदिर हस्तलिखित संग्रह-नागपूर येथील बघेरवाल मोठे मंदिर येथील हस्तलिखित संग्रह, सैतवाल मंदिर हस्तलिखित संग्रह, महावीर मंदिर, जिंतूर, जि. परभणी, भांडारकर इन्स्टिट्यूट, पुणे येथील हस्तलिखित संग्रह, प्रा. डॉ. विद्याधर जोहरापूरकर संग्रह, जीवराज ग्रंथमाला-सोलापूर येथील हस्तलिखित संग्रह, आदिनाथ मंदिर-सोलापूर हस्तलिखित संग्रह, हिंगोली येथील **श्री. शशिकांत दोडल** यांचे घरी असलेले हस्तलिखित संग्रह, औरंगाबाद-पैठण येथील चिमणापंडितांचे हस्तलिखित संग्रह या सर्व विदर्भ आणि मराठवाड्यातील मंदिर व संस्थांनी हस्तलिखिते दाखविण्याचे व फोटोकॉपी घेण्यास सहकार्य केले. याशिवाय पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील **स्वस्तिश्री डॉ. लक्ष्मीसेन महाराज** यांनी लक्ष्मीसेन मठातील हस्तलिखिते उपलब्ध करुन दिली. तसेच नांदणी येथील जिनसेन मठातील हस्तलिखिते **प्रा. आप्पासाहेब भगाटे** यांनी उपलब्ध करुन दिली. बाहुबली येथील अनेकान्त शोधपीठामधील हस्तलिखिते उपलब्ध होण्यासाठी **डॉ. नेमिनाथ शास्त्री** यांनी महत्वाचे सहकार्य केले. भोसे-ता. मिरज येथील जैन मंदिराचे ट्रस्टी, बेडग जैन मंदिर-ता. मिरज येथील जैन मंदिराचे ट्रस्टी यांनीही हस्तलिखिते उपलब्ध करुन दिली. कर्नाटकातील शांतिगिरी कुप्पानवाडी कोथळी व राजस्थान मधील अपभ्रंश ॲकडमी, जयपूर तसेच गणिवर्य श्री वैराग्यरति विजयजी महाराज, श्रुतभवन संशोधन केंद्र, पुणे यांनीही हस्तलिखिते उपलब्ध करुन दिली या सर्व संस्थांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार व ऋण व्यक्त करतो. श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी व महावीर महाविद्यालयातील माझे सर्व सहकारी यांचेही ऋण व्यक्त करतो.

ग्रंथास अंतिम प्रारुप देण्यासाठी जैनबोधक प्रकाशन संस्थेद्वारे **श्री. सुरेश लामकाने** तसेच उत्तम मुद्रणासाठी महाराष्ट्र शासनाचे **फोटो झिंको प्रेस-पुणे** च्या सर्व सदस्यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

**- प्रा.डॉ. गोमटेश्वर पाटील**

प्रोफेसर, मराठी विभाग-महावीर कॉलेज, कोल्हापूर.

# सुक्तिमुक्तावली

## संपादकीय प्रस्तावना

### सुक्तिमुक्तावली – सामान्य परिचय

ज्या काळात संस्कृत ही प्रतिष्ठितांची रूढ बोलीभाषा होती, त्या काळात सामान्य माणसे प्राकृत भाषेचा वापर करीत होती. संस्कृत भाषा त्यांना नीटशी समजत नव्हती. अशा वेळी सामान्यांना धर्मज्ञान करून देण्यसाठी आचार्य विजयसिंह यांनी धर्माचार्य अजितदेवांच्या संस्कृत भाषेतील 'सुक्तिमुक्तावली' या ग्रंथावर टीका म्हणजे समीक्षा मराठी भाषेत लिहिली आहे. जशी संत ज्ञानेश्वरांनी व्यासांच्या भगवत्‌गीतेवर 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाद्वारे सामान्यांसाठी मराठी टीका लिहिली आहे.

मूळ ग्रंथात संस्कृत श्लोक साधारण ९८ ते १०० आहेत. आणि एकवीस अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायातील श्लोकांची संख्या ४ (चार) आहे. १८, २०, २१ या तीन अध्यायांत सहा-सहा श्लोक आहेत. आचार्य विजयसिंह यांनी या श्लोकांचा अर्थ स्पष्ट करून सांगण्यासाठी मराठीत साठ-सत्तार ओव्या लिहिल्या आहेत. मराठी भाषेतील विवरण अर्थ अधिक सुस्पष्ट करून सांगण्यासाठीच आहे. प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभी लेखकाने वीतराग, आदिनाथ अथवा इतर कोणत्या ना कोणत्या भगवानांना वंदन केलेले आहे. मूळ संस्कृत श्लोक लिहिला आहे. पुढे मात्र मराठीतील आपली निर्मिती अर्थ स्पष्ट करणारी आहे. अर्थ लोकांना नीट समजावा यासाठी अनेक उदाहरणे दिली आहेत. उपमा, दृष्टांत, अर्थांतरन्यास या अलंकारांचा उपयोग योग्य प्रकारे केला आहे. अर्थात काही उदाहरणांची पुनरावृत्ती झालेली आहे. ज्या काळात यज्ञयागाचे प्राबल्य वाढले होते, त्या काळात आपला अहिंसावादी जैन धर्म लोकांना समजावून सांगणे ही काळाची गरज होती. यज्ञात बळी जाणाऱ्यांच्या किंकाळ्या लोकांना ऐकू येत नव्हत्या. बळी देणे ही समजूत दूर करून त्यांना सत्यवचनी, सज्जन करून सन्मार्गाला लावण्याचा हेतू ठेवूनच लेखकाने ही मराठी टीका लिहिली आहे. हेतू साध्य करण्यासाठी लेखकाने प्रत्येक अध्यायाच्या सुरुवातीला श्रोते आता आपल्याला काय समजले ते सांगून आता आम्हाला अमुक गोष्ट समजावून सांगा अशी विनंती करतात. आपण मुद्दाम तत्त्वबोध करत नसून लोकादर करत

आहोत, असा आभास लेखकाने केला आहे. त्यामुळे लेखनाला सुलभता आली आहे. गृहस्थधर्म स्वीकारलेल्या श्रावकाला अहिंसाव्रत, तप, पूजा-अर्चा, अचौर्य व्रत, जिनसंघ, सत्यव्रत यांचे पालन करणे सहज शक्य आहे. मात्र श्रावकाने नीट पारखून गुरू करावा. गुरूआज्ञेचे पालन करावे. संघपूजा करावी. दानधर्म करावा. सौजन्य ठेवावे. दयाभाव बाळगावा. लोभ, मान, क्रोध, माया या मोक्षमार्गातील शत्रूंना कसे दूर ठेवावे, त्यांच्यापासून काय नुकसान होते, याचे विवेचन करून निःस्पृहता, ब्रह्मचर्य, इंद्रियदमन यांचे महत्त्व विशद केले आहे.

एकंदरीत संतांच्या, गुणिजनांच्या संगतीने आणि गुरुपदेशामुळे लाभलेल्या मनुष्यजन्माचे सार्थक कसे करावे, या बद्दल अनेक उदाहरणे देऊन विवरण केले आहे. दुर्लभ मनुष्यजन्म लाभला असताना स्वधर्म साधना न करणे म्हणजे जन्म व्यर्थ घालविणे आहे. धर्म अनुसरणे सोडून विषयसुखाच्या मागे धावणे हा मूर्खपणा आहे. असा मूर्खपणा न करण्याबद्दल वारंवार वेगवेगळी उदाहरणे देऊन सांगितलेले आहे.

ग्रंथ अतिशय उत्तम, तत्त्वार्थबोध करणारा आहे. भाषा साधी, सोपी मराठी (त्या काळातली प्राकृत) आहे. सामान्यांच्या मनातील अज्ञानाचा अंधकार दूर करण्याचा उत्तम प्रयत्न लेखकाने केला आहे.

जिनमत, जिनसंग, सज्जन, निःस्पृह गुरू यांच्याबद्दल भरभरून सांगितले आहे. अहिंसातत्त्व आणि इंद्रियदमन यांचे माहात्म्य वर्णन करून मोक्षमार्ग सुलभपणे कसा अनुसरता येतो हे विशद केले आहे.

वरीलप्रमाणे सर्व गोष्टी जरी श्रावकाने केल्या तरीसुद्धा मोक्ष मिळविण्याचा दृढ निश्चय आणि त्यासाठी करावी लागणारी एकाग्रता, आत्मबोध सर्वाधिक महत्त्वाचाच होय, हे पण स्पष्ट केले आहे. आत्मबोधाशिवाय सर्व साधना व्यर्थ ठरू शकते. साधनेमुळे धन, संपत्ती, सुख-समृद्धी, प्रतिष्ठा लाभू शकते; परंतु निःस्पृह होऊन इंद्रियदमन करून आत्मबोध करून घेऊन एकाग्रतेने भावना अभिव्यक्त करण्याची नितांत गरज असते. तरच मोक्षप्राप्ती होऊ शकते, हे धर्मसार व्यक्त झाले आहे.

**'सूक्तिमुक्तावली' हस्तलिखित प्रतीविषयी**

प्रस्तुत हस्तलिखिताच्या दोन प्रती सापडल्या. पैकी पहिली प्रत शके १७३४ (इ.

स. १८१२) ऐनापूरचे उपाध्ये धामोधरन पुत्र नेमाप यांनी लिहिलेची कन्नड भाषेत मराठी लिपीत सांगितले आहे. कार्तिक शुद्ध अष्टमी बुधवार या दिवशी हा ग्रंथ लिपिबद्ध केल्याचे सांगितले आहे, परंतु नेमाप हा लिपिकर्ता आहे. दुसरी प्रत माझ्या गावी मजले (ता. हातकणंगले जि. कोल्हापूर) येथे श्रीपाल देविंद्रा उपाध्ये यांनी स्वहस्ते लिहिल्याचे सांगितले असून मिती ज्येष्ठ शुद्ध १ शके १८४६ म्हणजे १ जुलै १९२४ रोजी प्रारंभी ओंकारपद्धती सांगून हा ग्रंथ समाप्त केल्याचे सांगितले आहे. वरीलप्रमाणे हस्तलिखिताच्या दोन प्रती सापडल्या असून या ग्रंथाचा कर्ता मधुकराया हा स्वतः विजयसिंव्हाचार्य यांचा शिष्य असल्याचे सांगतो. मूळ ग्रंथ आचार्य सोमप्रभ यांचा असून आचार्य सोमप्रभ यांचा काळ व कर्तृत्व पुढे सांगितले आहे. ऐनापूर मंदिरात लिहिलेल्या हस्तलिखित प्रतीत १४० पत्रे आहेत. तर मजले येथे लिहिलेल्या हस्तलिखित पत्रांची संख्या १०३ आहे. दोनही हस्तलिखित प्रती अगदी सुस्थितीत असून ओवी छंदात हा ग्रंथ लिहिला आहे.

हा ग्रंथ टीकात्मक स्वरूपाचा असून मूळ ग्रंथातील संस्कृत श्लोकावर मऱ्हाष्ट भाषेत टीका केल्याचे सांगितले आहे. एकूण ९६ संस्कृत श्लोकांवर २१ अध्यायांत हा ग्रंथ लिहिला आहे. ग्रंथाच्या पत्रावर दोन्ही बाजूला समास सोडला असून समास रेघांनी बंदिस्त केला आहे. मजले प्रतीमध्ये समासावर पानाफुलांची, वेलीची नक्षी असून प्रत्येक अध्यायाच्या समाप्तीनंतर अध्यायाचे शीर्षकसार व नक्षीदार समाप्ती आली आहे. मजले प्रतीत तपाचाराचे महत्त्व सांगणाऱ्या अध्यायानंतर एक मुनी उपसर्गाचे चित्र लिपिकर्त्याने काढले आहे. मजले प्रतीची भाषा अलीकडची व अद्ययावत असून लिपीची अक्षरे आधुनिक आहेत. ऐनापूर प्रतीमध्ये लिपी, भाषा व वर्णाचे वळण हे मध्ययुगीन असल्याचे जाणवते. ओवी संख्या व श्लोक संख्या सांगणारे अंक हे मध्ययुगीन वळणाचे आहेत. ऐनापूर प्रतीत दोन रंगांची शाई वापरली असून ओवी समाप्तीनंतर व अध्याय समाप्तीनंतर तांबडी शाई वापरली आहे. ऐनापूर प्रतीच्या शेवटी कोणी अलीकडच्या व्यक्तीने या ग्रंथात न आलेला श्लोक पेनाने लिहिला असून 'श्री फलठणनगरी।। आदिनाथ चईताले।। श्री धरमशेन मुनुी श्रुतमुक्तावली टिका।।' असा मजकूर आला आहे. यावरून फलटण येथे धरमशेन मुनींनी याची एक प्रत लिहिली असावी, असे वाटते. यांपैकी एक प्रत बाहुबली येथील अनेकांत शोधपीठात उपलब्ध झाली आहे.

विजयसिंह आचार्यकृत शके १७३५ (इ. स. १८१३) ला हा ग्रंथ लिहिला आहे. ग्रंथाचे एकूण अध्याय व त्याचा सारांश पुढीलप्रमाणे -

**प्रथम अध्याय -**

संस्कृत श्लोक - १ - 'सिंदूर प्रकरः तपः करिशिर क्रोडी कषा' प्रारंभी वीतराग, आदिनाथ, अजितनाथ यांना वंदन केले आहे. पार्श्वनाथ स्वामींच्या चरणावरील सूर्यकिरणांच्या प्रकाशाने अवघे भुवन भरले असून अपार कांती शोभते आहे. सिंदूर रज झळाळताहेत. ते चंद्रमंडळासम भासत आहेत. जंगलात वणवा पेटून त्याची प्रभा चहूकडे प्रकाशमय व्हावी, तसे क्रोध, लोभ, माया, मान यांचे दहन करण्यासाठी आणि अज्ञानाचा अंधकार दूर करण्यासाठी बोधप्रकाश देणारा सूर्य उगवला आहे. देव व नर यांची पावले फुले, पाने, फळे यांच्या रूपाने भाविकांना कल्पवृक्ष होऊन देत आहेत. (११ ओव्या)

श्लोक २ - इष्टदेवता, साधू, संत सर्वांना प्रसन्न होण्यासाठी विनवणी. कमळाचा सुवास वाऱ्याशिवाय कसा पसरणार? त्याप्रमाणे संतांशिवाय तत्त्वविचार कोण प्रगट करणार? सज्जन चांगली दृष्टी असणारे ज्ञानी असतात. म्हणून त्यांना प्रार्थना करावी. ग्रंथकर्त्याचा अंतरार्थ प्रकट करण्याचा प्रयत्न करतो आहे (१२ ते २२ अशा १० ओव्या).

श्लोक ३-४ - अनेक जन्म हिंडताना मनुष्य जन्म लाभला. उत्तम अशा वेळी धर्मार्थकाम साधला नाही, तर जन्म व्यर्थ गेला. पशुवत जगणे झाले असे सत्पुरुष म्हणतात. मनुष्य जन्मात येऊन धर्मासारखे रत्न मिळवले नाही तर ते माकडाने मिळालेला चिंतामणी सागरात टाकून द्यावा, तसेच होईल. धर्म पारखून घ्यावा. पंचधातूमध्ये सोने जसे सर्वश्रेष्ठ, तसा अहिंसा हा श्रेष्ठ धर्म होय. कोळी मच्छिमार हिंसेलाच धर्म म्हणतात. दूध, रुईचा चीक, ताक पांढरे शुभ्र असतात, परंतु त्यात खूप फरक असतो. फरक ओळखून धर्म पारखून घ्यावा. अहिंसा धर्म सर्वांना वंद्य आहे. ज्ञानी माणसाने हिंसा धर्म वर्ज्य मानावा. दशलक्षणी धर्मामुळेच सुख मिळते. तो मोक्ष देण्यास मदत करणारा अहिंसा धर्म आहे. दुसरा धर्म नाही (२३ ते ३७ - १५ ओव्या)

श्लोक ५ - मनुष्यजन्मास येऊन स्वधर्म साधना न करणे म्हणजे जन्म व्यर्थ घालविणे आहे. आयुष्य कणाकणाने संपत असते. सावध असावे. धर्म अनुसरणे सोडून विषयसुखासाठी प्रयत्न करणारा मूर्ख होय. रत्नजडित सुवर्णपात्र उकिरड्यावर

फेकण्यासारखेच हे वागणे होय. स्वतःच्या घरातील अमृत पिऊन तृप्त होण्याऐवजी त्याने पाय धुणे हा अनर्थ होय. ऐरावतसारखा हत्ती मिळाला तर त्यावरून लाकडे वाहण्याचाच हा प्रकार होय. धर्म सांडला तो मूर्ख होय. त्याला स्वहित कळत नाही. चिंतामणीसारखे रत्न मिळाले तर त्याचा कावळ्याला उडविण्यासाठी दगडासारखा उपयोग करणारा मूर्खच नाही का? मतिहीनपणाचे लक्षण होय. मानव जन्मास येऊन स्वधर्म ज्याने केला नाही, तो वरीलप्रमाणे मूर्ख होय (३८ ते ४७ - १० ओव्या).

श्लोक ६ - ते धतूर तरुं - मनुष्यजन्मास जो आला, तो धर्माविण वाया गेला. त्याने कल्पवृक्षच उपटून टाकला. चिंतामणीसारखे रत्न फेकून काचेचा मणी घेतला. धर्मासारखे रत्न टाकून पाप करी. धर्माशिवाय संसार करणारा पशुसारखा नर होय. पशुपक्षी, जलचर सर्वचजण संसार करतात. मात्र माणसाने जीव वचन प्रमाण मानून धर्म अंगीकारून संसार करावा. त्यामुळे दुःख तुटून सुख प्राप्त होईल. (४८ ते ५७ - १० ओव्या).

श्लोक ७ - अपारे संसार - या भवसागराचा आदि-अंत कळत नाही. त्यात दुःख भरलेलेच आहे. दुःखाच्या या अनेक राशी जिवाला भोगाव्याच लागतात. चौऱ्याऐंशी लक्ष योनीचे कित्येक कोटी फेरे फिरावे लागतात. सागरात बुडत असताना अवचित सापडणारे अलौकिक जहाज सोडून जो दगड (पाषाण) धरू इच्छितो, तो खऱ्या अर्थाने स्वहिताला अंतरला, असेच म्हणावे. सापडलेल्या जहाजात बसून पैलतिरी जाणे हा विवेक बाळगावा. दुर्लभ नरदेह लाभला आहे, तर अहिंसाधर्म घेऊन मोक्षसुखाकडे जावे, हे उत्तम होय. (५८ ते ६७ - १०ओव्या).

इति नीतिदृष्टांत कथनरूप श्लोक समाप्त केला आहे. प्रथम अध्यायात धर्माचे महत्त्व व अज्ञानाने धर्मापासून दूर जाणाऱ्या माणसांचे वर्णन आले आहे.

**द्वितीय अध्याय**

श्री पारिश्वनाथाय नमः। श्री संभवनाथाय, अभिनंदनाय नमः।

इतके झाल्यानंतर श्रोत्यांनी हात जोडून विचारले, ''स्वामी, हा दुर्धर संसार कसा तरावा? भवसागर सुखाने पार करण्यासाठीची नौका/उपाय सांगा.''

श्लोक ८ - भक्ती तीर्थंकरे ... श्रोते हो, मन शुद्ध करून लक्षपूर्वक ऐका. साधुजन, नर नानाजातीचे सुखासाठी धडपडतात. संसारदुःखाला भितात. मोक्षसुखाची

इच्छा करतात. त्यांनी तीर्थनाथांची जो तीर्थांचा ईश्वरी अंश आहे, त्याची (अरिहंतदेव) भक्ती करून जीवनाचे सार्थक करावे. अर्हंताच्या भक्तीने अक्षय सुख लाभते. अशुभ निर्दाळले जाते. सकल मंगल घडते. भक्ती हा सर्व साधनांचा आधार आहे. मुक्तीचे माहेर आहे हे निश्चित जाणा. जिनभक्ती ही कामधेनू आहे. नाना रत्नांपैकी श्रेष्ठतम रत्न आहे. शंकातीत होऊन जिनमताची, जिनऋषीची, जिनसंगाची भक्ती करणाऱ्यास सकळ सौभाग्य प्राप्त होते. अंती मुक्तीचाही लाभ होतो. ऐका, संग म्हणजे कोण? जिनमताचे रुषीगण ज्यांना इंद्रादिक देवसुद्धा वंदन करतात, तपाचार पाळणाऱ्या आर्यिका त्या श्रावकामध्ये धर्मप्रसाराचे काम करून श्रावकांना भक्ती/व्रत करावयास शिकवतात. त्यांचे अंतरंग पवित्र आहे. अहिंसाधर्माचे पालन भक्तीने, निष्ठेने करावे. सर्व जिवांना आपुल्यासम समजावे. सदा सत्य बोलावे. अचोरी व्रत पाळावे. सापडलेली वस्तूसुद्धा घेऊ नये. ब्रह्मचर्यव्रत हे सर्व व्रतांमध्ये श्रेष्ठ (शिरोमणी) आहे. त्याच्या पालनामुळे मुक्तिकांता वश होते (मुक्ती मिळते). सर्वदा निःस्पृह असावे. क्रोध, माया, लोभ, मान यांना सोडावे (त्यजावे). दुर्जनांची संगती नको. दुर्गुण त्यागावे. चित्तशुद्धीचे बारा तप करावे. उदास वृत्ती, चित्ती वैराग्य राखावे. यामुळे आशा, पाश सहज तुटतात. मोक्षसाधना करताना हे सर्व केलेच पाहिजे. नाही तर चतुर्गती भ्रमण होईल. चुकणार नाही (१ ते ३३ ओव्या).

श्लोक ९ - पापं लुंपति... घातीकर्मातून मुक्त, अठरादोष विरहित असा अरिहंत देव जाणावा. अठरा दोष - क्षुधा, तृष्णा, जन्म, मरण, चिंता, विद्, विस्मय, राग, मोह, भय, क्षोभ, रति, आलस्य, निद्रा, प्रखेद, मंतरजा. अरिहंताची विधिपूर्वक मनोभावे पूजा केल्यास पापमळ जातो. दुःखाचा नाश होतो. घोर दुर्धर दुःख जाते. सकळ वैभव प्राप्त होते. आरोग्य लाभते. सौभाग्य लाभते. दुर्भाग्याची दृष्टीच पडत नाही. सूत्रोक्त अरिहंताची पूजा केल्यास मानवाच्या हातात मोक्ष येतो (३४ ते ४८ ओव्या).

श्लोक १० - स्वर्गंतस्य गृहांगणं - जो भक्त अरिहंताची पूजा करतो, त्याला सर्व सौभाग्य, गुण इत्यादी प्राप्त होतात. मानव जन्म सुखाने भोगत तो स्वर्गात जातो. त्याला लक्ष्मीची साथ लाभते. दुःखाचा संसार तो सहज पार करू शकतो. जिनेश्वराच्या पूजनाने त्याच्या कर्माचे भंजन होते. तो मोक्षसुखाचा अधिपती होतो. त्रिकाळी जिनपूजा करणारा पुण्यवान पुरुष होय. या धरतीवर इतर कवींनी देवपूजेचे, सद्गुरूचे वर्णन काय करावे (३४ ते ५८ ओव्या).

श्लेक ११ - अरिहंताची पूजाअर्चा करणाऱ्या व्यथा पळून जाते. दुःख, शोक त्याच्या वाट्याला येतच नाही. दारिद्र्य जातेच. सिंहाला बघून हत्ती जसा पळून जातो, त्याप्रमाणे कर्म पळून जाते. विरक्त कन्या जशी पुरुषाला बघून दूर जाते, चंद्राला बघून समुद्राला भरती येते, त्याप्रमाणेच सुखाचा सागर त्याला भेटतो. डोक्यावर छत्र घेतल्याने शांत सावली मिळते. गात्रे शांत होतात. त्याप्रमाणे जिनप्रतिमेच्या सहवासात परम सौख्य लाभते (५९ ते ६८ ओव्या - १० ओव्या).

श्लोक १२ - जिनेंद्राला पुष्पे अर्पण केल्याने भरपूर पुण्य प्राप्त होते. अनंत सौख्य प्राप्त होते. जिनेश्वराची स्तुती केल्याने, अंतःकरणात त्याचे रूप धारण केल्याने पापे नाहीशी होतात. स्वयं होऊनी ब्रह्मरूप योगी त्याचेच ध्यान करतात (ओवी क्र. ७५). अशा प्रकारे जिनभक्ती सांगून मग गुरुभक्ती सांगतो

**तृतीय अध्याय**

श्री सुमतीनाथाय, प्रद्मप्रभ यांना नमन करून गुरूचे महत्त्व सांगितले आहे.

श्लोक १ (१३) - अनंत जन्म फिरून लाभलेला मनुष्य देह गुरुशिवाय व्यर्थ. गुरू पारखूनच करावा. ज्याने संसार, परंपरा तोडली आहे, भवार्णव पार केला आहे, तोच दुसऱ्याला तारू शकतो. त्याला आत्मज्ञान असले पाहिजे. (काहीजण) कुटुंबाचे पोषण करण्यासाठी साधुपणा दाखवून शिष्यांकरवी द्रव्य मिळवितात. तंत्रमंत्र करून द्रव्य हरण करतात. असा गुरू केल्याने भवसागर पार होत नाही. सैरावैरा असा गुरू केल्याने कर्मफेरा चुकत नाही. समर्थ आणि तत्त्वार्थ जाणणारा गुरू केल्यास परमार्थ प्राप्त होतो. ज्याचे अंतःकरण स्फटिकासारखे शुद्ध असते, निर्मळ असते, जो स्वस्वरूपी लीन असतो, तो गुरूच शिष्यांना भवसागर पार करून देतो. असा गुरू तपाचरण व चारित्र्यपालन करतो. त्याला शत्रुमित्र समान असतात. माती, सोने सारखे मानतो. तो भवदुःखाचे निवारण करतो. उपदेश करतो. सर्व प्राणिमात्रांवर प्रेम करतो. कृपाळू असतो. निश्चयाचा मेरुमणी, आनंदाचा मेघ होऊन वर्षतो. असा गुरू भेटल्यास दर्शनाचे जन्मोजन्मीचे पाप नष्ट होते. अज्ञानाचा अंधकार नष्ट होतो. प्रेमाने कुमती (वाईट बुद्धी) सांडावी. दया करावी. पुण्य मिळवावे असे सांगतो. सुमतीचा मार्ग दाखवतो. दुःख निवारतो. गुरूशिवाय तारक कोणीही नाही.

श्लोक २ (१४) - गुरू निर्दोष मार्गाने चालतो. त्याचा भाव उदास, निःस्पृह असतो. तसाच बोध तो शिष्यास देतो. आपण स्वतः सिंधू तरून जातो. इतरांना देखील त्याचा उपाय सांगतो. म्हणून त्याचे पाय धरावे. रत्नत्रय भावना संपूर्ण असून यासीच संत गुरूचे पूजन करतात. गुरुपदाचा अंगीकार केल्यास कर्मक्षय होतो. नरककुपातून गुरूशिवाय कोण बाहेर काढणार? दुसरा कुणीच नाही. म्हणूनच शुद्ध, ज्ञानवंत, तत्त्व प्रकट करणारा समर्थ गुरूच करावा (ओवी ४१).

श्लोक ३ (१५) - गुरू धर्म अधर्म, पापपुण्य यांतील भेद स्पष्ट करून ताप (त्रास) हरण करतो. गुरूशिवाय सर्व नातेवाईक असूनही नरकयातना चुकत नाहीत. गुरूच चुकवू शकतो. गुरूच तारतो. गुरू आज्ञेशिवाय सर्व गुण निष्फळ होत. जैसे फल धान्यावीण पशू भक्ष जैसे.

श्लोक ३ (१६) - गुरूच्या आज्ञेशिवाय, अनुग्रहाशिवाय केलेले ध्यान, तप, विषयत्याग सर्व निष्फळ होय. गुरुपदेशाशिवाय अंतःकरण शुद्ध होत नाही. गुरूशिवाय आराधना होऊच शकत नाही. अंतरभ्रम जात नाही. यासाठी गुरुपदी जिनध्यास असावा. भक्तीने, श्रद्धेने गुरूला शरण जाऊन, विनवून, सम्यक्ज्ञान गुरुमुखातूनच घ्यावे. जन्माचे सार्थक करावे. विवेक बाळगून ज्ञानसंपन्न गुरू मिळवावा (ओवी ६६).

**चतुर्थ अध्याय**

सुपार्श्वनाथांना नमन करून भक्तीचा महिमा येथे सांगितला आहे.

श्लोक १ (१७) - जिनवचन ही डोळ्यांनी बघण्याची गोष्ट नाही. आंधळा जग पाहू शकत नाही. सूर्य रात्र पाहत नाही. तसेच जिनागमाशिवाय सुदेव-कुदेव, सद्गुरू-कुगुरू, पाप-पुण्य हे कळतच नाही. जिनशास्त्राशिवाय धर्म-अधर्म कळत नाही. जिनवचनाशिवाय जिनगुणाचे अंतरंग समजत नाही. कृत-अकृत्य, कार्य-अकार्य, सुगुण-दुर्गुण, सम्यक्त गुण हे कळत नाही. जिनागमाशिवाय हित-अहित, विवेक कळत नाही. आत्मघात होतो. डोळे असून अंध, परमार्थ कसा साधावा, हे न कळल्यामुळे जगणे लाकडी बाहुलीसम होते.

श्लोक २ (१८) - सर्वज्ञांची शास्त्रवाणी ज्यांच्या कानी पडत नाही, त्यांचे जीवन व्यर्थ. वाळलेल्या वृक्षातल्या ढोलीसारखेच हे कान. प्रेताच्या नेत्रासम डोळे. जिनागमाचा

दयारस ज्याने चाखला नाही त्यास गुण-दोषांतला भेद कळत नाही. सर्वज्ञ आगम रस कानी पडला नाही, त्याचा जन्म निष्फळ. जिनशास्त्राशिवाय अगाध भवसिंधु कसा तरणार? तो स्वानंद सुखाला मुकणार. दुःखाला पात्र होणार, असे बुद्धिवान म्हणतात.

श्लोक ३ (१९) – जिनदर्शन सर्वश्रेष्ठ. पर्वतामध्ये मेढ श्रेष्ठ, अमरलोकांत इंद्र श्रेष्ठ, तारासमूहात सूर्य श्रेष्ठ. तसे जिनमत सर्व दर्शनांत श्रेष्ठ. जिनदर्शनाची तुलना इतर दर्शनांशी होऊच शकत नाही. अमृत-विष सारखे कसे होतील? अग्नी आणि पाणी सारखे नाहीत. फुलांची माला व सर्प सारखे नाहीत. चिंतामणी इच्छापूर्ती करणारा त्याला काळे ढेकूळ का म्हणावे? डोळ्यांना भ्रम झाल्याचे हे लक्षण. माळावर पडलेल्या गारा रत्नासारख्या दिसल्या तरी ती रत्ने नव्हेत. अहिंसा धर्माची बरोबरी कशाशीपण होऊ शकत नाही. म्हणून साधुसंत सदा जिनेंद्रमताचे सेवन करतात. जिनमताचे सेवन केल्याने काय होते? ते सांगावे.

श्लोक ४ (२०) – जिनमताचा महिमा मोठा. सगळे विश्व प्रकाशमय करणाऱ्या सूर्यासारखे जिनमत. पापाचा नाश आणि पुण्याचा विस्तार करते. दुर्गती देणाऱ्या मद, मत्सर, माया, लोभ, यांचा नाश करते. मिथ्या मत, विपरीत बुद्धी यांचा नाश वडवानलाप्रमाणे भस्म करते. जिनमतामुळे मनात कृपा, दया, करुणा उत्पन्न होते. आशा, तृष्णा या सर्पिणी अंतःकरणाला सदा दंश करतात. जिनमतरूपी गारूड त्यांचे निर्विष करते. अशा सर्वश्रेष्ठ जिनमताचे स्वाध्यायाने जो नित्य पारायण करतो, त्याचा जन्म कृतार्थ झाला. जिनमतामुळे विघ्ने दूर जातात. स्वसुख भोगता येते (५०). असे जिनमताचे महत्त्व सांगितले आहे.

**पंचम अध्याय**

श्री चंद्रप्रभ तीर्थंकरांना वंदन करून जिनसंघाचे अनुसंधान या अध्यायात सांगितले आहे.

जिनमताचा महिमा सांगून समाधान केलेत. आता जिनसंघाचे संबंध (अनुसंधान) सांगावे, ही विनंती शिष्य करतो.

जिनसंघामुळे भवाचा पाश सुटून मोक्षसुखाचा लाभ होतो. गुणस्तोत्र सांगण्यासाठी चारी सूत्र रचिले आहे. बुडत्या जहाजाला जिनसंघच तारतो.

श्लोक १ (२१) – संघामध्ये संपूर्ण सद्‌गुण असतात. जसे आकाशात पक्षी, चंद्र,

सूर्य, ग्रह, तारे, प्रकाश असतात. संघात उत्तम सग्रम गुण असतात. कमळाने सरोवर जसे शोभिवंत दिसते, तसे संघ संतामुळे दिसतो. संघ समुदाय जिनेश्वराचे पूजा विधान करवून पुण्य जोडतात.

श्लोक २ (२२) – 'ऐका संघाचे लक्षण, शुद्ध ज्याचे अंतःकरण', ज्याची देहभोगाबद्दल विरक्ती, वृत्ती तटस्थ, नित्य स्वरूपाचा अभ्यास, मोक्षसुखाचे ध्यान, चित्त दृढ करून शुद्ध चित्ताने, एकांतात राहून मोक्षमार्गाचे चिंतन करतात, ते संत होत. संघाशिवाय दुसरा पवित्र पदार्थ नाही. देववृंद नमस्कार करतात. संतसंघाचा समागम केल्यास संसारभ्रम तुटतो. कीर्ती पसरते. पुण्यराशी जमतात. संतजनाचे पूजन हे सर्वार्थ साधन आहे.

श्लोक ३ (२३) – संतसंघ ही पुण्यराशी होय. संघाची पूजाभक्ती करणाऱ्यासमोर लक्ष्मी हात जोडून उभी राहते. भावे पुजता पाप नाश होय, मति प्राप्त होय उत्कर्ष. संतसंघाचे पाय सेविता घोर दुष्कर्मांचा शीघ्र नाश होतो. संघभक्तीचा महिमा अपार. अंकुरलेले भात तृणासम दिसले तरी नंतर कण प्राप्त होतात. तसेच संघभक्तीचे आहे.

श्लोक ४ (२४) – संतसंघभक्तीचे गौण फळ संपत्तीवैभव मात्र मुख्यफळ ते मुक्तिपती. असा त्याचा महिमा वर्णन करण्यास बृहस्पतीची वाचा थकली. साधुजनांची सेवा केल्याने सेवकाचा अभ्युदय होतो. पापहरण होते. गृह पवित्र होते. जिनसंघाचे चरणामृत ज्याच्या मंदिरात (घरात/हृदयात) पडत नाही, त्याने नावलौकिक घालविला म्हणावे. संत परोपकार करतात. निष्काम राहतात. नदी वाहते. वृक्ष फळे देतात. ते निष्कामपणे. त्याप्रमाणेच संघ असतात. गाय निसर्गनियमानुसार दूध देते. त्याप्रमाणे संत चतुर्विध संघाचे भले व्हावे म्हणून काम करतात. जिनसंघाची भक्ती का करावी, हे श्रोत्यांना सांगून शत्रुपरंपरा जिंकण्यासाठी सूत्र रचिले. अशा प्रकारे जिनसंघाचा महिमा सांगितला आहे.

**षष्ठम अध्याय**

श्री पुष्पदंताय नमः। संघाचे महत्त्व जाणल्यावर श्रोत्यांनी व्रतविधानाचे महत्त्व विचारले.

श्लोक १ (२५) – कृपाळू होऊन प्राण्यांचे रक्षण करतो. त्या उत्तम पुरुषाच्या

अंतःकरणात दयाभाव असतो. त्यामुळे व्यसनांचा दावाग्नी जळतो. दुःखराशी नाहीशा होतात. महाप्रचंड प्रबळ मेघाने दावानळ (वणवा) सहज विझवावा, त्याप्रमाणे लक्ष्मी त्याची दासी असते. सुखसमृद्ध साम्राज्य भोगतो. दयाभाव ही स्वर्गात जाण्याची शिडी आहे. संतांशिवाय त्रिभुवनात कोणी पुण्यवान नाही. चतुःसंघाचा पदस्पर्श झाल्याने पर्णकुटी, घाम पवित्र तीर्थासम होते. कृपेसारखा उत्तम गुण नाही. तो सर्व सुखाचा सागर आहे. ज्याच्यापाशी दया आहे, त्याला कोणाचाच उपद्रव होत नाही. त्याला कसलाच त्रास नसतो.

श्लोक २ (२६) - सर्वांवर दया करावी. मतिमूढ मात्र प्राणिविध करून पुण्य जोडतात. पैसे देऊन पाप घेतात. महोत्सवात जीवहत्या करून जीवनाचे सार्थक झाले म्हणतात. पण दुसऱ्या जिवाला मारून यांना कसे पुण्य मिळणार? तेव्हा हे सर्व बोलणे खोटे होय. जीवहत्येने पुण्य होत नाही, हेच सत्य होय. अग्नीचा गुण उष्णच थंड कधीच नाही. घरा पृथ्वी चराचराला आधार देते. तेव्हा मंत्र-तंत्र, यज्ञयाग जर हत्या करायला सांगत असतील, तर ते कुशास्त्र होय. ते अज्ञ (लोक) आहेत.

श्लोक ३ (२७) जीवहत्या करून त्याला धर्म म्हणतात. हे एक आश्चर्यच आहे. डोळ्याचा आजार झाला म्हणजे सर्व उलटे, विपरीत दिसते. तसे पापकर्माचा उदय झाला किंवा अहंकार वाढला की, विवेक जाऊन भलते सलते जाते. जीवहत्या हा धर्म म्हणणे ही भ्रांती होय. डोळ्याला झापड आल्याचे लक्षण होय. सापाच्या तोंडात हात घालून दिव्यामृत काढतो म्हणणे हा आत्मघात आहे. मतिमंदांना भेद कळत नाही. पुण्य समजून जीवहत्या करतात. त्यांची दुर्गती नक्की. अग्नीत कमळ उगवणे, सर्पमुखात अमृत मिळणे हे जसे अशक्य, तसेच जीवहत्या करून पुण्य मिळणे अशक्य. प्राण गेला तरी जीवहत्या (हिंसा) करू नये. अहिंसा व्रतच सर्व सुखाचे आगर आहे (४९).

श्लोक ४ (२८) - दयायुक्त मन असणाऱ्याला उत्तम गोत्र लोकाधिपत्य, जगमित्र, उत्तम सिंहासन, आरोग्य, द्रव्य, सौख्य सर्व मिळते. त्याची दुःकर्मेजळतात. तो संसारसागर तरतो (६२). दयेने सर्व पातके नष्ट होतात. दयेशिवाय सर्व क्रियाकर्मेव्यर्थ. अहिंसाव्रतच जगात श्रेष्ठ. दया सर्व धर्माचे मूळ आहे (६५). असे अहिंसाव्रताचे निरुपण या अध्यायात केले आहे.

**सप्तम अध्याय**

श्री शीतलनाथाय नमः। अहिंसाव्रत ऐकून तृप्त झालो. आता सत्यव्रत सांगावे, अशी विनंती श्रोते करतात.

श्लोक १ (२९) - सत्य हे महाव्रत असून विश्वाचे मंदिर आहे. त्याने विपत्तींचा नाश, पापकर्माचे दहन होते. संपत्ती लाभते. सर्व सूरअसूर, यक्षकिन्नर त्याची आराधना करतात. ते मोक्षसुखाचे संचकार धन आहे. सत्यवचनी आपल्या वचनाचा भंग करीत नाहीत. सत्यव्रत म्हणजे चंद्र (शशी). त्याला बघून सागर उचंबळतो. त्याप्रमाणे सत्यवाक्याने समृद्धी होते. सत्यवानाची त्रैलोक्याशी तुलना होते. श्रोते डोलतात. अग्नी शमन होते. पाषाण तरंगतात.

श्लोक २ (३०) - असत्य वचनाचे फळ सांगतो. कीर्ती क्षणात भस्म होते. ते महादुष्ट आहे. त्याने दुःख मिळते. नरकात स्थान मिळते. धर्माचे विस्मरण करून असत्य वचन बोलणारा दरिद्री होय. त्याचा सर्वनाश होतो. समस्त अपदांचे मूळ असत्य वचन आहे. बुद्धिवंताने कधीही असत्य बोलू नये.

श्लोक ३ (३१) - नरकादी दारूण दुःख भोगावे लागते. असत्य म्हणजे कुवासनांचे मंदिर. त्याचा नरकफेरा चुकत नाही. परक्याची वस्तू हवीशी वाटते. तृप्ती वाटतच नाही. अनेक अपराध घडतात. लोक छीः थूः करतात. अशांची मैत्री सोडावी. (नाना युक्त्या करून) परोपकारासाठी असत्य बोलल्यास हिंसा टाळण्यासाठी असत्य बोलल्यास, ते क्षम्य सत्य होय. परंतु हानी होईल अशी दुर्वाणी बोलू नये. जिनवचनाला प्रमाण मानून असत्य बोलणे टाळावे. सत्य मुक्तीचे माहेर (४७).

श्लोक ४ (३२) - सत्य वचन हे अमोल रत्न. जो सत्यांकित वचन बोलतो, त्याला अग्नीसुद्धा पाणी करतो. शत्रू मित्र होतो. ईहलोकी, परलोकीसुद्धा तो वंद्य होतो. सत्यवानाचे घर दुष्ट चोरसुद्धा राखतात. सापाची पुष्पमाळ होते. सज्जन त्याचा संग करतात. सिंहाचा मृग होतो. रसातळ महाभयंकर. तिथे दुःखाच्या राशी, परंतु सत्यवानाला मुंगीच्या बिळासम भासते. धारदार तीक्ष्ण हत्यारे बघूनच चळचळ कापायला होते. पण सत्यवचनाने ते कमळ होते. असे सत्याचे बळ आहे. हालाहल विषाचे अमृत होते. सत्याने विश्व जिंकता येते. तो मोक्षमार्ग आहे. सत्य हे व्रत आहे. त्याची कशाशी तुलना होत नाही.

साधू, सज्जन कधीच असत्य बोलतनाहीत. सत्यच बोलतात (६२ ओवी).

असा सत्यव्रताचा महिमा निरुपण केला आहे.

**अष्टम अध्याय**

श्री श्रीयांसनाथाय नमः। आता आचोरि महाव्रताबद्दल सांगावे, अशी विनंती केल्यानंतर -

श्लोक १ (३३) - अचोरी व्रत पालन करणारा निभ्रांत असतो. म्हणजे अविचल असतो. कुठेही पडलेली वस्तू दिसली, सोने असले तरी त्याच्या मनात तिची अभिलाषा वाटत नाही. कुणी न देता तो काहीही घेत नाही. त्यामुळे आनंद, कीर्ती, लक्ष्मी त्याला मिळतात. त्याला दुःख नसतेच. त्याला नक्कीच सुगती मिळते. सौभाग्य लाभते. जो अभिलाषी आहे, त्याला मात्र कसलीही सिद्धी प्राप्त होत नाही. अचोरी व्रताची सर्व कार्येसिद्धीला जातात. प्राण गेला तरी धन चोरून घेऊ नये (१७).

श्लोक २ (३४) - ज्याला पुण्य हवे आहे, त्याने अचोरीव्रत पाळावे. त्याने सर्व पापकर्मांचा नाश होऊन पुण्यकर्मांचा उदय होतो. न मिळालेले (अदत्त) जो घेत नाही, त्याच्या हृदयकमळात शुभाचा आरंभ होतो. घोर अंधकार त्याला जवळचा वाटतो. सूर्यप्रकाश बघून तो दूर पळतो. लपतो. व्रत पाळणाऱ्याला विद्या, विनय, हर्ष, आनंद सहज मिळते. त्याच्या चरणावर माथा ठेवतात. तो ज्ञानवंत होतो. शिवाय लोक विश्वासाने आपले धन त्याच्या जवळ ठेवतात. अशी त्याच्याजवळ लक्ष्मी सतत राहते. नरेश्वर सन्मान करतात. सहजपणेच त्याला नवनिधी प्राप्त होतात (३२).

श्लोक ३ (३५) - जो अदत्त धनाची इच्छा करतो, त्याची गत सूर्य अस्ताला गेल्यावर प्रकाशाची जागा अंधार पटकन घेतो, तशी एका क्षणात होते. यश, कीर्ती लोपते. पुण्यनाश होतो. अधर्म घडतो. दावानळाने क्षणात सर्व वृक्ष जळून जातात. तसा धर्मनाश होतो. सर्व सुकृत्यांचे हरण होते. हिंसा गुण प्रगट होतात. शांत चित्ताने नाना युक्त्या करून हे अदत्त धन घेण्याचे टाळावे. ते अशुभ आहे (४८).

श्लोक ४ (३६) - हा तस्कर (चोरी) गुण दुसऱ्याला मनाला वेदना देणारा आहे. त्याने अनेक वाईट गोष्टी घडतात. स्वर्गात जाणाऱ्या जहाजाचे शीड मोडते. मोक्षपुराचा दरवाजा बंद होतो. दुधात मीठ पडल्याप्रमाणे होते. कस्तुरी हिंगपात्रात गेल्याप्रमाणे होते.

लोक छी थू करतात. हातपाय तोडले जातात. नीच माणसाच्या हातून मरण येते. जर चोरी गुणाचा त्याग केला, तर जीवन फुललेल्या पळसाप्रमाणे शोभिवंत होते (६२). असे पंचानुव्रतातील अचोरी व्रताचे माहात्म्य सांगितले आहे.

**नवम अध्याय**

श्री वासपूज्यनाथाय नमः

ऐकावे ब्रह्मव्रत मोक्षलाभ होय. त्वरीत तोचि अर्थ सांगतो, असे ब्रह्मचर्य व्रताचे माहात्म्य या अध्यायात सांगितले आहे.

श्लोक १ (३७) - मोक्षसुखाचे मुख्य कारण शील (चारित्र्य) आहे. ज्याने दुर्गुणामुळे शील घालविले, तो मूर्खांचा शिरोमणी होय. शीलहीन माणसाला लहानथोर सर्व अपमान करतात. आईबापांना दोष मिळतो. तो आपल्या गोत्रास काळिमा फासतो. शीलभ्रष्टास पाताळ मुळीच चुकत नाही. ज्याचे शील (चारित्र्य) हरवले, त्याच्यासाठी मोक्षदरवाजा बंद होतो. अधर्माचा वृक्ष वाढत जातो. पापकर्म वाढते. इह-परलोकी निंदा होते. म्हणून शील रक्षावे. व्रतस्थ राहावे. ब्राह्मव्रत स्वीकारावे.

श्लोक २ (३८) - तिन्ही जगात श्रेष्ठ मोल शील व्रताला आहे. शीलव्रतीला सर्वांची कृपा लाभते. त्याला समस्त कल्याणाचा उत्साह असतो. त्याचा सहवास सूर-असुरांना ही आवडतो. महा असूरही त्याची आज्ञा पाळतात. चंद्राला बघून सागरास भरती येते. त्याप्रमाणे त्याच्या सहवासाने अनेकांचा अभ्युदय होतो. शीलव्रत हे पुण्यकर्म आहे.

श्लोक ३ (३९) - मनाचा पक्का निर्धार करून जो शील स्वच्छ निर्मल ठेवतो, त्याचा महाकाळालादेखील धाक वाटतो. महाजन (उच्च पदस्थ)सुद्धा त्याचा सन्मान करतात. धनवान त्याला दान देऊ इच्छितात. साधु त्याचा संग इच्छितात. शीलव्रताचे पालन करण्याने अनेक उपसर्ग जातात. संसारपाश तुटतात. वैभव मिळते. पदवी (श्रेष्ठत्व) मिळते. स्वतः मोक्षलक्ष्मी त्याला वरते. माळ घालते (५०).

श्लोक ४ (४०) - शिलाचा महिमा असा मोठा की, घोर सागर सरोवरासम बनतो. घोर अरण्य मंदिरासम होते. शिलामुळे अनंतमती जगविख्यात झाली. शीलव्रताची तुलना कामधेनू, कल्पवृक्ष, चिंतामणी या कुणाशीही होऊ शकत नाही (६५). असे पंचानुव्रतातील ब्रह्मचर्य व्रताचा महिमा सांगितला आहे.

**दशम अध्याय**

आता निस्पृहाव्रत (अपरिग्रह) सांगावे. अशी विनंती केल्यावर अपरिग्रह व्रताचा महिमा या अध्यायात सांगितला आहे.

श्लोक १ (४१) - परिग्रह म्हणजे अंगीकार केला की, चित्त स्थिर राहात नाही. अनेक विकल्प होतात. सतत हे हवे, ते हवे असे वाटतेच. परिग्रह मदनमत्त होऊन धर्माचे तरू उपटून टाकतो. लोभ वाढतो. सारासार विवेक नष्ट होतो. तृष्णेचा महापूर येतो. यम नियम बाजूला पडतात. म्हणून महासमर्थ (संत) परिग्रहाचा त्याग करतात. परिग्रह टाळून निःस्पृह असावे. लोभ मित्राच्या आहारी गेल्यास आशा वाढते.

श्लोक २ (४२) - परिग्रहामुळे व्यसनांना आश्रय मिळतो. तस्कर (चोर) वाटमारी करणारे अंधार पडताच आनंदाने आपले काम सुरू करतात. त्याप्रमाणे परिग्रह केला की, सर्व दोष येतात. पापराशी होतात. देहभोग आसक्ती वाढते. सर्व गुण नष्ट होतात. शांत स्वभाव, कोमल अंतःकरण, विनय, शुभ-अशुभ विवेक हे गुण जातात. पैशांवरचे प्रेम वाढते.

श्लोक ३ (४३) - परिग्रहाचा चमत्कार असा - याचकवृत्ती वाढते. संतापी वृत्ती वाढते. बुद्धी नीच होते. मित्रभाव उरत नाही. द्वेषादी कुभाव वाढतात. ज्ञानरूपी सूर्यकिरण परिग्रह करणाऱ्याला दिसत नाहीत. दुर्बुद्धी होते. शांतरस शोषलाच जातो. रौद्ररसाचा उठाव होतो. अहंकार, अहंभाव वाढतो. अशा प्रकारे परिग्रह महाशोकाचे कारण होतो. तो दारूण अग्नीच होय. कलहबुद्धी वाढते. तेव्हा विवेक बाळगून निःस्पृह राहावे (४५).

श्लोक ४ (४४) - थोडासा जरी परिग्रह केला तरी चित्ताला तृप्ती नसते. तृष्णेचा वृक्ष वाढतोच. अग्नीत लाकडे, तूप टाकता ज्वाला भडकते. तसेच सागरात तरंग उठावे, तसे मनात सतत आशेचे, तृष्णेचे तरंग उठतात. परवस्तूचा लोभ वाटतो. चित्त तृप्त, स्थिर होतच नाही. यासाठीच संत महात्मे वैभव, संसार सोडून स्वस्थपणे ध्यानधारणा करतात. मन शुद्ध करून समाधानात राहतात. सारांश असा की, परिग्रहाचे विष त्यजावे (६२). असे पाच अनुव्रतांचे महत्त्व दहाव्या अध्यायापर्यंत सांगितले आहे.

**एकादश अध्याय**

श्री अनंतनाथाय नमः। अणुव्रताचा महिमा समजला. आता क्रोध गुणाने काय

होते, ते सांगावे. क्रोध न करता स्वहित कसे साधावे, का साधावे? ते सांगतो.

श्लोक १ (४५) – कोप दुष्कर्मांचा बाप. त्यापासून पाप उपजे. कोपाने ज्ञानरूपी सूर्याचा लोप होतो. सापाला बघून बकरी शेळी भितात. त्याप्रमाणे क्रोधाला सामान्य माणसे घाबरतात. संतोषवन क्रोध क्षणात नष्ट करतो. भ्रष्ट विचार जसा संवेदनशीलता (चेतना) नाहीशी करतो, तसा क्रोध चैतन्याचा विनाश करतो. क्रोध हा महाखळ आहे. तो समूळ नष्ट करावा (१६).

श्लोक २ (४६) – तपाचाराने वाढविलेला पुण्याचा वृक्ष शाखा उपशाखाने विस्तारला तर इच्छित फल होतो. त्याला वैभवाची फुले येतात. परिमल पसरतो. तो जणू कल्पवृक्षच असतो. संसारदुःखे दूर करतो. उत्तम छाया देतो. अज्ञान अंधकार नाहीसा करतो. प्रयत्नपूर्वक वाढविलेला हा उत्तम वृक्ष क्रोधाग्नी नाहीसा करतो. तेव्हा परमार्थाची साधना करणाऱ्याने क्रोध सोडावा (३१).

श्लोक ३ (४७) – क्रोध चतुर्गतीचे फेरे फिरायला लावतो. क्रोधासारखा दुर्धर रोग नाही. तो क्लेश देणारा आहे. तेव्हा त्याचे निर्मूलन करावे (४६).

श्लोक ४ (४८) – क्रोध स्वधर्माचा तरू जाळतो. क्रोधाचे करावे हरण, चुके जन्ममरण. सरोवरात उमललेली कमललता मनोहर दिसते आणि आनंद देते. मात्र मदोन्मत्त हत्ती ती उचकटून टाकतो. तसे क्रोध मानससरोवरातील उत्तम विचारांची सुमने नष्ट करतो. क्रोधाचा वारा शांतामृत नासवतो. क्रोध सोडल्यास मोक्षसुख लाभते (६६). असे क्रोधाचे दुष्परिणाम सांगितले आहेत.

**अध्याय द्वादश**

श्री धर्मनाथाय नमः। मान (गर्व) करू नये. असे साधुसंत म्हणतात. त्याने काय होते, ते सांगावे.

श्लोक १ (४९) – मान हा गर्वपर्वत आहे. गर्व सोडला तर मृगजळ राहात नाही. गर्विष्ठ माणसाचा स्वभाव हिंसक असतो. सम्यगज्ञान लोप पावते. क्रोध दावानल उत्पन्न करून सम्यकवृत्तीच्या वेलीचे दहन करतो (१५).

श्लोक २ (५०) – उन्मत्त हत्तीला हित अहित कळत नाही. तसेच मानगर्विताला स्वकार्य कळत नाही. त्याने अनर्थ होतो. मदामुळे काम जागृत होतो व व्रताचा वृक्ष मोडतो.

उपशमनाचा स्तंभ उपटुनी टाकतो. कठोरशब्दांची धूळ उडवितो. लोकांना क्लेश (त्रास) देतो. मानगर्वाचे वेड लागले तर आगम सिद्धांताचा अंकुशही उपयोगी होत नाही. विनयलता नाश होते. सज्जन मानगर्वाचा त्याग विवेकाने करतात. निगर्वी व्हावे (३०).

श्लोक ३ (५१) - वारा ढगांचा समूह मोडतो. तसा योगी मानाचा समूळ नाश करतो. विषारी सर्प क्षणात कुणाचा जीव घेतो. त्याप्रमाणे मान आप्तस्वकीयांचे जीवन वाईट करतो. हिंगामुळे कस्तुरी नासते. मिठामुळे दूध/अमृत नासते. तसा मान गर्व नासवतो. सद्गुणांना पाताळात टाकतो. यश, क्रियेचे फळ, धर्मार्थ काम, सर्वांचा नाश करतो. विवेकाने या मानगर्वाचा त्याग करावा. त्याने दुःखच मिळते (४५).

श्लोक ४ (५२) - विनय हितकारक आहे. सर्वांना समाधान, संतुष्टता देतो. जातीचा, कुळाचा, तारुण्याचा असे आठ प्रकारचे मद (गर्व) आहेत. त्यापासून विषय-विकार उद्भवतात. तो सर्व सुखांचा नाश करतो. मोक्षसुखाची अभिलाषा धरणाऱ्याने मान (गर्व) सोडावा (त्यजावा).

**त्रयोदश अध्याय**

शांतीनाथाय नमः। निगर्वव्रत सांगितले. मानकषाय सांगून मार्दव गुण सांगितला. आता तिसरे व्रत निर्माय सांगावे. माया असल्यास काय होते?

श्लोक १ (५३) - माया सारासार विचार करू देत नाही. कुवासनांची ती जननी होय. व्यसनांची सहकारी, दुःखांची अधिकारी, विकारांची निर्माती, कुटिल गुणांचे घर. कपट वेष धारण करून परद्रव्याची अभिलाषा उत्पन्न करते. विश्वास संपादन करून इतरांचे धन धेते. माया इतरांना ठकवते. फसवते. पण त्यामुळे स्वतःच नरकात फसते. नाना योनीचे भोग भोगायला लावते (२१).

श्लोक २ (५४) - मित्रत्व, हित दाखवून कुटील बुद्धीने दुसऱ्याचे धन लुबाडते. ती तृष्णा, अभिलाषा उपजवते. परमार्थ कसा देणार? त्याला नरक चुकत नाही. माया दुर्गतीच देते. माया वर्जावी (२७).

श्लोक ३ (५५) - माया म्हणजे ठकपण. मोह दाखवून द्रव्यहरण, खोटेपणा, स्वार्थ, कुटिलपणा. मडक्यात डोके घालून खीर खाणाऱ्या मांजराला अंगावर काठ्या

पडणार हे कळत नाही. मडके फुटते. कंठमाळ अडकते. संचित पुण्यसुद्धा मायेमुळे नष्ट होते. माया, कपट वर्जावे (४३).

श्लोक ४ (५६) - परधनाची इच्छा करणारा, मनी कपट बाळगणरा हा मायागुणाचा माणूस जगात दुष्ट म्हणून ओळखतात. अज्ञानी माणसांना हा ठकवतो. कपट करून जाळ्यात ओढतो. मधमाशी मध शोषते, पण क्षणात तो ओकून बाहेर काढते. तसा परधनाची इच्छा करणाऱ्याला दुःख भोगावेच लागते. वेळच्या वेळी औषध घेतले नाही तर मरण येते. तसे मायेला कवटाळल्याने पुण्य मरते. माया कपट टाळावे. निष्कपटी असावे.

**चतुर्दश अध्याय**

कुंतुनाथाय नमः

मायाकपट ऐकले. संतुष्ट झाले. आता लोभकषायाचे दुर्गुण सांगावे.

श्लोक १ (५७) - हृदयात लोभाचा प्रवेश झाला की, डोळे असून अंध असे स्वार्थासाठी घोर अरण्यात फिरून स्वतःचा घात होतो. द्रव्याची आशा करून कपटाने दुसऱ्याला जाळ्यात ओढायला लावते. लोभ आळसाचे मूळ होय. पैशाची लालूच, वित्ताची आशा आपला-परका याची पर्वा करत नाही. लोभ सोडला तर सर्व क्षोभ नष्ट होतो (१९).

श्लोक २ (५८) - सुकृत्यांची रास लोभ क्षणार्धात अगस्तीप्रमाणे पिऊन टाकतो. कोरडी लाकडे, तूप याने अग्नी प्रबळ होतो. त्याप्रमाणे क्रोधाग्नी लोभामुळे वाढतो. लोभ कलहाचे क्रीडामंदिर आहे. नाना विकार उत्पन्न करतो. विवेकरूपी चंद्राला लोभरूपी राहू ग्रासतो. दुर्गुण निपजतात. विवेक लोप पावतो. कीर्तीलता नष्ट करतो. लोभ दुःखाचे आगर. विपत्तींचा सागर. लोभाचा त्याग केल्याशिवाय सुख नाही.

श्लोक ३ (५९) - क्षमा, मार्दव, आर्जव, सत्य, शुद्धता, संयम, तप, त्याग याने पापहरण होते. ब्रह्मचर्याचे स्मरण होता विघ्ने पळती. अपकीर्ती होते. पतंग दिव्यावर झेप घेताच मरतो. तद्वत लोभाग्नीच्या स्पर्शाने अंतरंगातील गुण मरतात. लोभ अनेक अनर्थ घडवितो. तो त्यजावा (५३).

श्लोक ४ (६०) - लोभ सोडल्याशिवाय संतोष नाही. संतोष महामेघातील पाण्याप्रमाणे लोभाचा नाश करू शकतो. संतोष सर्वांत महत्त्वाचा होय. संतोष असल्यास

दारिद्र्य कळत नाही. विश्व वश होते. मुक्तिमार्ग विनाप्रयास प्राप्त होतो. ज्ञान वाढते. जप, तप, अनुष्ठानाचा आधार घेतल्यास चित्त स्थिर राहते. शुद्ध होते. निर्लोभी असावे (पृ. क्र. ८३).

**पंचदश अध्याय**

श्री अरनाथाय नमः। नमूनि गुरुचरण श्रोते पुसती दुर्जन हा महाखळ असे शास्त्र सांगते, नेमके काय?

श्लोक १ (६१) – विषारी सापाच्या तोंडात चुकून अज्ञानाने जरी हात घातला तरी मृत्यू येणारच. एकवेळ अग्नीत उडी टाकावी, थोडे भाजेल. पण दुर्जनाशी जवळीक नको. तो भवभवाचे दुःख देणार. दुर्जनत्व अति वाईट (१५).

श्लोक २ (६२) – दुर्जनत्वाचे गुण टाकावे. सज्जनत्वाला जवळ करावे. सहजस्वभावे त्याने पापमळ धुतला जाऊन निर्मळ होता येते.

श्लोक ३ (६३) – काही काळासाठी कष्ट भोगून जगाला संतुष्ट करणारा तो महापुरुष. जो दुष्टत्व ठेवून जगात वावरतो, तो धनवान असला तरी दुराचारी, अविचारी असे जगण्यापेक्षा मरण बरे. कुबेरासारखा धनवान असूनही दुष्टत्व सांभाळणारा तो पुण्यहीन होय. द्रव्यहीन सज्जनचा श्रेष्ठ सुजनत्वे लाभे सुधर्म (४२).

श्लोक ४ (६४) – सज्जनाचे मुख्य लक्षण अंतःकरण शुद्ध, उत्तम गुणी, निंदा न करणारा, जगमित्र, दुर्जनावर आवरण घालतो. दुर्गुण पाहिला तरी त्याचा उच्चार न करी. अंतरी अनुकंपा. खेद निवारतो. दुर्वचन एकेले तरी रागावत नाही. शांत, स्वस्थ राहतो. क्षमा करतो (६०).

**षोडश अध्याय**

श्री महतिय नमः। श्लोक १ (६५) – संसारदुःख तुटून केवलज्ञान प्राप्त होईल असा उपाय सांगा. जिनवाक्याचे दिव्यामृत ऐका, असे मुनी म्हणाले. कोणी एक बुद्धिहीन नर गुणिजनांचा संग सोडून दुर्ध्यानाने वनात हिंडे. अंतर दया, शरम नाही. धर्माची विस्मृती. मनात व्रताची इच्छा, पण प्रत्यक्ष व्रतभंग. गुणी संग सोडे. क्रोधी सकळ शास्त्र अभ्यासाची इच्छा, पण बुद्धीच नाही. म्हणून गुणी माणसांचा संग करावा. साधुसंत तो करतात. त्यामुळे सम्यकत्वाचे रत्न लाभते. मोक्षनगर प्राप्त होते (१९).

श्लोक २ (६६) - गुणहीन अपात्रसुद्धा गुणिजनांच्या संगतीने पवित्र होय. सकळ वंद्य होतो. गुणीच्या संगतीने सद्‌गुण वाढतात. मती शुद्ध होते. कीर्ती वाढते. नम्रता येते. दुर्मती जाते. चिंता जाते. ध्यान एकाग्र होते. गुणिसंगे लाभे परमार्थ मग काय न होय (३४).

श्लोक ३ (६७) - गुणिजनांच्या संगतीने पातकभंग, अंतःकरणशुद्ध, दुर्बुद्धी नष्ट होते. समृद्धी लाभते. बोध मिळतो. सत्संग साधावा (४८).

श्लोक ४ (६८) - गुणहिनाचा संग केल्यास क्लेष होतो. सुकृत्याचा लोप होतो. संताप येतो. मानहानी होते. फुललेले कमळ सुंदर दिसते, मात्र हिमवर्षाव झाला की, शेवाळ साठून कुरूप दिसते. तसे हृदयकमळाचे गुणहिनाच्या संगतीने होते. क्षमेचा पर्वत उत्तुंग आहे. तो धरावा. दुर्गुणीमुळे अन्याय, दुर्गुणांच्या वेली वाढून मंडप बनतो. तिथे मनःशांती (विश्राम) कसा मिळणार? बळकट गुणसंग करावा, तरच कुगतीची वाट मोडते. नीजरूप भेटते. दुर्जनांचा त्याग करावा. कर्मचक्राचा भंग होतो स्वधर्मचक्र लाभते (६४).

**सप्तदश अध्याय**

चतुर्गतीचे भ्रमणचक्र चुकेल, दुःख राहणार नाही, ते कसे हे सांगतो.

श्लोक १ (६९) - इंद्रिय दमन करून सर्व इंद्रिये क्षीण करून आत्ममग्न व्हावे (स्वरूपि मन लावावे). जसा खोडकर घोडा अशक्य अवघड मार्ग सुद्धा पार करतो, त्याप्रमाणे इंद्रिय दमन इच्छेचे स्थान मोडून टाकते. मन सतत विषयाकडे धावते. त्याला आवरावे. इंद्रिये दुर्जनासारखीच असतात. नरकादी दुःखाशी संचकारपत्र करतात. बयाणा देतात. इंद्रिये जिंकल्याशिवाय समाधान मिळत नाही. इंद्रिये जिंकल्याने हृदयकमळ शुद्ध होते. शुभकाळ येता आत्ममग्न व्हावे (१६).

श्लोक २ (७०) - प्रतिष्ठित, श्रेष्ठ मानून क्षणभरासाठी जरी इंद्रियवश चित्त स्थिर न राहता विषयामागे हिंडते. इंद्रियांना जिंकल्याशिवाय दान, पूजा, होमहवन, ध्यान, मौन ही साधने फळास येत नाहीत. तेव्हा इंद्रिये जिंकणे महत्त्वाचे (६१).

श्लोक ३ (७१) - मौन केले, गृहत्याग केला, शास्त्राभ्यास केले, तप केले तरी इंद्रिये जिंकली नाहीत तर हे सर्व कष्ट व्यर्थ. त्याने कष्टच होणार. साधुजन इंद्रिये जिंकूनच जयवंत झालेत.

श्लोक ४ (७२) - ज्ञानसूर्याला इंद्रिये अभ्र सूर्याला आवरण घालतो. तसे आवरण

घालतात. विवेक नासतो. दुःखाची भीती आणि सुखाची मैत्री हवी असल्यास इंद्रिये जिंकावी. पतंगकिड्याप्रमाणे पंचेंद्रिये आपला भंग करतात (अनेक उदाहरणे दृष्टांत, ६२). वासाच्या मोहाने भ्रमर कमळात कैद होतो. प्राणाशी मुकतो. पाण्यात खेळणारा जळचर क्षणभर बाहेर आला तर मरतो (६८).

**अष्टादश अध्याय**

गृहस्थी धर्मात धन कसे जतन करावे, ते कृपया सांगा.

श्लोक १ (७३) - दान केल्याने धन वाढते. पुण्य सरता लक्ष्मी जाते. यासाठी दयादान धर्म करावा. क्षणभराची झोप अचेतन करून ज्ञानग्रहण हरवते. तसे पुण्य सरल्यास ऐश्वर्य लोपते. लक्ष्मी असते, पण भिक्षुक दिसत नाही. भ्रांती पडते. तेव्हा सावध राहून दान करावे. धुरामुळे दिसत नाही. तसे धनांधाचे होते. सुपात्री दान करावे. पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे लक्ष्मी अस्थिर असते.

श्लोक २ (७४) - पूर्ण सत्कृत्याचे संचिताचे फळ म्हणून धन लाभते. मात्र धनलोभी खूप असतात. त्यामुळे चोर, वारसदार, भूत सर्वचजण धन लुबाडू बघतात. अग्नी, पाणी हे पण धननाश करतात. आयुष्याचे प्रमाण माहीत नाही. त्या पात्री दान द्यावे. परलोक साधन (३६).

श्लोक ३ (७५) - द्रव्याचा अभिलाषी निचांचा राजा होऊन नीच कर्मेकरतो. साधुकडे पाहात नाही. लोकांना मूर्ख बनवून द्रव्यहरण करतो. त्याची निंदा होते. पण त्याला लाज नसते. फक्त द्रव्यसंचय हीच मनाची इच्छा असते.

श्लोक ४ (७६) - निंबोळ्या खूप लागतात. पण त्या फक्त कावळाच खातो. आंबे सर्वजण खातात. धृत पुष्कळ चांगल्या कर्माने जरी मिळवले तरी ते सत्पात्री दान दिले नाही, तर व्यर्थ होय. विष पिताच मनुष्य मरतो. तसे पुण्याशिवाय धनधान्यादीक राहात नाही. सुपात्री दान करावे (९६).

श्लोक ५ (७७) - मनात पुण्यहेतू ठेवून सत्पात्री दान द्यावे. उत्तम धान्य पेरले तर भरपूर धान्य उगवते, मिळते. तसे सत्पात्री दानाने सकळ सौभाग्य लाभते. लक्ष्मी त्याच्यापाशी आनंदाने राहते. सुमती मिळते, प्रीती लाभते. सुखाचा सागर भोगता येतो (१११).

श्लोक ६ (७८) - एका गुणिजनाने कुशल उपायाने धन साठविले. पवित्र भूमीचा शोध घेऊनच ते पेरले. सप्तक्षेत्री संचित धन पेरल्याने खूप खूप उगवले. ज्ञानवंताने सप्तक्षेत्री धन वेचून जन्माचे सार्थक करावे. पुण्य मिळवावे. कमलपात्रावरील पाण्याचा थेंब मोत्याप्रमाणे दिसतो. दीर्घकाळ राहतो. पण गवतावरचा थेंब अल्पावधीत नष्ट होतो. सर्पाचे विष प्राणनाश करू शकते, पण इतरत्र पडल्यास व्यर्थच जाते. तसेच हे आहे. विशेष गुण असणारे सुपात्र शोधावे. सुपात्री दानच द्यावे. गवत दिसल्यावर गाय दूध देते. द्रव्य असेल तर निर्लोभी वृत्तीने पात्रदानी द्यावे. तरच संसारा तसुख लाभते (१४०) पृ. क्र ११२.

**एकोनविशंतितम अध्याय**

श्री नेमीनाथाय नमः।

श्लोक १(७९) - तपाचरणाचा महिमा -

इंद्रियांचे दुष्ट साप क्षणोक्षणी डंख मारतात. मात्र तो विषभंग करणारा चांगला गरूडमंत्र म्हणजे तप. त्याने सौख्याची पुष्पफळे मिळतात. अनुसन म्हणजे निराहार तप शक्तीनुसार करावे. पंचरत्य किंवा एक-दोन वर्जावे. तपाचार हा कायाक्लेष. अंतःकरण शुद्ध ठेवून भूक तहानेवर विजय मिळववा. बाह्यतपाने दुष्कर्माचा लोप होतो. अंतरताप - प्रायश्चित्त, विनय, स्वाध्याय, कुबुद्धीचा अंकुर उपटणे, गुरूजवळ अपराध उच्चार, क्षमायाचना, सेवा, सत्कार, ध्यान, कायोत्सर्ग इत्यादी (३०, पृ. ११५).

श्लोक २ (८०) - तप करताना शांत गुण ठेवावा. त्याने इंद्रियदमनही होते. सकळ सिद्धी प्राप्त होतात. ज्ञानदीप उजळतो (४०).

श्लोक ३ (८१) - तप कर्माला जाळते. जसा मेघ दावानळाला विझवतो, अनेकांनी तपाचाराने परमार्थ साधला. ते मुक्त झाले. राज्यभार सोडुनी दिगांबर झाले (८६).

श्लोक ४ (८२) - तप हा कल्पवृक्ष आहे. संतोषवृक्षाचे मूळ आहे. शीलसंपत्तीचे पल्लव त्यांवर शोभतात. श्रद्धेचे उदक, कुलबलऐश्वर्य सर्वा अनुपम्य सुखाचे मोक्षफळ तपतरुवर. शुद्ध भावाने तप करा. सुख मिळवा (६२). पृ ११८)

**विशंती अध्याय**

श्री जिननाथाय नमः - आता आम्हाला पवित्र आत्मभावना सांगा. आत्मज्ञान सोपे नाही. ते सर्वांत गहन आणि ते मोक्षाचे स्थान आहे.

श्लोक १ (८३) - कुटील स्त्रीचे चपळ कटाक्ष वैराग्यापुढे निष्फळ ठरतात. तसे दृढ भावना असल्याशिवाय आत्मज्ञानाचे प्रयत्न निष्फळ. दगडावर कमळ उगवणे अशक्य तसेच क्षारभूमी जमिनीवर कित्येक वर्षेपाऊस पडला तरी गवत उगवत नाही. तसे दानधर्म, पूजाअर्चा, तप, स्वाध्याय, शास्त्र अध्ययन, नाना विधाने, सर्व भावनेशिवाय व्यर्थ. परमात्मा या अलौकिक गोष्टीचा ध्यास ही दृढ भावना पाहिजे. तत्त्व-अतत्त्वाचा विवेक धरावा. पुण्याचा संचय, पात्राचा क्षय झाला पाहिजे. भवसागर पार व्हावा, ही दृढ भावना धरावी. मनवचकाया शुद्ध करून भावना भावावी (प्रयत्न करणे) तर आपोआप (स्वभावे) सफलता येते. नाही तर यज्ञ-याग, पूजा इत्यादी बालकाच्या खेळासमान होतात (२४).

श्लोक २ (८४) संसाराचे दुःख पार करण्यासाठी निवृत्ती घ्यावी. सर्व उपायांची क्रोधमानमायालोभ भंगण्याची भावना हवी. भावनेशिवाय मूर्तिपूजा काय कामाची?

श्लोक ३ (८५) - जिनागमाचा अभ्यास, शास्त्रांचे पाठांतर भावनेशिवाय व्यर्थ. कितीही कष्ट करून शेतात कोंडा पेरला तर पीक येईल काय? गर्व सोडून भावना धरावी, तरच संतोष मिळेल. काया हा बहिरात्माचे लक्षण. काया वेगळा मी कोण आहे हे पाहावे. आत्मा अनादी, अनंत, अनेश्वर आहे. तो अनेक जातीची शरीरे धारण करतो. अखंडचि चालते . (५०).

श्लोक ४ (८६) - आत्मा अविनाशी आणि अमूर्त आहे. दृश्य पदार्थाचा नााश होतो. अमूर्ताचा नाही. द्रष्टा हे जाणतो. हे ज्ञान मुरवतो. सिद्धांत सार समजुनि घ्यावे. आत्म्याचे चैतन्यरूप जाणून घ्यावे. इंद्रियांना आपले रूप माहीत नसते. इंद्रियांद्वारे मन वाहते. शब्द, रस, गंध, कोणत्याच मार्गाचे त्याचे वर्णन होऊ शकत नाही. ते अतिंद्रिय, आत्मज्ञान स्वतःचे, स्वतः जाणावे लागते (६८).

श्लोक ५ (८७) - आत्मा सचेतन आहे. श्रद्धा निश्चयाद्वारे जाणता येते. निर्विकल्प समाधीच्या बळावर स्वसंवेद्य निर्मळ ज्ञान होते. आत्मा स्वसंवेद्य ज्ञानसम हे प्रसिद्ध जिनगमात आहे. भाविकांनी हे सत्य मानावे. हे स्वरूप अनुभवल्यास अनेक वृत्तींचा

लोप होतो. अधिक माहितीसाठी समयसार ग्रंथ पाहावा (९८).

**अध्याय एकविंशती**

श्री वितरागाय नमः

श्लोक १ (८८) - भावना अभिव्यक्त करतानापूर्ण वैराग्य भाव असावा. उन्मत्त गजाला अंकित करण्यास वज्र अंकुश लागतो. त्याप्रमाणे दुष्ट इंद्रियांना अंकित ठेवण्यास वैराग्य पाहिजे. वैराग्य शृंखला बळकट असून मनाला आवरते. वैराग्याशिवाय मोक्ष नाही, हे जिनवचन प्रमाण होय.

श्लोक २ (८९) - सकळ सुखाचे स्थान (मोक्ष) हवे असल्यास मन एकाग्र करून वैराग्य धारण करावे. नाशिवंत देहाचा मोह कशाला?

श्लोक ३ (९०) - इष्टमित्र, नातेवाईक सर्वांचा बंधपाश तोडावा. त्याचा उपसर्ग (त्रास) होतोच. उदास भाव ठेवावा. स्त्रीसुखाचा विचार स्वाधीन सुखात अंतर पाडतो. तेव्हा शुद्ध मनाने अभिलाषा सोडावी. वैराग्य धरावे (३०).

श्लोक ४ (९१) - दुर्लभ असा नरजन्म मिळाल्यावर सार्थक करा. जिनेंद्रपूजा त्रिकाळ करा. चकोर चंद्रकिरणांची वाट पाहतो. तसे राहा. सुभ पात्राचा सन्मान, दान करा. सारासार विचार, विवेक बाळगून संसार दूर का (४०).

श्लोक ५ (९२) - मनुष्यजन्मात येऊन दुष्कर्म टाळावे. त्रिसंध्या, देवार्चनाचे दुष्कर्म मोडा. एकाग्रमने जप केल्याने पापकर्मांचा लोप, शत्रूंचा नाश होतो. शिवसुख धाम मिळते. कामक्रोधादी शत्रूंचा नाश करून मनाचे दालन शुद्ध करावे (४७). दया सर्वांवर करावी. अनुकंपा बाळगावी. मन स्वस्थ ठेवावे. नातरि मनुष्यजन्म निष्फळ होय.

श्लोक - ६ (९३) - अजितदेव धर्माचार्य - शांतधर्मी, द्वादश तपाचारी, शास्त्रसुधाब्धि - सोम विजयसिंह - चरणकमळी मधु कराया सदाकाळी.

**मूल्यमापन**

जैन तत्त्वज्ञान, साहित्य व समाज या अनुषंगाने अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ म्हणून सूक्तिमुक्तावली या ग्रंथाकडे पाहावे लागेल. माघनंदी आचार्य हे जैन परंपरेतील एक महत्त्वाचे आचार्य होऊन गेले. इ. स. चे १२ वे शतक हा त्यांचा कालखंड होय. प्राकृत,

संस्कृत, कानडी अशा अनेक भाषांमध्ये त्यांनी ग्रंथरचना केली. आचार्य कुमुदचंद्रदेव यांचे ते शिष्य होते. सिद्धान्तसार, शास्त्रसमुच्चय, माघनंदी श्रावकाचार, पदार्थसार इ. ग्रंथांचे ते कर्तेहोते. यांनी केलेल्या रचनांच्या आधारे विजयसिंह आचार्य यांनी प्रस्तुत सूक्तिमुक्तावली हा ग्रथ लिहिला आहे तर मधुकराया या लेखकाने त्यावर आधारित हा ग्रंथ लिहिला असावा. मात्र हा मधुकराय कोण याविषयी काहीही माहिती जैन ग्रंथांतून मिळत नाही. ग्रंथाचा लेखनकालही सापडत नाही. मात्र या ग्रंथाची प्रतिलिपी नेमाप्पा नावाच्या कवीने शके १७३५ मध्ये केल्याचा उल्लेख सापडतो. मधुकराया आपली परंपराया सांगताना अजितदेव यांचे शिष्य उदयसूर्य, त्यांचे शिष्य सोमप्रभ व त्यांचे शिष्य विजयसिंह यांचे शिष्य आपण असल्याचे सांगतो. परंतु ही परंपराही मराठी जैन साहित्यात अन्यत्र कुठे दिसत नाही. त्यामुळे हा ग्रंथ जैन परंपरेतील श्वेतांबर परंपरेत लिहिला गेला की काय? अशी शंका करण्यास जागा आहे. अत्यंत संयत शब्दांत जैन तत्त्वज्ञान व आचारधर्माचा महिमा कथन करणारा हा ग्रंथ आहे. लेखकाचे शब्दप्रभुत्व पानोपानी बहरास आले आहे. उपमा, दृष्टांत, रूपक, अनुप्रास आदी अनेक अलंकारांच्या वैभवाने नटलेला हा ग्रंथ आहे. तत्कालीन समाजातील चालीरीती व उदाहरणांनी हा ग्रंथ नटला आहे. तीर्थंकरांची वर्णने, गुरूंचा महिमा, श्रोत्यांची महती, संतांची लक्षणे, सांधुसंतांचे गुणगान, साधुसंघाचे गुण, साधुसंघाचा सहवास, धर्माचे महत्त्व, धर्म कोणता करावा, लोकांची मूढता, कर्म, पाप, पुण्य, दान, तप, शील, जैन तत्त्वे अशा अनेक विषयांना अनेक बाजूंनी स्पर्श करणारा ग्रंथ म्हणून या ग्रंथाकडे पाहावे लागेल. ग्रंथामध्ये आलेली उपमा-दृष्टांतांची मालिका वाचकांना खिळवून ठेवणारी आहे. जैन धर्मावरील श्रद्धा दृढ करण्यासाठी मार्मिक उदाहरणांनी कवीने दिलेले दाखले आजच्या समयाला देखील चपखळ बसतात. उदा. काही मूढ लोक धर्म कसा करतात हे सांगताना कवीने दृष्टांताची मालिकाच मांडली आहे

जडित रत्न सुवर्णपात्र। शोभायमान दिसे विचित्र।।
जेवावया दिव्यान्न पवित्र। राज्ययोग देखा।।४१।।१।।
धुळी भरुनी तयात। उकरावरी टाकी नित्य।।
धर्माविण जन्म तयाते। निरर्थक जाहला।।

किंवा

घेउनि तो चिंतामणी। उडवावया कागाप्रती।।
दूरोनि टाकिला त्या दुर्मती। मतिहिन पाहे।।
मानवजन्मास येऊन। स्वधर्म केला नाही जाण।।
या दृष्टांतापरी केली त्याण। ऐका सज्जन हो।।

अशा आशयाच्या दृष्टांतांच्या शृंखला या ग्रथांत जागोजागी पाहावयास मिळतात. धर्म, भक्ती, देव, दयाभाव, जिनमहिमा, अहिंसा-सत्य आदी पाच अणुव्रते, सज्जन-दुर्जन, इंद्रिये, वासना, संसार, मोक्ष इत्यादींसह जैन तत्त्वज्ञानातील व आचारधर्मातील अनेक गोष्टींचे विवेचन अनेक उदाहरणांसह कवी करताना दिसतो. सूर्य, आकाश, पृथ्वी, पाणी, पक्षी, पशू, निसर्गातील अनेक उदाहरणांनी आपले मत पटवून देण्याचे कवीचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे.

ओवी छंदात लिहिलेला हा ग्रंथ, तर काही ठिकाणी साडेतीन चरणांच्या ओव्याही या ग्रंथात अनेक ठिरकाणी आढळतात. ११ +१० +१० +६ अशा अक्षरसंख्यांमध्ये या ओव्यांची रचना केली गेली आहे. ग्राम्य शब्द, तत्कालीन समाजात प्रचलित असलेले रोजच्या व्यवहारातील शब्द यांचा सरसहा उपयोग कवीन केला आहे. उदाहरणादाखल वापरलेले शब्द अधिकच मोहक व सौंदर्यवाचक आहेत. त्यामुळे निसर्गविषयक व सौंदर्यवादी शब्दांची रेलचेल या कवितेत अधिक आहे. त्यामुळे हा ग्रंथ जैन तत्त्वज्ञानाचा परिचय करून देत असताना देखील रसिक वाचकास मोहवून टाकणारा आहे.

डॉ. गोमटेश्वर पाटील

**gomteshpt@gmail.com**

**mob.** ९८५०७५८२०७

मधुकराया कृत

# सुक्तिमुक्तावली

## मूळ ग्रंथाची यथामूल आवृत्ती – हस्तलिखित


नं॰ २३/८ नं॰ १८

॥६०॥श्रीवीतरागायनमः॥श्रीआदिनाथायनमः॥श्रीअजितनाथायनमः॥अथसूक्तमुक्तावलीसटीकप्रारंभ
ः॥श्लोक॥सिंदूरप्रकरःतपःकरिशिरःक्रोडीकषायाटवी॥दावार्चीनिचयःप्रबोधदिवसःप्रारंभसूर्योदयः॥मुक्तिश्री
कुचकुंभकुंकुमरसश्रेयस्तरोपल्लवा॥प्रोल्लासक्रमयोर्नखद्युतिभरःपार्श्वप्रभोःपातुनः॥१॥टि॰॥श्रीपार्श्वनाथ
स्वामीचेचरण॥प्रकाशोल्लोपतिसूर्यकीरण॥नखप्रभाभरलेभूवन॥कांतिआपारशोभति॥१॥तोचिपादरज्ञोतआह्मासी
॥नक्रिधडोजन्मजन्मासि॥यावत्स्वामीमोक्षसुखासी॥होयपरियंत॥२॥आतातेनखाचेवर्णन॥नकरवेशेषादिकाला
गुण॥बृहस्पतिजाहलामौन्य॥तेकोणनकविवर्णील॥३॥नखेदीसतातिसुंदर॥उदतिकीरणाचेवक्रभार॥कीउगव
लेबक्रभास्कर॥प्रभाआपारफाकली॥४॥तयाश्चरणेगजेंद्रधवळ॥मस्तकीशोभतिगंडस्थळ॥सिंदुररजझळकेज
ळाळ॥चंद्रमंडळभासति॥५॥आणिककैसेपरिशोभत॥ऐकासांगतोदृष्टांत॥कामदहनअत्याद्भुत॥अग्नीप्रख्यातजै
सा॥६॥चतुष्कषायआरण्यगहन॥क्रोधलोभआणीमायामान॥त्यासिकरावयादहन॥वनिदावाग्निजैसा॥७॥पेट
लादावानळविशेष॥प्रभाचकुंकडेप्रकाश॥तेणेकोंदलेसर्वआकाश॥प्रभानयभासत॥८॥पुढ्ताकौतूकतेकैसे॥
अज्ञानतमोधकारअशेष॥करावयाबोधप्रकाश॥प्रारंभसुर्यउदेला॥९॥जैसोमोक्षलक्ष्मीचेभाळ॥कुंकुमशोः

॥३॥

न्तसलाळ॥तेकिमुक्ताफळदेतिढाळ॥प्रसाविशाळशोभे॥३०॥नरसुरादीपदप्रत्यक्ष॥नानाविधकल्पवृक्ष॥पुष्पप
ल्लवफळेदक्ष॥देतसेसाविका॥३१॥श्लोक॥संतःसतममप्रसन्नमनसोवाचांविचारोद्यता॥सुत्यंम्रकमलानितत्व
रिमलंवाताःवितंत्वंतियतू॥किंवान्यर्थनयानयाद्यदिगुणोस्त्यासांततस्तेस्वयं॥कर्त्तारःप्रथनंनचेदथयशःप्रत्यार्थिना
तेनकी॥२॥टीका॥हेइष्टदेवतानमस्कारून॥करावयासाधूसीनमन॥विशुद्धिकरुनियामन॥प्रथीसज्ञानाते॥३२
॥आहोसंतसाधुजन॥मजसोमप्रज्ञालागुन॥सत्वरक्वावेप्रसन्न॥ग्रंथारंभावया॥३३॥कैसेसंताचेलक्षण॥ज्ञाकु
नीइतराचेदुर्गुण॥विस्तारितीविशेषगूण॥करूणासागर॥३४॥वाचाअमृतदिव्यवाणी॥सारासारविचारखाणी॥ह
द्यमार्दवजैसेपाणी॥सर्वप्राणीतोष॥३५॥कोणियेकेकारणेकरून॥होउनिउदकातउत्पन्न॥पद्मेदीसतातीशोभाय
मान॥मनोहरतरे॥३६॥ऐकाकमळाचापरिमळ॥कोणविस्तारीवायुवगळ॥तैसेसंतावीणकेवळ॥कोणतत्वप्रक
टी॥३७॥सुगंधअसेजरीपुष्पात॥सहजविस्तारउरबकृत॥नातरिकायकरिलीवात॥जायस्वभाव॥३८॥तैसेगुणः
आसतिज्ञाह्यात॥तरिविस्तारितीउरबकृत॥नातरिकायकरितीसंत॥दुर्गुणासित्या॥३९॥सज्जनसुनयचिज्ञा
णती॥कुनयअवघाचिलोपती॥यालागीप्रार्थनातयाप्रती॥आधीआधीकरावि॥४०॥सद्गुणप्रगटतिसज्जन॥

॥३॥

आसतितरी उत्तमगुण ॥ कायकरावेतेदुर्गुण ॥ अभिदाननाशो ॥ २१ ॥ ग्रंथकर्तारं केलाग्रंथ ॥ प्रकटावयाअत
रार्थ ॥ सूक्तमुक्तावळी समर्थ ॥ नामयालागी ॥ २२ ॥ श्लोक ॥ त्रिवर्गसंसादनमंतरेण ॥ पशोरिवायुर्विफलंनरस्य
॥ तत्रापिधर्मंप्रवरं वदंति ॥ नतंविनायद्भवतार्थकामौ ॥ ३ ॥ टी० ॥ हिंडताआनंतानंतजन्म ॥ नरतनुलाधलाउत्त
म ॥ साधीलानाहिधर्मार्थकम ॥ व्यर्थजन्मतयाचा ॥ २३ ॥ पशूवतूजालाकीआयुष्य ॥ ऐसे बोलतीसत्पुरुष ॥ व्यथा
जीणविलेमातेस ॥ नवमासगर्भि ॥ २४ ॥ धर्मार्थकामहेत्रिवीध ॥ त्यामाजीधर्मश्रेष्ठशुद्ध ॥ नरतनुफळहाचीबो
ध ॥ नातरिनिर्फळ ॥ २५ ॥ धर्माविणनपावेअर्थ ॥ कामधर्माविणनिरार्थ ॥ कैसासावात्यावीणस्वार्थ ॥ जन्मव्यर्थत
याचा ॥ २६ ॥ तोचिधर्मप्रगटावयासी ॥ उत्तरसूत्रर चिलेविशषी ॥ श्रोतेहोवेसावधानासी ॥ स्वस्तचित्तकरूनि
॥ २७ ॥ श्लोक ॥ यःप्राणडुःप्राप्यमिदंनरत्वं ॥ धर्मंनयत्नेनकरोतिमूढाः ॥ क्लेशप्रबंधेनसलब्धिमब्धौ चिंतामणी
पातयतिप्रमादात् ॥ ४ ॥ टी० ॥ होउनियात्रसस्थावर ॥ घेतलाकित्येककोटिफेर ॥ प्राप्तजालेनरशरीर ॥ पुर्वसुकृ
ते ॥ २८ ॥ मानवजन्महाविशाळ ॥ त्यामाजिदुर्लभउत्तमकूळ ॥ ज्ञानअत्यंतनिर्मळ ॥ सम्यक्त्वरत्न ॥ २९ ॥ येउनिया
नरजन्मासी ॥ संसारकरीबहुसायासी ॥ होउनिधर्मतआळसी ॥ गर्भांधजैसा ॥ ३० ॥ नकरिकदाधर्मासियत्न

॥२॥

अर्थसाधीतसेप्रयत्न॥ धर्मासारिखेसांडोनिरत्न॥ गारायत्नेसाधीत॥ ३३॥ बहुतकरूनियाकष्ट॥ चिंताम
णीसाधिलाश्रेष्ट॥ तोसागरीटाकीलमर्कटे॥ ऐसीपरि जाह्याली॥ ३२॥ धर्मकरावापारखोन॥ धातुयंचका
तेजैसेसोने॥ कि नानामणीमाजीरत्न॥ तैसाधर्मअहींसा॥ ३३॥ धर्मसर्वत्रबोलती॥ धिवरखाटकिह्यीन
जाती॥ जीववधासिधर्मह्मणती॥ तरिअधर्मतोकैसा॥ ३४॥ दुग्धगायीचेनोचिसार॥ तक्र त्यापरिसदिसे
शुभ्र॥ अर्क क्षीरदिसेपांढरे॥ परिअंतरमह्द॥ ३५॥ ऐसाधर्मपरिक्षावा॥ अहींसाधर्मवंद्यसर्वा॥ हिंसा
धर्मतोवर्जावा॥ ज्ञानीयानी॥ ३६॥ धर्मजाणावादशलक्षण॥ विवीधसौख्यप्रामतेणे॥ तोचिमोक्षासिका
रण॥ अन्यधर्मनाहीं॥ ३७॥ श्लोक॥ स्वर्णस्थालेक्षिपतिसरजः॥ पादसोच्यंविदते॥ पीयुषेणप्रवरकीरणेवाह्य
यत्येदजारं॥ चिंतारत्नंविकीरतिकराद्वायसोड्डानार्थं॥ योडुःप्रापंगमयतिमुदामर्त्यजन्मःप्रमत्तः॥५॥टी०॥ मनु
ष्यजन्मासियेऊन॥ नकरीस्वधर्मसाधन॥ वृथादवडिलागद्धारान॥ जन्ममानव॥ ३८॥ नहोनिसांपडलाहादे
ह॥ धर्मनकरीअज्ञानपाहे॥ अयुष्यजातसेलवलाहे॥ निमिष्यानिमिष्य॥ ३९॥ ऐकामुढाचेलक्षण॥ त्याजो
निधर्मतिदुर्गुण॥ विषयसुखाचेकारण॥ नानायत्नेसाधीत॥ ४०॥ जडितरत्नसुवर्णपात्र॥ शोभायमानदिसे

॥२॥

विचीत्र ॥ जेवावयादिव्यान्नपवित्र ॥ राज्ययोग्यदेखा ॥ ४१ ॥ धुळिन्नरूनितयात ॥ उकरावरिटाकीनित्य ॥ धर्माविणजन्मतः
याते ॥ निरार्थकजाहाला ॥ ४२ ॥ स्वगृहीचहोतेअमृत ॥ तेणाशोनिक्षावेसदाहस्त ॥ पायाधुवोनिटाकिलेतयाते ॥ अनर्थ
केला ॥ ४३ ॥ गजेंद्र ऐरावतिसारिखा ॥ लाकडेवाहेत्यावरिदेखा ॥ स्वहितनकळेकित्यामुर्खा ॥ सांडीलाधर्म ॥ ४४ ॥ कर
तळिहोतादिव्यमणि ॥ नानासौख्यासियेकखाणी ॥ चिंतितार्थासिचिंतामणि ॥ अनर्घ्यदेखा ॥ ४५ ॥ घेउनितोचिंताम
णीहाति ॥ उडवावयाकागाप्रती ॥ दुरोनिटाकीलात्याडुर्मति ॥ मतिहिनयाहे ॥ ४६ ॥ मानवजन्मासयेउन ॥ स्वधर्म
केलानाहीजयान ॥ याहृष्टांतापरीकेलीत्याण ॥ ऐकासज्जनहो ॥ ४७ ॥ श्लोक ॥ तेधत्तूरतरुंवपंतिभुवनेप्रोन्मुल्यक
ल्पद्रुमं ॥ चिंतारत्नमपास्यकाचसकलंस्वीकुर्वतेतेजडः ॥ विक्रियद्विरदंगिरींद्रसदृशंक्रीणंतितेरासभाः ॥ येलब्धंप
रिहात्यधर्ममधमाधावंतिभोगाशयाः ॥ ६ ॥ टिका ॥ सांडोनिधर्मचिंतामणी ॥ स्विकारीनानापापखाणी ॥ ऐकामुर्खामा
जीशिरोमणी ॥ तोचियेक ॥ ४८ ॥ आतासांगतोदृष्टांत ॥ श्रोतीकरावेस्वस्तचित्त ॥ आपलेकरावेस्वहित ॥ पुरत्वालागी ॥ ४९ ॥
मनुष्यजन्मासिज्ञोआला ॥ धर्माविणवायागेला ॥ थोरअनर्थपेकेला ॥ अज्ञानपणे ॥ ५० ॥ उपडोनिटाकिलाकल्पवृ
क्ष ॥ धतुरलाविलाकिअपेक्षे ॥ ऐसामुढपाहाप्रत्यक्ष ॥ सांडिलाधर्म ॥ ५१ ॥ करिचाटाकुनिचिंतामणी ॥ अवडीस्विका

॥३॥

रिकाचमणी॥ स्वहितअंतरलाडुर्गुणी॥ धर्माविण॥ पर॥ चिंतीतार्थपुरविचिंतारत्न॥ टाकुनिगारवेचतियेत्न॥ धर्मासा
रिखेसांडोनिरत्न॥ पापयत्नेकरीत॥ ५३॥ नइद्दस्तिरत्नकेवळ॥ मेरुगिरीसमविशाळ॥ देउनिगार्धभघेतलाबळे
खळचित्रेसा॥ ५४॥ धर्मावाचोनिकरीसंसार॥ पशुसमानजाणतोनर॥ मुंगीमात्रादीकसार॥ संसारकरीती
॥ ५५॥ जळस्थळचरनानाजाति॥ अनेकजीकुळेअसति॥ संसारसर्वत्रहीकरीती॥ अपुलाले॥ पहीं॥ सत्य
मानावेजिवचन॥ करावेस्वधर्मसाधन॥ संसारदुःखजायतूटोन॥ ऐसेकरावे॥ ५७॥ श्लोक॥ अपारसंसारक
थमपिसमासाद्यनृभवं॥ नधर्मयःकूर्याद्विषयसुखतृष्णातरलितः॥ ब्रुदनूपारावारेप्रवरमपहायप्रवहणं॥ समुखो
मूर्खाणांमुपलमुपलब्धुंप्रयतते॥ ७॥ टीका॥ पारावारहाभवसागर॥ कदाकाळीनाहीयाचापार॥ आदिअंतिनाहीघो
राघोर॥ नाहिपारदुःखासी॥ ५९॥ चतुर्गतीतेवडवानळ॥ महाभयंकररसातळ॥ मोटेतरंगकल्लोळ॥ जन्मजल
धी॥ पर्णी॥ ऐशाडुर्धरवारासी॥ विवीधप्रकारदुःखरासी॥ त्यामाजीजंतुनानाराशी॥ दुःखक्लेशभोगिती॥ ६०॥
चतुराशीतिलक्षयोनी॥ कितेककोटिफेरेघेउनि॥ आलानरजन्मालागुनी॥ काकतालन्याये॥ ६१॥ नांगरनि
खळूनियांवेगे॥ दातडसाडाकेलावियोग॥ सागरीटाकिलेदोनिभाग॥ पूर्वपश्चिमेसी॥ ६२॥ अवचितहोउनिये

॥३॥

कज्जाग॥ पुर्वईहात ज्ञालासंयोग॥ किटाळीमाझीसापडेकाग॥ तैसाहादेह॥ ईरे॥ यापरीदुर्लभनरदेह॥ मोक्ष
सुखासीकारणपाहे॥ वर्जोनिधर्मातिंलवलाहे॥ विषयईछीत॥ ईध॥ ऐकात्याचेवेडेपण॥ बुडतासागरामाजी
जाण॥ तेथेतारकनसेकोण॥ आदीअंतिनाही॥ ई५॥ तवअवचितातेथेयेक॥ झाजसापडलेअलोलिक॥ त्यामा
जीबेसोनिविवेक॥ ह्मावेपैलपारा॥ ईई॥ तेपवहणसोडूनिपवरे॥ पाषाणधरुईछीत्वरे॥ ज्ञाणमनुष्यामाजीतो
खरे॥ अंतरलास्वहीता॥ ६७॥ ईतिश्रीनीतिदृष्टांतकथनेरपश्लोकसत्यसमाप्तप्रथमोध्यायः॥ मंगलमहाश्री॥ १
॥श्री॥ ॥ ॥श्रीपारिश्वनाथायनमः॥श्रीसंभवनाथायअभिनंदनायनमः॥ नवइतुकियानंतर॥ श्रोती
पुसिलेजोडोनिकर॥ स्वामीदुर्धरहासंसार॥ तरावाकैसा॥ १॥ पुढेसांगावाउपाययेक॥ भवसागरतरावयाचा
विवेक॥ सुखेतरावयासिनवक॥ दाखउनिद्यावि॥ २॥ श्लोक॥ ॥ त्रिकिंतीर्थकरेगुरौजिनमतेसंगेचहिंसानृते॥
स्तेयाब्रह्मपरीग्रहाद्युपरमंक्रोधाद्यरीणांजयं॥ सौजन्यंगुणिसंगमिंद्रियदमंदानंतपोभावनं॥ वैराग्यंचकुरुस्व
निर्वृतिपथेयद्यस्तिगंतुमनः॥ ८॥ टीका॥ ॥ अतायासुत्राचेअरव्यान॥ सावधऐका श्रोतेजन॥ शुधकरुनिया
मन॥ ग्रंथीलक्षअसावा॥ ३॥ अहोसंतसाधूजन॥ नारीअथवापुमान॥ नानाजातीहरकोण॥ सुखानिळा

॥४॥

सी॥४॥ संसारदुःखासि जो भीती॥ मोक्षसुखासी इछीत॥ भक्तिपूजा होति र्थनाथा॥ करावेसार्थक॥५॥ सर्वतिर्था
चा जो ईशा॥ यालागि म्हणति तीर्थाधीशा॥ सुरासूर शेवति अशेष॥ करिती स्वहीत॥६॥ पवित्र करी भक्तजनासी
॥तीर्थंकर यालागि नाम त्यासी॥ तेचि भक्ती अक्षय सुखासी॥ कारण देखा॥७॥ तेचि जाण संजीवनी॥ असुभकु
ळनिर्दाळनि॥ विवीधपुंण्यसंपादिनी॥ अर्हतभक्ती॥८॥ भक्ती तारक जिवासी॥ सकळ मंगळा चि राशी॥ भक्ती पंचक
ल्याणासी॥ कारण ऐका॥९॥ भक्ति त्रैलोक्यामाजी सार॥ सर्व साधनासी आधार॥ भक्ति मुक्तिचे माहेर॥ निश्चय हा:
चि॥१०॥ भक्ती अक्षय सुखाचें स्थानं॥ कामधेनू चिंतामणि निधान॥ नवनिधी नानारत्न॥ श्रीजिनभक्ती॥११॥ तीर्थं
कराचे भक्तिसी॥ वर्णितां नये शेषादिकासी॥ त्रिभुवनी या उपमेसी॥ नाही नाही अन्य॥१२॥ जयासी मोक्षसु:
खासी कारण॥ भक्ति करावि त्रिकर्ण॥ शुध करुनियां मन॥ गुरुभक्ति करावि॥१३॥ ऐसीच भक्ति जिनमतात॥ करा
वि होउनि शंकातीत॥ मोक्ष अभिलाषी जरी चित्त॥ तरीच कीजे॥१४॥ जिनसंगाचि करावि भक्ती॥ सकळ सौभाग्य:
ते पावसी॥ अंतिला भहोईल मुक्ती॥ हा निश्चितार्थ॥१५॥ ऐका संगह्मणी जे कोण॥ जिनमताचे रुषीगण॥ ज्यासी वं
दिती देवगण॥ ईंद्रादीक ते॥१६॥ तैसीच पाहे आर्जिका॥ पवित्र पात्र वंद्य लोंका॥ तपाचार पाळिती निका॥ विधीयुक्त

॥४॥

॥१७॥ स्वधर्म चालविती श्रावक ॥ उत्तमभक्ति श्रावकालोका ॥ येकादशव्रतपाळीनिका ॥ दर्शनिकादी ॥१८॥ हे जाण
वे चतुःसंग ॥ पवित्र ज्याचे अंतरंग ॥ होति समस्त पातके भंग ॥ भक्त जनाची ॥१९॥ अहिंसाव्रत पाळावे भावे ॥ जंतुरू
पे नेरक्षावे ॥ जावजीवा समजाणावे ॥ अपुलिया ऐसे ॥२०॥ यापरि रक्षावे व्रत ॥ सदा वचन बोलावे सत्य ॥ तेणे किंकर
देव दैत्य ॥ मा ईतर ते काय ॥२१॥ तैसेचि अचोरीव्रत पाळी ॥ सापडले नेघे कदाकाळी ॥ श्रीदेविया अदि सकळी ॥ दा
स्य करीती ॥२२॥ व्रतामाजी शिरोमणी ॥ ब्रह्मचर्य गुणरत्नखाणी ॥ जेणे वश्य होय रमणी ॥ मुक्तिकांता ॥२३॥ परिग्रह
दुर्गति स्वभावे ॥ यालागी निस्पृहत्व असावे ॥ स्वाधीन सुख सहज भावे ॥ प्राप्त होये ॥२४॥ अनादि वैरी कषाय कुरुंभ
क्रोध आणी मान माया लोभ ॥ क्षणक्षणी उठविती क्षोभ ॥ त्यजावे यालागी ॥२५॥ सज्जन गुण धरावे उज्वळ ॥ दुर्जनः
त्व टाळावे तेरवळ ॥ करावे हो मन निर्मळ ॥ स्वहितालागी ॥२६॥ करावा गुणीजनाचा संग ॥ दुर्गुणाचा करावा त्या
ग ॥ मोक्षलाभ होय जेणे वेग ॥ तोचि संग करावा ॥२७॥ ईंद्रियाते क्षावे दमन ॥ अचळ शुध्य करावे मन ॥ जेणे परब्रह्मालाः
गे ध्यान ॥ तोचि साधन करी ॥२८॥ चतुर्विध करावे दान ॥ सत्पात्रालागी द्यावे सन्मान ॥ तेणे वर्धत होय मान ॥ त्रिभुवना
माजी ॥२९॥ तप करावे द्विविध ॥ बाह्याभ्यंतर दोन भेद ॥ द्वादश प्रकार चित्त शुध्य ॥ यथाविधी ॥३०॥ परमात्म भावना

॥५॥

चितयुक्त ॥ करावा अभ्यास नित्यानित्य ॥ वस्तुज्ञान जेणे सत्य ॥ तोची अर्थ करावा ॥ ३१ ॥ वृत्ति असावी उदास ॥ सदा
वैराग्य चित्ताभ्यास ॥ तुटो निजाय अज्ञापाश ॥ तोचि न्यास करावा ॥ ३२ ॥ जयासि मोक्षाचे कारण ॥ तरी करावे
या श्रमाण ॥ नातरी चतुर्गति भ्रमण ॥ चुकेना कदाकाळी ॥ ३३ ॥ श्लोक ॥ पापं लुंपति दुर्गतिं दलयति व्यापादयत्या
पदं ॥ पुण्यं संचनुते श्रियो वितनुते पुष्णाति निरोगतां ॥ सौभाग्यं विदधाति पल्लवयते प्रीतिं प्रसुतिं यशः ॥ स्वर्गं यच्छ
ति निर्वृतिं च रचयत्यर्चार्हतां निर्मितां ॥ ४ ॥ टीका ॥ अता देव जाणावा अर्हंत ॥ जो अठरा दोषा विरहित ॥ ऐका
घातिकर्म विनीर्मुक्त ॥ तोचि देव म्हणावा ॥ ३४ ॥ दोष अठरा ते कोण कोण ॥ क्षुधा तृषा जनन मरण ॥ चिंता विदवि
स्मय कारण ॥ रागमोह नाही ॥ ३५ ॥ भय क्रोध नाहि कदाकाळी ॥ खेद मंतर ज्ञानि र्मुळी ॥ रति रहस्य अलज्जपटाः
ळी ॥ जरा निंद्रा नाही ॥ ३६ ॥ अता अर्हंत देवाची पुजा ॥ त्रिकाळ केली जरि वोजा ॥ त्याचे पापमळ जाय सहजा
॥ पूजाप्रभावे ॥ ३७ ॥ नाना दुःखदायक दुर्गती ॥ नरक तिर्यकादि नाना जाती ॥ अनेक दुःखाची संगती ॥ दलन हो
य शीघ्र ॥ ३८ ॥ किती क जन्माची आपदा ॥ जन्म मृत्यु जरा लागवी सदा ॥ घोर दुःखं घोर दुःख बाधा ॥ नाश होय क्षण
त ॥ ३९ ॥ बहुत पुण्यांच्या होती राशी ॥ स्वर्गादि संपती होती त्यासी ॥ अधिपति होय सर्व सुखासी ॥ पुजाप्रभावे ॥ ४०

॥५॥

॥ऐकाजिनपुजेचभाव॥लक्ष्मिविस्तारहोयस्वभाव॥धामहोयसकळवैभव॥जिनपुजाप्रताप॥५१॥जरीपुजिला
तोजिनवर॥आरोग्यताहोयनिरंतर॥सदासेवितीसुरनर॥अहोत्यानरासी॥५२॥जन्मोजन्मिहोयसोभा
ग्य॥कदाहष्टीनपडेदुर्भाग्य॥चक्रेश्वरादिकसकळभाग्य॥धामहोय॥५३॥भितीनेपुजिलाजिनेश्वर॥तरी
जयाहोयप्रियकर॥करुणाकरीतिसुरवर॥भगकायनहोय॥५४॥किर्तिव्यापेत्रिजगात॥जैसाभानूवि
श्वस्फुरित॥तैसेयेउदउदिशात॥सहजिवकाशे॥५५॥स्वर्गस्त्रियाइछितीतयासी॥म्हणतिकेव्हायेईलपुं
ण्यरासी॥जाउनिपुजुजिनेश्वरासी॥तयासंगतिने॥५६॥भोगुनिसुरनरादिसंपति॥अंतिधामहोयनिवृत्ती
॥भावपुजिलाजिनपति॥तरीधामसर्व॥५७॥अहोऐकायासुत्रोक्त॥जरिपुजिलादेवअर्हंत॥तरिमोक्षकर
तळात॥तयामानवासी॥५८॥श्लोक॥स्वर्गतस्यगृहांगणंसहचरेसाम्राज्यलक्ष्मीशुभा॥सौभाग्यादिगुणा
लीर्विलसतिस्वैरंवपुर्वेश्मनी॥संसारःसुतरःशिवंकरतलेक्रोडीलुटत्यंजसा॥यःश्रद्धाभरभाजनंजिनपतिः
पूजांविधत्तेजनः॥१०॥टिका॥आताऐकावेश्रोतेजन॥होउनिभक्तिसीभाजन॥जिनपुजाकरीजोसज्जन॥अ
धाभावेदेखा॥५९॥कोणीयेकभाविकजन॥भावेपुजीलाजरिश्रीजिन॥तयाअंगणीस्वर्गभुवन॥लक्ष्मीतसे॥६०

॥६॥

सुखे जो गुनि मानव गति॥ नंतर जाय स्वर्ग श्वति॥ तरी न सोडीत या श्वति॥ शुभ लक्ष्मी॥ ५१॥ साम्राज्य लक्ष्मी म्हणे
येथ॥ कधी येईल तो लोकनाथ॥ चक्रादि रत्न करवी न शाम॥ तया त्राविकासी॥ ५२॥ सौभाग्यादि गुण समस्त॥ शा-
रीर मंदिरी विराजित॥ अवधि संपती शोभत॥ पूजक नरासी॥ ५३॥ श्रेकासंसार समुद्र अपार॥ घोर दुस्तर नग्र
कर॥ नाग नर सुरा न कळे पार॥ संसार दुःखाचा॥ ५४॥ ययाअपार सागरात॥ सुखे तरोनि जाय त्वरीत॥ निर्मल बुद्धि
जिनेश्वराते॥ त्रिसुद्धी करुनि॥ ५५॥ करीता जिनेश्वराचे पूजन॥ होय सर्व कर्माते भंजन॥ अधिपति होय तो सज्ज
न॥ मोक्षसुखासी॥ ५६॥ आन्योदय जो एनि सर्वकाळी॥ मुक्त होय त्वरित चिकाळी॥ जिनपुजा करी जो त्रिका
ळी॥ तो चि पुण्यपुरुष॥ ५७॥ अतादेवपुजेचे वर्णन॥ न होय सुरगुरु कारण॥ मा ईतर कवि वर्णि कोण॥ ययाध
रातळी॥ ५८॥ श्लोक॥ कदाचिन्नातंकः कुपित इव पश्यत्यभिमुखं विदूरे दारिद्र्यं चकितमिव नश्यत्यनुदिनं॥ विर
क्ता कांत्येव त्यजति कुगतिः संगमुदयो न मुंचत्यभ्यर्णं सुहृदिव जिनार्चां रचयतः॥ ११॥ टीका॥ अर्चा करीता अ
र्हंताचि॥ व्यथा पळोनि जाय तयाची॥ जैसी रतिकुपित नराचि॥ न स्थिर होय॥ ५९॥ झडकरी जाय तैसी व्यथा
दृष्टि मागे न करी सर्वथा॥ मा दुःख शोकाचि कथा॥ काणि कदा पडेना॥ ६०॥ दारिद्र नरा देतया जवळ॥ जया-

॥६॥

सीदेखुनिडुरपळे॥ बाधाहोयकीरानोमाळ॥ तयापुरुषाची॥ ६१॥ नयानीतहोउनिमानसी॥ गजपळेशिंहदे
खोनिदेशोदेशी॥ तैसेदेखुनितयासी॥ कर्मजायपळोनी॥ ६२॥ विरक्तबाळजैसीनिर्मळ॥ पुरुषदेखोनिडुरपः
ळे॥ तैस्याकुगतिसकळ॥ डुरजातीपळोनि॥ ६३॥ डुर्गतीत्यजितीत्याचासंग॥ अवडिसुगतिहोययोग॥ पाप
कर्मअवघेंभंग॥ पुज्यकनराचे॥ ६४॥ सर्वसंपतीचाउदय॥ संगसोडुनिकदानजाय॥ जैसादेखोनिचंद्रो
दय॥ भरतियेईसागरा॥ ६५॥ भावपुजिलाजिनेश्वर॥ सर्वज्ञःकर्मजायडुर॥ सकळसुखाचासागर॥ निरंत
र भोगी॥ ६६॥ हेऐकोनि भव्यजन॥ त्रिकळकरावेजिनपुजन॥ सर्वसुखासीभाजन॥ अपणचिहोय॥ ६७॥
भावेसुर्यासिधरिताछत्र॥ छायाशांतहोयआपुलेगात्र॥ तैसीजीनप्रतिमापवित्र॥ पुजितासौख्यसहज॥ ६८॥
॥श्लोक॥ यःपुष्पैर्जिनमर्चती॥ स्मितसुरस्त्रीलोचनैसोर्चते॥ यस्तंवंदतयेकशःस्त्रिजगतासोहर्दिवंवंद्यते॥ या
स्तंस्तौतिपरस्त्रवृत्रदमनास्तोमेनसंस्तुयती॥ यस्तंध्यायतिक्लृप्तकर्मनिदनः॥ सध्यायतेयोगिभिः॥ १२॥ टीका॥
अहोकोणीयेकसज्जन॥ दिव्यघेउनियासुमन॥ त्रिकाळीअर्ची देवजिन॥ त्रिकर्णशुद्धी॥ ६९॥ पुष्पेअर्चिल्याजि
नेंद्रासी॥ देवांगनाअर्चिततयासी॥ आपुल्यादिव्यनेत्रेजयासी॥ लक्षीतीदेखा॥ ७०॥ येकपुष्पेजरीयेकवेळे॥ अ

॥७॥

र्चिला जिनेश्वर निर्मळ ॥ देवस्त्रिया निज दिव्य डोळे ॥ अर्चिती तयासी ॥ ७१ ॥ येकदा वंदिला जिननाथ ॥ तयावं
दिती त्रिलोकनाथ ॥ स्वये होउनि सिधनाथ ॥ अनंत सौख्य भोगि ॥ ७२ ॥ करीता जिनेश्वराचि स्तुती ॥ पत्रीस्तवी
ती सुरसमिति ॥ अंति होउनि श्रीपति ॥ मोक्षसुख भोगी ॥ ७३ ॥ अंतरी ध्याता निजरुप ॥ हरति तयाचे सकळ पाप
॥ स्वय होउनि ब्रह्मरूप ॥ योगि ध्याती तयासी ॥ ७४ ॥ यापरी सांगुनि जिनभक्ती ॥ नंतर सांगतो गुरुभक्ती ॥
श्रोते होउनि सावधचिती ॥ लक्ष ग्रंथी असावा ॥ ७५ ॥ ईति श्री अर्हद्भक्ति निरुपण नाम द्वितीयोध्याय ॥ २ ॥
॥ श्रीमंगल महाश्री ॥ छ ॥ ॥ ॥ श्रीसुमतीनाथाय नमः ॥ श्लोक ॥ विदलयति कुबोधं बोधयत्याग
मार्थं ॥ सुगति कुगति मार्गौ पुण्यपापे व्यनक्ति ॥ अवगमयति कृत्याकृत्य भेदं गुरुर्यो ॥ भवजलनिधिपोतस्तं विना ना
स्ति कश्चित् ॥ १३ ॥ टीका ॥ अनंत जन्मी फीरो नियादे ॥ लाभ जाला मनुष्यदेह ॥ गुरु वीण जात आहे ॥ निरार्थक ॥ १ ॥
गुरु करावा जन्मा येउनि ॥ सापडली नरतनू हे निधान ॥ यालागी करावा सज्ञाने ॥ श्रीगुरु शीघ्र ॥ २ ॥ गुरु करा
वा पारखून ॥ जेणे तोडिला संसार संतान ॥ पार जाला भवार्णव गहन ॥ तो चितारी इत्यासी ॥ ३ ॥ भार्यापुत्रादिक अ
हस्त ॥ तैसे चि शिष्यासी उपदेसित ॥ आत्मज्ञाना वीण भ्रांत ॥ निरसे वैसी ॥ ४ ॥ कुटुंब पोसावया कारण ॥ बहुत द

॥७॥



खविसाधुपण॥ शिष्यकरुनिद्रव्यहरण॥ थोरयलेकरी॥ ५॥ द्रव्यईछुनियाअंतरी॥ यंत्रमंत्रकरीकुसरी॥ जें
दुनियानरनारी॥ द्रव्यकरीहरण॥ ६॥ ऐसागुरुकेलाकोणीजरी॥ कैसेनिघावेभवसागराबाहेरी॥ जालीदो
घाचियेकचिपरी॥ ऐकासज्ञानहो॥ ७॥ गुरुकरुनयेसैरावैरा॥ तेणेनचुकेकदाकर्मफेरा॥ संसारतुटोनिजाये
येकसरा॥ ऐसागुरुकरावा॥ ८॥ यालागिगुरुकरावासमर्थ॥ जेणेज्ञानहोयतत्वार्थ॥ लाभहोयेजेणेपरमार्थ॥ ऐ
सेकरावे॥ ९॥ ऐकाश्रीगुरुचेलक्ष॥ शुद्धजयाचेअंतःकर्ण॥ सदास्वहिताचेकारण॥ अहीर्निशीकरीत॥ १०॥
शुद्धस्फटिकाचेभाजनी॥ शुद्धोदकघेविलेभरोनी॥ पाहातापाणीदिसेलोचनि॥ पात्रकाहीदिसेना॥ ११॥ आ
सेनिर्मळज्याचेअंतर॥ सस्वरुपीलीननिरंतर॥ पारकरीभवसागर॥ शिष्याजनासी॥ १२॥ तपकरीतसेद्वादश॥
॥ त्रयोदशचारित्रपाळीविशेष॥ सूक्ष्मक्रियापाळीअसेष॥ मार्दवभाव॥ १३॥ शत्रुमित्रजयातेसमान॥ सम
मृत्तिकाधान्यसोन॥ गारकांचअनर्घ्यरत्न॥ समानजयासी॥ १४॥ कोणीभावेयेउनिपूजिले॥ कोणीलत्तांगु
ळीनेताडिले॥ समानदोघासिबोले॥ तोचिपुण्यमुर्ति॥ १५॥ समानपाहेसर्वत्रासी॥ भुवनत्रयातीलजीवरा
सी॥ सुरासुरकीटकासी॥ समानलेखी॥ १६॥ गुरुसंसारसमुद्रतारक॥ गुरुभवदुःखनिवारक॥ स्वपरतत्व

उपदेशक ॥ भव्यजनासी ॥ १७ ॥ दयाकरीषड्जिवावरी ॥ स्थावरजंगमादिकावरी ॥ भेदनआणीअंतरी ॥ सागर
रूपेचा ॥ १८ ॥ निश्चयरत्नत्रयालंकृत ॥ सकळप्रमादटाळीत ॥ अजिनवकर्मानेवर्जित ॥ श्रीगुरुनाथयेक ॥ १९ ॥
स्वसुखार्णवीसदाक्रम ॥ परमानंदामृतशोभित ॥ नित्यघनानंदवर्शत ॥ तयाअंतरी ॥ २० ॥ जरीपुण्यअसेबहुजन्मा
चे ॥ ऐसागुरुसापडेतरीच ॥ पातकनस्यहोयजन्मोजन्मीचे ॥ दर्शनमात्रे ॥ २१ ॥ गुरुरूपाहसीपाहेजरी ॥ कुबोधना
शहोयक्षणमाझारी ॥ अज्ञानतमांधकारनिवारी ॥ येकाक्षणात ॥ २२ ॥ आगमार्थबोधातयाते ॥ सप्ततत्वाचेप्रक
शित ॥ भेदीकरविनीजरूपाते ॥ गुरुपुण्यराशी ॥ २३ ॥ कुगतिदुःखाचेकारण ॥ नरकतिरकादिकरविभ्रमण ॥ शि
ष्यजनासिकृपापूर्ण ॥ करुनिसांगे ॥ २४ ॥ पितीनेसांडविकुमती ॥ दयाकरुनिसांगेसुमती ॥ पुण्याकोणत
यापती ॥ रूपेनेसांगे ॥ २५ ॥ मार्गदाखवीसुगतिचा ॥ स्वर्गापवर्गनानासुखाचा ॥ स्वामीहोयत्रिलोकाचा ॥ उ
पायऐसासांगे ॥ २६ ॥ पापपुण्याचेदाखविरूप ॥ सुबोधकरूनिलपवीपाप ॥ हरोनिजायसंसारताप ॥ नो
चिरूपदाखवि ॥ २७ ॥ कृत्याकृत्यदाखवीभेद ॥ हेकृत्यकेलियाउपजेखेद ॥ याकृत्यानेपातकछेद ॥ म्हणो
निसांगे ॥ २८ ॥ याकारणेगुरुथो ॥ असेम्हणतातिजनसारे ॥ सकळसाधनासिआधार ॥ गुरुमहाराज ॥ २९ ॥


गुरुसंसारसागरतारक॥ दुर्धरदुःखातेनिवारक॥ बुडतासागरीज्ञाजयेक॥ गुरुमहाराजा॥३०॥ गुरुविणतारक
नाहीकोणी॥ स्थावरजगमाआधारजैसेपाणी॥ कीमार्गदाखवीताघोरस्रानी॥ नाहिनाहीदुजा॥३१॥ श्लोक॥ अ
वद्यमुक्तिःपथयः प्रवर्तते॥ प्रवर्तयतन्यजनंचनिस्पृहः॥ सएवसेव्यःस्वहितेषणांगुरु॥ स्वयंतरंतारयितुंक्षमःपरं
॥३१॥ टीका॥ आपणचालतसेनिर्दोषमार्ग॥ साहातसेघोरोपसर्ग॥ जेणेप्राप्तहोयेस्वर्गापवर्ग॥ तोचिमार्गदाखवी
॥३२॥ भावनिस्पृहउदास॥ स्वानंदसौख्यभोगिविशेष॥ तोचिबोधशिष्यजनास॥ सांगतसेनित्य॥३३॥ रत्नत्र
यभावनासंपूर्ण॥ आनंतसुखासिकारण॥ शिष्यजनावरीदयापूर्ण॥ करुनिसांगे॥३४॥ आपणपाळीचारीत्र
शुध॥ चालवीअन्यजनाकरुनिबोध॥ प्राप्तहोयस्थाननिर्बाध॥ तोचिबोधकरी॥३५॥ स्वहितचिसांगेगुरु
राज॥ हरुनिजायजणेपापरज॥ कृपाळुऐसामहाराज॥ गुरुविणकोण॥३६॥ आपणस्वयेसिंधुतरुनिजाय॥
तैसाईतरजनादाखविउपाय॥ यालागीधरावेतयाचेपाय॥ आधीआधीलरे॥३७॥ आपणआचरेशुधअ
चार॥ भेदभेदरत्नत्रयोपाचार॥ तोचिशिष्यजनासीविचार॥ उपदेशित॥३८॥ याकारणेसंतजन॥ करीताति
गुरुचेपूजन॥ लोपहोतिकर्मांजन॥ गुरुपदसेविता॥ अर्थं॥ नरककुपातुनिबाहीर॥ गुरुवीणकाडीलकोणई

तर ॥ नाहीनाहीयया धरीवर ॥ समर्थहुजा ॥ ४० ॥ तोचिकरावा गुरुसमर्थ ॥ योहोनिश्रुथज्ञानवंत ॥ तत्वप्रक
टकरीजनात ॥ गुरुराजसमर्थ ॥ ४१ ॥ श्लोक ॥ १ ॥ पितामाताभ्राताप्रियसहचरीसूनुनिवह ॥ सुदत्स्वामीमाद्य-
त्करिभटरथाश्वःपरिकरः ॥ निमज्जंतुंजंतुंनरककुहरीरक्षतुमलं ॥ गुरोधर्माधर्मःप्रकटनपरस्कोमनपरः ॥ ३५
॥ टीका ॥ १ ॥ अनादिसंतानहेत्रिताप ॥ चतुर्गतीहिंडवीउन्नयरूप ॥ येकसरेचियाचालोप ॥ करीगुरुराज ॥ ४२
॥ दारवविधर्माधर्मरूप ॥ तैसेचिसुचवीपुण्यपाप ॥ गुरुवीणकोणहरवीताप ॥ शिष्यजनाचा ॥ ४३ ॥ गुरुवीणमाता
पीता ॥ कन्यापुत्रबंधुभ्राता ॥ नरककुपामाजीपडता ॥ कोणकाडीहुजा ॥ ४४ ॥ सोयेरेधाईरेहुहृज्जन ॥ प्रियमित्र
दिकांताजन ॥ अवघीअसोनिनर्कभूवन ॥ गुरुविणचूकेना ॥ ४५ ॥ राजाधीराजस्वामीथोर ॥ मंडलीकमहा
मंडलेश्वर ॥ बलवासुदेवादिचक्रधर ॥ नानरेहीती ॥ ४६ ॥ ऐसाथोरअसोनिधणी ॥ पडताडुर्गतीदुःखरा-
नी ॥ येकागुरुवीणनतारीकोणी ॥ यात्रिजगामाजी ॥ ४७ ॥ महामदोन्मतकुंजर ॥ रथपदांतीअश्वथोर ॥ को-
टिमहादिमहावीर ॥ कार्यकरीती ॥ ४८ ॥ धनधान्यादिकसंपति ॥ सैन्यचतुर्विदमहाविभूती ॥ गुरुवाचो-
निनतरति ॥ भवदुःखसागरी ॥ ४९ ॥ नरककुपामाजीसमस्त ॥ जंतुरारात्रीदुःखभोगीत ॥ येकागुरुवी

णनयात॥ कोणकाडीबाहेरी॥ ५०॥ भवसागरीबुडताप्राणी॥ भोगीतानानादुःखखाणी॥ येकासद्गुरूवाचुनी॥ कोण
काडीतयाते॥ ५१॥ गुरुआज्ञेविणसर्वगुण॥ तेनिष्फळअसेजाण॥ ऐकाफोलधान्यावीण॥ पद्मनद्दजैसे॥ ५२॥ श्लो
क०॥ किंध्यानेन भवतशेषविषयत्यागैस्तपोभिःकृत॥ पूर्णभावनयालमिंद्रियदमैःपर्याप्तमाप्तागमैः॥ किंत्वकं भ
वनाशनेकुरुगुरुप्रीत्यागुरोशासनं॥ सर्वेयेनविनाविनाथबलवत्स्वार्थायनालंगनाः॥ २६॥ टिका॥ गुरुआज्ञेवी
णकेलेध्यान॥ अथवाकेलेनानासाधन॥ मौन्यअनुष्ठानादिविधान॥ वृथाजीणदिसे॥ ५३॥ सर्वविषयाचाकेला
त्याग॥ नातरीकेलानानायोग॥ गुरुवचनाविणसर्वत्याग॥ तरिनिष्फळ॥ ५४॥ अनुग्रहावाचुनिकरितातप॥ बा
ह्यान्यांतरउभयरूप॥ साहिलाअनेकप्रकारेताप॥ परीनिरार्थपाहे॥ ५५॥ गुरुवचनाचानाहीबोध॥ जपज
पतसेनानाविध॥ गुरुउपदेशावीणअंतरशुध॥ कदाकाळीनहोये॥ ५६॥ गुरुआज्ञेवीणभावना॥ अथवामु
द्रासाधननाना॥ गुरुवाचोनिआराधना॥ कैसीकरावी॥ ५७॥ जरीइंद्रियातेकेलेदमन॥ रोधोनिबैसलाज
रिमन॥ सर्वव्यर्थगुरुआज्ञेवाचुन॥ निजखूननकळे॥ ५८॥ प्रापजालाअप्रागम॥ व्यर्थसांगवर्जुनिकाम॥ गुरु
आज्ञेविणअंतरभ्रम॥ नजायकदा॥ ५९॥ गुरुआज्ञेविणहेसर्वनिष्फळ॥ ऐसेबोलतीशास्त्रसकळ॥ ऐका



॥३०॥

सर्वसाधनासिमुळ॥ गुरुराजयेक॥ ६०॥ ययासर्वावरीगुरुआसन॥ तेणेहोतीसकळसाधन॥ हे१माणमानु
निजिनवचन॥ गुरुकरावाअधी॥ ६१॥ गुरुअज्ञेवीणतयास॥ नकदाहोयभवनाश॥ यालागीहोनिजध्यास
॥गुरुपदीअसावा॥ ६२॥ गुरुअज्ञेविणसर्वगुण॥ व्यर्थजैसेसैन्यरायाविण॥ स्वामीकार्यनहोयतेणे॥ सर्वथापा
हे॥ ६३॥ श्रीगुरुसीशरणजावेभक्तीने॥ अर्जउनितयासिप्रियवचने॥ सिकारुनिध्यावेसम्यग्ज्ञान॥ निज
गुरुमुखे॥ ६४॥ गुरुउपदेशाविणसार्थक॥ नहोयकेलियाउपायअनेक॥ याकारणेकरावाविवेक॥ ज्ञानीया
निशिघ्र॥ ६५॥ सार्थककरावेजन्माचे॥ सत्यमानावेवचनगुरुचे॥ धरावेपादपद्मतयाचे॥ बळकटअधी॥
६६॥ इतिश्रीगुरुभक्तिनिरोपणंनामतृतीयोध्यायः॥ मंगळंमहाश्री॥ श्री॥ श्री॥ श्री॥ श्री॥ ॥ळ॥ळ॥ळ॥ळ॥ळ॥ ॥
॥श्रीसुपारिश्वनाथायनमः॥ गुरुभक्तिसांगुनियापुडे॥ जिनागमभक्तिसांगतोपाठ॥ प्रीतीकरुनिचित्तदृढ॥ ऐका
वेंभक्तिने॥ १॥ श्लोक॥ नदेवंनादेवंनशुभगुरुमेवंनकुगुरुं॥ नधर्मंनाधर्मंनगुणपरीणर्धनविगुणं॥ नकृत्यंनाकृत्यं
नहितमहीतंनापिनिगुणं॥ विलोकंतिलोकाजिनवचनचक्षुर्विरहीत॥ १७॥ टीका॥ जिनवचनचक्षुरहितलो
का॥ जैसागर्भांधनदेखेवर्णपेचक॥ किंदिनमणीसीनपाहेधुक॥ तैसेपरीजाणा॥ २॥ जिनागमावाचूननकळेदेव

॥३०॥

॥सुदेवकुदेवयाचानकळेनाव॥जिनवचनावाचुनिदेवादिदेव॥कदाकाळीदिसेना॥३॥नकळेत्यासिसद्गुरुरू
प॥अथवाकुगुरुमिथ्यारूप॥जिनवचनाविणपुण्यपाप॥दिसेनाकधी॥४॥जिनशास्त्रावाचूनिनकळेधर्म॥कि
ह्यदुर्गतिदुःखदायकअधर्म॥नदिसेकधिजिनगुणवर्म॥जिनवचनावीण॥५॥नकळेदुर्गुणअथवासगुण
॥सौख्यदायकसम्यक्त्वगुण॥जिनवचनाइतरनिजखुण॥कैसेनिदिसे॥६॥कृत्याकृत्यनकळेभेद॥कार्याः
कार्यनानाविध॥जिनशास्त्राविणसुबोध॥कदाकाळीनहोय॥७॥जिनागमाविणहिताहीत॥नकळेकदा
विवेकनीत॥करोनिघेतलाआत्मघात॥जीनशास्त्रावीण॥८॥जोनपाहेजिनशास्त्र॥तोजाणावाहीननेत्र॥न
कळेतयासिपात्रापात्र॥नेत्रअसोनिअंध॥९॥नदिसेतयासिस्वहितार्थ॥कैसासाधावापरमार्थ॥जिनवचः
नावीणजन्मव्यर्थ॥तयामानवाचा॥१०॥सर्वज्ञशास्त्राविणजेजन्मले॥तेजाणावेजितचिमेले॥नातरिजैसेकाः
ष्ठाचेबाहुले॥तैसीपरितयाची॥११॥श्लोक॥मानुष्यंविफलंवदंतिहृदयंव्यर्थंवृथाश्रोत्रयोः॥निर्माणंगुणदो
षभेदनकलांतेषांसमंजाविनी॥दुर्वारंनरकांधकूपपतनंमुक्तिंबुधांदुर्लभं॥सर्वज्ञंसमयोदयारसमयोयेः
त्रकर्णास्थितेः॥१२॥टिका॥अहोएकावेश्रोतेजन॥सर्वज्ञसमयदिव्यवचन॥दयारसमयनिधान॥व

चनअषती ॥ ४२ ॥ सर्वज्ञशास्त्र दिव्यवाणी ॥ दयारसअमृतखाणी ॥ तो रसनपडे ज्याचे कानी ॥ व्यर्थज
न्मतयाचा ॥ ४३ ॥ जिनागमवाणी निर्मळ ॥ लोकत्रयामाजी मंगळ ॥ नाएकतां जन्म निष्फळ ॥ जाहः
लातयाचा ॥ ४४ ॥ व्यर्थ निर्माण जाहलेकर्ण ॥ शून्यतयाचे अंतःकर्ण ॥ जिनागमरसना संपूर्ण ॥ कर्णे
ड्रियात ॥ ४५ ॥ जैस्या मृतष्कचक्षुच्या ढोली दीसति ॥ तैसीच कर्णेंद्रिये दीसताती ॥ श्वेतनेत्रापरि मास
ती ॥ नेत्रतयाचे ॥ ४६ ॥ जिनागमदयारसकेवळ ॥ नसेसेविलातो निर्मळ ॥ गुणदोषभेदज्ञान कळे ॥ तयापु
रुषासी ॥ ४७ ॥ सर्वज्ञागमरस नसे पडिला कानी ॥ तो निष्फळ जाला जन्मायेउनि ॥ ऐसे बोलीले केवळज्ञा
नी ॥ हे सत्यसत्य ॥ ४८ ॥ ऐकिले नाहीसर्वज्ञशास्त्र ॥ तो नर जाणावा अपात्र ॥ विवीधदुःखासी तो चिपा
त्र ॥ ऐसे बोलती ॥ ४९ ॥ नरकगर्तेंतुनिस्वछंदे ॥ कैसे निघावे पंगु गर्जांधे ॥ जिनशास्त्राविण भवसिंधु
अगाध ॥ कैसा तरावा ॥ ५० ॥ अंतरला स्वानंदसुखासी ॥ पात्रजाला सर्वदुःखासी ॥ मोहकुर्ले मतयापु
रुषासी ॥ असे बोलती बुध ॥ ५१ ॥ जो नर जिनशास्त्रावेगळा ॥ मानवजन्म तयासी निर्फळ ॥ ते जाण जे सेवा
ष्टाचे फुतळे ॥ हातात्यर्थी ॥ ५२ ॥ श्लोक ॥ पीयूषं विषवज्जलं ज्वलनवत्तोमवनू मित्रं शास्त्रववत्स्रजं भुजग

वचिंतामणीलोष्टवत् ॥ ज्योत्स्नायीष्मजधर्मवत्समनुतेकारुण्यपुण्यापणं ॥ जैनेंद्रंमतमन्यदर्शनसमंयो
दुर्मतीर्मन्यते ॥ २९ ॥ टिका ॥ अज्ञानलोकाचिएका दुर्मती ॥ कुश्चिळकुबुधीवसेचित्ती ॥ जैनदर्शनासममा
निति ॥ अन्यदर्शन ॥ २३ ॥ करुणारसअमृतदिव्यपात्र ॥ जिनिंद्रदर्शनशुद्धपवित्र ॥ सौख्यदायकईश्वर
त्र ॥ यानपात्रासम ॥ २४ ॥ जिनिंद्रदर्शनासमअन्य ॥ केसेकरावेतेदयाशून्य ॥ तेसुरासुरादिकासिमान्य ॥ जि
नदर्शन ॥ २५ ॥ पर्वतामाजीमेरुभूधर ॥ अमरलोकीजेसाशचिवर ॥ कि उडगणामाजीप्रकाशभास्कर ॥ तैसे
जिनमत ॥ २६ ॥ जिनदर्शनआणीअन्यदर्शन ॥ जेमानीसर्वसमान ॥ तेनरजाणावेज्ञानहीन ॥ अचेतनजै
से ॥ २७ ॥ आहोएकातेअज्ञानजन ॥ म्हणतिअमृतविषसमान ॥ कैसाहोईलहीवरचंदन ॥ समानउभय ॥ २८
॥ अमृतशेचतिहोतीमेंअमर ॥ विषप्राशितीतात्काळमरे ॥ कैसेजिनेंद्रदर्शनासमईतर ॥ मानिदुर्मती ॥ २९
॥ अग्निसमानमानीउदक ॥ तेजअंधारकरीयेक ॥ ऐसाअज्ञानअविवेक ॥ चुकलाहितासी ॥ ३० ॥ शत्रूवतूमा
नीहितमित्रासी ॥ मित्रम्हणेदुर्जनखळासी ॥ तैसेअन्यमतजिनिंद्रदर्शनासी ॥ समानम्हणे ॥ ३१ ॥ सुगंधप
रिमळपुष्पमाळ ॥ तयासिम्हणेसर्पकेवळ ॥ जिनमतासमानमानीखळ ॥ अन्यदर्शन ॥ ३२ ॥ चिंतामणीरत्न

॥३२॥

केवळ॥ ईछीतार्थपुरवीसकळ॥ ह्मणेतयासिकाळेढकुळ॥ ऐसारवळताची॥३३॥ निर्मळशरद्रतूचेचांदण॥ या
होनितिमृछह्मणेदारुण॥ भ्रांतिरूपवेदेप॥ण॥ चाबळेनलतेचि॥३४॥ जयापुरुषासिऐसीमती॥ तयासिनचुके
कदादुर्गती॥ पडलिनेत्रासिमोहभ्रांति॥ ह्मणतीज्ञानी॥३५॥ उदंडगाराअसतिमाळावरी॥ तेकायकरीतीर
त्नसरी॥ तैसेअहिंसाधर्माबरोबरी॥ नाहिनाहीदुजा॥३६॥ याकारणेसाधुसंत॥ सदासेविती जिनेंद्रमत॥ कद
नकरितीजिवघात॥ स्वहितालागी॥३७॥ तवश्रोतीवंदूनिगुरुचेपाय॥ पुसतेजालेपुढताउपाय॥ जिनमतसेवि
ताहोतेकाय॥ तेसांगावेस्वांमी॥३८॥ श्लोक॥ धर्मंजागरयत्यघंविघटयत्युत्थापयत्युत्पथं॥ भिंतेमत्सरमुच्छिनत्ति
कुनयंमथ्नातिमिथ्यामतं॥ वैराग्यंवितनोतिपुष्यतिकृपांमुष्णातितृष्णाचयं॥ तज्जैनंमतमर्चतिप्रथयतिध्यायत्य
धीतेकृतिः॥२०॥ टिका॥ ऐकाजिनमताचामहिमापुर्ण॥ भानुजैसाविश्वस्फुरितकीर्ण॥ मोहतमकरावयाविदार
ण॥ समर्थदेखा॥३९॥ दहनकरियापापारण्य॥ विस्तारकरीबहुतपुण्य॥ पाहाजीनमतासमानअन्य॥ नाहीनाही
त्रिजगी॥४०॥ जिनमतनरेंद्रहास्तिकेवळ॥ कुमार्गवृक्षउपडिसकळ॥ नराहेमिथ्यात्वमूळ॥ ऐसेकरीत॥४१॥ दुः
र्गतीदायकमदमत्सर॥ भ्रांतकरवीमोहांधकार॥ तोनासावयाजैसाभास्कर॥ जिनमतपाहा॥४२॥ विदारणकरी

॥३२॥

अथवेथेकुनय॥विस्तारणकरीश्रुद्धसुनय॥दाखविमोक्षमार्गउपाय॥जिनमतार्क॥४३॥मिथ्यामतविपरीतबुध्दि॥
घोरांधरउन्नयविधी॥शोषावयातोनववारिधी॥वडवानळजैसा॥४४॥वैराग्यउपजविअंतरी अज्ञानतमोधं-
कारविदारी॥सूर्यप्रकाशजेसाअंबरी॥तैसेजिनमत्र॥४५॥कृपाउत्पन्नहोयमानसी॥दयाकरविसर्वजीवासी॥
॥जिनमतासारिखीकरुणारासी॥नाहीनाहीत्रिलोकी॥४६॥आशाश्रृछायासर्पिणी॥निसिदिनीडकितीअं-
तःकर्णी॥निर्विषकरावयागारुडमणी॥तैसेजिनमत्र॥४७॥ऐसेजिनमत्रप्रकटित॥विवीधप्रकारेशुजित॥तोस-
र्वसाम्राज्यभोगुनित्वरीत॥मुक्तहोय॥४८॥जिनमत्रध्यायीजोपुमान्॥करीपारायणनिशिदिन॥तोकृतार्थजा-
लाजन्मायेउन॥त्यातेजन्मफळला॥४९॥ऐसाजिनमत्राचामहिमाथोर॥सेविताविघ्नेपळतीदुर॥सवसूखः-
भोगीनिरंतर॥तोनरदेखिजे॥५०॥इतिश्रीजिनमत्रनिरूपणनामचतुर्थोध्यायः॥मंगलमहाश्री॥श्री॥श्री॥छ॥ ४
॥श्रीचंद्रप्रभायनमः॥ऐकोनिश्रोतेजनाचेचित्त॥संतुष्टपरमानंदडुल्लत॥त्यावेजोडोनिदोनीहात॥पुसतेजाले
॥१॥स्वामीजिनमताचेमहिमान॥दाखउनिकेलेसमाधान॥आताजिनसंगाचेअनुसंधान॥सांगावेस्वामी
॥२॥नववोलिलेगुरुनाथ॥पुरउनिश्यावामनोरथ॥जेणेसाध्यहोयपरमार्थ॥तोचिअर्थसांगतो॥३॥मदिः

॥१३॥

मोक्षाचा जिनसंगाचा । पूजितायात्रानुदोनिज्ञायजवाचा । लाजहोयेमोक्षसुखाचा । पूजितासंग । ४ । संगावयासं
गाचे गुणस्तोत्र । पुढे रचिले चारी सूत्र । बुडता सागरी यानपात्र । तैसा जिनसंग । ५ । श्लोक० । रत्नानामिवरोहणं क्षि
तिधरः खं तारकाणामिव च । स्वर्गः कल्पमहीरुहामिव सरः पंकेरुहाणामिव । पाथोधिः पयसामिवेंदुमहसां स्थानं गुणानां
नामसौ । वित्यालोच्य विरच्यतां भगवतः संगस्य पूजाविधिः । २३ । टिका० । सकळवस्तुवसतीरोहणाद्रि । उत्तुंगशो
भायमान दिसत । तैसे जाण सद्गुण समस्त । असति संगामाजी । ६ । नभामाजी वसति उडुगण । ज्योतिश्चक्र आणि
चंडकीर्ण । तैसे संगामाजी संपूर्ण । सद्गुण असती । ७ । स्वर्गी कल्पद्रुम वसती सहज दाही दिशा उज्वळी विराज ।
ईश्वदि जैसा शशांकराज । सद्गुण संगी । ८ । समस्त पृथ्वीतील उदकासी । स्थान जैसे तो अंबुरासी । तैसचि उत्त
मगुण संगापासी । असति समग्र । ९ । सहजी शांतगुण असे सोम । कळासंपूर्ण दिसे विराम । ऐकाते विपरीगुणः
आराम । चतुःसंगामाजी । १० । सरोवर जैसे कमळासि स्थान । तेणे दिसतसे शोभायमान । तैसे विशेष गुणासि
निधान । संतसंग । ११ । संगसमुदाय जिनेश्वरसंबंधी । पुजाविधान करीती त्रिशुद्धी । गुणी गुण जाणुनी पूजावि
धी । करीता पुण्य जोडे । १२ । श्लोक । येसंसारनिरासलालसमती मुक्त्यार्थमुत्तिष्ठते । येतीर्थं कथयंति पावनत

॥१३॥

यायेनास्तिनान्यंसमः॥यस्मैदेवपतिर्नमस्यतिसतांयस्मांछुजायते॥कीर्तिर्यस्यपरावसंतिचगुणाःयस्मिन्स
संगार्चिता॥२३॥टीका॥नवशिष्यपुसेगुरुसी॥सांगश्रुजितांहोयेपुण्यराशी॥जिजीसांगह्मणवेकोणासी॥तेसां
गावेस्वामी॥२३॥गुरुबोलेमधुरवचन॥ऐकास्वस्तकरूनियामन॥जेणेलाजहोयेसकळसाधन॥सांगीनतोः
चिश्रता॥२४॥ऐकासंगाचेलक्षण॥शुद्धजयाचेंअंतःकर्ण॥साधीतातितेउत्तमगुण॥तोचिसंगह्मणवा
॥२५॥संसारत्यजावालेंपटमती॥देहभोगावरीविरक्ती॥जयासीवंदिदेवपति॥संतत्यासीह्मणवे॥२६॥वृत्ती
जयाचेउदास॥निरंतरनिजध्यास॥स्वस्वरूपाचाअभ्यास॥नित्यानित्यकरी॥२७॥रत्नत्रयकरीसाधन॥स
दामोक्षसुखाचेध्यान॥स्वरूपीहोयमनलीन॥तोचिध्यानकरीत॥२८॥सदामोक्षमार्गितिष्ठत॥दृढश्रुद्धः
करूनिचित॥निजनिरंतरजनीयेकांत॥निरंतरकरी॥२९॥करीतीजकजनासीपावन॥त्रिजगीनाहीतयासः
मान॥तीर्थेधुंडाळितात्रिभुवन॥संगाविणनाही॥२०॥पुरतीशेवकजनाचेमनोरथ॥यालागीह्मणतीतयासि
तीर्थ॥संगावीणपवीत्रपदार्थ॥नाहीनाहीअन्य॥२१॥याकारणेसंगापती॥देववृंदनमस्कारिती॥पुण्येपाः
र्जनिपवित्रकरीती॥ह्मणमाजीतयासी॥२२॥संतसंगाचासमागम॥होतालाजहोयगुणउत्तम॥तुदोनि

॥३५॥

जायसंसारभ्रम॥ ऐसेकरीती॥२३॥ कीर्तिलतापसरेआकाशी॥ विवीधपुण्याच्याहोतीराशी॥ उपमादेतासंतसंगा
सी॥ त्रिजगामाजीनाही॥२४॥ संतसंगाचिकरीतापुजा॥ त्रिजगीवंद्यहोयसहजा॥ मुक्तिसतिहोयभाजा॥ मगः
कायनहोये॥२५॥ अहोयासूत्राचेप्रमाण॥ करीतासंतजनाचेपूजन॥ होयसर्वार्थसाधन॥ पूजकानरा॥२६॥
॥श्लोक॥ लक्ष्मीस्तंस्वयमभ्युपैतिरभसाकीर्तिस्तमालोकती॥ प्रीतीस्तंभजतेमतिः॥ प्रयततेतंलब्धमुत्कंठया॥
स्वश्रीस्तंपुरीलब्धुमिछतिमुक्तमुक्तिस्तमालोकते॥ यःसंगंगुणिसंगकेलिसदनंश्रेयोरुचिसेवते॥२७॥ टीका
॥ जोमोक्षयसुखाचाप्रियकर॥ तरीभक्तिपुजाहोसंगीच्यार॥ सौख्यभोगाहोनिरंतर॥ पुजाप्रभावे॥२७॥ स्वइ
छाउत्तमगुणासी॥ पवित्रसदनक्रिडावयासी॥ समस्तपुण्याचीयेकराशी॥ संतसंग॥२८॥ संतसंगाचिशेवा
वानिर्भार॥ करीतासूरहोतीकिंकर॥ लक्ष्मीउभीजोडोनिकर॥ पूजकानरासी॥२९॥ श्रीदेवियाहेरभस॥ स
र्वदेवताहोतिदास॥ भावेपूजितजिनसंगास॥ पापनाशहोय॥३०॥ कीर्तिदेविनिर्भाररभक्ति॥ प्रेमेतयासिआ
लंगीती॥ साधुसंगहोयमुक्ती॥ त्वरीतचिकाळी॥३१॥ प्रितीदेवितयानरासी॥ सेवाकरितीदासदासी॥ प्रेमेल
क्ष्मीअहीर्णसी॥ संगपूजाप्रताप॥३२॥ मतीप्रामहोयउत्कर्ष॥ त्वराइछीतसेउल्हास॥ प्रयत्नकरितीबहुस

॥३५॥

यास॥ तयामानवा॥ ३३॥ स्वर्गादिसंपतितयापती॥ थेमेआलिंगावयाईछिती॥ पुनःपुन्हायादेमागुति॥ संगपुन्हक
॥३४॥ मोक्षलक्ष्मिईछीतयासी॥ ह्मणेके क्रांयेऽलपुण्यराशी॥ अहीर्णिसीलक्ष्मीमानसी॥ नचीसरेकदा॥३५
॥संतसंगाचेझेविनापाय॥ घोरदुषकर्मझीघुजाय॥ सकळसाम्राज्यपावदोय मव्हिमासंगाचा॥३६॥ संगतः
क्तिमुख्यकारण॥ जातपेरिल्याअंकुरदिसेखूण॥ परिसेवटीयेइ जैसेकण॥ तैसेगौणफळ॥३७॥ श्लोक॥ यद्भक्तिः
फलमर्हदादिपदवीमुख्यंकृषेःसस्यवः। चक्रेत्वत्रिदशेंद्रतादिव्यघ्नणस्यासंगिकंगीयते॥ शक्तियन्महमस्त
तैनदधतेवाचोपिवाचस्पते॥ संगःसोगव्हरः॥ पुनातुचरणान्यासैःसंतामंदिरं॥२८॥ टिका॥ कृषारंभासिगौणजै
से॥ शशीविराजीतलसलसे॥ तैसेगौणअर्हदादिपदविस॥ संगभक्तिते॥ ३७॥ गोणह्मणिजेस्वल्पफळ॥ मुख्यतेः
चिविज्ञोपकेवळ॥ तेणेचिपावहोयेसकळ॥ वैभवदेखा॥ ३९॥ साळीपेरिल्याअंकूरदिसे॥ सस्यासिनामसाळीच
असे॥ गौणपळयालागित्यास॥ ह्मणतीज्ञानी॥४०॥ अंतिसाळीयेतिफळास॥ मुख्यफळह्मणावेतयास॥ तैसे
अर्हदादिपदवीस॥ गौणफळस्वर्गादी॥४१॥ राजाधिराजमहाराज॥ मंडळीकमहामंडळीकतेज॥ मुकुटबंधादिप
दविराज्ये॥ हेगौणफळ॥४२॥ गौणफळपतीवासुदेवसंपती॥ तीसंगभक्तीचहोयपावती॥ मुख्यफळतेमुक्तीपति॥ सं

॥३५॥

गधूजाकरुनि ॥४३॥ बलवासुदेवादि चक्रेश्वर ॥ खेचरनरेंद्र धरणीधर ॥ अर्हदादिपदवीसहणवत्सार ॥ ऐकासज्जन
हो ॥४४॥ गरूडगंधर्वादियेंतर ॥ ज्योतिष्कदेवादिसुरासुर ॥ गौणफळहणवत्सार ॥ अर्हदादिपदासी ॥४५॥ ऐसाम
हिमासाधुसंगा चि ॥ कोणवर्णनकरितयाचा ॥ साक्षात्बृहस्पतीचीअकलीवाचा ॥ नवर्णवेतया ॥४६॥ करिता
साधूजनाचीभक्ती ॥ प्राप्तहोयसकळसंपती ॥ ईंद्रादिदेवतयावंदिती ॥ निरंतर ॥४७॥ ईत्यादिसर्वअभ्योदय
॥ ऐकागौणफळचिहोय ॥ सेविता साधुजनाचेपाय ॥ मुख्यफळप्राप्त ॥४८॥ करावयासिपापहरण ॥ मुख्यज्ञा
णच्चतुर्वर्ण ॥ गृहपवित्रहोयतेण ॥ पादस्पर्शिता ॥४९॥ पवित्रकरीतातिजनकासी ॥ तिर्थह्मणवेयालागीत्यासी
॥ त्रिभुवनामाजीपुण्यराशी ॥ संताविणनाही ॥५०॥ जिनसंगपूचरणचेरजामृत ॥ नपडेज्याचेमंदिरात ॥ कांतार
ह्मणावेतयात ॥ नाशिलेनाम ॥५१॥ चतुःसंगाचिपदधुळ ॥ स्पर्शताचिहोयनिर्मळ ॥ धन्यधन्यतेधामविशाळ ॥
असोवर्णकूटी ॥५२॥ जिनसमंधीसंगाइतर ॥ तीर्थनाहीयाधरीवर ॥ तरावयाभवसागर ॥ नाहीदुसरेज्ञान ॥५३॥
॥ परोपकारीवर्ततीसंत ॥ निष्कामहीडतामूतळात ॥ तयासगुणाचानकळेअंत ॥ ब्रह्मादिकासी ॥५४॥ नदिवाहा
तीनिष्काम ॥ स्वभावेफळतिहृत्तविराम ॥ सहजीपुरवितीजनाचेकाम ॥ तैसासंगजाणावा ॥५५॥ धेनुस्वभावेचि-

॥३५॥



देईक्षीर॥ वरीनिवडुसर्याचेअंतर॥ आपरिक रितीपरोपकार॥ चतुर्विधसंग॥ ५८॥ करितासंगाचेवर्णन॥ नहो:
यदोषादिकालागुन॥ माईतरकविवर्णीकोण॥ ययाधरातळी॥ ५९॥ करायाजिनसंगाचेभक्ती॥ दाखउनिश्री
तेजनासियुक्ति॥ पुढेजितावयाअरीसंतती॥ रचिलेसूत्र॥ ६०॥ इतिश्री जिनसंगनिरूपणंनामपंचमोध्यायः॥ श्री
॥ श्रीपुष्पदंतायनमः॥ ऐकोनिसंगाचेमहिमान॥ संतुष्टहोउनिश्रोतेजन॥ पुढेव्रतविधीचेविधान॥ पुसतेजाले॥ १॥
॥ श्लोक ७॥ क्रीडाभूःसुकृतस्यदुष्कृतरजःसंहाररवीत्याभवै॥ दन्वन्नौव्यसनाग्निमेघपटलंसंकेतदुतेश्रयां॥ नि:
श्रेणीत्रैदिवौकसःप्रियसखीमुक्तीःकुगत्यर्गलं॥ सत्वेसुक्रियतांकृपैवभवतुल्कैशैषैपरेः॥ २५॥ टिका ७॥
कृपेनेरक्षीजोप्राणीगण॥ ऐकातयापुरुषाचाउत्तमगुण॥ क्रीडास्थळावयालक्ष्मीकारण॥ विस्तीर्णभूमवत्॥ २॥
उडवावयामहापापधूळ॥ वज्रप्रचंडवडवानळ॥ जयाचेकृपाअंतरनिर्मळ॥ तयाचेगुण॥ ३॥ दयाअंतरीअसेस
हज॥ सळअमगुणतेथेचिविराजे॥ भवसागरतरावयाझाज॥ दयाविणनाही॥ ४॥ येटलादावाग्नीसप्तव्यसन॥
जाळितउत्तमगुणमहावन॥ त्रोगविडुर्धरनरकयातन॥ नानादुःखराशी॥ ५॥ विझवावयातोदावानळ॥ महा
प्रचंडमेघपवळ॥ जयाचेदयाअंतरकोमळ॥ तइतजाण॥ ६॥ कृपाअसेजयाअंतरी॥ दयाकरीजंतूगणावरी॥

॥३६॥

वंदितीदेवगणच्यारी॥तयापुरुषासी॥७॥लक्ष्मीहोयतयाचीदासी॥भोगविसकळसाम्राज्यसौख्यरासी॥सांगका
र्यकरीअद्धीर्लिसी॥इतिजैसीतेपाहे॥८॥अहोदयाभावमहाप्रौढ॥तोचिजाणस्वर्गपतीभावयात्रीढ॥नेउनिला
वितसेकडोविकड॥स्वर्गलक्ष्मी॥९॥दयाभावसर्वासिप्रियकर॥तोलक्ष्मीचामनोहर॥तयाकंठीचाथोरहार॥कृपाते
चिजाणी॥१०॥कृपेनपावेमुक्तिरमा॥लक्ष्मीततयापुरुषोत्तमा॥झालीदुर्गतीचीसीमा॥लाविलेकपाट॥११॥कुगतिसिं
लाउनिथोरअर्गळा॥निरंतरईछीतसेअमृतफळा॥पुण्यद्वारकरूनिस्वगळा॥घालीतयासी॥१२॥कृपासारीखाथोरगु
ण॥नाहीत्रिभूवनामाजीजाण॥सकळसुखासिकारण॥दयागूणदेखा॥१३॥दयालोकत्रयामाजीसार॥दयाउत्तमगु
णासीतोचिआधार॥सर्वसुखाचासागर॥कृपागुण॥१४॥दयासंपतीचेमूळ॥दयाविपत्तीचेकाळ॥दयेनेसिद्धगूणसक
ळ॥प्राप्तहोय॥१५॥दायासाधनाचेसार॥दयागुणासिनाहीपार॥दयामुक्तिचेमंदिर॥ऐकासज्जनहो॥१६॥दयाजया
चिसर्वत्तुति॥अन्यउपद्रवतातयाकायकरिती॥अशेषक्लेषनराहाती॥तयाजवळी॥१७॥दयानाहिजयाअंतरी
॥सौख्यनमिळेस्वप्नांतरी॥तोपडिलाजाणभवसागरी॥दुःखराशीमाजी॥१८॥श्लोक॥यदियावातोयेतरतितरुणीर्य
ड्दयती॥प्रतिच्यासप्ताचीर्यदिभजतिशैकथमपि॥यदिक्ष्मापीवंस्याडपरीसकलस्यापिजगतः॥प्रसुतेसत्वान्नात

॥३६॥



दयितवदक्वापिसुहृतं॥२६॥ टिका॰॥ नवशिष्यह्मणेगुरुराया॥ करावित्सर्वांनुतिदया॥ हेज्ञाजदिधलेतरावया॥ नव
सागर॥ २९॥ हेतोत्रिलोकामाजीसार॥ ऐसेबोलतातिसाह्माचार॥ परीबहुतदिसेअंतर॥ मिथ्यामतामाजी॥ २०॥
प्राणीवधकरूनिपुण्यजोडे॥ ऐसेबोलतातिमतिमुढ॥ द्रव्यवेचूनियारोकडे॥ पापकर्मघेती॥ २१॥ काहीयेकनिमि-
त्यकरूनि॥ मोहत्साहकरीतीजीववधून॥ ह्मणतीसफळजालेजन्मायेउन॥ येणेकर्मे॥ २२॥ कैसेपुण्यघडेलयाजि
वासी॥ प्रत्यक्षमारूनियरजिवासी॥ ह्मणतिकारणहेचीसर्वसुखासी॥ हाकायअनर्थ॥ २३॥ गुरुबोलेमधुरवाणी
॥ ऐकेशिष्याशिरोमणी॥ हेमिथ्यावचनपापखाणी॥ ऐकोनयकदा॥ २४॥ आताऐकाहोश्रोतेजन॥ सत्यमानावे
हेजीनवचन॥ पुण्यनघडेजीववधकरून॥ हेसत्यसत्य॥ २५॥ याउपरि नतरेकदापाण्यात॥ तोदीतरोनिजायकदा-
चित॥ परीकरुनयाजिवघात॥ नघडेपुण्य॥ २६॥ पश्चिमेनउगवेकदाभास्कर॥ तोहीउगवेलकाळनुसार॥ परी
करुनिहींसाविचार॥ पुण्यनघडे॥ २७॥ अग्निगुणउष्णकेवळ॥ तोकदापीनहोयशीतळ॥ तोहीकाळेकरूनि
होयीलजळ॥ सत्यार्थीपाहे॥ २८॥ ऐकाकोणीयेकेकारण॥ हेसर्वघडोनियेतीगुण॥ परीजीवहिंसाकेलीयान
॥ पुण्यनघडे॥ २९॥ वसुंधरासर्वजंतूसिआधार॥ उत्पन्नहोतीसकळचराचर॥ धातुरत्नादीकप्रचुर॥ स्थावरसर्वा



भूमी॥३०॥भूमिपीठसर्वजंतुते॥थारानदेईनघडेमाते॥परीकाळेकरुनिश्रवचिते॥घडोनियेपी॥३१॥नहोयऐसे
वियरित॥तेहीहोईलकदाछित॥परीजिवहिंसाकरुनिघात॥पुण्यनहोये॥३२॥ऐकाश्रोतेजनसमस्तशाङ्ग॥
मंत्रतंत्रादियागयज्ञ॥हिंसाकराविह्मणतीकुज्ञास्वज्ञ॥तेचिअज्ञह्मणावे॥३३॥श्लोका॥सकमलवचनेमग्नेर्वा:
सरंनास्वदस्ता॥दमृतमुरगवआत्साधुवादंविवादात्॥रुगपगममजीनाङ्जीवितंकालकूटा॥दमिळसतिलवाथः
प्राणिनांधर्ममोछितु॥२७॥टिका॥हेऐकोनिश्रोतेजन॥स्वामीहेनकळेतयालागुण॥धर्मह्मणतिजीववधुन॥हे
आश्चर्यकाय॥३४॥मुनिह्मणेऐकामात॥लोकप्रसिद्धदृष्टांत॥जरीजाहलासन्नीपात॥काहोप्रांतनपडे॥३५॥
नेत्रासीरोगआलाजरी॥शंखदिसेपिवीळापरी॥पापकर्मउदेलेतरी॥ऐसीपरीदिसत॥३६॥अथवाजाहलाउन्म
तवात॥स्वइछाबोलेमलतनलेत॥मगकायपुसावेतयाते॥विवेकीयाणी॥३७॥शुभाशुभकर्माचाउदय॥तद्यो
गकाळीहोयउदय॥कर्मासारीखेफळहोय॥उदयकाळी॥३८॥नेत्रझाकूळलेअशुभकर्म॥पापपुण्याचेनक
ळेवर्म॥तेणेजिववधासिह्मणतीधर्म॥निजभ्रांतिरूप॥३९॥ज्ञाननेत्रासीआलेपडळ॥ह्मणेतीवआग्नीकरूनिश्च
ळ॥त्यामाजीलाउनिकमळ॥पुण्यफळघ्यावे॥४०॥अस्तजालावासरमणी॥पडिलाआंधारनदिसेधरणी॥

॥३८॥

तैंक्षा ह्मणो उगवला नरुणी ॥ ऐसा प्राणी अनार्य ॥ ४१ ॥ भुजंगा मुखी घालू निद्हात ॥ काडावे ह्मणे दिव्याऽमृत ॥ प्रत्यः
ह्म होइल आपला घात ॥ हेन कळे तया ॥ ४२ ॥ सज्जनासी करु निवेवाद ॥ बोलावया शिके उत्तम शाब्द ॥ मतिमंदासि
न कळे भेद ॥ इछी तो पुण्य ॥ ४३ ॥ रोगे पीडो निद्राहल्ला जीर्ण ॥ उपायन दिसे ह्मणे आले मरण ॥ चिरंतन वाचावयाका
रण ॥ वीशदारुण प्राशीत ॥ ४४ ॥ पुण्य इछूनियामनात ॥ करीतो अन्य जिवाचा घात ॥ ह्मणे येणे होइल शांत ॥ सक
ळ राष्ट्रासी ॥ ४५ ॥ ऐसी असे जयाची मती ॥ कैसे बोधावे तयाप्रती ॥ कदा न चुके होउ र्गति ॥ तयापुरुषासी ॥ ४६ ॥ अ
ग्नीमाजी उपजे कमळ ॥ किमध्यरात्री उगवे अर्क मंडळ ॥ तरी चजीव वधूनि पुण्यफळ ॥ प्राप्त होय ॥ ४७ ॥ सर्पमु
खी अमृत मिळे ॥ कीवीष प्राशीता होय रोग निर्मळ ॥ तरीच प्राणी वधूनि पुण्यफळ ॥ प्राप्त होय ॥ ४८ ॥ हे जाणोनि
दृष्टांत खुण ॥ हिंसा न करावि गेलिया प्राण ॥ अहो सर्वसुखासी कारण ॥ अहींसा व्रत ॥ ४९ ॥ श्लोक ॥ आयुर्दिर्घ
तरं वपुर्वरतरं गोत्रं गिरीयस्तरं ॥ वितं भूरीतरं बलं बहुतरं स्वामित्व मुच्चैस्तरं ॥ आरोग्यं विगतांतरं त्रिजगतृश्लाघ्या
त्वमल्पेतरं ॥ संसारांबुनिधिकरोति सुतरं चेतः कृपार्द्रीतरं ॥ २७ ॥ टिका ॥ जयापुरुषाचे अंतर ॥ कृपेने द्रवे निरंतर
॥ तो जाणावा उत्तम नर ॥ त्रिभुवनामाजी ॥ ५० ॥ दयाकरिता सर्वजिवावर ॥ आयुष्य वर्धे दीर्घतर ॥ हमिंद्रा दिसे

॥३८॥



रव्यसार॥सहजीप्राप्त॥५१॥स्वरूपसुंदरसंज्ञानन॥जगप्रियकरअभिनवमदन॥जरीदयायुक्तअसेमन॥तरीच
प्राप्तहोय॥५२॥प्राप्तहोयउत्तमगोत्र॥लोकाधिपत्यआणीजगमित्र॥जयाचेकरुणारसचित्तपवित्र॥तयापुरुषा
सी॥५३॥धनधान्यादीकसंपती॥उमामातुल्यजैसाधनपती॥रूपाअसेजयाचाचिती॥तरीप्राप्तहोय॥५४॥त्रिभु
वनामाजीमहाबळी॥नत्रीयेकोणासिकदाकाळी॥अनुकंपाअंतरकळकळी॥तरीचलाभहोय॥५५॥दयायुक्त
ज्याचेहृदयकमळ॥तरीप्राप्तहोयस्वामीत्वसकळ॥सेविती विश्वधरामंडळ॥तयापुरुषासी॥५६॥आरोग्यताप्रा
प्तहोयेकडवर॥व्यथापळुनिजायदुर॥जयाचेकृपेनेइव्येअंतर॥तयामानवासी॥५७॥कृपेनेरक्षिजोप्राणीया॥
सी॥म्हाख्यातात्रिजगीहोयतयासी॥देवतातीप्ततीतयापासी॥अद्दीर्णिजीदेखा॥५८॥सर्वांभुतीदयाकरीता॥
त्रिभुवनामाजीहोययोग्यता॥जावेलक्षितीस्वर्गदेवता॥तयापुरुषासी॥५९॥दयासर्वामाजीमुख्य॥तेणेप्राप्त
होयसर्वसौख्य॥दुष्कर्मजळोनिहोयराख॥तयामानवाचे॥६०॥रूपासकळामाजीसार॥सर्वसुखासिरूपा
आधार॥देवदानवहोतीकिंकर॥मगकायनहोय॥६१॥संसारसागरबहुदुस्तर॥नागनरसुरानकळेपार॥त
रोनिजायशुभतर॥दयागुणपाहे॥६२॥दयासर्वधर्माचेमूळ॥दयानेसर्वपातकेहोतीनिर्मुळ॥दयासौख्यरा

॥श्री॥

ज्ञीकेवळ॥अमृतखाणी॥ ६३॥ दयेवीणकथाधर्म॥ दयेवीणक्रीयाकर्म॥ दयेविणसाधनधर्म॥ निष्फळपाहे॥ ६४
॥ अहिंसाव्रतहेजगी श्रेष्ट॥ तेसुचविलेतुह्मास्पष्ट॥ अतासत्यव्रतमहिमावरिष्ट॥ सर्वांगरिष्टपाहे॥ ६५॥ ईतिश्रीअ
हिंसाव्रतनिरुपणंनामषष्टमोध्यायः॥ ६॥ मंगलंमहा॥ श्री॥ श्री॥ श्री॥ श्री॥ श्री॥ ॥ ॥ळ॥ळ॥ळ॥ळ॥ळ॥ ॥ ॥
॥श्रीशीतलनाथायनमः॥ करजोडोनिश्रोतेजनी॥ विनविलेगुरुलागुनी॥ स्वामीअहिंसाव्रतश्रेकोनी॥ तृप्तजा
लोदेवा॥ १॥ अतासत्यव्रततेकैसे॥ कायगुणअहेतेथेविशेष॥ कृपाकरुनिसांगावेआह्मास॥ श्रीगुरुराया॥ २॥
मुनिबोलेमधुरवचन॥ आताऐकाहोश्रोतेजन॥ स्वस्तकरोनिअपुलेमन॥ सत्यव्रतऐका॥ ३॥ श्लोक॥ विश्वा
सायतनंविपत्यदलनंदेवैःकृताराधनं॥ मुक्तेःपत्यधनंजलाग्निशमनंव्याघ्रोरगस्तंभनं॥ श्रेयःसंवननंसमृध्दि
जननंसौजन्यसंजीवनं॥ कीर्तिःकेलिवनंप्रभीवजवनंसत्यंवचःपावनं॥ २९॥ टिका॥ सत्यव्रतहेजगपावन॥
साध्यहोतिसकळसाधन॥ लाभहोयमुक्तिनिधान॥ सत्यमहाव्रत॥ ४॥ सत्यव्रतमहाथोर॥ तेविश्वाचेमंदीर॥ वि
धार॥स्वसुखामृतरससागर॥घनानंदवर्षेथोर॥तेचिनिश्चयचरीत्र॥७७॥ययासर्वातजाणणे॥तेचिवस्तसचेतन
॥परमानंदसुखानुभावन॥स्वसत्तारुपे॥७८॥ज्ञानचेतनाअसतिविवीध॥स्वस्वरूपीसर्वहोतिनिषीद्ध॥येकचीव

॥६१॥

स्कउरविशुद्ध । तोकोण आहे दुजा । ७९ । यास्वरूपाचा अनुभव । ध्यावा स्वसंवेद्यस्वभाव । सहजि अन्यद्वयाचा आभाव
स्वभावचि होय । ८० । निर्विकार सद्आनंद । सकळ बोधलतिकाकंद । निर्द्वंद परमानंद । अभेदस्वरूप । ८१ । अहा
र भयादि मैथुन । उभय परिग्रहास्मृती जनन । हत्यारुपिद्रल विषयवन । विकार मनाचा । ८२ । सहजि स्वरुपी होता
लीन । हेतिमुरे माधुतियतन । अमूर्त अतिंद्रिते चिद्ज्ञान । स्वभावे चि राहे । ८३ । जो द्रव्य पदार्थाचा भास । ज्ञायेकपणे
होय अभास । दृष्टा स्वस्वरूपी प्रकाश । आपण चि आहे । ८४ । जाणे सर्वही आवस्थाते । अवस्था न जाणति अपणाते
ज्ञाइकपण सर्वातीत । आली भराहे । ८५ । जागृतीस जाणे आपण । जागृती आपणासी नेणे । मी चि आहे जागेपणे
हे कोण जाणे दुजा । ८६ । निद्राकर्म पाडी भ्रांती । ते चि जाणा विस्कयुत्थी । परि तीने णे अपणा प्रति । आत्मा साक्षी
आसे । ८७ । स्वप्नावस्थी तनेणे अपण । परि ते सांगतो पुन्हा कोण । या परि सर्वा अवस्थाची खुण । जाणता आत्मा
८८ । आत्मा स्वसंवेद्य ज्ञानसम । हे प्रसिध जिनागम । हे सत्य मानावे अनुपम । भाविकजनानी । ८९ । आत्मा ज्ञानमय
घनाकार । सकळ तत्वासि आधार । केवळज्ञानादी आपार । परीपुर्ण आसे । ९० । आत्मा ज्ञानाऽतर असे । तरि सक
ळ पदार्थ जाणी कैसे । ज्ञान आत्मा विणे प्रकाशे । कैसेनि होय । ९१ । यालागी जाणावे समान । न होय थोर अथवा



निलावी शुद्धमार्गास ॥ उत्तमवैराग्य ॥ ३ ॥ कूशलस्क मनासी योग्यस्थान ॥ विस्तीर्ण शुद्ध उद्यानवन ॥ जनमनोहरा ॥
आत्रायमान ॥ वैराग्यभुमी ॥ ४ ॥ आशा कपउन्मत मर्कट ॥ क्षणनथरे धावे विषयवाट ॥ अहो वैराग्यशृंखळा बळक
ट ॥ बंदकरी मनाते ॥ ५ ॥ निवृती बाळीसी सुंदर ॥ प्रमोद खेळावया मंदिर ॥ आनंदे क्रीडे निरंतर ॥ वैराग्यसदनि ॥ ६ ॥
॥ अतिदुर्धर मन्मथज्वर ॥ उग्र विपरोपरीचे विकार ॥ वैराग्य जाव औषधथोर ॥ उपशम क्षणात ॥ ७ ॥ त्वरे चालावया
मोक्षमार्ग ॥ वैराग्यरथ अति निसर्ग ॥ कडोवीकडी चढे दुर्ग ॥ अक्षइस्कख ॥ ८ ॥ ऐसा वैराग्याचा चमत्कार ॥ आनंत
सुखाचा सागर ॥ विवेकीयाणी विचार ॥ हाचि शिघ्र करावा ॥ ९ ॥ मोक्ष नहोय वैराग्यावीण ॥ हे जिनवचन प्रमाण ॥
हेचि सकळ स्कखासी कारण ॥ हा जाण तात्पर्य ॥ १० ॥ श्लोक ॥ चंडानिलस्फुरितमब्दचयं दवार्चि ॥ र्वृक्षव्रजं तिमि-
रमंडलमर्कबिंबं ॥ वज्रं महीध्रनिवहं नयते तथातो ॥ वैराग्यमेकमपि कर्म तथा समग्रं ॥ ९० ॥ टीका ॥ सकळ कर्म
विदारणार्थ ॥ नाही वैराग्या इतर समर्थ ॥ हा जाणो नितात्पर्यार्थ ॥ स्विकारावे वैराग्य ॥ ११ ॥ प्रचंड पवनावाचुन ॥ नहो
य मेघडंबर दलन ॥ तेचि परि वैराग्यावाचुन ॥ कर्मदहन नहोय ॥ १२ ॥ वन वृक्षाचे दहन ॥ कोण करी दावाग्नीवाचु
न ॥ तैसे वैराग्या इतर कर्मजीत्र ॥ अन्य कोण करी ॥ १३ ॥ घोर अंधार व्यापिता रजनी ॥ कोण विदारी सुर्यावाचु

॥६६॥

नि॥ तद्रुपरिश्रवलतरमोहनि॥ अन्यकोणनासी॥ १४॥ उत्तुंगपर्वतसमस्त॥ जिल्लनहोतिवज्रागदाविरहीत॥ तद्दतवि
नावैराग्यमदपर्वत॥ कोणनाशीडजा॥ १५॥ घोरकर्मअतिदुस्तर॥ हींडविचतुर्गतिचेफेरे॥ तयाचाकरावयासंव्हार
॥वैराग्यइतरकोण॥ १६॥ संसारदुःखाचेअसेनय॥ सकळकर्माचाकरावाल्लय॥ परिरेसीइछाहोय॥ तरिकरावे
वैराग्य॥ १७॥ मनइछीसमाधान॥ पाहीजेसकळसुखाचेस्थान॥ पामव्हावेयेकाग्रध्यान॥ तरीकरावेवैराग्य॥ १८॥
जरिनसेलोकीकचाड॥ तोडावेदुःखाचेसाकडे॥ मगकाधरावायाचापाड॥ नाशिवंतदेहाचा॥ १९॥ उपायनाहीया
वितर॥ यालागीस्विकारावेवैराग्यसार॥ नातरिकदानचुकतिफेरे॥ स्वदुखाचे॥ २०॥ श्लोक॥ भोगानूरुष्णभुजंगभो
गविषयानराज्यंरजःसन्निभंबधूनू॥ बंधनबधनानिविषयग्रामंविषान्नोपमं॥ भुतीभुतिसहोधरांतृणतुलस्त्रैणंविधि
त्वात्यजेनो॥ नेष्वाशक्तीमनाविलोहिल्लभत्तेमुक्तीविरक्तः पुमानू॥ ९१॥ टिका॥ ऐसावैराग्यपरआसेजोनर॥ तोचि
पाविजेमोक्षनगर॥ नातरीभोगविकर्मचक्रफेरे॥ घोराघोरजलधी॥ २१॥ उदासआसावासदाभाव॥ स्वयोगवि-
योगकर्मस्वभाव॥ देहभोगासीइतरव्हावे॥ ज्ञानबळेकरुनि॥ २२॥ शरीरभोगरुष्णसर्पासमान॥ द्रव्यमात्रक
रीअचेतन॥ चिरंजीवव्हावेआलीगोन॥ कैसेनघडे॥ २३॥ पाचिन्नकर्महोराज्यभार॥ हाद्रुष्कर्माचापरीकर॥ न

॥६६॥

कौदिदुःखघोराघोर॥नचुकतिकदा॥२४॥इष्टमित्रादिबंदुवर्ग॥हेतोनावजवांतरदुःखदुर्ग॥बळकटबधना
चाउपसर्ग॥येणेचिहोति॥२५॥विषयसमोहविषदारुण॥मधुरान्नमिश्रिताऽरुचिकारण॥परीकेसाबाचेळ
णयातून॥जाणवेयापरी॥२६॥देवश्वर्यजनस्मासमान॥स्फटतादुष्कर्मवातगहन॥क्षणनलगताजायउदोन॥
नरादेकादी॥२७॥तृणतुछनरादेस्त्रीर॥तैसाजाणास्त्रिसुखाचाविकार॥पाडीस्वाधीनसुखासिअंतर॥नरादे
कदा॥२८॥यापरिजाणोनिज्ञानियान॥त्यजावाअभिलाषशुद्धमने॥ऐसेवैराग्यसंपादुनिसज्जन॥तोचियोगी
मोक्ष॥२९॥नैराश्येयेवैराग्यसंपुर्ण॥तेचिमोक्षसुखासीकारण॥जयानिमानिलेदेषमाण॥तोचिपतीमोक्षाच्या
३०॥श्लोक॥जिनेंद्रपुजागुरुपर्युपास्ती सत्वानुकंपा शुभपात्रदानं॥गुणानुरागः श्रुतिरागमस्य॥नृजन्मवृक्ष
स्यफलान्यमुनी॥६१॥टिका॥नरजन्मदुर्लभगुणरत्नराशी॥आवचितालाधलाजरिजिवासी॥तरीयासुत्रोक्त
व्हावाउपाश्रयी॥नातरीनिष्फळ॥३१॥जिनेंद्रपुजाशास्त्रानुसार॥त्रिकाळकरीजोकोणीनर॥जैसाचंद्रकीर्ण
सीचकोर॥तदुपरीलक्ष्मी॥३२॥निजगुरुत्वकीसितत्पर॥सेवाकरिजोनिरंतर॥तत्पादपंकजासीभ्रमर॥धन्यनर
तोचिकी॥३३॥दुःखीतदेखोनिपरजिवासी॥व्याकुळमनेअपुलेमानसी॥अनुकंपापुण्यराशी॥तयासीचनाव





साध्यहोयस्वर्गापवर्ग याचितपाये ४६ कामक्रोधादिअरीजन सुधमनकरावेदलन निजस्वरूपिव्हावेलीन क-
रावाहाउपाय ४७ दयाकरावीसर्वावरी अनुकंपाअसावेअंतरी मग्नव्हावेसुखसागरी थोरउपायहाचि
४८ जिनोत्तमआगमसुधारस करावानित्यानित्यअभ्यास स्वजावेस्वज्ञानप्रकाश होईलउपाये ४९ याउ
पायेचतुर्गतीचिसीमा जालीसिद्धमोक्षरमा याहीनंतरस्वस्तधामा असावेस्वस्त ५० देवपूजादिउपायस
कळ करितानचुकेकदामोक्षफळ नातरीनरजन्मतयासीनिष्फळ जाहलापाहाहो ५१ यानंतरेग्रंथक
र्तारे केलाआचार्यसंततिसनमस्कार होउनित्तत्पदकमळीचेभ्रमर सुधारसघेतसे ५२ श्लोक अजि-
तयजित्तदेवाचार्यपट्टोदयाद्रि द्युमणीविजयसिंहाचार्यपादारविंद मधुकरसमत्तांयस्तेनसोमप्रभेणे
व्यरचिपमनुप्राज्ञासूक्तिमुक्तावलीयं ५३ टिका अजित्तदेवधर्माचार्य संपूर्णगुणकीर्णगुणवर्य पट्टा-
द्रिवरीउदयसुर्य मेरुधैरशोभत्त ५२ हादशतपसर्वज्ञोम शास्त्रसुधाश्रीपूर्णसोम सर्वजनप्रियाभिराम
शांतधर्मविराजे ५४ विजयसिंहचरणकमळी मधुकरायासदाकाळी सुधारससेवीहृदयकमळी बंधानुळीलम
ळीत ५५ ऐसाजोसोमप्रभयतीवर हाग्रंथाकेलासुधासार सुक्तमुक्तावळीसुंदर नामप्रवरवीराजे ५६ बोधा

॥६८॥

वयान्नावीकजन ॥ श्रुतज्ञानाभ्रीकरूनिमथन सारकाडिले निवडून ॥ विवीधरत्नबुद्धजनासी ॥ ५७ ॥ ईतिश्री
वैराग्यनिरूपणंन्नाम एकविंशतिमोध्यायः ॥ २१ ॥ छ ॥ ॥ श्रीवितरागायनमः ॥ श्लोक ॥ कृत्वाहत्पद
पूजनंयतिजनंनत्वाविधित्यागमं ॥ हित्वासंगमधर्मकर्मेर थियांपात्रेषुदत्वाधनं ॥ गत्वापद्धतिमुत्तमक्रमजुषां
जित्वात्मरात्रीव्रजं ॥ स्मृत्वापचंनमस्त्रियांकुरुकरक्रोडस्थमीष्टसुखं ॥ ९५ ॥ यत्संसोषसुखंजीतीडीयज्ञवोयचित
तःशातताःयेज्ञीवेषुरयालुतायरपीनीःसत्यामृतस्यंनिधीज्ञानंसोचेमनार्यसंवीरतीचयत्संगतीसज्जने ॥ यीत्य
वंपरिणामसुंदरफलासेवेवीवेकांकुरु ॥ ९६ ॥ न्नावार ९५मुद्धयदीजगम्मीषुमुक्तिनगरं ॥ तदानीमाकर्षेवीषयविष
यवृक्षीबंधुशेती ॥ यतम्छायायेषांव्रतयतीमहामोनमचोराःक्षेमुचैनांदूरीत्तयतीत्तजनःशर्मसदनं ॥ ९७ ॥ प्रज्ञा
रतीयथाकीर्तीकृस्तपाकरसोदरंलुरयजननीयाशीस्येतीयथागुरुसंततीःकल्पतीयथाचूडीधर्मकुकर्महती
कृमकुशलजनंनेन्यायेकार्यंतयावतीवर्तनं ॥ ९८ ॥ ईतिश्रीसुक्तमुक्तावळीग्रयंसटीकामज्ञाष्टन्नाषासं
पुर्ण ॥ श्रीमंगळमहा ॥ श्री ॥ ७ ॥ ७ ॥ गुरुस्तुति श्लोक ॥ नमोनम्रजीनानंदस्यंदीनेमाघनंदीने ॥ ज
गत्प्रसीद्धसिद्धांतवेधीनेचीत्थमोदीने ॥ १ ॥ सीद्धांतसारसंवेम्ध्वकोशावासेकमुनये ॥ नमःश्रीमाघनंदाख्याविश्व

॥६८॥

८

वीरव्यातकर्त्तये ॥ २ ॥ यज्ज्ञानतमसालुप्तामार्गो रत्नत्रयात्मकः ॥ तत्प्रकाशासमर्थाय नमोस्तुकुमुदीदुं दुंवे ३
संसारदुःखनीताया स्वात्मोयसुखसेवीना ॥ रत्नत्रयपवीत्रयनमोस्तुकुमुदीदुंवे ४ ॥ जीनवानयाणंवोद्भूत ॥ रत्न
त्रयसुनीर्मलंचीत्सदाचार्यशोनाया ॥ नमोस्तुकुमुदीदुंवे ५ ॥ ईती श्री गुरुस्तुती ॥ छ ॥ शाके १७३७ यवीनां
मंसोम्यनासंवत्सरे कार्तिकशुद्धी अष्टमिइंदुवासरे प्रातःकालीबुदवारदिने ॥ सुक्तमुक्तावलीमल्कोष्टनापाः
टिकासंपुर्णमस्तु ॥ श्रीअयेनापुरदउपाध्येधामोधरनपुत्रनेमापखदासदिदबरद इथानु ॥ श्लोक ॥ जिना
दीपाद्वंचगुरुपदान्ते ॥ पत्रेद त्रस्कयुतयुद्धचीत्ते ॥ अन्योन्यरुपमनमंदीराते ॥ सेवीसदाशांतसुखानेवा
त ॥ १ ॥ परोपकाराय तवआवीनोद ॥ केलीटीका आकृतबाळबोधा ॥ पंडीतसाधुजनदेवबुद्ध ॥ शोधूनीलावावे
युक्तयुद्ध ॥ मंगळमहा श्री ॥ श्री ॥ श्री ॥ श्री ॥ श्री ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ ॥ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥
॥ श्रीफलठणनगरे ॥ श्रीआदिनाथचेदेवाले ॥ श्रीव र्त्रेनमुनिसूक्तमुक्तावलिटिका ॥ सारखचंदसुत
चंदसात्रदानआपिस ॥ या ग्रंथांत नसलेले श्लोक ॥ यदशुभरजः पाथो दृप्तेंद्रियद्विरदाङ्कुशं ॥ कुशलकुसुमो-
द्यानं माद्यन्मनः कपिशृङ्खला ॥ विरतिरमणीलीलावेश्म स्मरज्वरभेषजं ॥ शिवपथरथस्तद्वैराग्यं विमृश्य
भवाभयः ॥ १ ॥ नमस्या देवानां चरणवरिवस्या शुभगुरो- ॥ स्तपस्या निःसीम क्लमपदमुपास्या गुणवताम् ॥

५९ निषद्यारण्ये स्याक्करणदमविद्या च शिवदा ॥ विरागः कूरागः क्षपणनिपुणोऽन्तः स्फुराति चेत् ॥१०२॥
करे श्लाघ्यस्त्यागः शिरासि गुरुपादप्रणमनं ॥ मुखे सत्या वाणी श्रुतमाधिगतं च श्रवणयोः ॥ हृदि स्वच्छा
स्वच्छा वृत्तिर्विजयिः भुजयोः पौरुषमतो ॥ विनाप्यैश्वर्येण प्रकृतिमहतां मण्डनमिदम् ॥१०३॥ सोमप्रभाचार्य- ६९
मभा च लोके ॥ वस्तु प्रकाशं कुरुते यथाशु ॥ तथायमुच्चैरुपदेशलेशः ॥ शुभोत्सवज्ञानगुणांस्तनोति ॥४॥

क्र० ५७

मधुकराया कृत

# सुक्तिमुक्तावली

## मूळ ग्रंथाच्या यथामूल आवृत्तीचे –
## हस्तलिखिताचे मराठी लिप्यंतर

# सुक्तिमुक्तावली

## प्रथम अध्याय

श्री वीतरागाय नमः।। श्री आदिनाथाय नमः।। श्री अजितनाथाय नमः।।

अथ सूक्तमुक्तावली सटीक प्रारंभः।।

**श्लोक।।**

सिंदूरप्रकरः तपःकरिशिरः क्रोडी कषायाटवी।
दावाचीनिचयः प्रबोधदिवसः प्रारंभसूर्योदयः।।
मुक्तिश्रीकुचकुंभकुंकुमरजश्रेयस्तरो पल्लवा।
प्रोल्लासक्रमयोर्नखद्युतिभरः पार्श्वप्रभोः पातु नः।।१।।

**टिका।।**

श्री पारिर्श्वनाथ स्वामीचे चरण। प्रकाशे ल्लोपति सूर्यकीरण।।
नखप्रभा भरले भूवन। कांति आपार शोभति।।१।।
तोचि पाद रक्षोत आम्हासी। भक्ति घडो जन्मजन्मासि।।
यावत्प्राप्ती मोक्षसुखासी। होय परियंत।।२।।
आता ते नखाचे वर्णन। न करवे शेषादिकालागुण।।
बृहस्पति जाहला मौन्य। ते कोण न कवि वर्णिल।।३।।
नखे दीसताति सुंदर। उटति कीरणाचे बहु भार।।
की उगवले बहु भास्कर। प्रभा आपार फाकली।।४।।
तपाश्चरणे गजेंद्र प्रबळ। मस्तकी शोभति गंडस्थळ।।
सिंदुर रज झळके झळाळ। चंद्रमंडळ भासति।।५।।
आणिक कैसेपरि शोभत। ऐका सांगतो दृष्टांत।।
कर्मदहन अत्याद्भुत। अग्नी प्रख्यात जैसा।।६।।
चतुष्कषाय आरण्य गहन। क्रोध लोभ आणी माया मान।।
त्यासी करावया दहन। वनि दावाग्नि जैसा।।७।।

पेटला दावानळ विशेष। प्रभा चहुंकडे प्रकाश।।
तेणे कोंदले सर्व आकाश। प्रभा नय भासत।।८।।
पुन्हा कौतूक ते कैसे। अज्ञान तमोंधकार विशेष।।
करावया बोधप्रकाश। प्रारंभ सुर्य उदेला।।९।।
जैसो मोक्षलक्ष्मीचे भाळ। कुंकुम शोभत झळाळ।।
ते कि मुक्ताफळ देति ढाळ। प्रभा विशाळ शोभे।।१०।।
नर सुरादी पद प्रत्यक्ष। नानाविध कल्पवृक्ष।।
पुष्प पल्लव फळे दक्ष। देतसे भाविका।।११।।

**श्लोक ।।**

संत सत मम प्रसन्नमनसो वाचां विचारोद्यता।
सुत्यंभः कमलानि तप्तरिमलं वाताः वितंत्वंति यत्।।
किंवाभ्यर्थनया नया यदि गुणोस्त्यासां ततस्तेस्वयं।
कर्त्तारः प्रथनंन चेदथयशः प्रत्यार्थिना तेन कीं।।२।।

**टीका।।**

हे इष्ट देवता नमस्कारून। करावया साधूसी नमन।।
विशुद्धि करूनिया मन। प्रथी सज्जनाते।।१२।।
आहो संत साधुजन। मज सोमप्रभा लागुन।।
सत्वर व्हावे प्रसन्न। ग्रंथारंभावया।।१३।।
कैसे संताचे लक्षण। झाकुनि इतराचे दुर्गुण।।
विस्तारिति विशेष गूण। करूणासागर।।१४।।
वाचा अमृत दिव्य वाणी। सारासार विचार खाणी।।
हृदय मार्दव जैसे पाणी। सर्व प्राणी तोष।।१५।।
कोणि येके कारणे करून। होउनि उदकात उत्पन्न।।
पद्मे दीसताती शोभायमान। मनोहरतरे।।१६।।
ऐका कमळाचा परिमळ। कोण विस्तारी वायुवगळ।।
तैसे संतावीण केवळ। कोण तत्व प्रकटी।।१७।।

सुगंध असे जरी पुष्पात। सहज विस्तार दुर बहुत।।
नातरी काय करिल वात। जाय स्वभाव।।१८।।
तैसे गुण आसति शब्दात। तरि विस्तारिति दुर बहुत।।
नातरि काय करिति संत। दुर्गुणासि त्या।।१९।।
सज्जन सुनयचि जाणति। कुनय अवघाचि लोपति।।
यालागी प्रार्थना तयाप्रति। आधी आधी करावि।।२०।।
सद्गुण प्रगटति सज्जन। आसति तरी उत्तम गुण।।
काय करावे ते दुर्गुण। अभिदान नाशे।।२१।।
ग्रंथकर्तारं केला ग्रंथ। प्रकटावया अतरार्थ।।
सूक्तमुक्तावळी समर्थ। नाम या लागी।।२२।।

**श्लोक।।**

त्रिवर्गसंसादनमंतरेण यशोरि वायुर्विफलं नरस्य।
तत्रापि धर्मं प्रवरं वदंति। नतं विना यद्भवतार्थकामै।।३।।

**टी. ।।**

हिंडता आनंतानंत जन्म। नरतनु लाभला उत्तम।।
साधीला नाही धर्मार्थकाम। व्यर्थ जन्म तयाचा।।२३।।
पशूवत् जाला की अयुष्य। ऐसे बोलति सत्पुरुष।।
वृथा शीणविले मातेस। नव मास गर्भि।।२४।।
धर्मार्थकाम हे त्रिवीध। त्यामाजी धर्म श्रेष्ठ शुद्ध।।
नरतनु फळ हाची बोध। नातरि निर्फळ।।२५।।
धर्माविण न प्राप्त अर्थ। काम धर्माविण निरार्थ।।
कैसा सा(धाव)वा त्यावीण स्वार्थ। जन्म व्यर्थ तयाचा।।२६।।
तोची धर्म प्रगटावयासी। उत्तर सूत्र रचिले विशषी।।
श्रोते व्हावे सावधानासी। स्वस्थ चित्त करूनि।।२७।।

**श्लोक ।।**

यः प्राण दुःप्राप्यमिदं नरत्व। धर्मन्नय न करोति मूढाः।।
क्लेशप्रबंधे नस लब्धिमब्धौ। चिंतामणी पातयति प्रमादात्।।४।।

**टी.।।**

होउनिया त्रस स्छावर। घेतला कित्येक कोटि फेर।।
प्राप्त जाले नर शरीर। पुर्व सुकृते।।२८।।
मानव जन्म महाविशाळ। त्यामाजि दुर्लभ उत्तम कूळ।।
ज्ञान अत्यंत निर्मळ। सम्यक्त रत्न।।२९।।
येउनिया नर जन्मासी। संसार करी बहु सायासी।।
होउनि धर्मत अळसी। गर्भांध जैसा।।३०।।
न करि कदा धेर्मासि यत्न। अर्थ साधीतसे प्रयत्न।।
धर्म्मासारीखे सांडोनि रत्न। गारा यत्ने साधीत।।३१।।
बहूत करूनिया कष्ट। चिंतामणी साधीला श्रेष्ट।।
ते सागरी टाकील मर्कटे। ऐसी परि जाहाली।।३२।।
धर्म करावा पारखोन। धातुपंचकात जैसे सोने।।
कि नाना मणीमाजी रत्न। तैसा धर्म अहींसा।।३३।।
धर्म सर्वत्र बोलती। धिवर खाटति हीन जाती।।
जीववधासि धर्म म्हणती। तरि अधर्म तो कैसा।।३४।।
दुग्ध गायीचे तो सार। तक्र त्यापरिस दिसे शुभ्र।।
अर्कक्षीर दिसे पांढरे। परि अंतर महद।।३५।।
ऐसा धर्म परिक्षावा। अहींसा धर्म वंद्य सर्वा।।
हिंसा धर्म तो वर्जावा। ज्ञानीयानी।।३६।।
धर्म जाणावा दशलक्षण। विवीध सौख्य प्राप्त तेणे।।
तोचि मोक्षासी कारण। अन्य धर्म नाही।।३७।।

**श्लोक।।**

स्वर्णस्छाले क्षिपति सरजः पाद सौच्यं विदते।
पीयूषेण प्रवरकीरणो वाहायत्येदभारं।।
चिंतारत्नं विकीरति कराव्हायषाठानार्थं।
यो दुःप्रापं गमयति मुदा मर्त्यजन्म प्रमतः।।५।।

**टी.।।**

मनुष्यजन्मासि येउन। न करी स्वधर्मसाधन।।
वृथा दवडीला गव्हारान। जन्म मानव।।३८।।
न होनि सांपडला हा देह। धर्म करी अज्ञान पाहे।।
अयुष्य जातसे लवलाहे। निमिष्यानिमिष्य।।३९।।
ऐका मुढाचे लक्षण। त्याजोनि धर्माते दुर्गुण।।
विषयसुखाचे कारण। नाना यत्ने साधीत।।४०।।
जडित रत्न सुवर्णपात्र। शोभायमान दिसे विचीत्र।।
जेवावया दिव्यान्न पवित्र। राज्ययोग्य देखा।।४१।।
धुळि भरुनि तयात। उकरावरि टाकी नित्य।।
धर्माविण जन्म तयाते। निरर्थक जाहाला।।४२।।
स्वगृहीच होते अमृत। ते प्राशोनि व्हावे सदा तृप्त।।
पाया धुवोनि टाकिले तयाते। अनर्थ केला।।४३।।
गजेंद्र ऐरावतिसारिखा। लाकडे वाहे त्यावरि देखा।।
स्वहित न कळे त्या मुर्खा। सांडीला धर्म।।४४।।
करतळि होता दिव्य मणि। नाना सौख्यासि येक खाणि।।
चिंतितार्थासि चिंतामणि। अनर्घ्य देखा।।४५।।
घेउनि तो चिंतामणी हाति। उडवावया कागाप्रति।।
दुरोनि टाकीला त्या दुर्मति। मतिहिन पाहे।।४६।।
मानव जन्मास येउन। स्वधर्म केला नाही जयान।।
या दृष्टांतापरी केली त्याण। ऐका सज्जन हो।।४७।।

**श्लोक।।**

ते धतूर तरुं वपंति भुवने प्रोन्मुल्य कल्पदृमं।
चिंतारत्नमपास्य काचसकलं स्वीकूर्वते ते जडः।।
विक्रिय द्विरदं गिरींद्रसदृशं क्रीणंति ते राषभाः।
ये लब्ध परिहार्त्य धर्ममधमा धावंति भोगाशयाः।।६।।

**टि.।।**

सांडोनि धर्म चिंतामणी। स्विकारी नाना पापखाणी।।
ऐका मुर्खामाजी शिरोमणी। तोचि येक।।४८।।
आता सांगतो दृष्टांत। श्रोती करावे स्वस्त चित्त।।
अपले करावे स्वहित। पूरत्रालागी।।४९।।
मनुष्य जन्मासि जो आला। धर्माविण वाया गेला।।
थोर अनर्थ पै रेवला। अज्ञानपणे।।५०।।
उपडोनि टाकिला कल्पवृक्ष। धतुर लावि कि अपेक्षे।।
ऐसा मुढ पाहा प्रत्यक्ष। सांडिला धर्म।।५१।।
करिचा टाकुनि चिंतामणी। अवडी स्विकारि काच मणी।।
स्वहित अंतरला दुर्गुणी। धर्माविण।।५२।।
चिंतीतार्थ पुरवि चिंतारत्न। टाकुनि गार वेचति येत्न।।
धर्मासारिखे सांडोनि रत्न। पाप यत्ने करीत।।५३।।
भद्र हस्तिरत्न केवळ। मेरुगिरिसम विशाळ।।
देउनि गार्दभ घेतला बळे। खळचि ऐसा।।५४।।
धर्मावाचोनि करी संसार। पशूसमान जाणा तो नर।।
मुंगीमात्रादीक सार। संसार करीति।।५५।।
जळ स्छळचर नाना जाति। अनेक पक्षीकुळे असति।।
संसार सर्वत्रही करीति। अपुलाले।।५६।।
सत्य मानावे जिन वचन। करावे स्वधर्मसाधन।।
संसारदुःख जाय तूटोन। ऐसे करावे।।५७।।

**श्लोक।।**

अपारे संसार कथमपि समासाद्य नृभवं।
न धर्मं यः कूर्याद्विषयसुखतृष्णातरळितः।।
वृढन् पारावारे प्रवरमपहाय प्रवहणं।
स मुख्यो मूर्खाणामुपलमुपलब्धं प्रयतते।।७।।

**टी.।।**

पारावार हा भवसागर। कदा काळी नाही याचा व्यापार।।
आदि अंति नाही घोराघोर। नाहि पार दुःखासी।।५८।।
चतुर्गतीते वडवान्नळ। महा भयंकर रसातळ।।
मोटे तरंग कल्लोळ। जन्मजलधी।।५९।।
ऐशा दुर्धर वारासी। विविध प्रकार दुःखरासी।।
त्यामाजी जंतु नाना राशी। दुःख क्लेश भोगिती।।६०।।
चतुराशीति लक्ष योनि। कित्तेक कोटि फेरे घेउनि।।
आला नरजन्मालागुनी। काकताळ न्याये।।६१।।
नांगर निखळूनिया वेगे। दातइ साडा केला वियोग।।
सागरि टाकिले दोनि भाग। पूर्व पश्चिमेसी।।६२।।
अवचित होउनि येक जाणा। पुर्व ईंदात जाला संयोग।।
किटाळीमाजी सापडे काग। तैसा हा देह।।६३।।
यापरी दुर्लभ नरदेह। मोक्षसुखासी कारण पाहे।।
वर्जोनि धर्माते लवलाहे। विषय इच्छीत।।६४।।
ऐका त्याचे वेडेपण। बुडता सागरामाजी जाण।।
तेथे तारक नसे कोण। आदी अंति नाही।।६५।।
तव अवचिता तेथे येक। झाज सापडले अलौकिक।।
त्यामाजी बैसोनि विवेक। व्हावे पैल पारा।।६६।।
ते प्रवहण सोडूनि प्रवरे। पाषाण धरू ईछी त्वरे।।
जाणा मनुष्यामाजी तो खरे। अंतरला स्वहीता।।६७।।

।। ईति श्री नीतिदृष्टांतकथनरूप श्लोक सप्त समाप्त।
प्रथमोध्यायः।। मंगल महा श्री ।। छ ।। श्री ।। छ ।।

* * *

# द्वितीय अध्याय

श्री पारिश्वनाथाय नमः।। श्री संभवनाथाय अभिनंदनाय नमः।।

तव इतुकियानंतर। श्रोती पूसिले जोडोनि कर।।
स्वामी दुर्धर हा संसार। तरावा कैसा।।१।।
पूढे सांगावा उपाय येक। भवसागर उतरावयाचा विवेक।।
सुखे तरावयासि नवक। दाखवुनि द्यावि।।२।।

**श्लोक।।**

भक्तिं तीर्थकरे गुरौ जिनमते संगे च हिंसानृते।।
स्तेयाब्रह्मपरीग्रहाव्युपरमं क्रोधाद्यरीणां जयं।।
सौजन्यं गुणिसंगमिंद्रियदमं दानं तपोभावनां।
वैराग्यं च कुरुस्व निवृतिपथे यद्यस्तगंतु मनः।।८।।

**टीका.।।**

अता या सुत्राचे अख्यान। सावध ऐका श्रोते जन।।
शुध करुनिया मन। ग्रंथी लक्ष असावा।।३।।
अहो साधू जन। नारी अथवा पुमान।।
नाना जातीहर कोण। सुखाभिळासी।।४।।
संसारदुःखासि जो भीति। मोक्षसुखासी इछीत।।
भक्ति पूजा हो तिर्थनाथ। करावे सार्थक।।५।।
सर्व तिर्थाचा जो ईश। यालागि म्हणति तीर्थाधीश।।
सुरासूर शेवति अशेष। करिती स्वहित।।६।।
पवित्र करी भक्त जनासी। तीर्थंकर नाम या लागि त्यासी।।
तेचि भक्ती अक्षय सुखासी। कारण देखा।।७।।
तोचि जाणा संजीवनी। असुभ कुळ निर्दाळनि।।
विविध पुण्य संपादिनी। अर्हंत भक्ती।।८।।
भक्ती तारक जिवासी। सकळ मंगळाचि राशी।।
भक्ती पंच कल्याणासी। कारण ऐका।।९।।

भक्ति त्रैलोक्यामाजी सार। सर्व साधनासी अधार।।
भक्ति मुक्तिचे माहेर। निश्चय हाचि।।१०।।
भक्ती अक्षय सुखाचें स्थान। कामधेनू चिद्रत्न निधान।।
प्राप्त नवनिधी नाना रत्न। श्री जिनभक्ती।।११।।
तीर्थेश्वराचे भक्तिसी। वर्णिता न ये शेषादिकासी।।
त्रिभुवनी या उपमेसी। नाही नाही अन्य।।१२।।
जयासी मोक्षसुखासा कारण। भक्ति करावी त्रिकर्ण।।
शुद्ध करुनिया मन। गुरु भक्ति करावि।।१३।।
ऐसीच भक्ति जिनमतात। करावि होउनि शंकातीत।।
मोक्ष अभिळाषी जरी चित्त। तरीच कीजे।।१४।।
जिनसंघाचि करावि भक्ती। सकळ सौभाग्य तेणे प्राप्ती।।
अंति लाभ होईल मुक्ती। हा निश्चितार्थ।।१५।।
ऐका संग म्हणीजे कोण। जिनमताचे रुषीगण।।
ज्यासी वंदिती देवगण। ईंद्रादीक ते।।१६।।
तैसीच पाहे अर्जिका। पवित्र पात्र वंद्य लोका।।
तपाचार पाळिती निका। विधीयुक्त।।१७।।
स्वधर्म चालविती श्रावक। उत्तम भक्ति श्रावकालोक।।
येकादश वृत पाळी निक। दर्शनिकादी।।१८।।
हे जाणावे चतुःसंग। पवित्र ज्याचे अंतरंग।।
होति समस्त पातके भंग। भक्त जनाची।।१९।।
अहिंसा व्रत पाळावे भावे। जंतु कृपेने रक्षावे।।
जाव जीवा सम जाणावे। आपुलिया ऐसे।।२०।।
यापरि रक्षावे व्रत। सदा वचन बोलावे सत्य।।
तेणे किंकर देव दैत्य। मा ईतर ते काय।।२१।।
तैसेचि अचोरी व्रत पाळी। सापडले ने घे कदा काळी।।
श्रीदेवि या आदि सकळी। दाश्य करीति।।२२।।

व्रतामाजी शिरोमणी। ब्रह्मचर्य गुणरत्न खाणी।।
जेणे वश्य होय रमणी। मुक्तिकांता।।२३।।

परिगृहा दुर्गति स्वभावे। यालागी निस्पृहत्व असावे।।
स्वाधीन सुख सहज भावे। प्राप्त होये।।२४।।

अनादि वैरी कषाय कुरुंभ। क्रोध आणि मान माया लोभ।।
क्षणोक्षणी उठविति क्षोभ। त्यजावे या लागी।।२५।।

सज्जन गुण धरावे उज्वळ। दुर्जनत्व टाळावे ते खळ।।
करावे हो मन निर्मळ। स्वहितालागी।।२६।।

करावा गुणी जनाचा संग। दुर्गुणाचा करावा त्याग।।
मोक्षलाभ होय जेणे वेग। तोचि संग करावा।।२६।।

ईंद्रियाते व्हावे मन। अचळ शुद्ध करावे मन।।
जेणे परब्रह्मा लागे ध्यान। तोचि साधन करी।।२७।।

चतुर्विध करावे ध्यान। सत्पात्रालागी द्यावे सन्मान।।
तेणे वर्धत होय मान। त्रिभुवनामाजी।।२९।।

तप करावे द्विविध। बाह्याभ्यंतर दोन भेद।।
द्वादश प्रकार चित्त शुद्ध। यथाविधी।।३०।।

परमात्म भावना चित्तयुक्त। करावा अभ्यास युक्तायुक्त।।
वस्तु प्राप्त जेणे सत्य। तोची अर्थ करावा।।३१।।

वृत्ति असावी उदास। सदा वैराग्य चित्ताभ्यास।।
तुटोनिया जाय आशापाश। तोचि न्यास करावा।।३२।।

जयासि मोक्षाचे कारण। तरी करावेया प्रमाण।।
नातरी चतुर्गति भ्रमण। चुके ना कदा काळी।।३३।।

**श्लोक।।**

पापं लुंपति दुर्गतिं दलयति व्यापादयत्यापदं।
पुण्यं संचनुते श्रयो वितनुते पुष्णाति निरोगतां।।
सोभाग्यं विदधाति पल्लवयते प्रीतिं प्रसुतिं यशः।
स्वर्गं यच्छति निवृतिं चरयत्यर्चार्हतां निर्मितां।।९।।

अता देव जाणावा अर्हंत। जो अठरा दोषा विरहित।।
ऐका घाति कर्म विनीर्मुक्त। तोची देव म्हणावा।।१०।।

**टीका ।।**

दोष आठरा ते कोण कोण। क्षुधा तृषा जनन मरण।।
चिंता विद विस्मयकारण। राग मोह नाही।।३५।।
भय क्षोभ नाही कदा काळी। प्रखेद मंतरजा निर्मुळी।।
रति रहस्य अलश्य टाळी। जरा निंद्रा नाही।।३६।।
अता अर्हंत देवाची पुजा। त्रिकाळ केली जरि वोजा।।
त्याचे पापमळ जाय सहजा। पूजाप्रभावे।।३७।।
नाना दुःखदायक दुर्गती। नरकादि नाना जाती।।
अनेक दुःखाची संगती। दलन होय शीघ्र।।३८।।
कितेक जन्माची आपदा। जन्म मृत्यु जरा भागवी सदा।।
घोर दुर्धर दुःख बाधा। नाश होय क्षणात।।३९।।
बहुत पुण्याच्या होति राशी। स्वर्गादि संपती होती त्यासी।।
अधिपती होय सर्व सुखासी। पुजा प्रभाव।।४०।।
ऐका जिनपुजे प्रभाव। लक्ष्मि विस्तार होय स्वभाव।।
प्राप्त होय सकळ वैभव। जिनपुजा प्रताप।।४१।।
जरी पुजिला तो जिनवर। अरोग्यता होय निरंतर।।
सदा सेविती सुर नर। अहो त्या नरासी।।४२।।
जन्मोजन्मि होय सौभाग्य। कदा दृष्टी न पडे दुर्भाग्य।।
चक्रेश्वरादिक सकळ भाग्य। प्राप्त होय।।४३।।
प्रितिने पुजिला जिनेश्वर। तरी जया होय प्रियकर।।
करुणा करीति सुरवर। मग काय न होय।।४४।।
किर्ति व्यापे त्रिजगात। जैसा भानू विश्वस्फूरित।।
तैसे येश दश दिशात। सहजि प्रकाशे।।४५।।

स्वर्गस्त्रिया इछिती तयासी। म्हणति केव्हा येईल पुंण्यरासी।।
जाउनि पुजु जिनेश्वरासी। तया संगतिने।।४६।।
भोगुनि सुर नरादि संपति। अंति प्राप्त होय निव्रती।।
भा(वे) पुजिला जिनपति। तरी प्राप्त सर्व।।४७।।
अहो ऐकाया सुत्रोक्त। जरि पुजिला देव अर्हंत।।
तरि मोक्ष करतळात। तया मानवासी।।४८।।

**श्लोक ।।**

।स्वर्गं तस्य गृहांगणं सहचरे साम्राज्यलक्ष्मी शुभा।
।सौभाग्यादि गुणा लीविसति स्वैरं वपुर्वेश्मनी।।
संसारः सुतरः शिवं करतले क्रोडी लुटंत्यंजसा।
यः श्रद्धाभरभाजनं जिनपतिः पूजां विधत्ते जनः।।१०।।

**टिका।।**

आता ऐकावे श्रोते जन। होउनि भक्तिसी भाजन।।
जिनपुजा करी जो सज्जन। श्रधाभावे देखा।।४९।।
कोणी येक भाविक जन। भावे पूजीला जरि श्रीजिन।।
तया अंगणी स्वर्गभुवन। लक्ष्मी त(व?)से।।५०।।
सुखे भोगुनि मानव गति। नंतर जाय स्वर्गाप्रति।।
तरी न सोडी तयाप्रति। शुभ लक्षुमी।।५१।।
साम्राज्यलक्ष्मी म्हणे येथ। कधी येईल तो लोकनाथ।।
चक्रादि रत्न करवीन प्राप्त। सौभाग्यादि गुण समस्त।।५२।।
सौभाग्यादि गुण समस्त। शरीरमंदिरी विराजित।।
अवधि संपती शोभत। पूजक नरासी।।५३।।
ऐका संसारसमुद्र अपार। घोर दुस्तर भयकर।।
नाग नर सुरा न कळे पार। संसारदुःखाचा।।५४।।
यया अपार सागरात। सुखे तरोनि जाय त्वरीत।।
निर्भर पुजि जिनेश्वराते। त्रिसुद्धी करुनि।।५५।।

करीता जिनेश्वराचे पूजन। होय सर्व कर्माते भंजन।।
अधिपति होय तो सज्जन। मोक्षसुखासी।।५६।।
आभ्योदय भोगूनि सर्व काळी। मुक्त होय त्वरितचि काळी।।
जिनपुजा करी जो त्रिकाळी। तोचि पुण्य पुरुष।।५६।।
अता देवपुजेचे वर्णन। न होय सुरगुरु कारण।।
मा ईतर कवि वर्णि कोण। यया धरातळी।।५८।।

**श्लोक।।**

कदाचिन्नंतकः कुपित इव पश्यत्यभिमुखं।
विदूरे दारिद्रं चकितमीव नश्यत्यनुदिनं।।
विरक्ता कांत्येव त्यजति कुगतिः संगमुदयो।
न मुंचत्यभ्यर्णं सुददेव जिनाचरिचयतः।।११।।

**टीका।।**

अर्चा करीता अर्हंताचि। व्यथा पळोनि जाय तयाची।।
जैसी वृति कुपित नराचि। न स्थिर होय।।५९।।
झडकरी जाय तैसी व्यथा। दृष्टी मागेन करी सर्वथा।।
मा दुःख शोकाचि कथा। कर्णि कदा पडेना।।६०।।
दारीद्र न राहे तयाजवळ। जयासी देखुनि दुर पळे।।
बाधा होय की रानोमाळ। तया पुरुषाची।।६१।।
भयाभीत होउनि मानसी। गज पळे शिंह देखोनि देशो देशी।।
तैसे देखुनि तयासी। कर्म जाय पळोनी।।६२।।
विरक्त बाळ जैसी निर्मळ। पुरुष देखोनि दुर पळे।।
तैस्या कुगति सकळ। दुर जाती पळोनि।।६३।।
दुर्गती त्यजिती त्याचा संग। अवडि सुगति होय योग।।
पापकर्म अवघे भंग। पुज्यक नराचे।।६४।।
सर्व संपतीचा उदय। संग सोडुनि कदा न जाय।।
जैसा देखोनि चंद्रोदय। भरति येई सागरा।।६५।।
भाव पुजिला जिनेश्वर। सर्व दुःक्कर्म जाय दुर।।।
सकळ सुखाचा सागर। निरंतर भोगी।।६६।।

हे ऐकोनि भव्य जन। त्रिकाळ करावे जिन पुजन।।
सर्व सुखासी भाजन। अपणाचि होय।।६७।।
भावे सुर्यासि धरिता छत्र। छाया शांत होय आपुले गात्र।।
तैसी जीन प्रतिमा पवित्र। पूजिता सौख्य सहज।।६८।।

**श्लोक।।**

यः पूष्पैज्जिनमर्चती स्मितसुरस्त्रीलौचनै सोर्चते।
यस्तं वंदत येकशः स्त्रिजगता सोहर्दिवं वंद्यते।।
।यस्तं स्तौति परस्त्र वृत्रद मनास्तोमेन संस्तुयती।
।यस्तं द्यायति कृप्तकर्मनिदनः स ध्यायते योगिभिः।।१२।।

**टीका।।**

अहो कोणी येक सज्जन। दिव्य घेउनिया सुमन।।
त्रिकाळी अर्ची देव जिन। त्रिकर्ण शुद्धी।।६९।।
पुष्पे अर्चिल्या जिनेंद्रासी। देवांगना अर्चित तयासी।।
आपुल्या दिव्य नेत्रे जयासी। लक्षीति देखा।।७०।।
येक पुष्पे जरी येक वेळे। अर्चिला जिनेश्वर निर्मळ।।
देवस्त्रिया निज दिव्य डोळे। अर्चिती तयासी।।७१।।
येकदा वंदिला जिननाथ। तया वंदिती त्रिलोकनाथ।।
स्वये होउनि सिद्धनाथ। अनंत सौख्य भोगि।।७२।।
करीता जिनेश्वराची स्तुती। परस्त्री स्तवीति सुरसमिति।।
अंति होउनि श्रीपति। मोक्षसुख भोगी।।७३।।
अंतरी ध्याता जिनरूप। हरति तयाचे सकळ पाप।।
स्वयं होउनि ब्रह्मरूप। योगि ध्याती तयासी।।७५।।
यापरी सांगुनि जिनभक्ती। नंतर सांगतो गुरुभक्ती।।
श्रोते होउनि सावध चिती। लक्ष ग्रंथी असावा।।७५।।

ईति श्री अर्हद्भक्तिनिरूपणन्नाम द्वितीयोध्याय।।२।।

श्री मंगळ महा श्री।। छ।।

* * *

# तृतीय अध्याय

**।। श्री सुमतीनाथाय पद्मप्रभाय नमः।।**

**श्लोक।।**

विदलयति कुबोधं बोधयत्यागमार्थं।
सुगति कुगतिमार्गोपुण्यपापे व्यनक्ति।।
अवगमयति (कृत्या)कृत्यभेदं गुरुर्यो।
भवजलनिधिपोतस्तं विना नास्ति कश्चेत्।।१३।।

**टीका।।**

अनंत जन्मी फीरोनि पाहे। लाभ जाला मनुष्य देह।।
गुरुवीण जात अहे। निरार्थक।।१।।
गुरु करावा जन्मा येउन। सापडली नरतनू हे निधान।।
यालागी करावा सज्जने। श्री गुरु शीघ्र।।२।।
गुरु करावा पारखून। जेणे तोडीला संसारसंतान।।
पार जाला भवार्णव गहन। तोचि तारी दुज्यासी।।३।।
भार्या पुत्रादिक ग्रहस्त। तैसेचि शिष्यासी उपदेसित।।
अत्मज्ञानावीण भ्रांत। निरसे कैसी।।४।।
कुटुंब पोसावयाकारण। बहुत दाखवि साधुपण।।
शिष्य करुनि द्रव्यहरण। थोर यत्ने करी।।५।।
द्रव्य ईछूनिया अंतरी। यंत्र मंत्र करी कुसरी।।
भेदूनिया नरनारी। द्रव्य करी हरण।।६।।
ऐसा गुरु केला कोणी जरी। कैसे निघावे भवसागराबाहेरी।।
जाली दोघाची येकचि परी। ऐका सज्जन हो।।७।।
गुरु करु नये सैरावैरा। तेणे न चुके कदा कर्मफेरा।।
संसार तुटोनि जाये येकसरा। ऐसा गुरु करावा।।८।।
यालागि गुरु करावा समर्थ। जेणे प्राप्त होय तत्वार्थ।।
लाभ होये जेणे परमार्थ। ऐसे करावे।।९।।

ऐका श्री गुरुचे लक्ष(ण)। शुद्ध जयाचे अंतःकर्ण।।
सदा स्वहिताचे कारण। अहर्णिशी करीत।।१०।।
शुद्ध स्फटिकाचे भाजनी। शुद्धोदक ठेविले भरोनि।।
पाहाता पाणी दिसे लोचनि। पात्र काही दिसेना।।११।।
आसे निर्मळ ज्याचे आंतर। स्वस्वरूपी लीन निरंतर।।
पार करी भवसागर। शिष्या जनासी।।१२।।
तप करीतसे द्वादश। त्रयोदशा चारित्र पाळी विशेष।।
सूक्ष्म क्रिया पाळी अशेष। मार्दव भाव।।१३।।
शत्रु मित्र जयाते समान। सम मृतिका धातू सोन।।
गारा कांच अनर्घ्य रत्न। समान जयासी।।१४।।
कोणी भावे येउनि पूजिले। कोणी लतांगुळीने ताडीले।।
समान दोघासि बोले। तोचि पुण्यमुर्त्ति।।१५।।
समान पाहे सर्वत्रासी। भुवनत्रयातील जीवरासी।।
सुरासुर कीटकासी। समान लेखी।।१६।।
गुरु संसारसमुद्र तारक। गुरु भवदुःख निवारक।।
स्वपरतत्व उपदेशक। भव्य जनासी।।१७।।
दया करी षड् जिवावरी। स्छावर जंगमावरी।।
भेद न आणी अंतरी। सागर कृपेचा।।१८।।
निश्चय रत्नत्रयाळंकृत। सकळ प्रमाद टाळीत।।
अभिनव कर्माते वर्जित। श्री गुरुनाथ येक।।१९।।
स्वसुखार्णवी सदा तृप्त। परमानंदामृत शेवित।।
नित्य घनानंद वर्शत। तया अंतरी।।२०।।
जरी पुण्य असे बहु जन्माचे। ऐसा गुरु सापडे तरीच।।
पातक भस्म होय जन्मोजन्मीचे। दर्शनमात्रे।।२१।।
गुरु कृपादृष्टी पाहे जरी। कुबोध नाश होय क्षणमाझारी।।
अज्ञानतमांधकार निवारी। येका क्षणात।।२२।।

अगमार्थ बोधी तयाते। सप्त तत्वाचे प्रकाशित।।
भेटी करवि नीजरुपाते। गुरु पुण्यराशी।।२३।।
कुगति दुःखाचे कारण। नरक तिरकादि करवि भ्रमण।।
शिष्यजनासि कृपा पूर्ण। करुनि सांगे।।२४।।
प्रितिने सांडवि कुमती। दया करुनि सांगे सुमती।।
पुण्यकारण या प्रती। कृपेने सांगे।।२५।।
मार्ग दाखवी सुगतिचा। स्वर्गापवर्ग नाना सुखाचा।।
स्वांमी होय त्रिलोकाचा। उपाय ऐसा सांगे।।२६।।
पाप पुण्याचे दाखवि रुप। सुबोध करूनि लपवी पाप।।
हरोनि जाय संसारताप। तोचि रुप दाखवि।।२७।।
कृत्याकृत्य दाखवी भेद। हे कृत्य केलिया उपजे खेद।।
या कृत्याने पातक छेद। म्हणोनि सांगे।।२८।।
या कारणे गुरु थो(र)। ऐसे म्हणताति जन सारे।।
सकळ साधनासि अधार। गुरु महाराज।।२९।।
गुरु संसारसागर तारक। दुर्धर दुःखाते निवारक।।
बुडता सागरी झाज येक। गुरु महाराज।।३०।।
गुरुविण तारक नाही कोणी। स्थावर जंगमा अधार जैसे पाणी।।
की मार्ग दाखवीता घोर रानी। नाहि नाही दुजा।।३१।।

**श्लोक।।**

अवद्य मुक्तिपथ यः प्रवर्तते।
।वर्तयतन्यजनं च निस्पृहः।।
स णव सेव्यः स्वहितेषणां गुरु।
स्वयंतरं तारयितुं क्षमः।।१४।।

**टीका ।।**

अपण चालतसे निर्दोष मार्ग। साहातसे घोरोपसर्ग।।
जेणे प्राप्त होये स्वर्गापवर्ग। तोचि मार्ग दाखवी।।३२।।

भाव निस्पृह उदास। स्वानंद सौख्य भोगि विशेष।।
तोचि बोध शिष्य जनास। सांगतसे नित्य।।३३।।
रत्नत्रय भावना संपूर्ण। आनंत सुखासि कारण।।
शिष्य जनावरी दया पूर्ण। करुनि सांगे।।३४।।
अपण पाळी चारीत्र शुध। चालवी अन्य जना करुनि बोध।।
प्राप्त होय स्छान निर्बाध। तोचि बोध करी।।३५।।
स्वहितचि सांगे गुरुराज। हरुनि जाय जणे पापरज।।
कृपाळू ऐसा महाराज। गुरुविण कोण।।३६।।
आपण स्वये सिंधु तरुनि जाय। तैसा ईतर जनासि दाखवि उपाय।।
या लागी धरावे तयाचे पाय। आधी आधी त्वरे।।३७।।
अपण आचरे शुध अचार। भेद भेद रत्नत्रयोपचार।।
तोचि शिष्यजनासी विचार। उपदेशित।।३८।।
या कारणे संतजन। करीताति गुरुचे पूजन।।
लोप होति कर्मांजन। गुरुपद सेविता।।३९।।
नरककुपातूनि बाहीर। गुरुवीण काडील कोण ईतर।।
नाही नाही यया धरीवर। समर्थ दुजा।।४०।।
तोचि करावा गुरु समर्थ। पाहोनि शुध ज्ञानवंत।।
तत्व प्रकट करी जनात। गुरुराज समर्थ।।४१।।

**श्लोक।।**

पिता माता भ्राता प्रियसहचरी सूनुनिवहा।
सुदत्स्वामीमाद्यतकरिभटरथास्वःपरिकरः।।
निमज्जंतु जंतु नरककुहरीरक्षतुमलं।
गुरो धर्माधर्मः प्रकटनपरत्कोमनपरः।।१५।।

**टीका।।**

अनादि संतान हे त्रिताप। चतुर्गती हिंडवी उभयरूप।।
येकसरेचि याचा लोप। करी गुरुराज।।४२।।

दाखवि धर्माधर्म रुप। तैसेचि सुचवि पुण्य पाप।।
गुरुवीण कोण हरवी ताप। शिष्यजनाचा।।४३।।
गुरुवीण मातापीता। कन्या पुत्र बंधु भ्राता।।
नरक कुपामाजी पडता। कोण काडी दुजा।।४४।।
सोयेरे–धाईरे दुष्ट जन। प्रियमित्रादि कांता जन।।
अवघी असोनि नर्क भूवन। गुरुविण चूकेना।।४५।।
राजाधीराज स्वामी थोर। मंडलीक महामंडलेश्वर।।
बल वासुदेवादि चक्रधर। ना तरे क्षीती।।४६।।
ऐसा थोर असोनि धणी। पडता दुर्गती दुःखरानी।।
येका गुरुवीण न तारी कोणी। या त्रिजगामाजी।।४७।।
महा मदोन्मत कुंजर। रथ पदांती अश्व थोर।।
कोटिभट्टादि महावीर। काय करीती।।४८।।
धन धान्यादिक संपति। सैन्य चतुर्दिक महाविभूती।।
गुरुवाचोनि न तरति। भवदुःखसागरी।।४९।।
नरककुपामाजी समस्त। जंतुराशी दुःख भोगीत।।
येका गुरुवीण तयात। कोण काडी बाहेरी।।५०।।
भवसागरी बु(ड)ता प्राणी। भोगीता नाना दुःखखाणी।।
येका सद्गुरुवाचोनि। कोण काडी तयाते।।५१।।
गुरु अज्ञेविण सर्व गुण। ते निष्फळ असे जाण।।
ऐका फोल धान्यावीण। पशू भक्ष जैसे।।५२।।

**श्लोक।।**

किं ध्यानेन भवत(त्य)शेषविषयत्यागैस्तपोभिः कृत।
पूर्ण भावनया ल मिंद्रियदमैः पर्याप्तमाप्तागमैः।।
किंत्व कं भवनाशने कुरु गुरुप्रीत्या गुरो शासनं।
सर्वेयेन विना विनाथ बलवत् स्वार्थाय नालं गनाः।।१६।।

**टीका ।।**

गुरु अज्ञेवीण केले ध्यान। अथवा केले नाना साधन।।
मौन्य अनुष्टानादि विधान। व्रथा शीण दिसे।।५३।।

सर्व विषयाचा केला त्याग। नातरी केला नाना योग।।
गुरुवचनाविण सर्व त्याग तरि निष्फळ।।५४।।
अनुग्रहावाचुनि करिता तप। बाह्याभ्यंतर उभयरूप।।
साहिला अनेक प्रकारे ताप। परी निरार्थ पाहे।।५५।।
गुरुवचनाचा नाही बोध। जप जपतसे नानाविध।।
गुरुउपदेशावीण अंतर शुध। कदाकाळी न होये।।५६।।
गुरुअज्ञेवीण भावना। अथवा मुद्रा साधन नाना।।
गुरुवाचोनि अराधना। कैसी करावी।।५७।।
जरी ईंद्रियाते केले दमन। रोधोनि बैसला जरि मन।।
सर्व व्यर्थ गुरुवाचुन। निजखून न कळे।।५८।।
प्राप्त जाला अप्तागम। व्यर्थ सांग वर्जुनि काम।।
गुरुअज्ञेविण अंतर भ्रम। न जाय कदा।।५९।।
गुरुअज्ञेविण हे सर्व निष्फळ। ऐसे बोलती शास्त्र सकळ।।
ऐका सर्व साधनासि मुळ। गुरुराज येक।।६०।।
यया सर्वावरी गुरुशासन। तेणे होती सकळ साधन।।
हे प्रमाण मानुनि जिनवचन। गुरु करावा अधी।।६१।।
गुरुअज्ञेवीण तयास। न कदा होय भवनाश।।
यालागी हो निजध्यास। गुरुपदी असावा।।६२।।
गुरुअज्ञेविण सर्व गुण। व्यर्थ जैसे सैन्य रायाविण।।
स्वामीकार्य न होय तेणे। सर्वथा पाहे।।६३।।
श्रीगुरुसी शरण जावे भक्तीने। अर्जउनि तयासि प्रिय वचने।।
स्विकारुनि ध्यावे सम्यग्ज्ञान। निज गुरुमुखे।।६४।।
गुरुउपदेशाविण सार्थक। न होय केलिया उपाय अनेक।।
या कारणे करावा विवेक। ज्ञानियानि शिघ्र।।६५।।
सार्थक करावे जन्माचे। सत्य मानावे वचन गुरुचे।।
धरावे पाद तयाचे। बळकट अधी।।६६।।

ईति श्री गुरुभक्तिनिरोपणन्नाम तृतीयोध्यायः।।
मंगळं महा श्री।। श्री।। श्री।। श्री।। छ।।छ।।छ।।

****

# चतुर्थ अध्याय

**।। श्री सुपारिश्वनाथाय नमः ।।**

गुरुभक्ति सांगुनिया पुडे। जिनागम भक्ति सांगतो प्रोढ।।
श्रोती करुनि चित्त दृढ। ऐकावे भक्तिने।।१।।

**श्लोक।।**

न देवं नादेवं न शुभगुरुमेवं कुगुरुं।
न धर्मं नाधर्मं न गुणपरीणर्धविगुणं।।
न कृत्यं नाकृत्यं न हितमहीतं नापि निगुणं।
विलोकंति लोका जिनवचनचक्षुर्विरहितं।।१७।।

**टीका।।**

जिनवचनचक्षुरहित लोक। जेसा गर्भांध न देखे वर्णपंचक।।
किं दिनमणीसी न पाहे धुक। तैसे परी जाणा।।२।।
जिनागमावाचून न कळे देव। सुदेव कुदेव याचा न कळे भाव।।
जिनवचनावाचुनि देवादिदेव। कदा काळी दिसे ना।।३।।
न कळे त्यासि सद्गुरुरूप। अथवा कुगुरु मिथ्यारूप।।
जिनवचनाविण पुण्यपाप। दिसे ना कधी।।४।।
जिनशास्त्रावाचूनि न कळे धर्म। किंव्हा दुर्गति दुःखदायक अधर्म।।
न दिसे कधी जिनगुणवर्म। जिनवचनावीण।।५।।
न कळे दुर्गुण अथवा सगुण। सौख्यदायक सम्यक्त गुण।।
जिनवचनाविण इतर निज खुण। कैसेनि दिसे।।६।।
कृत्याकृत्य न कळे भेद। कार्याकार्य नानाविध।।
जिनशास्त्राविण सुबोध। कदाकाळी न होय।।७।।
जिनागमाविण हिताहीत। न कळे कदा विवेक नीत।।
करोनि घेतला आत्मघात। जीनशास्त्रावीण।।८।।
जो न पाहे जिनशास्त्र। तो जाणावा हीन नेत्र।।
न कळे तयासी पात्रापात्र। नेत्र असोनि अंध।।९।।

न दिसे तयासि स्वहितार्थ। कैसा साधावा परमार्थ।।
जिनवचनावीण जन्म व्यर्थ। तया मानवाचा।।१०।।
सर्वज्ञ शास्त्राविण जे जन्मले। ते जाणावे जितचि मेले।।
नातरि जैसे काष्टाचे बाहुले। तैसी परि तयाची।।११।।

**श्लोक।।**

मानुष्यं विफलं वदंति ददयं व्यर्थं वृथा श्रोत्रयोः।
निर्माणं गुणदोषभेदनकलां तेषां समं भाविनी।।
दुर्वारं नरकांधकूपपतनं मुक्तिं बुधां दुर्लभां।
सर्वज्ञं समयोदयारसमयो न्नकर्नास्छितेः।।१८।।

**टीका ।।**

अहो ऐकावे श्रोतेजन। सर्वज्ञ समय दिव्य वचन।।
दया रसमय निधान। वचन अप्रती।।१२।।
सर्वज्ञ शास्त्र दिव्य वाणी। दयारस अमृतखाणी।।
तो रस न पडे ज्याचे कानी। व्यर्थ जन्म तयाचा।।१३।।
जिनागम वाणी निर्मळ। लोकत्रयामाजी मंगळ।।
न ऐकता जन्म निष्फळ। जाहला तयाचा।।१४।।
व्यर्थ निर्माण जाहले कर्ण। शून्य तयाचे अंतःकर्ण।।
जिनागम रसना संपूर्ण। कर्णेंद्रियात।।१५।।
जैस्या शु(त)ष्क वृक्षाच्या ढोली दीसति। तैसीच कर्णेंद्रिये दीसताति।।
प्रेत नेत्रापरी भासती। नेत्र तयाचे।।१६।।
जिनागम दयारस केवळ। नसे सेविला तो निर्मळ।।
गुण दोष भेद हा न कळे। तया पुरुषासी।।१७।।
सर्वज्ञागमरस नसे पडिला कानी। तो निष्फळ जाला जन्मा येउनि।।
ऐसे बोलीले केवळज्ञानी। हे सत्य सत्य।।१८।।
ऐकिले नाही सर्वज्ञशास्त्र। तो नर जाणावा अपात्र।।
विविध दुःखासी तोचि पात्र। ऐसे बोलती।।१९।।

नरक गर्तेतुनि स्वच्छंदे। कैसे निघावे पंगु गर्भांधे।।
जिनशास्त्राविण भवसिंधु अगाध। कैसा तरावा।।२०।।
अंतरला स्वानंद सुखासी। पात्र जाला सर्व दुःखासी।।
मोक्ष दुर्लभ तया पुरुषासी। ऐसे बोलती बुद्ध।।२१।।
जो नर जिनशास्त्रावेगळा। मानव जन्म तयासी निर्फळ।।
ते जाणा जैसे काष्टाचे पूतळे। हा तात्पर्यार्थ।।२२।।

**श्लोक।।**

पीयूषं विषवज्जलं ज्वलनवस्तोमवन्।
मित्रं शास्त्रववत्स्रजं भुजगव चिंतामणी लोष्टवत्।।
ज्योत्स्ना ग्रीष्मजघर्मवत्स मनुते कारुण्यपुण्यापणं।
जैनेंद्रं मतमन्यदर्शनसमं यो दुर्मतिर्मन्यते।।१९।।

**टीका।।**

अज्ञान लोकाचि ऐका दुर्मती। कुश्चिळ कुबुदी वसे चित्ती।।
जैन दर्शनासम मानिति। अन्य दर्शन।।२३।।
करुण रस अमृत दिव्य पात्र। जिनिंद्रदर्शन शुद्ध पवित्र।।
सौख्यदायक ईह परत्र। यानपात्रासम।।२४।।
जिनिंद्र दर्शनासम अन्य। कैसे करावे ते दयापून्य।।
ते सुरासुरादिकासि मान्य। जिनदर्शन।।२५।।
पर्वतामाजी मेरु भूधर। अमरलोकी जैसा शचिवर।।
कि उडगणामाजी प्रकाश भास्कर। तैसे जिनमत।।२६।।
जिनदर्शन आणि अन्य दर्शन। जे मानी सर्व समान।।
ते नर जाणावे ज्ञानहीन। अचेतन जैसे।।२७।।
आहो ऐका ते अज्ञान जन। म्हणति अमृत विषसमान।।
कैसा होईल हीवर चंदन। समान उभय।।२८।।
अमृत शेवति होति अमर। विष प्राशिती तात्काळ मरे।।
कैसे जिनेंद्रदर्शनासम ईतर। मानि दुर्मती।।२९।।

अग्निसमान मानी उदक। तेज अंधार करी येक।।
ऐसा अज्ञान अविवेक। चुकला हितासी।।३०।।
शत्रूवत् मानी हितमित्रासी। मित्र म्हणे दुर्जन खळासी।।
तैसे अन्य मत जिनिंद्र दर्शनासी। समान म्हणे।।३१।।
सुगंध परिमळ पुष्पमाळ। तयासि म्हणे सर्फ केवळ।।
जिनमतासमान मानी खळ। अन्य दर्शन।।३२।।
चिंतामणी रत्न केवळ। ईछीतार्थ पुरवी सकळ।।
म्हणे तयासी काळे ढेकुळ। ऐसा खळताची।।३३।।
निर्मळ शरद्रतुचे चांदण। पाहोनि तिवृ(उ)ष्ण म्हणे दारुण।।
भ्रांतिरूप वेढेपण। चावळे भलतेचि।।३४।।
जया पुरुषासि ऐसी मती। तयासि न चुके कदा दुर्गती।।
पडलि नेत्रासि मोहभ्रांति। म्हणती ज्ञानी।।३५।।
उदंड गारा असति माळावरी। ते काय करीती रत्नसरी।।
तैसे अहिंसा धर्मा बरोबरी। नाहि नाही दुजा।।३६।।
या कारणे साधुसंत। सदा सेविती जिनेंद्र मत।।
कदा न करिती जिवघात। स्वहितालागी।।३७।।
तव श्रोती वंदूनि गुरुचे पाय। पुसते जाले पुढता उपाय।।
जिनमत सेविता होते काय। ते सांगावे स्वांमी।।३८।।

**श्लोक।।**

धर्मं जागरयत्यघं विघटयत्फत्थापयत्युत्पथं।
भींते मत्सर मुछनति कुनयं मथ्नाति मिथ्यामतं।।
वैराग्यं वितनोति पुष्णति कृपां मुष्टाति वृष्णचयं।
तज्जैनं मतमर्चति प्रथयति ध्यायत्यधीते कृतिः।।२०।।

**टिका।।**

ऐका जिनमताचा महिमा पुर्ण। भानु जैसा विश्व स्फुरित कीर्ण।।
मोहतम करावया विदारण। समर्थ देखा।।३९।।

दहन करि पापारण्य। विस्तार करी बहुत पुण्य।।
पाहा जिनमतासमान अन्य। नाही नाही त्रिजगी।।४०।।
जिनमत भद्र हास्ति केवळ। कुमार्ग वृक्ष उपडि सकळ।।
न राहे मिथ्यात्व मूळ। ऐसे करीत।।४१।।
दुर्गतिदायक मद मत्सर। भ्रांत करवी मोहांधकार।।
तो नासावया जैसा भास्कर। जिनमत पाहा।।४२।।
विदारण करी अवघे कुनय। विस्तारण करी शुद्ध सुनय।।
दाखवि मोक्षमार्ग उपाय। जिनमतार्क।।४३।।
मिथ्या मत विपरीत बुद्धि। घोरांधर उभय विधी।।
शोषावया तो भववारिधी। वडवान्नळ जैसा।।४४।।
वैराग्य उपजवि अंतरी। अज्ञानतमांधकार विदारी।।
सूर्यप्रकाश जैसा अंबरी। तैसे जिनमत।।४५।।
कृपा उत्पन्न होय मानसी। दया करवि सर्व जीवासी।।
जिनमतासारिखी करुणारासी। नाही नाही त्रिलोकी।।४६।।
आशा तृष्णा या सर्पिणी। निसिदिनी डकिती अंतःकर्णि।।
निर्विष करावया गारुड मणी। तैसे जिनमत।।४७।।
ऐसे जिनमत प्रकटित। विवीध प्रकारे पूजित।।
तो सर्व साम्राज्य भोगूनि त्वरीत मूक होय।।४८।।
जिनमत स्वाध्यायी जो पुमान्। करी पारायण निशिदिन।।
तो कृतार्थ जाला जन्मा येउन। त्याते जन्म फळला।।४९।।
ऐसा जिनमताचा महिमा थोर। सेविता विघ्ने पळती दुर।।
स्वसूख भोगी निरंतर। तो नर देखिजे।।५०।।

ईति श्री जिनमत निरूपणन्नाम चतुर्थोध्यायः।।

मंगल महा श्री।। श्री।। श्री।। छ।।

****

## पंचम अध्याय

**।। श्री चंद्रप्रभाय नमः।।**

ऐकोनि श्रोते जनाचे चित्त। संतुष्ट परमानंद डुल्लत।।
भावे जोडोनि दोनी हात। पूसते जाले।।१।।
स्वांमी जिनमताचे महिमान। दाखउनि केले समाधान।।
आता जिनसंघाचे अनुसंधान। सांगावे स्वामी।।२।।
तव बोलिले गुरुनाथ। पुरउनि घ्यावा मनोरथ।।
जेणे साध्य होय परमार्थ। तोचि अर्थ सांगतो।।३।।
महिमा ऐकावा जिनसंगाचा। पूजिता पाश तुटोनि जाय भवाचा।।
लाभ होये मोक्षसुखाचा। पूजिता संग।।४।।
सांगावया संगाचे गुणस्तोत्र। पुढे रचिले चारी सूत्र।।
बुडता सागरी यानपात्र। तैसा जिनसंग।।५।।

**श्लोक।।**

रत्नानाममिवरोहणं क्षितिधरः खंतारणाभिवचः।।
स्वर्गेकल्पमहेरुहामिव सरः पंकेरुहाणामिव।।
पाथोदिः पयसामिवेंदुमहसा स्छानं गुणानामसी।।
वित्यालोच्य विरच्यतां भगवतः संगस्य पूजाविधि।।२१।।

**टिका।।**

सकळ वस्तु वसती रोहणाद्रित। उतुंग शोभायमान दिसत।।
तैसे जाण सद्गुण समस्त। असति संगामाजी।।६।।
नभामाजी वसति उडुगण। शशी ग्रह आणि चंद्रकीर्ण।।
तैसे संगामाजी संपूर्ण। सद्गुण असती।।७।।
स्वर्गी कल्पद्रुम वसती सहज। दाही दिशा उज्वळी विराज।।
ईंद्रपदि जैसा शक्रराज। सद्गुण संगी।।८।।
समस्त पृथ्वितील उदकासी। स्थान जैसे तो अंबुरासी।।
तैसेचि उत्तम गूण संगापासी। असति समग्र।।९।।

सहजी शांत गूण असे सोम। कळा संपुर्ण दिसे विराम।।
ऐका तेचि परी गुण अराम। चतुः संगामाजी।।१०।।
सरोवर जैसे कमळासि स्छान। तेणे दिसतसे शोभायमान।।
तैसे विशेष गुणासि निधान। संत संग।।११।।
संग समुदाय जिनेश्वर संबंधी। पुजा विधान करीती त्रिशुद्धी।।
गुणीजन जाणुनी पूजा विधी। करीता पुण्य जोडे।।१२।।

**श्लोक।।**

ये संसारनिरासलालसमती मुक्त्यार्थमुत्तिष्ठते।
ये तीर्थं कथयंति पावनतया ये नास्ति नान्यं समः।।
यस्मै देवपतिर्नमस्यति सतां यस्मांछु जायते।
कीर्तिर्यस्य परा वसंति च गुणाः यस्मिन्स संगार्चिता।।२२।।

**टीका।।**

तव शिष्य पुसे गुरुसी। सांगता होये पुण्यराशी।।
जि जी सांग म्हणावे कोणासी। ते सांगावे स्वामी।।१३।।
गुरु बोले मधुर वचन। ऐसा स्वस्त करूनिया मन।।
जेणे लाभ होये सकळ साधन। सांगीन तोचि अता।।१४।।
ऐका संगाचे लक्षण। शुद्ध जयाचे अंतःकर्ण।
साधीताति ते उत्तम गूण। तोचि संग म्हणावा।।१५।।
संसार त्यजावा लंपटमती। देह भोगावरी विरक्ती।।
जयासी वंदि देवपति। संत त्यासी म्हणावे।।१६।।
वृत्ती जयाचे उदास। निरंतर निज ध्यास।।
स्वस्वरूपाचा अभ्यास। नित्यानित्य करी।।१७।।
रत्नत्रय करी साधन। सदा मोक्षसुखाचे ध्यान।।
स्वरूपी होय मन लीन। तोचि ध्यान करीत।।१८।।
सदा मोक्षमार्गि तिष्ठत। दृढ शुद्ध करुनि चित।।
निज निरंतर जनी येकांत। निरंतर करी।।१९।।

करीती भक्त जनासी पावन। त्रिजगी नाही तयासमान।।
तीर्थेधुंडाळिता त्रिभुवन। संगाविण नाही।।२०।।
पुरती शेवक जनाचे मनोरथ। यालागी म्हणती तयासि तीर्थ।।
संगावीण पवीत्र पदार्थ। नाही नाही अन्य।।२१।।
या कारणे संगाप्रती। देववृंद नमस्कारिती।।
पुण्योपार्जुनि पवित्र करीती। क्षणामाजी तयासी।।२२।।
संत संगाचा समागम। होता लाभ गुण उत्तम ।।
तुटोनि जाय संसार भ्रम। ऐसे करीती।।२३।।
कीर्तिलता पसरे अकाशी। विविध पुण्याच्या होती राशी।।
उपमा देता संत संगासी। त्रिजगामाजी नाही।।२४।।
संतसंगाची करीता पुजा। त्रिजगी वंद्य होय जगता।।
मुक्ति सति होय भाजा। मग काय न होये।।२५।।
अहो या सूत्राचे प्रमाण। करीता संत जनाचे पूजन।।
होय सर्वार्थसाधन। पूजका नरा।।२६।।

**श्लोक।।**

लक्ष्मीस्तं स्वयमभ्युपेति रभसा कीर्तिस्तमालोकती।
प्रीतीस्तं भजते मतिः प्रयत्तत्ते तं लब्धमुत्कटया।
स्वश्रीस्तं पुरी।।
लब्धुमिळति मुहुर्मुहुर्मुक्तिस्तमालोकयते।
यः संगं गुणसंगकेलिसदनं श्रेयोरुचि सेवते।।२३।।

**टीका।।**

जो मोक्ष्यसुखाचा प्रियकर। तरी भक्ति पुजा हो संगी च्यार।।
सौख्यभोगा हो निरंतर। पुजा प्रभावे।।३७।।
स्वइछा उत्तम गुणासी। पवित्र सदन क्रिडावयासी।।
समस्त पुण्याची येक राशी। संत संग।।३८।।

संत संगाचि शेवावा निर्भार। करीता सूर होति किंकर।।
लक्ष्मी उभी जोडोनि कर। पूजका नरासी।।३८।।
श्रीदेवि पाहे रभस। सर्व देवता होति दास।।
भावे पूजिता जिनसंगास। पाप नाश होय।।३०।।
कीर्ति देवि निर्भार भक्ति। प्रेमे तयासि अळंगीती।।
साधु संग होय मुक्ती। त्वरीतचि काळी।।३१।।
प्रिति देवि तया नरासी। सेवा करिती दास दासी।।
प्रेमे लक्ष्मी अहीर्णिसी। संगपूजा प्रताप।।३२।।
मती प्राप्त होय उत्कर्ष। त्वरा इछीतसे उल्हास।।
प्रयत्न करिती बहु सायास। तया मानवा।।३३।।
स्वर्गादि संपति तयाप्रती। प्रेमे आळिंगावया ईछिती।।
पुन्हा पुन्हा पाहे मागुती। संग पूजका।।३४।।
मोक्षलक्ष्मि इछि तयासी। म्हणे केव्हां येइल पुण्यराशी।।
अहीर्णिसी लक्ष्मी मानसी। न वीसरे कदा।।३५।।
संतसंगाचे शेविता पाय। घोर दुष्कर्म शीघ्र जाय।।
सकळ साम्राज्य प्राप्त होय। महिमा संगाचा।।३६।।
संगभक्ति मुख्य कारण। भात पेरिल्या अंकुर दिसे तृण।।
परि सेवटी येइ जैसे कण। तैसे गौण फळ।।३७।।

**श्लोक।।**

यद्भक्तिः फलमर्हदादिपदवीमुख्यं कृषेः सस्यवः।
चक्रेत्व त्रिदशेंद्रता दिव्य तृणत्वासंगिकं गीयते।।
शक्ति यन्महमस्तु तैन दधते वाचोपि वाचस्पते।
।संगः सौगहरः पुनातु चरणान्यासैः संता मंदिरं।।२४।।

**टिका।।**

कृषारंभासि गौण जैसे। शशी विराजीत लसलसे।।
तैसे गौण अर्हदादि पदविस। संगभक्तिते।।३८।।

गौण म्हणिजे स्वल्प फळ। मुख्य तेचि विशेष फळ।।
तेणेचि प्राप्त होये सकळ। वैभव देखा।।३९।।

साळी पेरिल्या अंकूर दिसे। सस्यासि नाम साळीच असे।।
गौण फळ यालागि त्यास। म्हणती ज्ञानी।।४०।।

अंति साळी येति फळास। मुख्य फळ म्हणावे तयास।।
तैसे अर्हदादि पदवीस। गौण फळ स्वर्गादी।।४१।।

राजाधिराज महाराज। मंडळीक महामंडळीक तेज।।
मुकुटबंधादि पदवि राज्ये। हे गौण फळ।।४२।।

गौण फळ प्रती वासुदेव संपती। ती संगभक्तीच होय प्राप्ती।।
मुख्य फळ ते मुक्तीपति। संगपूजा करुनि।।४३।।

बल वासुदेवादि चक्रेश्वर। खेचर नरेंद्र धरणीधर।।
अर्हदादि पदवीस तृणवत्सार। ऐका सज्जन हो।।४४।।

गरूड गंधर्वादि येंतर। ज्योतिष्क देवादि सुरासूर।।
गौण फळ तृणवत् सार। अर्हदादि पदासी।।४५।।

ऐसा महिमा साधुसंगाचि। कोण वर्णन करि तयाचा।।
साक्षात् बृहस्पतीची थकली वाचा। न वर्णवे तया।।४६।।

करिता साधुजनाची भक्ती। प्राप्त होय सकळ संपती।।
ईंद्रादि देव तया वंदिती। निरंतर।।४७।।

ईत्यादि सर्वत्र अभ्योदय। ऐका गौण फळचि होय।।
सेविता साधुजनाचे पाय। मुख्य फळ प्राप्त।।४८।।

करावयासि पापहरण। मुख्य जाणा चतुर्वर्ण।।
गृह पवित्र होय तेण। पाद स्पर्शिता।।४९।।

पवित्र करीताति भक्तासी। तिर्थ म्हणावे यालागी त्यासी।।
त्रिभुवनामाजी पुण्यराशी। संताविण नाही।।५०।।

जिनसंग चरणाचे रजामृत। न पडे जयाचे मंदिरात।।
कांतार म्हणावे तयात। नाशिले नाम।।५१।।

चतुःसंगाचि पद धुळ। स्पर्शिता होय निर्मळ।।
धन्य धन्य ते धाम विशाळ। असो पर्णकूटी।।५२।।
जिनसमंधी संगा इतर। तीर्थ नाही या धरीवर।।
तरावया भवसागर। नाही दुसरे झाज।।५३।।
परोपकारी वर्तती संत। निष्काम हींडता भूतळात।।
तयास कुणाचा न कळे अंत। ब्रह्मादिकासी।।५४।।
नदि वाहाती निष्काम। स्वभावे फळति वृक्ष विराम।।
सहजी पुरविती जनाचे काम। तैसा संग जाणावा।।५५।।
धेनु स्वभावेचि देई क्षीर। परी निव दुसर्याचे अंतर।।
यापरि करिती परोपकार। चतुर्विध संग।।५६।।
करिता संगाचे वर्णन। न होय शेषादिकालागुन।।
मा ईतर कवि वर्णी कोण। यया धरातळी।।५७।।
कराया जिनसंगाचे भक्ती। दाखवुनि श्रोतेजनासि युक्ति।।
पुढे जितावया अरीसंतती। रचिले सूत्र।।५८।।
ईति श्री जिनसंग निरूपणं नाम पंचमोध्यायः।। श्री।।

## षष्ठम अध्याय

।। श्री पुष्पदंताय नमः।।

ऐकोनि संगाचे महिमान। संतुष्ट होउनि श्रोतेजन।।
पुढे वृतविधीचे विधान। पुसते जाले।।१।।

**श्लोक।।**

क्रीडाभूः सुकृतस्य दुष्कृतरजः संव्हारवीत्या भवै।
दन्वन्नोव्यसताग्निमेघपटलं संकेत दुतेश्रयां।।
निश्रोणी त्रैदिवौकासः प्रियसखी मुक्तीः कुगत्यर्गलं।
सत्वेसु क्रियतां कृपैव भवतु क्लेशैषै परेः।।२५।।

**टिका।।**

कृपेने रक्षी जो प्राणीगण। ऐका तया पुरुषाचा उत्तम गुण।।
क्रीडा खेळावया लक्ष्मीकारण। विस्तीर्ण भूमवत्।।२।।
उडवावया महापाप धूळ। बहु प्रचंड वहुटूळ।।
जयाचे कृपा अंतर निर्मळ। तयाचे गुण।।३।।
दया अंतरी असे सहज। स(क)ळ (उ)त्तम गूण तेथेचि विराजे।।
भवसागर तरावया झाज। दयाविण नाही।।४।।
पेटला दावाग्नि सप्त व्यसन। जाळित उत्तम गूण महान।।
भोगवि दुर्धर नरक पातन। नाना दुःखराशी।।५।।
विझवावया तो दावानळ। महाप्रचंड मेघ प्रबळ।।
जयाचे दया अंतर कोमळ। तद्वत जाण।।६।।
कृपा असे जया अंतरी। दया करी जंतूगणावरी।।
वंदिती देवगण च्यारी। तया पुरुषासी।।७।।
लक्ष्मी होय तयाची दाशी। भोगवि सकळ साम्राज्यसौख्य राशी।।
सांग कार्य करी अहीर्णिशी। दूती जैसी ते पाहे।।८।।
अहो दयाभाव मव्हा प्रौढ। तोचि जाणा स्वर्गप्रती जावया शीढ।।
नेउनि लावितसे कडोविकड। स्वर्गलक्ष्मी।।९।।

दयाभाव सर्वासि प्रियकर। तो लक्ष्मीचा मनोहर।।
तया कंठीचा थोर हार। कृपा तोचि जाणी।।१०।।
कृपेन पाही मुक्तिरमा। लक्षीत तया पुरुषोत्तमा।।
झाली दुर्गतिची शिमा। लाविले कपाट।।११।।
कुगतिसि लाउनि थोर अर्गळा। निरंतर इछीतसे अमृतकळा।।
पुष्पहार करूनि स्वगळा। घाली तयासी।।१२।।
कृपासारीखा थोर गुण। नाही त्रिभूवनामाजी जाण।।
सकळ सुखासी कारण। दयागूण देखा।।१३।।
दया लोकत्रयामाजी सार। दया उत्तम गुणासी तोचि अधार।।
सर्व सुखाचा सागर। कृपागुण।।१४।।
दया संपतीचे मूळ। दया विपत्तीचे काळ।।
दयेने सिद्ध गूण सकळ। प्राप्त होय।।१५।।
दया साधनाचे सार। दया गुणासी नाही पार।।
दया मुक्तिचे मंदिर। ऐका सज्जन हो।।१६।।
दया जयाची सर्व भुति। अन्य उपद्रवता तया काय करिती।।
अशेष क्लेश न राहाती। तयाजवळी।।१७।।
दया नाही जया अंतरी। सौख्य न मिळे स्वप्नांतरी।।
तो पडिला जाणा भवसागरी। दुःखराशीमाजी।।१८।।

**श्लोक।।**

यदि ग्रावा तोये तरति तरुणीर्यदुदियती।
प्रतिच्या सप्तार्चीर्यदि भजतिशैकथमपि।।
यदि क्ष्मापीठंस्यादुपरी सकलस्यापि जगतः।
प्रसुते सत्वान्नातदपि तवद क्वापि सुकृतं।।२६।।

**टिका।।**

तव शिष्य म्हणे गुरुराया। करावि सर्वाभुति दया।।
हे झाज दिधले तरावया। भवसागर।।१९।।
हे तो त्रिलोकामाजी सार। ऐसे बोलतातात साव्हाच्यार।।
परी बहुत दिसे अंतर। मिथ्यामतामाजी।।२०।।

प्राणीवध करूनि पुण्य जोडे। ऐसे बोलताति मतिमुढ।।
द्रव्य वेचूनिया रोकडे। पाप कर्म घेती।।२१।।

काही एक निमित्य करूनि। मोहत्साह करीती जीव वधून।।
म्हणती सफळ जाले जन्मा येउन। येणे कर्मे।।२२।।

कैसे पुण्य घडेल या जिवासी। प्रत्यक्ष मारूनि पर जिवासी।।
म्हणती कारण हेची सर्व सुखासी। हा काय अनर्थ।।२३।।

गुरु बोले मधुर वाणी। ऐके शिष्याशिरोमणी।।
हे मिथ्यावचन पापखाणी। ऐको नये कदा।।२४।।

आता ऐका हो श्रोते जन। सत्य मानावे हे जी वचन।।
पुण्य न घडे जीववध करुन। हे सत्य सत्य।।२५।।

पाशाण न तरे कदा पाण्यात। तोही तरोनिया जाय कदाश्चित।।
परी करून या जिवघात। न घडे पुण्य।।२६।।

पश्चिमे न कदा उगवे भास्कर। तोही उगवेल काळनुसार।।
परी करुनि हींसा विचार। पुण्य न घडे।।३७।।

अग्निगुण उष्ण केवळ। तो कदापी न होय शीतळ।।
तोही काळे करूनि होयील जळ। सत्यार्थी पाहो।।३८।।

ऐका कोणी येके कारण। हे सर्व घडोनि येती गुण।।
परी जीवहिंसा केलीयान। पुण्य न घडे।।२९।।

वसुंधरा सर्व जंतूसि अधार। उत्पन्न होति सकळ चराचर।।
धातु रत्नादीक प्रचुर। स्थावर सर्वा भूमी।।३०।।

भूमी पीठ सर्व जंतुते। थारा न देई न घडे माते।।
परी काळे करूनि अवचिते। घडोनि येति।।३१।।

न होये ऐसे विपरित। तेही होईल कदाश्चित।।
परी जिवहिंसा करुनि घात। पुण्य न होये।।३२।।

ऐका श्रोतेजन समस्त प्राज्ञ। मंत्र तंत्रादि याग यज्ञ।।
हिंसा करावि म्हणती कुशास्त्रज्ञ। तेचि अज्ञ म्हणावे।।३३।।

**श्लोक।।**

स कमलवचनमग्नर्वासरं भास्वदस्ता।
दमृतमुरगवक्त्रात्साधुवादं विवादात्।।
रुगपगममजीनाज्जीवितं काळकूटा।
दमिळसतिलवाथप्राणिनां धर्ममोछित्।।२७।।

**टिका।।**

हे ऐकोनि श्रोतेजन। स्वामी हे न कळे तयालागुण।।
धर्म म्हणति जीव वधुन। हे आश्चर्य काय।।२८।।
मुनि म्हणे ऐका मात। लोकप्रसिद्ध दृष्टांत।।
जरी जाहला सन्नीपात। का हो भ्रांत न पडे।।३५।।
नेत्रासी रोग आला जरी। शंख दिसे विविधा परी।।
पाप कर्म उदेले तरी। ऐसी परी दिसत।।३६।।
अथवा जाहला उन्मत वात। स्वइछा बोले भलत भलेत।।
मग काय पुसावे तयाते। विवेकीयाणी।।३७।।
शुभाशुभ कर्माचा उदय। तद्योगकाळी होय उदय।।
कर्मसारीखे फळ होय। उदयकाळी।।३८।।
नेत्र झाकू कळले अशुभ कर्म। पापपुण्याचे न कळे वर्म।।
तेणे जिववधासि म्हणती धर्म। निज भ्रांतिरूप।।३९।।
ज्ञाननेत्रासि आले पडळ। म्हणे तीव्र अग्नी करुनि प्रबळ।।
त्यामाजी लाउनि कमळ। पुण्यफळ घ्यावे।।४०।।
अस्त जाला वासरमणी। पडिला आंधार न दिसे धरणी।।
तेव्हा म्हणे उगवला तरुणी। ऐसा प्राणी अनार्य।।४१।।
भुजंगामुखी घालूनि हात। काडावे म्हणे दिव्याऽमृत।।
प्रत्यक्ष होइल आपला घात। हे न कळे तया।।४२।।
सज्जनासी करुनि वेवाद। बोलावया शिके उत्तम शब्द।।
मतिमंदासि न कळे भेद। इछीतो पुण्य।।४३।।
रोगे पीडोनि जाहला जीर्ण। उपाय न दिसे आले मरण।।
चिरंतन वाचावया कारण। वीश दारुण प्राशीत।।४४।।

पुण्य इछूनिया मनात। करीतो अन्य जिवाचा घात।।
म्हणे येणे होइल शांत। सकळ राष्ट्रासी।।४५।।
ऐसी असे जयाची मती। कैसे बोधावे तयाप्रती।।
कदा न चुके हो दुर्गति। तया पुरुषासी।।४६।।
अग्नीमाजी उपजे कमळ। कि मध्यरात्री उगवे अर्कमंडळ।।
तरीच जीव वधूनि पुण्य फळ। प्राप्त होय।।४७।।
सर्पमुखी अमृत मिळे। की वीष प्राशीता होय रोग निर्मळ।।
तरीच प्राणी वधूनि पुण्य फळ। प्राप्त होय।।४८।।
हे जाणोनि दृष्टांत खुण। हिंसा न करावि गेलिया प्राण।।
अहो सर्व सुखासी कारण। अहींसा व्रत।।४९।।

**श्लोक।।**

अयुर्दिर्घतरं वपुर्वरतरं गोत्रं गिरीयस्तरं।
वितं भूरीतरं बलं बहुतरं स्वामित्वमुछैस्तरं।।
अरोग्यं विगतांतरं त्रिजगत्श्लाघ्यात्वमल्पेतरं।
संसारांबुनिधि करोति सुतरं चेतः कृपार्द्रांतरं।।२८।।

**टिका।।**

जया पुरुषाचे अंतर। कृपेने द्रवे निरंतर।।
तो जाणावा उत्तम नर। त्रिभुवनामाजी।।५०।।
दया करिता सर्व जिवावर। आयुष्य वर्धेनिरंतर।।
(अ)हमिंद्रादि सौख्यसार। सहजी प्राप्त।।५१।।
स्वरूपसुंदर संव्हानन। जगा प्रियकर अभिनव मदन।।
जरी दयायुक्त असे मन। तरीच प्राप्त होय।।५२।।
प्राप्त होय उत्तम गोत्र। लोकाधिपत्य आणि जगमित्र।।
जयाचे करुणारस चित्त पवित्र। तया पुरुषासी।।५३।।
धन धान्यादीक संपति। उपामातुल्य जैसा धनपति।।
कृपा असे जयाचा चिती। तरी प्राप्त होय।।५४।।

त्रिभुवनामाजी महाबळी। न भीये कोणासि कदा काळि।।
अनुकंपा अंतर कळकळी। तरीच भला होय।।५५।।
दयायुक्त ज्याचे हृदयकमळ। तरी प्राप्त होय स्वामीत्व सकळ।।
सेविती विश्‍व धरामंडळ। तया पुरुषासी।।५६।।
अरोग्यता प्राप्त होये कडवर। व्यथा पळुन जाय दुर।।
जयाचे कृपेने द्रव्ये अंतर। तया मानवासी।।५७।।
कृपेने रक्षि जो प्राणीयासी। श्लाघ्याता त्रिजगी होय तयासी।।
देवता तीष्टती तयापासी। अहीर्णिशी देखा।।५८।।
सर्वा भुती दया करीता। त्रिभुवनामाजी होय योग्यता।।
भावे लक्षिती स्वर्ग देवता। तया पुरुषासी।।५९।।
दया सर्वामाजी मुख्य। तेणे प्राप्त होय सर्व सौख्य।।
दुष्कर्म जळोनि होय राख। तया मानवाचे।।६०।।
कृपा सकळामाजी सार। सर्व सुखासी कृपा अधार।।
देव दानव होति किंकर। मग काय न होय।।६१।।
संसारसागर बहु दुस्तर। नाग नर सुरा न कळे पार।।
तरोनि जाय शुभतर। दयागुण पाहे।।६२।।
दया सर्व धर्माचे मूळ। दयेने सर्व पातके होति निर्मुळ।।
दया सौख्यराशी केवळ। अमृत खाणी।।६३।।
दयेवीण वृथा धर्म। दयेवीण क्रियाकर्म।।
दयेविण साधन धर्म। निष्फळ पाहे।।६४।।
अहिंसा व्रत हे जगी श्रेष्ठ। ते सुचविले तुम्हा स्पष्ट।।
अता सत्यव्रत महिमा वरिष्ट। सर्वा गरिष्ट पाहे।।६५।।

ईति श्री अहिंसा व्रत निरुपणं नाम षष्टमोध्यायः।।६।।

मंगलं महा।।

।। श्री।।श्री।। श्री।। श्री।। छ।। छ।। छ।।

* * *

## सप्तम अध्याय

**।। श्री शीतलनाथाय नमः।।**

कर जोडोनि श्रोते जनी। विनविले गुरु लागुनी।।
स्वामी अहींसाव्रत ऐकोनी। तृप्त जालो देवा।।१।।
अता सत्य व्रत ते कैसे। काय गुण अहे तेथे विशेष।।
कृपा करोनि सांगावे आम्हास। श्री गुरुराया।।२।।
मुनि बोले मधुर वचन। आता ऐका हो श्रोते जन।।
स्वस्त करोनि अपुले मन। सत्य व्रत ऐका।।३।।

**श्लोक।।**

।विश्वासायतनं विपत्यदलनं देवैः कृताराधनं।
।मुक्तेः पत्यधनं जलाग्निशमनं व्याघ्रोरगस्तंभनं।।
।श्रेयः संवननं समृद्धिजननं सौजन्यसंजीवनं।
।कीर्तिः केळिवनं प्रभीवभवनं सत्यं वचः पावनं।।२९।।

**टिका।।**

सत्य व्रत हे जगा पावन। साध्य होति सकळ साधन।।
लाभ होय मुक्ति निधान। सत्य महाव्रत।।४।।
सत्य महाव्रत थोर। ते विश्वाचे मंदीर।।
विश्वास धरीती लाहन थोर। राव रंकादीक।।५।।
सर्व विपत्तीचे होय दलन। पाप कर्माचे होय गलन।।
सर्व संपती संपादन। सत्य महाव्रत।।६।।
सत्य व्रत पाळी जो नर। अराधिती तयासि सूरासूर।।
यक्ष किन्नर होती किंकर। तया पुरुषासी।।७।।
सर्व अभ्योदयासि स्छान। मोक्षसुखासि सचगार धन।।
जो नुलंघे सत्य वचन। सज्ञानमूर्ति तोची।।८।।
सत्य तेचि जलस्तंभन। पाणी नुलंघी तयाचे वचन।।
चालत जाय उदकातुन। लोकप्रसिद्ध।।९।।

सत्य वचन बोलता निर्मळ। प्रत्यक्ष अग्नि होय शीतळ।।
बाधा देखोनि दुर पळे। न राहे पुढे।।१०।।
व्याघ्रादिक क्रूर मृग। अथवा दुर्धर विशोरग।।
स्पर्श न करिती पवित्र अंग। सत्ववंताचे।।११।।
सत्य व्रत पाळिता निर्मळ। प्राप्त होय संपति सकळ।।
लक्ष्मी तिष्टे तयाजवळ। निरंतर।।१२।।
सत्य व्रत पूर्ण शशी केवळ। उदय देखोनि सागर उचंबळे।।
तैसी सत्य वाक्यासि समृद्धि सकळ। वर्धति होये।।१३।।
सत्य वचन परम पावन। तेणे विश्वही होती सज्जन।।
दृष्टि न पडे तयासि दुर्जन। त्रिभुवनामाजी।।१४।।
अनुपम्य देखा सत्य वचन। ते कीर्ति लक्ष्मीस क्रीडा स्छान।।
खेळावयासि उद्यावन। उपमातीत।।१५।।
अजींक सर्वासि सत्य वचन। सामर्थ्य सिंव्हासि योग्य भूवन।।
कि सर्वा वरिष्टासि येक स्थान। सत्य वचन अप्रति।।१६।।
सत्य वनासि उपमा देती। त्रैलोक्य न ये तयासि तुळीता।।
नाग नर सुरा न ये स्तविता। सत्य वचनासी।।१७।।
सत्ये पाषाण जाती तरु(न)। सत्य अग्नि होय शमन।।
त्रिजगामाजी पावन। सत्य वचन हो।।१८।।
सत्य व्रत ऐकोनि श्रोतेजन। आनंदे डुल्लति लोलायमान।।
धन्य धन्य स्वामी केले पावन। आम्हा अनाथासी।।१९।।
आता असत्य वचनाचे फळ। आम्हा निरोपावे स्वामी सकळ।।
जेणे तुठे असत्याचे मूळ। तेचि फळ सांगावे।।२०।।
गुरु वचन बोले गंभीर। म्हणे ऐका चित्त देउनि स्थिर।।
असत्य निरसोनि जाय येकसरे। तेचि सार सांगतो।।२१।।

**श्लोक।**

यशो यस्माद्भस्मीभवति वनवह्नीरिव वनं।
निंदानंदुःखानां यदवनिरुहानां जलमिव।।
न यत्र स्याच्छायातप इव तपःसंयमकथा।
कथंचित्तन्मिथ्यावचनमभिधते न मतिमान्।।३०।।

**टीका।।**

कही येके कारणे करुन। जरी बोलता असत्य वचन।।
किर्तिलता होउनि दहन। भस्म होय क्षणात।।२२।।
जवळ पेटोनि दावानळ। भस्म होति वनवृक्ष सकळ।।
तैसे असत्य वचन महाखळ। जाळी कीर्तिसी।।२३।।
कषाय महारण्य नानावृक्ष। पोषिता तया मेघजळ महादक्ष।।
तैसे असत्य वचना याची साक्ष। पोषी दुर्गुणासी।।२४।।
विवीध सौख्यासि विदारण। सकळ दुःखासी कारण।।
तीवृछ दारूण छायावीण। भोगवि दुःख।।२५।।
असत्य तेचि नरकस्थान। आपार दुःख भागवि गहन।।
यश मंटपासी करी दहन। असत्य दावाग्नी।।२६।।
ऐसे असत्याचे गुण। करी धर्माचे विस्मरण।।
जे बोले असत्य वचन। तया दुर्गती सत्य।।२७।।
त्या वचनाचे बोलता कथा। स्वप्नीहि न दिसे संशयाचि वार्ता।।
मग तपाचरण अणी परमार्थ। ठाव कैचा।।२८।।
असत्य दुर्गतिचे माहेर। असत्य व्यसनासि अधार।।
सर्व दुःखराशीचे मंदीर। असत्य वचन।।२९।।
समस्त अपदाचे मुळ। दरीद्र राहावयासी महास्थळ।।
दहन करी वृत्त संकुळ। असत्य अग्नी।।३०।।
या कारणे बुद्धिवंताने। कदा न वदावे असत्य वचन।।
सत्य वचन करि पावन। त्रिजगासी।।३१।।

**श्लोक।।**

असत्यमसत्य य मूलकारणं।
कुवासना पद्मसमृद्धीवारणं।
निपत्रिदानं परवंचनोर्जितं।
कृतापराधं कृतिभीर्विवर्जितं।।३१।।

**टिका।।**

असत्य अविश्वासाचे कारण। विश्वास न धरिती तयाचा कोण।।
भोगवी नर्कादि दुःख दारूण। वचन असत्य।।३३।।
जैसे कमळासि स्छान सरोवर। कि भुमी सर्वासि आधार।।
तैसे कुवासनाचे मंदिर। असत्य वचन।।३४।।
सर्व अपायाचे मंदिर। शीघ्र येउनि लीती अपस्मार।।
असत्य दुःखाचा सागर। नाही पार तयाचा।।३५।।
असत्य दुःखाचे पेठारे। कोण न मानि तयाचे खरे।।
कदा न चूके नर्क फेरे। पुनः पुन्हा तयासी।।३६।।
सर्व समृद्धीचे निवारण। पद्मलता विदारी जैसा वारण।।
की सत्याचार दहन कारण। असत्य दावान्नळ।।३७।।
परवस्तु ईछावया मूळ। वासना वृद्धि करवी सकळ।।
न तृप्त तृण दावान्नळ। तैसे असत्य।।३८।।
सर्व अपराधाचे स्छान। कुबुद्धि वाटवी असत्य वचन।।
सकळ अपकाराचे निधान। असत्य वाढवि।।३९।।
असत्य दुष्कृताचे मूळ। दुःखवृक्ष वाढे प्रबळ।।
शाखा पत्र पुष्प फळ। येती दुःखा।।४०।।
असत्य करवि कांळाहिन। छि छी म्हणति सर्व जन।।
निच असत्यासमान। काही अन्य नाहीची।।४१।।
यालागी त्याजावे जानीयान। नाना कुशळ युक्ती करून।।
कदा बोलो नय असत्य वचन। देखा प्राण गेलिया।।४२।।

परोपकारार्थ असत्य। तेचि जाणावे सुक्ष्म सत्य।।
जेणे हिंसा दोष न लागे असत्य। तोचि सत्य म्हणावे।।४३।।
असत्य बोलोनि रक्षावे प्राणी। तेचि सत्य व्रत दिव्य वाणी।।
असत्य बोलता होय हाणी। ते दुर्वाणी बोलू नये।।४४।।
प्रमाण मानूनि जिनवचन। असत्य त्याजावे परजिव रक्षुन।।
न बोलावे असत्य वचन। जाय प्राण तवरी।।४५।।
सत्य बोलता सांडुनि गर्व। वंदिती तयासी लोक सर्व।।
सत्यावेगळे नाही पर्व। त्रिजगामाजी।।४६।।
सत्य सुखाचा सागर। सत्य मुक्तिचे माहेर।।
सत्य सारामाजी सार। अन्य सार नाहीच।।४७।।

**श्लोक।।**

तस्याग्निर्जलमर्नवत्सलमरिमित्रं सुसः किंकरा।
कांतारः नगरं गिरी गृहमहीर्माल्यं मृगारी मृगः।।
पातालं बिलमस्त्रमुप्तलदः व्यलः शृगालो विष।
पीयुषं विषशमं च वचनं सत्यांकितं वक्तयः।।३२।।

**टीका।।**

सत्यांकीत वचन जो बोले। त्यासि अग्नि प्रत्यक्ष होय जळ।।
सत्य वचनासारीखे रत्न अमोल। नाही नाही त्रिजगी।।३३।।
असत्य वदे ना जो कूशळ। त्यासि समुद्र होय स्छळ।।
मार्ग देइल मह जळ। सत्यवंतासी।।४९।।
अरी होईल तयाचा मित्र। तो जगामाजी महापात्र।।
सत्य वचन बोले जो पवित्र। अत्र परत्र तो वंद्य।।५०।।
सुरासूर तयाचे किंकर। दाश करिती गंधर्व किन्नर।।
सत्य वचन बोले जो नर। उपमा नाही तयासी।।५१।।
अरण्य होय तयाचे नगर। बाधो न शकती मृगे कृर।।
गृह रक्षिती दुष्ट तस्कर। सत्य प्रतापे।।५२।।

गृह होय महापर्वत। समृद्धि प्राप्त होय महावनात।।
सत्य वचन बोलता त्वरीत। लाभ होय मोक्ष।।५३।।

भुजंग होय पुष्पमाळ साग। दुष्ट स्वापदे न स्पर्शति अंग।।
सज्जन इछीती तयाचा संग। अहीर्णिसी।।५४।।

सत्य वचन बोलता निरोग। शिंव्ह होयतसि मृग।।
घोर उपद्रव दुर्भाग। तया देखोनि।।५५।।

महा भयंकर रसातळ। दुःखराशी सप्त पाताळ।।
सत्यवंता दिसे केवळ। बीळ मुंगीचे।।५६।।

निशीत शा(श)स्त्र महाविशाळ। देखती कापे चळचळ काळ।।
ते प्रत्यक्ष होइल कमळ। असे बळ सत्याचे।।५७।।

सत्य वचन वदता विवेक। सहज येउन संचरे पुण्यपाक।।
क्रूर मृगे होति जंबुक। प्रताप फळे त्याचा।।५८।।

विष दारुण हळाहळ। तोचि अमृत होय केवळ।।
सत्य वचनासारिखे बळ। नाही नाही अन्य।।५९।।

घोरोपसर्ग महाविषम। सहजी होती अवघी शीम।
सत्य वचन महा आराम। कल्पवृक्षाचे।।६०।।

सत्य विश्व वस्य होये। सप्त पळति अवघे अपाय।।
सत्याविण नाही उपाय। मोक्षमार्गाचा।।६१।।

या कारणे सत्य व्रतसमान। तूळिता नये त्रिभूवन।।
पाहा पाहा साधु सज्जन। न बोलति आसत्य।।६२।।

ईति श्री सत्य व्रत निरूपणंन्नाम सप्तमोध्यायः।।

मंगळं महा श्री।। श्री।। श्री।। छ।। छ।। छ।।

* * *

## अष्टम अध्याय

**।। श्री श्रीयांसनाथाय नमः।।**

पुन्हा नमस्कारुनि गुरुचरणी। शिष्ये पूसीले जोडोनि पाणी।।।
स्वामी सत्य हे अमृतखाणी। दिव्य वाणी ऐकिली।।१।।
बहुत जन्माचे पातक। हरोनि जाले पुण्यपाक।।
सांगोनि सत्यव्रत विवेक। दाखविला स्वामी।।२।।
आतां अचोरि महाव्रत। रक्षण केलिया काय होते।।
कृपा करुनि आम्हा दिनाते। सांगावे स्वामी।।३।।
दया करुनि शिष्यावरी। मुनि म्हणे ऐका व्रत अचोरी।।
सजाति विजाति पुरुष नारी। पाळावे व्रत।।४।।

**श्लोक।।**

तमभिलषति सिद्धिस्तं वृणंती समृद्धि।
तमभिलषति कीर्तिर्मचंते तं भवार्थी।।
स्पृहयति सुगतिस्तं गानक्षते दुर्गती।
परीहरति विपत्यं न गृह्णंतत्वदत्तं।।३३।।

**टीका।।**

कोणे येके कारणे विख्यात। अचोरी व्रत पाळी निभ्रांत।।
परद्रव्यासी न लावी हात। कदा काळी।।५।।
ग्रामी अथवा अरण्यात। परवस्तु पडे जरि वनात।।
दृष्टी देखोनि अभिलास चित्त। न होय कदा।।६।।
मार्गि चालता व्रतिक जन। पुडे पडिले असे जरी सोने।।
निष्काम जाय स्वस्त मने। न पाहे तीकडे।।७।।

ऐसा व्रतिक असे जरी कोण। देव स्तविती तयाचे गुण।।
आनंदे डुल्लती साधुगण। पाहोनिया।।८।।
काहि येक कारणे करुन। न घेइ कदा अदत्त धन।।
हर्ष कीर्ति लक्ष्मी येउन। तया प्रेमे अळंगी।।९।।
किर्ति व्यापे त्रिजगात। धन्य धन्य म्हणति हा ज्ञानवंत।।
उपमा द्यावयासि जगाते। दुजीयाते नाही।।१०।।
संसारदुःख जाय सोडुन। बाधा न बाधी तयासि येउन।।
जो परवस्तु न घे कदा चोरून। तया पुरुषासी।।११।।
प्रेमे इछीती तयासी सुगति। दुर्गति न पाहे कदा मागुति।।
अदत्त धन न घेई हाती। पुण्यमुर्ति तो पाहे।।१२।।
विपत्य परिहारोनि जाय झडकर। सदा सौभाग्य भोगवि सौख्य सार।।
अचोरी व्रत पाळी जो नर। तोचि थोर जगाते।।१३।।
सकळ व्रतामाजी थोर। अचोरी व्रत महासार।।
जे पाळति नारी अथवा नर। तोचि थोर त्रिजगी।।१४।।
निरंतर अभिलासी तया सिद्धी। न सोडोनि जाय कदा बुद्धी।।
अहीर्निशी तिष्टती सिद्धी। तयाजवळी।।१५।।
सदा वर्धत होय सकळ सिद्धी। नवनिधी भोगवि तया सुरवाष्धी(?)।।
समस्त कार्य होती सिद्धी। तया पुरुषाची।।१६।।
अदत्त धन तया कारण। न घ्यावे कदा गेलिया प्राण।।
जतन करावे हेचि गूण। सर्वत्रानि।।१७।।

**श्लोक।।**

अदत्तानांदे कृतसुकृतकामः किमपयः।
शुभश्रोणीस्तस्मै न्वसति कलहं सेव कमले।।
विपत्तस्मादृरं व्रजतीवांवरमणे।
वनितं विद्यावंत्रिदिवशिवलक्ष्मीर्भजति तं।।३४।।

**टीका।।**

कोणी येक पुरुष कूशळ। जरी ईछी कृत पुण्यफळ।।
तरी पाळावे अचोरी व्रत निर्मळ। महा पुण्यकरण।।१८।।
सर्व सोभोदयाचे कारण। येक अचोरी व्रत जाण।।
समस्त कृत तयावीण। निष्फळ पाहे।।१९।।
सकळ पापकर्माचे लय। महापुण्याचा होय उदय।।
अदत्त धन कूशळ उपाय। करूनि त्याजावे।।२०।।
जैसी सरोवरामाजी कमळे। असती अन्योन्यपरि आळिकुळे।।
कि हंसपक्षी राहे निर्मळ। मान सरोवरी।।२१।।
तैसे धन न घे जो अदत। तया पुरुषाच्या हृदयकमळात।।
समुदाय शुभादयाचा समस्त। आसति तेथ।।२२।।
रात्री पडे आंधकार घोर। लोक व्यापुनि भरे दुस्तर।।
सूर्योदय देखोनि पळे दुर। नरा हे कीमपी।।२३।।
तैसी आनंत जन्माची विपती। देखोनि तयासी दूर पळती।।
ना फिरोनि पाहे कदा मागुती। अचोरि वृतिकाची।।२४।।
विद्या वस्य होय त्वरीत। विनय वाछल्यता राहे तेथ।।
जो हर्षेपाळी अचोरी व्रत। तयाजवळी।।२५।।
स्वर्गादि संपति अहीर्णिसी। आचळ राहे तयापासी।।
जो अचोरी व्रत पाळी त्रीशुद्धिसी। तोची रासी पुण्याची।।२६।।
निरंतर मुक्तिकांता। ईछी तयाच्या गूणव्रता।।
सर्व जन चरणी माथा। अर्पिती भावे।।२७।।
या कारणे ज्ञानवंत। यत्ने पाळीती अचोरी व्रत।।
न इछिति कदा द्रव्य अदत्त। त्रिकर्णेकरुनि।।२८।।

विश्वास धरिति सकळ जन। बळे ठेविति द्रव्य नेउन।।
तया मंदीरी लक्ष्मी येउन। निरंतर राहे।।२९।।
देशोदेशी होय विख्यात। म्हणती धन्य धन्य पुण्यवंत।।
दुष्ट तस्करादि समस्त। वंदिति तया।।३०।।
करुणा करिति सुरवर। सन्मान करिती नरेश्वर।।
नमस्कारीती लाहान थोर। व्रत महात्म।।३१।।
यालागी साधु सज्जने। न इछावे अदत्ता धन।।
प्राप्त होति नवनिधी येउन। सहज स्वभावे।।३२।।

**श्लोक।।**

यन्निर्वर्तितकीति धर्मनिधनं सर्वांगसंसाधनं।
प्रोन्नीलद्वदवंदनं विरचितं क्लेष्टाशयोद्बोधनं।।
द्वैर्गत्यंक निबंधनं कृतसुगत्याश्लेषसंरोदनं।
प्रात्सर्पं सदनं जिघृक्षतिनतं धीमानदतं धनं।।३५।।

**टीका।।**

कीर्ति असे जरी जगभरीत। तरि लय होउनि जाय क्षणात।।
अदत्त धन इछी जो मनात। तया पुरुषाची।।३३।।
जैसा अस्त होता तपनी। प्रकाश भरले पूनि रजनि।।
तैसे येश तेज जाय लपोनी। येका क्षणात।।३४।।
स्वकृत धर्माचा होय नाश। दुस्तर अधर्म होय प्रकाश।।
करिता अदत्त धनाची आस। होय नाश पुण्याचा।।३५।।
अरामी नाना वृक्ष शोभत। अनर्घ्य पुण्यफळ विराजीत।।
दावानळी दहन होय क्षणात। तैसा नाशे धर्म।।३६।।
अदत्त धन ईछिले जरी। जरी होय ऐसी परी।।
मग प्रत्यक्ष करीता चोरी। कैसी थोरी राहे।।३७।।

सर्व अपराधासि कारण। अवघे सुकृताचे हरण।।
परवस्तु करीता स्विकारण। होय हरण सर्व।।३८।।
अदत्त धनाची करिता अस। प्रकाशती हिंसा गुण विशेष।।
स्वपर जिवाचा होय नाश। येति दोष समस्त।।३९।।
सकळ वद बंधनाचे मुळ। अदत्त इछा तेचि पाप फळ।।
दुर्भग दुखराशी केवळ। स्थान होय अदता।।४०।।
समस्त क्लेषाचे उदयस्थान। अपकीर्तिचे विस्तीर्ण सदन।।
सर्व अपराधासि कारण। तरी मान न राहे।।४१।।
बहु दुर्गतिचे बंधन। बांधले सुगतिचे होय हनन।।
नर्क्यदि दुःखासि येक निधान। धन अदत्त।।४२।।
उपजवी युध्य कळावाद। करवि मनासि संत खेद।।
सकळ सद्गुणाचा करवि छेद। अदत्त धन।।४३।।
कोणी दत्त केल्याविण धन। जरी घेतले असक्त मने।।
न चुके दुर्गती तया लागून। बहु पुण्य असोक।।४४।।
याकारणे बुद्धिवंते। न घ्यावे धन अदत्त।।
नाना युक्ति स्वस्त चित्त। करूनि वर्जावे।।४५।।
सर्व अशूभासि कारण येक। म्हणोनि वर्जावे विवेक।।
येउनि शुभ कर्माचा पाक। अवचित्ता लाभे।।४६।।
सकळ बोधासि येकचि खुण। येत्ने परीहारावे चोरी गूण।।
नाना साधनेचि कारण। हेचि पाहे।।४७।।
जयासि साधण परमार्थ। तस्कर गूण वर्जावे हा तात्पर्य।।
सर्व कार्य साधनार्थ। ईत्यर्थ हाची।।४८।।

**श्लोक।।**

परजमः पीडा क्रीडावनंद वदभावना।
भवनमवनित्यपि व्यापल्लवता घनमंटपं।।
कुगतिगमनर्मार्गः स्वर्गापवर्गपुरार्गलं।
नियतमनुपादेयं स्तेयं नृणां हितकंक्षिणां।।३६।।

**टीका ।।**

परजन मनासि पीडण। करावया मुळ तस्कर गुण।।
ते केवळ दुत यमाचे जाण। महा दुःखकारक।।४९।।
खेळावया तया दुतासी। वन विस्तीर्ण महा विकासी।।
समस्त दुःखाचि येक राशी। तस्कर गूण।।५०।।
वद भावनेसी महासदन। समस्त दोषासी उत्पन्न स्थान।।
घोर उपसर्गासि निधान। चोरी गुण पाहे।।५१।।
हिंसा परिणाम उपजवी चोरी। दुष्ट भावनेसि साहाकारी।।
समस्त सद्गुणासि विदारी। तस्कर गुण।।५२।।
अवनिति लतासि घन मंडप। संपूर्ण पसरोनि लोक व्यापे।।
अवचिता येउनि झटति पापे। चोरी गुणे।।५३।।
कुगति गमनासि महामार्ग। सुमति मार्गासि अजींक दुर्ग।।
चोरी गुणे सकळ उपसर्ग। येउन लागति।।५४।।
स्वर्गाप्रति जावयाचे शीड। ते चोरी गुणे मोडोनि पडे।।
सकळ अनार्थ रोकडे। येउनि लागे।।५५।।
झाकी मोक्षपुराचे कपाट। अडगळा पडला महा बळकट।।
चोरी गुणे मोडिलि वाट। मोक्षपुराची।।५६।।

जैसे लवण पडता नाशे क्षीर। किं हींग पात्रे नाशे कस्तुर।।
तैसे तस्कर गुणे नासति सारे। उत्तम गुण।।५७।।
जरी पुणे असे बहुत। तरी नासोनि जाय क्षणात।।
येउनि पाप कर्मेसमस्त। लागति चोरी गुणे।।५८।।
चोरी हिंडवी देशोदेशी। भूमि जागा न देइ तयासी।।
लोक छिछी म्हणती पापराशी। पहा प्रत्यक्ष।।५९।।
हस्त पाद छेदिती चोरी गुणे। निचा हाती तयासी मरण।।
शिर छेदि शुळा रोहण। करीती देखा।।६०।।
सर्व दुःखासि चोरी मुळ। भोगवि नर्कादि अघोर फळ।।
चोरी पापराशीच केवळ। पाहे प्रत्यक्ष।।६१।।
आता सकळ बोधाचाये कळस। त्यजावा चोरी गुण अशेष।।
जैसा शोभे फुलला पळस। तैसा शोभे जगात।।६२।।

ईति अचोरी व्रतनिरूपणं नाम अष्टमोध्यायः।।

मंगलं महा।। श्री।। श्री।। श्री।। छ।। छ।। छ।।

* * *

## नवम अध्याय

**।। श्री वासपूज्यनाथाय नमः।।**

तव पुसती श्रोते जन। स्वामी केले अम्हासी पावन।।
अचोरी व्रत ऐकोनि समाधान। जालो स्वामी।।१।।
अता ब्रह्मव्रत अम्हासी। कृपा करोनि सांगा पुण्यराशि।।
जेणे साधन होय मोक्षसुखासी। तेचि सांगा स्वामी।।२।।
गुरु म्हणे हो स्वस्त चित्त। करूनि ऐकावे ब्रह्मव्रत।।
मोक्षलाभ होय त्वरित। तोचि अर्थ सांगतो।।३।।

**श्लोक।।**

दत्तस्तेन जगत्यकीर्ति पठहो गोत्रे मषेकूर्चिकं।
श्चारित्रस्य जलांजुलिर्गुणगणा समस्य दावानलः।।
संकेतः सकलापराशी वपुरद्वारे कवाटो दृढः।
शीलो येन निजं विलुप्तमखिलं त्रैलोक्यचूडामणीः।।३७।।

**टीका ।।**

अता ऐकावे श्रोते जन। ब्रह्म व्रताचे महिमान।।
उपमा देता सर्व भूवन। नये नये तयासी।।४।।
जो पाळी ब्रह्म व्रतासी। सकळ शीलाचि तोची राशी।।
अहो ऐका मोक्षसुखासी। कारण शील।।५।।
शील त्रैलोकाचे शिखरमणी। कि मोक्षलक्ष्मीचे कंठमणी।।
सकळ व्रतामाजी शिरोमणी। शीलव्रत पाहे।।६।।
ब्रह्मव्रत शील चुडामणी। ते हरविले जेया दुर्गुणी।।
हा हा मुर्खामाजी शिरोमणी। तोचि येक।।७।।
शीलहीन जाला जो नर। अपहास्यति लाहन थोर।।
धो धो वाजति नगारे। अपकीर्तिचे।।८।।
पुरुष अथवा असो नारी। काळिमा येइ तोंडावरी।।
वाजति अपकीर्तिच्या भेरी। यया जगाते।।९।।

केला जयाने शीलव्रताचा नाश। निज जननी जनका आणीला दोष।।
मसि लाविली त्याणे तोंडास। स्वगोत्र जनाच्या।।१०।।
चारित्रासि दिधली तिळांजुळी। सम्यक्त वृक्ष तोडिला समुळि।।
शिल भंगता पडे पाताळी। कदा काळी चुकेना।।११।।
ब्रह्मव्रत सद्गुण समुदायाचे वन। कल्पवृक्षादि विवीध शोभायमान।।
नाना सौख्याची फळे सूमने। तया वनि शोभति।।१२।।
अब्रह्म अविचार हुताशन। दहन करी सद्गुणगण वन।।
शिलव्रत सोडिले जयान। त्याणे ऐसे केले।।१३।।
सकळ अपदासि जनस्छान। दुर्विकल्पासि भांडारसदन।।
शीलरत्न गेलीया हरवोन। दुःखसदन ते होय।।१४।।
दलन हाताशी व्रताचे। कवाड लागे मोक्षपुराचे।।
सकळ दुष्कर्मेयेउनि साचे। तयाचे ह्रदई।।१५।।
मुक्तिद्वारासी पडे खीळ। अधर्म वृक्ष वाढे सबळ।।
शील हरविता येती सकळ। अरिष्ट राशी।।१६।।
शीलव्रत होता विदारण। सकळ व्रताचे होय हरण।।
नर्कादि दुःखासि कारण। कुशिल धर्म।।१७।।
नाश होता शील च्यारीत्र। पापकर्मासि जाहला पात्र।।
निंद्या होय अत्र परत्र। गोत्रि वर्जिती तया।।१८।।
या कारणे संत सज्जन। शील रक्षितातित यत्ने करुन।।
हे सुत्र ऐकोनि बुद्धिवंतान। रक्षावे शील।।१९।।
शील रक्षिता व्रते समस्त। रक्षण होति ऐका त्वरीत।।
सिद्धी उभी राहे तिष्टत। तयाजवळी।।२०।।

**श्लोक।।**

व्याघ्रव्यालजलादि विपदस्तेषां वृजती क्षयं।
कल्याणानि समुलसंति विबुधाः सान्निध्यमध्यासते।।
कीर्तिस्फूर्तिमियर्तियात्फपचयं धर्मं प्रणश्यत्यघं।
स्वान्नर्वाणि सुखानि सन्निधधते ये शीलमाबिभ्रते।।३८।।

**टीका।।**

जो त्रिकर्ण पाळी शीळ। व्याघ्र तयासी होईल कोल।।
शील व्रतासी काही मोल। त्रीजगी नाही।।२१।।

शीलव्रत धरीले जयान। बाधु न शके तयासी जिवन।।
महापुर जाय चालुन। तो ब्रह्मचारी।।२२।।

स्पर्श न करीती दुष्ट स्वापद। कदा न करिती अरि विषाद।।
शीळव्रत पाळिता नवविध। कृपा करीती सर्व।।२३।।

न बाधी तयासी दावानळ। अज्ञा पाळिती क्रूर मृगे सकळ।।
पाळिता शीळ व्रत निर्मळ। मोक्ष फळ शीघ्र।।२४।।

ऐका दुष्टोपसर्गाची बादा। शील पाळिता न होय कदा।।
यतर सांग कार्य करिती सदा। शील प्रभावे।।२५।।

जो शिळव्रत पाळी तयास। समस्त कल्याणाचा उल्हास।।
शुभोदयाचा उदय विशेष। शील प्रतापे होय।।२६।।

शीलव्रत पाळिता नवविध। समिप असति तयाचे विबुध।।
अवघे इछिती तयाचा बोध। शील प्रताप।।२७।।

संग न सोडिती सुरवर। अज्ञा पाळिती महा असुर।।
यंतरदेव होती किंकर। शील महात्म।।२८।।

कीर्ति व्यापे त्रिजगात। धन्य धन्य म्हणती व्हा शीलवंत।।
कर जोडोनि विनविती समस्त। प्रभाव शीलाचा।।२९।।

वर्धत होय निजधर्म। येउन साचे पुण्यकर्म।।
त्रिजगामाजी शुभर्शर्म। म्हणती तयासी।।३०।।

सर्व स्वर्गादिक संपती। समीप तयाचे वर्तति।।
जैसी सागरा येई भरति। चंद्रासि देखोनी।।३१।।

सर्व अभ्योदयाची विभुती। सन्निध तयाचे असति।।
निरंतर देवकन्या ईछीती। मार्ग तयाचा।।३२।।

शीलव्रत पाळिता अ(च)ळ। मोक्षसुख सदा तयाजवळ।।
अज्ञा पाळिती देव सकळ। तया पुरुषाची।।३३।।

सुभ कार्याचा समुदाय सर्व। साध्य होति गुण निगर्व।।
सर्व पर्वामाजी महापर्व। शील महाव्रत।।३४।।
ऐका श्रोते जन सकळ। शीलव्रत पुण्यकर्माचे मुळ।।
शीलव्रत ते मोक्षफळ। करतळामाजी।।३५।।

**श्लोक।।**

हरति कुलकलंकं लुपते पापपंकं।
सुकृतमुपचिनोती श्लाघ्यतामातनोती।।
नमयति सुरवर्गं हंति दुर्गोपसर्गं।
रचयति शूचिशीलं स्वर्गमोक्षौ सलिलं।।३९।।

**टिका।।**

शुची शीळ व्रत निर्मळ। जो पाळी मन करुनि अचळ।।
असत्याचे दूर पळे। दश दिशासी।।३६।।
शीळ गुण पाळिता विवेक। हरे उभय कुळाचा कळंक।।
महाकाळासि पडे धाक। तया पुरुषाचा।।३७।।
काही येक न करीता अयास। हरोनि जाय कुळाचा दोष।।
महाजन सन्मानिती तयास। प्रिय करूनि।।३८।।
करिता शील व्रताचा नेम। धुवोनि जाय पाप कर्दम।।
चळचळा कापे देखोनि येम। प्रताप शीलाचा।।३९।।
लोपवुनि जाय कुकर्म। विस्तार होय पुण्यकर्म।।
साधन होय शुद्ध धर्म। शील शर्म प्रकाशे।।४०।।
निश्चय करिता शीलव्रताचा। ठाव न राहे अशुभ कर्माचा।।
उदय होय सर्व शुभाचा। शीलाचा प्रभाव।।४१।।
पूज्यत्व होय त्रिजगामाजी। तयाचा कार्यास सर्व राजी।।
देव कर जोडुनि उभे सहजी। तयाचा पुडे।।४२।।
शेवा इछीती सर्व जन। मतिवंत इछीती द्यावया दान।।
संग इछीती साधू जन। तया पुरुषाचा।।४३।।

नमस्कार करीती सुरवर। असुर होति तयाचे किं(क)र।।
शीलरक्षण करी जो नर। नाही पार गुणाचा।।४४।।
धरीता शीलव्रताचा मार्ग। निवारण होति घोरोपसर्ग।।
करतळामाजी तयाचा सर्ग। न सोडी सदा।।४५।।
जो शिलव्रताचा लालस। सर्व वैभव प्राप्त होती तयास।।
तुटोनिया जाय संसार पाश। तया पुरुषाचे।।४६।।
ऐका स्वर्गादि संपति। कदा न सोडी तयाप्रती।।
चेक्रेश्वरादि पदवीप्राप्ती। होय शीले प्रतापे।।४७।।
पाहोनि शिलाचे महिमान। नमस्कारिती सकळै जन।।
लक्ष्मी वंदिति तया यउन। अहीर्णिसी।।४८।।
शीळ पाळिता निर्वेध। तुटोनिया जाय संसारभेद।।
मुक्तीकांता पाहे प्रमाद। शीलवंता कडे।।४९।।
शील पाळावे दृढ मने। परवनिता पाहो न ये भ्रांत मने।।
स्वये मोक्षलक्ष्मी येउन। वरी तयासी।।५०।।

**श्लोक।।**

तोयत्यग्निरपि स्रजत्यहरपि व्याघ्रोपि सारंगति।
व्यालोप्यश्वतिपर्वतिप्युपलति क्ष्वेडोपि पीयुषति।।
विघ्नोप्युत्सवति प्रिथत्यरिरपि क्रीडातटागत्यपां।
नाथोपि स्वगृहटव्यपि नृणां शीलप्रभावाधृतं।।४०।।

**टिका।।**

जो मनुष्यामाजी सुशीळ। शीलव्रत पाळीतसे निर्मळ।।
अग्नि प्रत्यक्ष होय तयासि जळ। ऐसे शील सामर्थ।।५१।।
जरी पर्वत असे विषाळ। तो खडा होय केवळ।।
शीलप्रतापे मंदिरी खेळे। निरंतर लक्ष्मी।।५२।।
न करवे शीलव्रताचे गणीत। त्रिजगामाजी प्रख्यात।।
दारूण विष होये अमृत। जगप्रसिद्ध।।५३।।

महाविघ्नाचे स्कंद सर्व। होती उत्साह महापर्व।।
यालागी विबुद्धी जनी सर्व। पाळीती शील।।५४।।
निशंक पाळीता शील गूण। सर्व दोषाचे होती हरण।।
पाहा सकळ साधनासि कारण। शीलगुण देखा।।५५।।
त्रिसुद्धि पाळिता शीलव्रत। दुर्धर दुःखे होती तेणे शांत।।
अरि मित्र होती त्वरीत। शीलप्रतापे।।५६।।
घोर सागर अशक्य दुस्तर। होय क्रिडावया सरोवर।।
देखोनि तयासि मागे सरे। महा समुद्र।।५७।।
तत्रापी पडे जरि सागरी। शीलगुणे निघे बाहेरी।।
असे नववीध ब्रह्मचारी। तारी महाजळ।।५८।।
घोर आरण्य अती दुर्धर। अशक्य महाभयंकर।।
तो होइल स्वमंदिर। शीलप्रभावे।।५९।।
शील प्रतापाचा प्रभाव। सर्व अपसव्य होति सव्य।।
शुभोदय फळती स्वभाव। शीलप्रतापे।।६०।।
शीलगुणे तरली अनंतमती। प्रसिद्ध जाहली भूविख्याति।।
वंद्य जाली देवाप्रती। जगविख्यात।।६१।।
शीलगुणे सिता नारी। निघाली अग्नि प्रवेशोनि बाहीरी।।
धन्य धन्य स्तविती नारी। त्रिजगामाजी।।६२।।
अचळ पाळूनि शीलगुण। विख्यात जाला सुदर्शन।।
गेला सर्वार्थसिद्ध कारण। शीलप्रतापे।।६३।।
त्रिजगी ब्रह्मव्रत महादक्ष।। नये उपमेसि कामधेनु कल्पवृक्ष।।
पाहे पा चिंतामणी प्रत्यक्ष। नये नये तुकासी।।६४।।
या कारणे संत सज्जन। पाळिती ब्रह्मव्रत गुणनिधान।।
त्रिभुवनी ब्रह्मव्रतासमान। नाही नाही अन्य।।६५।।

ईति श्री ब्रह्मव्रत निरूपणन्नाम नवमोध्यायः।।९।।

श्री।। श्री।। श्री।। श्री।। छ।।

* * *

## दशम अध्याय

**।। श्री विमलनाथाय नमः ।।**

ऐकोनि गुरुचे वचनामृत। श्रोती पूसिले जोडोनि हस्त।।
स्वामी पवित्र केले अम्हाते। ब्रह्मव्रत सांगोनि।।१।।
अता सांगाने निस्पृहाव्रत। परिगृहा स्वीकारिता काय होत।।
का त्यजीताती परीगृहा महासंत। ते सांगावे स्वामी।।२।।

**श्लोक।।**

कलुषं जनयान् जडस्य रचयन् धर्मादृमोन्मुल्लयन्।
क्लेशेन्नीति कृपाक्षमाकमलिनीर्लोभांबुधिं वर्धयन्।।
मर्यादातटमुद्धुजन् शुभमनोहंसर्वशासं दिशन्।
किन्न क्लेशकरः परिगृहनदिपूरः प्रवृद्धीं गतः।।४१।।

**टिका।।**

गुरु बोले मधुर वचन। ऐका स्वस्थ करुनिया मन।।
अंतःकर्ण होय समाधान। ते सज्ञान सांगता।।३।।
परिग्रह जडत्वाचे घर। उपजवि क्लेशाचे बहुत अंकुर।।
चित्त न राहे कदा स्छीर। परिगृहा संसर्ग।।४।।
अनेक विकल्पाचे उठती भार। वर्धत जाती नाना विकार।।
साधन कार्योपडे आंधार। परिगृहा स्वभाव।।५।।
परिगृहा मदन मत्त कुंजर। उपडोनि टाकी निज धर्म तरुवर।।
भ्रांती चढवि वीशोरग क्रूर। दुर्धर अही।।६।।
कृपा कमळलता कोमल। जळ आटता दहन करी अनळ।।
तैसा परीगृह दावान्नळ। जाळी धर्मदुम।।७।।
क्षमा कल्पवल्लीचे अंकुर। दयानदीतटि विराजे सुंदर।।
निर्मुळ करी परीगृह महापुर। सागरा मीळवी।।८।।
व्रत नेमाची मर्यादा। परिगृहा उलंघी सदा।।
स्वधर्माचार न राहे कदा। परिगृहा स्वभावे।।९।।

शाती सरोवरामाजी पूर्ण। विकाष संतोष वन जे अंतःकर्ण।।
क्लेश मदगज करी विदारण। परीगृहा स्वरूप।।१०।।
वर्धेलोभांबुधि अपार। बुडवि सारासार विचार।।
सर्व अनर्थाचे मुळ थोर। परीगृहा भाव।।११।।
तृष्णा महानदीचा पूर। ढासळी यम नेमाचे उभय तीर।।
यालागी त्यजितातिं सत्वर। महा समर्थ।।१२।।
शुभ मनराजहंसाचे वास। विध्वंसुनिया उपजवि क्लेश।।
परिगृहा स्विकारिती संतोष। न राहे कदा।।१३।।
परिगृहा स्वीकारिता रोकडे। पडती नाना परिची साकडे।।
अवचिता येउनि दोष घडे। विवीध प्रकारे।।१४।।
लोभ मित्राची होती अरी। आशा वाढत जाय भारी।।
परिगृहा काहे दुःख न करी। भ्रांत जनासी।।१५।।
परिगृहा त्यजावे सत्य भावे। निरंतर निस्पृहत्व असावे।।
धन्य धन्य तोचि मानव। त्रीजगामाजी।।१६।।

**श्लोक।।**

कलहः कलभं विद्यः क्रोधगृह धुश्मशानं।
व्यसनभुजगरंध्रं द्वेषदस्युप्रदोषः।।
सुकृतवन दावाग्नीर्माधवांभोदवायुः।
नय नलिन तुषोरोत्यक्रमर्थानुरागः।।४२।।

**टीका।।**

कलह गजप्रकारासी उन्न(त)। विस्तीर्ण विंद्याचळ पर्व(त)।।
बाल करी खेळती मदोन्मत। स्वइछे आपुले।।१७।।
परिगृहा घोर कांतारी। खेळती विशाळ बाळ करी।।
क्रीडती स्वछंदे नाना परी। राहाती निर्भय।।१८।।
अदो क्रोध गृध्र पक्षियासी। वास श्मशानभूमी विशेषी।।
ऐका परिगृहा पापराशी। विवीध प्रकार।।१९।।

क्रूर सर्पासि थारा बीळ। राहाती वृश्चीकादि क्रिमिकूळ।।
तैसे परिगृहा आसरा केवळ। सर्व व्यसनासी।।२०।।
तमांधकारी तस्करासी। स्वइछा जाती व्यापारासी।।
कि अनंद होतो वट जनासी। पडता आंधार।।२१।।
जैसी परिगृहा सर्व दोषासी। आधार जैसा तमाधराशी।।
स्विकारिता घडे पापराशी। मूर्छा स्वभावे।।२२।।
सुकृतवनासि दावान्नळ। दहन करि पुण्यदृम सकळ।।
परिगृहासमान अग्नि प्रबळ। नाही नाही त्रिजगी।।२३।।
विवीध सुकृताचे तरुवर। शोभित पुण्यफळ नाना प्रकार।।
क्रूर परिगृहा वैश्वानर। भस्म करीतसे।।२४।।
मार्धव गुणाचे मेघडंबर। मृदु मधु विराजे सुंदर।।
परिगृहा वात दुर्धर। विदारण करी।।२५।।
परीपुर्ण शांत स्वस्त गुण। लसलसती कोमळ अंतःकर्ण।।
परीगृहा वाहुटूळ करी हरण। सर्व गुणासी।।२६।।
विनय युक्ती गुणाचि कमळे। शांत सरोवरी देती ढाळ।।
परीगृह तुषार करी वीकळ। हृदयकमळासी।।२७।।
परीगृहाचा करीता स्विकार। न राहे कदा विनय उपचार।।
न कळे शुभाशुभ विचार। तया पुरुषासी।।२८।।
परवस्तुचा करावा त्याग। त्यजावा अर्थावरील अनुराग।।
निवृत्ती होय देहभोग। तोचि संग करावा।।२९।।

**श्लोक।।**

प्रत्यार्थिप्रशमस्तिमित्रदृमेतेर्मोहस्य विश्रामभुः।।
पापानां खनिरापदां पदृमसं द्यानस्य लीलावनां।।
व्याक्षीपस्य निधिर्मदस्य शचिवः शोकस्य हेतुकले।
केळीविश्मपरिगृहः परिहृतेर्योग्यो विविक्तात्मनां।।४३।।

**टीका।।**

ऐका परीगृहाचा चमत्कार। उटवि याचकवृत्ति निरंतर।।
लघुत्वबुद्धि करवि चटोर। सदा सर्वदा।।३०।।

उपशमभावासी अमित्र। संतप्त करवि सदा गात्र।।
परिगृहा समान दोष पात्र। नाही नाही त्रिलोकी।।३१।।

न करु देइ मीत्रभाव। सदा उठवि द्वेष कुभाव।।
करवि सज्जनपणासी अभाव। परिगृहा खळ।।३२।।

मोहतमासी विश्रामठाव। उटवि मायेचा ल्लोळ भाव।।
घेउ न दे सम्यक्ताचे नाव। परिगृहा दुष्ट।।३३।।

परिगृह दुःखाची राशी पूर्ण। सुमतिस पाडी आवर्ण।।
दिसो न देई ज्ञानभानूचे कीर्ण। परिगृहा राहु।।३४।।

पापकर्माचे उत्पन्न स्छान। सर्व दुर्बुद्धीस येक निधान।।
स्वस्त न राहो देई कदा मन। परिगृहा भूत।।३५।।

परिगृह समस्त अपदाचे मूळ। दहन करी हृदयकमळ।।
शोषून टाकी शांतरस जळ।। ऐसा खळ देखा।।३६।।

दुर्ध्यान मनासी खेळावया। उद्यान वन तरुछाया।।
नानाविध खेळ माया। परिगृहा वनि।।३७।।

उठति अर्थ रौद्र ध्यान स्वभाव। परिगृहा अहिर्णिशी करवि भाव।।
मग धर्मध्यानासि कैचा वाव। परिगृहा स्विकारे।।३८।।

विक्षेपासि निधी केवळ। सदा चित्तासि करी व्याकूळ।।
परिगृहासमान कृर गरळ। नाही त्रीभुवनात।।३९।।

परिगृहा अष्ट मदाचा सचिव। तेणे कुबुद्धिस होये स्वभाव।।
क्षणक्षणी उठवि दुष्ट स्वभाव। परिगृहा सेविता।।४०।।

परिगृह अहंकाराचे मंदिर। अहंभावाचा वाहे पुर।।
सन्मार्गासि अडवा भूधर। अजींक पाहे।।४१।।

परिगृहा महाशोकाचे कारण। करी शांत भावाचे विदारण।।
परिगृहासमान अग्नी दारुण। नाही नाही त्रिलोकी।।४२।।
कलहबुद्धीसी खेळवया स्थान। महाविस्तिर्ण उद्यानवन।।
त्रिजगि परिगृहासमान। नाही नाही दुष्ट।।४३।।
या कारणे संत मृत्यलोकी। निस्पृह होताती विवेकी।।
निसंग होता मान लोकी। वर्धत होय।।४४।।
हे पाहोनि विवेकवंतानि। परिगृह त्यजावा अशेष मनि।।
प्रियत्वे वरि मुक्तिकामिनि। तया पुरुषासी।।४५।।

**श्लोक।।**

वन्हे स्त्रुप्पति निंधनैरिह यथा नांभोभिरंभोनिधी।।
स्तद्वत् लोभघनं घनैरपी धनैर्जंतुर्न्न संतुष्यती।।
न त्वेवं मनुते विमुंच विभवं निःशेषमन्यं भवं।
यात्यात्मा तदहं मुदैव विटघं मैनास भूयासकी।।४४।।

**टीका ।।**

स्वल्प परिगृहा स्वीकारिता। न होय कदाचित्तृप्तता।।
वृक्ष तृष्णेचा होय वाढता। भरे अकाश।।४६।।
वरि वरि तृण काष्टे घालिता। अग्नी न होय कदा तृप्तता।।
इंधन सहस्र हस्ते घालीता। न तृप्त होय।।४७।।
पुन्हा पुन्हा शिंचिता घृत। शिखात जाय बहुत।।
तैसे परिगृहासंगे चित्त। तृष्णा वाढवि।।४८।।
जैसा जळे करूनि सागर। तृप्त न होय येक क्षणभर।।
अपार नदिचे जाती पूर। परि तृप्त न होय।।४९।।
अगणीत सागराचे तरंग। कित्तेक उठती होती भंग।।
तैसे परिगृहास्तव अंतरंग। भंगे क्षणोक्षणी।।५०।।
तयापरि वाढत जाय लोभ। महा कल्लोळ उठे क्षोभ।।
मन इछी परवस्तुचा लाभ। सदा सर्वदा।।५१।।

धन धान्यादीक संपदा। तृष्णा वाढवी मन सदा।।
विस्मृत्य करवी परम पदा। परिगृहा स्वभाव।।५२।।
मुंगीमात्रादीक सर्व जीव। अर्थ इछीती अपुले भाव।।
तेथे परमार्थासी कैचा ठाव। फुटकी नाव जैसी।।५३।।
हिंडता जन्मोजन्मी कोटि फेरे। अवचिता लाभे हे शरीर।।
परिगृहा न सुटेचि अनर्थ थोर। न चुके पुन्हा जन्म।।५४।।
परिगृहा पापाचे मूळ। तेणे चित्त न होय कदा निर्मळ।।
परिगृहा करी जो निर्मुळ। जन्म सफळ तयाचा।।५५।।
चक्रेश्वरादि संपत। जरि असलीया न तृप्त होय चित।।
अधीकाऽधीक पडी भ्रांत। स्वस्त चित न होय।।५६।।
सकळ ऐश्वर्य त्यजिल्यावाचुन। स्वस्त न होय कदा मन।।
यालागी त्यजावे ज्ञानीयान। परिगृहा सर्व।।५७।।
परिगृहा त्यागिताचि सर्व। सहजी उपजे संतोष भाव।।
पळोनि जाय अवघा कुभाव। न राहे कदा।।५८।।
परिगृहा त्यजिताची अनंद। तुटोनि जाय अवघा खेद।।
स्वपर तत्वाचा होय भेद। घनानंद वर्षत।।५९।।
अहो या कारणे साधुसंत। वैभव सांडिताति समस्त।।
होउनि संसाराविरहीत। ध्यानी स्वस्त बैसले।।६०।।
संतोषे त्यजावे वैभव धन। शुद्ध करुनि आपले मन।।
जेणे होय समाधान। तेचि ध्यान करावे।।६१।।
सारांश सांगतो कृत्य। विष परिगृहा त्यजावे त्वरित।।
असावे धर्मध्यानी स्वस्त। तात्पर्यार्थ हाची।।६२।।

ईति श्री पंच आणूव्रत निरूपणनाम दशमोध्यायः।।१०।।

श्री।। श्री।। श्री।। श्री।। छ।। छ।। छ।। छ।। छ।।

* * *

## एकादश अध्याय

।। श्री अनंतनाथाय नमः।।

सांगोनि पंच अणुव्रताचि महीमा। बुडता सागरी तारिले आम्हा।।
अता बोध करणेची जाली शिमा। सद्गुरु राया।।१।।
क्रोध गुणाने होते काय। ते सांगावे अम्हाते गुरुमाये।।
बळकट धरुनि गुरुचे पाय। पूसते जाले।।२।।
गुरु बोले गंभीर वाणी। क्रोध दुष्ट बा रे पापखाणी।।
क्रोध प्रत्यक्ष प्रळयाग्नी। न विझे महामेघा।।३।।
जरि पेटला दावाग्नी। तरी विझतो घालिता पाणी।।
परि क्रोध न विझेचि दुर्गुणी। काही केलिया।।४।।
अता क्रोध गुणाचि मात। ऐका सांगतो बहु दृष्टांत।।
जयासि करु निघणे स्वहित। तरि ऐकावे।।५।।

**श्लोक।।**

यो मित्रं मधुनो विकार करणी संत्राससंपादने।।
सर्पस्य प्रतिबींबमन्यदहने सप्तार्चिषः सोदरः।।
चैतन्यस्य निपोदने विषतरोः स ब्रह्मचारी चिरं।
स क्रोधः कुशलभिलषकुषलै निर्मुल्यमुन्मुल्यतां।।४५।।

**टिका।।**

कोप सर्व दुष्कर्माचा बाप। कोपापासुनि उपजे पाप।।
कोप ज्ञानभानुचा करवि लोप। घनी अभ्र जैसा।।६।।
क्रोध कोणे येके कारणे। उटवी अनेक विकार गुण।।
ऐसे मद्यपान अती दारुण। करवि भ्रांत।।७।।
क्रोध अन्य जिवासि भयकारक। उपजो न देइ कदा विवेक।।
जैसा सर्प देखोनि उपजे धाक। अज्ञान जिवासी।।८।।
जैसा भुजंग देखोनि अजा भांत। क्रोध आलीया होय तद्वत।।
न कळो देइ हिताहित। अद्भूत करवि।।९।।

पसु पक्षी अदी जीवासी। क्रोध संत्रास करवि मानसी।।
क्रोध सर्व दोषाची राशी। त्यजावे त्वरे।।१०।।
अन्य जिवासी करावया दहन। क्रोध अग्निसि मित्र जैसा पवन।।
क्षणामाजि दग्ध करी संतोष वन। प्रळयाग्नी जैसा।।११।।
शुद्ध बुद्धिचा करावया विध्वंश। क्रोध विशतरु महा विषेष।।
किं कंठासि पडता पाष। करी विनाश जिवाचा।।१२।।
जैसा ब्रचारि गुण नाशी चेतनासी। तैसा क्रोध विदारी चैतन्यासी।।
कि मग उडता पडे पाषी। नाश होये जिवाचा।।१३।।
जरी असे कूशळ अभिळाषी। तरी क्रोध त्यजावा पापराशी।।
अधिपती होइल सर्व सुखासी। त्यजीता क्रोध।।१४।।
कुशळ बुद्धिने त्यजावा क्रोध। सकळामाजी श्रेष्ठ हाची बोध।।
होउनि सर्वात निर्बाध। मोक्षसिद्धि होय।।१५।।
चिरंतन संसाराचे मूळ। जाणा क्रोधचि महाखळ।।
तो समूळ करावा निर्मुळ। बुद्धिवंतानी।।१६।।

**श्लोक।।**

फलति कलितश्रेयः श्रीणिः प्रसूनपरंपरः।
प्रसम प्रयसासि क्रो मुक्ति तपश्चरणद्रुमः।।
यदि पुनरसो प्रत्याशक्तिं प्रकोपह विभुर्।
जो भजति लभते भस्मे भावंतदावि फलोदय।।४६।।

**टिका।।**

तपाश्चरणे वृक्षस्कंद शोभत। द्वादशविध शाखा महाउन्नत।।
विवीध गुणकीर्ण विराजित। दिनमणी जैसा।।४७।।
बहूत विस्तारला तरुवर। ईछितार्थ फळे देई सुंदर।।
नाना ऐश्वर्यसुम प्रवर। द्यावया दक्षे।।१८।।
उपशमभावाचे शींपावि उदक। वृक्ष वाढविला बहु विवेक।।
चिंतीतार्थ फळ दायक। अप्रति कल्पवृक्ष।।१९।।

लसलसीत शोभति पत्रछाया। निरूपम दक्ष शोक हरवाया।।
क्षणमात्र बसता निरसे माया। तया छायेसी।।२०।।
विवीध वैभव पुष्पाचा भार। भरित जाला कल्पतरुवर।।
परिमळ दश दिशा मनोहर। विस्तार होय।।२१।।
स्वर्गादि अभ्योदयाची फळे। फळित जाहाला वृक्ष सकळ।।
रस अमृत भरले निर्मळ। तोष विजानाते।।२२।।
परीपरीने मोक्षफळ। इछीत जना देतसे निर्मळ।।
संसारदुःखासी करि निर्मुळ। अति लवकरी।।२३।।
प्रकाशे लोपतसे दिनकर। हरवि अज्ञान तमांधकार।।
अनेक कीर्णाचे उटति भार। वृक्ष प्रवर शोभत।।२४।।
ऐसा वृक्ष उपमातीत। करुनि वाढवी सायास बहुत।।
क्रोध अग्नी येका क्षणात। भस्म करी तयासी।।२५।।
क्रोध अलाजरी येक वेळ। इतुके सायास करी निर्फळ।।
दहन करी तप वृक्ष समूळ। काळकूट जैसा।।२६।।
या कारणे ज्ञानियानी। उपशम भाव रक्षावे मनी।।
थारा न द्यावी क्रोधालागुनी। कदाकाळी देखा।।२७।।
जैसा उष्ण काळी लागता दावान्नळ। भस्म होती तरुलता सकळ।।
मग कैची पत्रे पुष्पे फळ। तया ठायासी।।२८।।
तैसे तपश्चरण कल्पदृम। कोपाग्नी लागता होय भस्म।।
मग कैचा तपाचार व्रत नेम। तया पुरुषासी।।२९।।
पुरुष नारी अथवा बाळ वृद्ध। सर्वत्र साधू जनानी त्यजावा क्रोध।।
ऐका बोधामाजी हाची बोध। ज्ञानी जनासी।।३०।।
जयासि साधन करणे परमार्थ। तरि त्यजावा क्रोध नर्थ।।
साध्या होइल सकळार्थ। तया पुरुषासी।।३१।।

**श्लोक।।**

संतापं तनुते भिन्नति विनयं सौहर्ममुत्सादयो।
येतुद्धिं जनयत्यवद्यवचनं सूते विदते कलींकीर्तिः।।

कृतंति दुर्गति वितरति व्याहंति पुण्योदयं।
दत्ते यः कुमतिं सहातुमुचितो रोषः स दोषः सतां।।४७।।

**टीका।।**

कोणे येके कारणे कोप। हृदइ संचरता वाटे संताप।।
संचय होय महापाप। तेणे करूनि।।३२।।
पापे करुनि दुख दुर्धर। चतुर्गति फिरवि घोराघोर।।
कदा न चुके चौर्यांसि फेर। क्रोधे करुनी।।३३।।
क्रोध विनयाचा करवि नाश। क्लेश करवी सज्जनाचे मानस।।
इष्ट मित्र होती उदास। नरा हाती जवळी।।३४।।
क्रोध संचरता मानसी। सज्जन न राहाती तयापासी।।
भार्या पुत्र दासदाशी। देशोदेशी पळती।।३५।।
क्रोध चित्तास जनवी उद्वेग। हृदय फोडोनि करवि भाग।।
क्रोधासमान दुर्धर रोग। नाही नाही जगाते।।३६।।
अहो क्रोधाचा होता संग। ढवळोनि जाय अंतरंग।।
समाधान गुणाचा होय भंग। शीघ्र त्याग करावा।।३७।।
शब्द उपजवी महादुष्ट। सर्व जनासि वाटे कष्ट।।
या लागी त्यजावा क्रोध स्पष्ट। सत्पुरुषाने।।३८।।
कलहा आणुनि देइ क्रोध। तत्क्षणीच लागे प्रमाद।।
न उपजो देई कदा बोध। सदा खेद वाढवि।।३९।।
किर्ति नासोनि टाकी क्षणात। अपकीर्ति वाढवि जनात।।
यास्तव त्यजावा क्रोध त्वरित। मतिवंतानी।।४०।।
क्रोधापासुनि उपजे कुबुद्धी। विदारूनि टाकी शुद्ध बुद्धी।।
या लागी त्यजावा त्रिशुद्धी। बुधी जनानी।।४१।।
क्रोध दुर्गतिचा दातार। पुन्हा पुन्हा करवी नर्क घोर।।
यालागी त्यजावा सत्वर। संत सज्जनानी।।४२।।
पुण्योदयाचा करितसे नाश। पाप शृंखळा घाली पाष।।
या कारणे करावा निस्तोष। ज्ञानीवंतानी।।४३।।

क्रोधाग्नी स्पर्शताचि हृदयकमळी। संतोष अंकुराते जाळी।।
सुकृत वनाची करी होळी। निर्मुळ करावा शिघ्र।।४४।।
क्रोध क्लेशाचे मंदिर। सकळ कुवेसनाचे माहेर।।
बुद्धीवंतानी होउनि धीर। शीघ्र त्यजावा।।४५।।
सारांश बोधाचा सकळ। क्रोध निर्मूळ करावा अशेष।।
तुटोनिया संसार पाष। तेणे करुनि।।४६।।

**श्लोक।।**

थो धर्मं दहति दृमं दव इव मथुनाति नीतीलतां।
दंतीवेंदु कालाविदंतु इव कीस्नाति कीर्तिलृणां।।
स्वार्थं वायुरिवांबुधं विघटयत्फल्लासयत्यापदं।
तृष्णां गंमयिवोचित्तः कृतकृपालोपः स कोपः कथं।।४८।।

**टीका ।।**

अहो वणवा लागता अकाशी। दहन करी त्रस्त स्छावरासी।।
तैसा कोपान्नळ पापराशी। जाळी स्वधर्मतरु।।४७।।
कोप संचरता हृदयकमळात। दहन करी धर्म वृक्ष समस्त।।
म्हणोनि क्रोध त्यजावा त्वरित। सत्पुरुषानि।।४८।।
धर्म नाही जया ठायासी। पाप येउनि साचे तयापासी।।
मग भोगावि दुःखराशी। तया पासाव।।४९।।
जरी असे धर्माचे कारण। तरी क्रोधाचे करावे हरण।।
चुके तरीच जन्म मरण। तया पुरुषासी।।५०।।
जैशा कमळलता सरोवरात। पत्रपुष्पासहित विराजित।
संतोषविति सर्व जनाते। मनोहर देखा।।५१।।
गज मदोन्मत प्रवेशता। उपडोनि टाकी त्या कमळलता।।
मग सुमने कैसेनि येति हाता। भावीक जनासी।।५२।।
अहो तैचि मानसरोवरी। सुमने शोभति नानापरि।।
तेथे प्रवेशता क्रोध मत्त करी। हेचि परि होये।।५३।।
अंतःकर्णिची लता नीती। सद्गुणरूपे विराजती।।
कोप विध्वंसी तयाप्रति। करि निर्मूळ।।५४।।

संपुर्ण कळा चंद्र मंडळ। शांत प्रकाश शोभे निर्मळ।।
तेणे तोषती सज्जन सकळ। परमानंदे।।५५।।
पडता राहुची छाया वर। कळा लोपूनि पडे अंधार।।
तद्वत् कोप लोपवी कळाभार। किर्तिचंद्राच्या।।५६।।
कीर्तिप्रकाश जरी जगभरीत। तरि लोप होय येक क्षणात।।
कोप प्रवेशता शरिरात। पडे आंधार।।५७।।
मघ पडला विदारण। निमिष्यामाजी करी समिरण।।
तैसा कोपवात महा दारुण। नाशीवि शांतामृत।।५८।।
जैसा वायु विघटी मेघासी। की लवण पडता क्षीर नाशी।।
तैसा क्रोध विध्वंसि स्वकार्यासी। त्यजावयालागी।।५९।।
क्रोध क्रियेचा करि लोप। विशेष विस्तारी क्लेष संताप।।
सर्व दुष्कर्माचा बाप। क्रोधचि जाणा।।६०।।
या कारणे साधक जनानी। क्रोध टाकावा निर्मुळुनि।।
होय सर्व सुखाचा धणी। तेणे गुणे।।६१।।
उपशमिताचि क्रोध गुण। होउनि येती सर्व कारण।।
सहजी प्राप्त होती शांत गुण। तया पुरुषासी।।६२।।
शब्द साहाता म्हणती हासत। वंद्य होय सर्व लोकात।।
मग काहो न त्यजावे क्रोधाते। भले पुरुषानी।।६३।।
सर्वासि योग्य अक्रोधता। होय त्रिजगामाजी श्लाघ्यता।।
क्रोध सर्व पापाचि मात। उत्पन्न होति दुष्ट कर्मे।।६४।।
यासाटी त्यजावा क्रोध। हाचि सर्व जनासि थोर बोध।।
क्रोध सांडलीया काय अगाध। मोक्षसुखाचा।।६५।।
हे ऐकोनि व्याख्यान। क्रोध त्यजावा ज्ञानियान।।
होति सकळ साधन। तया पुरुषाची।।६६।।

ईति क्रोधव्रतनिरूपणं नाम एकादशोध्यायः।। मंगलं महा।।

श्री।। श्री।। श्री।। श्री।। छ।। छ।। छ।। छ।।

* * *

# द्वादश अध्याय

।। श्री धर्मनाथाय नमः।।

इतुकीया नंतर श्रोतेजन। विनंती करिताती कर जोडुन।।
अक्रोध व्रत ऐकोन। पवित्र जाहालो।।१।।
मान असो नये पुरुषात। ऐसे बोलताती साधूसंत।।
मान त्यजिलीया काय होत। सांगावे स्वामी।।२।।
गुरु मधुर वचन बोले। अता ऐकावे तुम्ही वहिले।।
अहो मानव जन्म सफळ होयील। त्यजीता मान गर्व।।३।।

**श्लोक।।**

यस्मादाविर्भवति वितती दुस्तरापन्नदीनां।
यस्मिन् शेष्टाभिरुची तद्गुणग्रामनामापी नास्ती।।
यश्च व्याप्तं वहति वदधी धुम्यया क्रोधदावं।
तं मानाद्रि परिहर दुरारोहमौचित्यवृत्ति।।४९।।

**टीका।।**

मान महा गर्वपर्वत। अशक्य अजिंक बहु उन्नत।।
मार्ग न होय संसारी जनाते। साधुविना कदा।।४।।
मान त्यजिता सुलभ मार्ग। साध्य होय स्वर्गापवर्ग।।
मोडुनिया जाय तेणे कुमार्ग। त्यजिताचि मान।।५।।
उपशमिता मान दुर्धर घाट। होय स्वर्गमोक्षासि पायवाट।।
मा इतर सुखाची काय गोष्ट। निरसिता मान।।६।।
अहो मानव पर्वताहुन। भवसागर वाहे दुस्तरायमान।।
तेथे कोण जाय तरोन। अपार जलधी।।७।।
मान निरसिता जलधी अतुडे। मृगजळ न राहे पुडे।।
श्लाघ्यता वर्धत जाय गाढे। तया पुरुषाची।।८।।
मान शैलावरुनि निरंतर। अपदा नदि वाहे पुर।।
कैसे होउनि जावे पार। अशक्त जनानी।।९।।

सुभ गती प्राप्तीकारण। श्रेष्ठाचाराचा उत्तम गूण।।
मान मदगजा करी वीदारण। तया गुणासी।।१०।।
मानगर्वित जो मानव। सदा हिंसक तयाचा भाव।।
कैसेनि राहे तेथे नाव। उत्तम गुणाचे।।११।।
मानाद्री शीखरासमीप। हिंसाबुद्धी धूम व्याप।।
सम्यग्ज्ञानाचा होय लोप। तेणे करुनि।।१२।।
मान उपजवि क्रोध दावान्नळ। दहन करी सम्यग्वृती लत्ता सकळ।।
शुद्ध बुद्धी जाळी सकळ। महा खळ मान तो।।१३।।
सर्व दुःखासि कारण मान। यालागि त्यजावा भेले पुरुषान।।
तेणे शोक होय दहन। बिज न राहे।।१४।।
अहो सावध असे जो नर। तेणे मान परीहारावाचून।।
वृति राहे निरंतर। सदा अभ्यासी।।१५।।

**श्लोक।।**

शमालानं भजन् विमलमति नाडि विघटयन्।
किरं दुर्वाक्षां सुत्कमगणयन्नागमसृणीं।।
भ्रमन्नुर्व्यां स्वैरं विनयवनवित्थिं विदलयन्।
जनः कनानाथं जनय मदांधो हि द्विप ईव।।५०।।

**टीका ।।**

मदे भ्रांत होय जैसा गज। नेणे स्वपर हिताहित गुज।।
तैसे मानगर्विताचे स्वकाज। सहजचि नाशे।।१६।।
मानापासुनि उपजे मद संकुळ। मदा पाडि नेत्रासि पडळ।।
तेणे सर्व कार्य होति नीर्फळ। होय अनर्थ।।१७।।
मान अनर्थासि कारण। करी स्वसुखासि विदारण।।
नासुनि टाकी उत्तम गुण। येकहि न राहे।।१८।।
मदापासुनि उपजे काम। मोडोनि टाकी व्रतवृक्ष नाना नेम।।
स्वस्त कामाचा करी होम। नाम न राहे।।१९।।

मान गर्व मदांध ईभ। उपडोनि टाकी उपशम स्तंभ।।
वाढत जाय नाना क्षोभ। तेणे स्वभावे।।२०।।
निर्मळ बुद्धिची तोडि शृंखळा। स्वस्थान सोडोनि हिंडे निराळा।।
विदारी विवीध गुण सुमन माळा। मान मद करी।।२१।।
कठोर शब्दाची उडवी धुळ। पाहो क्लेश मानिति जन सकळ।।
मान गर्व समान अन्य खळ। नाही नाही त्रिजगी।।२२।।
मान गर्वाचे लागति पिसे। न मानि अगम सिद्धांत अंकुश।।
विनयलताचा करि नाश। फिरे स्वइछा।।२३।।
मान गर्वाचे लागता भुत। स्वईछा फिरे विषयवनात।।
मोडोनि टाकि न्याय नित। मान गजेंद्र।।२४।।
नितिपुष्पवाटिकाचा नाशी मार्ग। मर्यादा नेमाचा पाडी दुर्ग।।
अन्य जनासी उपसर्ग। मान मदगज।।२५।।
मार्गी चालता हस्ति मदांध। मोडीत जाय वृक्षस्कंद।।
तैसा मान गर्व उपजवि द्वंद्व। सर्व जनासी।।२६।।
कोण अनर्थ न करी मान। हे मनि पाहावे सर्व शोधून।।
यालागि त्यजितातिं हो सज्जन। होति निगर्व।।२७।।
मान त्यजिल्या विनाश काही येक। उपजो न देइ कदा विवेक।।
यालागि त्यजितातिं साधुलोक। यया जगात।।२८।।
सोडोनि द्यावा मान गर्व। हे पर्वामाजी महापर्व।।
अता ऐका हो जन सर्व। सुखाभिळाषी।।२९।।
सौख्य इछीतसे जो नर। तयाने मान गर्व त्यजावा त्वरे।।
तरीच संसारदुःख सरे। निगर्वि होता।।३०।।

**श्लोक।।**

उचित्या चरणं विलंपति तयोवाहं नभस्वानि।
प्रध्वंसं विनयं नयं नयसत्यहिरिव प्रणस्पशां जीवितं क।।
कीर्तिकैरवाणि मतंगज इव प्रोन्मुलयत्यंजसा।
मानो नीच इवोपकारनिकरं हंती त्रिवर्गं नृणां।।५१।।

**टीका।।**

मेघपडळ विध्वंसी जैसा पवन। किं अभ्रतुषार नाशी च्यूतसुमन।
तैसा योगाचार विदारी मान। करि निर्मूळ।।३१।।
जैसा दुष्ट भुजंगम विषपूरित। क्षणामाजी करि जीवघात।।
तद्वत मान गर्व नाशी जीवित। स्वपर जनाचे।।३२।।
जेवि हिंग स्पर्श करिता कस्तुरी नाशे। नातरि लवण पडता पीयूष।।
तैसा मान गर्व नाशी। क्षण न लागता।।३३।।
कि मदगज प्रवेशता सरोवरात। त्रस जिवराशीचा होय घात।।
उपडोनि टाकी कमळलता समस्त। करी विध्वंश।।३४।।
तैसा मान गर्व चढता हृदयकमळी। सद्गुणगणासी घाली पाताळी।।
विनयकैरवलता उपडि समुळी। करि निर्मूळ।।३५।।
मेघपडळाचा कराव्या विध्वंश। महावात सूटता न लगे निमिष्य।।
तैसाच मान गर्व करी नाश। कीर्ति मंटपाचा।।३६।।
उपजता क्षणेक मान गर्व। येश लोपूनि जाय सर्व।।
मान त्यजुनि व्हावे निगर्व। भले पुरुषानि।।३७।।
मान निर्मूळ करी स्वधर्म। अयाचित येउनि साचे अधर्म।।
कदा चालो न देइ स्वकर्म। मोडी वर्म क्रियाचे।।३८।।
मान नासुनि टाकी सर्व अर्थ। सुचो न देइ कदा स्वार्थ।।
मग काय पुसावा परमार्थ। तया पुरुषासी।।३९।।
मानापासुनि नाशे काम। पुण्यकर्माचा होय होम।।
मग कैसेनि होइल विश्राम। तया जिवासी।।४०।।
धर्मार्थ काम या त्रिवर्गाते। मान गर्व नासुनि टाकी क्षणात।।
यालागी त्यजावा मान त्वरित। सज्जन पुरुषानि।।४१।।
मान गर्व सुख विदारक। नाना विवीध दुःखदायक।।
या कारणे करुनि विवेक। त्यजावा मान।।४२।।
अधोसाधन कार्यासि जो निपुण। जयासि पाहीजे उत्तम गुण।।
तरि करावेया प्रमाण। हेचि खुण जाणावी।।४३।।

जैसा निचासि करिता उपकार। सर्वेचि होय तयासि अपकार।।
ऐसेचि मानापासोनि दुःख फार। होय जिवासी।।४४।।
मानव जन्मासि येउन। करावे धर्मार्थकाम साधन।।
त्रिवर्ग साधुनि देइ कदा मान। जरि समर्थ असोका।।४५।।

**श्लोक।।**

मुष्णाति यः कृतसमस्तसमीहीतार्था।
संजीवनं विनयजीवितमंगभाजां।।
जात्यादिमानविषजं विषमं विकारं।
तं मार्दवांमृतरसेन नयस्व शांतिं।।५२।।

**टीका।।**

आहो कोणी येक मान गर्व। विनय लोपूनि बाकी सर्व।।
दुष्ट गुणासि मुख्य पर्व। दुर्गति कारण।।४६।।
विनय सर्वस्व हिताचे कारण। तुष्टति समस्त प्राणीगण।।
मान गर्व करि विदारण। सर्व विनयासी।।४७।।
विनय प्राप्त होय अभिष्ट सिद्धी। पुरवि मनोरथ शुद्ध बुद्धी।।
महा अपराध त्यासि न बाधी। विनयगुणे।।४८।।
विनय तीर्थ करी पावन। विनय जंतुसी जीवन।।
विनाश करी तयाचा मान। यालागी त्यजावा।।४९।।
जात्यादि मद अष्ट प्रकार। प्रवेशता उटति मन विकार।।
याकारणे त्यजावे दुर। समस्तेही गर्व।।५०।।
जातिमद आणी कुळमद। तैसेचि पापरूप तारुण्यमद।।
पूज्य शास्त्र तपोबळ मद। हे अष्टविध जाणा।।५०।।
येके मदाचा प्रकार। सांगता विस्तार होइल थोर।।
यालागी सूचविला मूळ विचार। चतुर जनासी।।५२।।
अष्ट मदापासोनि विषम विकार। उपजती मान गर्व नाना प्रकार।।
उटति दुर्धर विष अंकुर। नाही नाही पार तयाचा।।५३।।

मान गर्व महा दावानळ। दहन करी विनयवन सकळ।।
भस्म होति सद्गुण रत्न कोमळ। मुक्ताप(फ)ळादिक।।५४।।
करुनि मार्दव रसामृत पयोधर। विझउनि टाकावा तो दा(वा)ग्नि कूर।।
तरीच होईल संसार पार। घोर वारासी।।५५।।
विना मान गर्व त्यजिल्यावाचून। बाहीर न निघे भवार्णवातुन।।
यालागी शीघ्र त्यजावा मान। संत जनानी।।५६।।
मान गर्वासमान पर्वत। नाही नाही या त्रिजगात।।
या कारणे त्यजावा त्वरित। महापुरुषानी।।५७।।
मान गर्वापासुनि पापाचे। मग तया जिवासि सौख्य कैचे।।
मान गर्वासमान निच। नाही नाही त्रिजगी।।५८।।
मान स्पर्शता बुद्धि नाशे। भ्रांत करवि जैसे पिसे।।
मग काय पुसावे तयास। विवेक विचार।।५९।।
मान गर्व दोषाचि राशी। सर्व सुखाचे बीज नाशी।।
बांधोनि टाकी पापराशी। न सोडि कदा।।६०।।
करुनि मार्दव शस्त्रविषेष। तोडोनि टाकावा मानपाश।।
तरीच होय पापनाश। संतोष होय।।६१।।
जयासि मोक्षसुखाचा अभिळास। तरी मान त्यजावा पुरुषे।।
तेणे होय सर्व सुखास। अधिकारि तो।।६२।।

इति श्री मानकषायनिरूपणं न्नाम द्वादशोध्यायः।।

मंगळं महा। श्री।। श्री।। श्री।। श्री।। छ।। छ।। छ।। छ।।

# त्रयोदश अध्याय

**।। श्री शांतिनाथाय नमः।।**

श्रोतेजन मिळोनिया सकळ। पूसती जोडोनि करकमळ।।
सांगोनि निगर्व व्रत निर्मळ। पुनीत केले अम्हाते।।१।।
निरोपूनि मान कषाय। दाखविली मार्दव गुणाची सोय।।
आता तिसरे व्रत निर्माय। का होताति संत।।२।।
माया असलीया काय होते। हे निरोपावे स्वामी आम्हाते।।
जेणे निरसे माया भ्रांत। ते सांगावे स्वामी।।३।।
मधुरामृत करुण वचनी। शिष्य जनासी बोले मुनी।।
म्हणे भोगावया निच योनि। कारण माया।। ४ ।।

**श्लोक।।**

कुशलजनितवंद्यां सत्यसूर्यास्तसंद्यां(ध्यां)।
कुगतियुवतिमालां मोहमातंगशालां।।
शमकमलहिमानिं दुर्यशोराजधानीं।
व्यसनशतसहायां दूरतो मुंचमया।।५३।।

**टिका।।**

हिंडता जन्म गेले आनंत। न सुटे कदा माया भ्रांत।।
पुढिले भवासि नाही अंत। माया गुणे।।५।।
वंध्या न प्रसवे कदाकाळी। की जळावीण निष्फळ साळी।।
तैसी विनयावाचूनि मुक्तीबाळी। न प्राप्त होय।।६।।
विनय उपजावया जैसी वंध्या। शील प्रावर्णाच्या करी चिंध्या।।
सकळ जगी माजवी निंदा। माया दुर्गुणी।।७।।
सत्य सूर्याचा करवि अस्त। असत्य काळिमा चाले ववीदुस्त( ?)।।
कर्म कर्दमी लोळवी मदस्त। माया महिषी।।८।।
कुगती वनिताची मोहमाळा। मायापाष घालवी गळा।।
माया न ऐके कळीकाळा। संतावाचुनी।।९।।

मोहमतगजासि राहावया। विस्तीर्ण उतुंगशाला माया।।
यालागि दवडावी त्वरे विळया। गुणी जनानी।।१०।।
उ(प)शम पद्मासि हिमंतुषार। शोकुन टाकी हृदय इंदिवर।।
माया सारासार विचार। करू न दे कदा।।११।।
अति दुर्वेसनासि राजधानी। माया कुवासनाची प्रीय जननी।।
यालागी साधु संत जनानी। त्यजिली माया।।१२।।
सर्व व्यसनाचि साहाकारी। विविध दुखा अधिकारी।।
माया समान अन्य विकारी। त्रिभुवनि नाही।।१३।।
सकळ दुर्गुणासि अधार। पापकर्माचे मायाघर।।
यालागी शीघ्र त्यजावि दूर। भव्य जनानी।।१४।।
माया कौटाल्य गुणाचे सदन। स्वस्त होउ न देइ कदा मन।।
माया त्यजिली या समाधान। चित्त होय।।१५।।
चतुर्गतीसि हिंडावया। कारण देखा काटाल्य माया।।
ते न वर्जिता गेला वाया। मानव जन्म।।१६।।
जैसा अग्निसी सखा पवन। मिळता दहन करी तरू सुमन।।
तैसी माया मोहिनीसी सज्जन। सुमन जाळी।।१७।।
हृदय धरुनि कपठ वेश। परद्रव्याची करि अभीळाष।।
प्रत्यक्ष पडे गळ्यासि पाष। माया क्लेश करवी।।१८।।
दाखउनि बहुत विश्वास। हरण करी इतर धनास।।
लोक न धरिती कदा विश्वास। माइक जनाचा।।१९।।
मनि धरुनिया मायारुप। अन्य द्रव्याचा करि लोप।।
मग त्या दुःखाचे न करवे माप। नरकादिक।।२०।।
इतरासि ठकवि माइक जन। सवेचि नरककुपि पडे अपण।।
नाना योनित माया गुण। अपणचि भोगी।।२१।।
कपट धरुनिया अंतरि। सोंग दाखवि नानापरी।।
भोंदीत हिंडे नरनारी। हे परी मायकाची।।२२।।

जितकी माइकपणाची लक्षण। तीतकी दुःखासी कारण।।
माया वर्जावि या कारणे। सुज्ञ जनानी।।२३।।
ऐका कोणी मायीक लोक। तयासि न चुके कदा नरक।।
जरि दान पुजा करी दांभिक। तरि व्यर्थ शीण।।२४।।
अंतरि माया कपट गुण। करि नानाविध साधन।।
वृथा श्रम मात्र दुरवस्थान। ज्ञानहिन करी।।२५।।
माया सर्व दुःखाचा दुर्ग। माया चुकवी स्वर्गापवर्ग।।
उघडविति दुर्गती मार्ग। माया गूण।।२६।।
हे ऐकोनि हो व्याख्यान। माया वर्जावी ज्ञानियान।।
निरंतर होति समाधान। अयास न लगे।।२७।।

**श्लोक।।**

मायामविश्वासविलासमंदिरं। दुराशयो यः कुरुते दुराशयः।।
सोनर्थसार्थं न पतंतिमीक्षते। यथा बिडालो लगुडं पयः पिबन्।।५५।।

**टीका ।।**

जयाचे कुटिल मायिक अंतर। अते विश्वासाचे विलास मंदिर।।
तेथे कैसेनि विश्वास वरे। जाय दुर पळोनि।।२८।।
विश्वास न धरी अन्य जनाचा। लोक न धरिती विश्वास तयाचा।।
मार्ग न कळे पुण्यपापाचा। गर्भांध जैसा।।२९।।
ह्रदय जयाचे माया कपट। कैसेनि तयास सद्गुरु भेटे।।
अंतरीचा भ्रम न तुटे। त्याचा कदाकाळी।।३०।।
ठकवि दुज्यासि मायिकपण। अपण शितरे बहुगुण।।
पुढे दुर्गतिकारण। नेणे माइक।।३१।।
माया म्हणिजे ठकपण। मोह दाखउनि द्रव्यहरण।।
पुढील गतिचे दुःख नेणे। दुर्गुणी मायिक।।३२।।
बक आपुला घात नेणे। घ्यावया जळचराचा प्राण।।
ह्रदय कपट माइक गुण। धरुनि ध्यान बैसे।।३३।।

त्याते देखोनिया मार्जरे। ते क्षणी मारूनि केला चूर।।
तैसाचि जाणा मायीक नर। दुःख अपार भोगी।।३४।।
कुटिलत्वे धरुनिया आपुला स्वार्थ। हरावया इछी पराचा अर्थ।।
त्वरीतचि होय महा अनर्थ। हे न कळे तया।।३५।।
जैसे मुख घालुनि मडक्यात। मार्जर स्वइछा क्षीर भक्षीत।।
काठ्या पडति अंगावरुते। हा अनर्थ नेणे।।३६।।
मडके फुटोनि होय विकळ। मग गळी आडके कंठमाळ।।
मारित फिरती अर्भके सकळ। लागती पाटी।।३७।।
ऐस्या परी होय मागुण। विवीध दुःखासि कारण।।
संचीत पुण्याचे विदारण। करवि माया।।३८।।
माया कुगतीसी मोकळी वाट। स्वर्गादि सुगतिस लागे कपाट।।
यालागी वर्जावे कपट। बुद्ध जनानी।।३९।।
माया दुराशा दुःखदायक। कृतसुकृत विध्वंसक।।
यालागी करुनि विवेक। त्यजावी माया।।४०।।
कपट माया त्यजील्यावीण। न चुके दुर्गतीदुःख दारुण।।
सकळ साधनासि करण। हेचि पाहा हो।।४१।।
समस्त शास्त्राचे हेचि सार। माया कपट वर्जावे दुर।।
नंतर पाहावे सारासार। सारांश मुख्यार्थ।।४२।।
प्रमाण मानावे जिनवचन। तेणे होति सकळ साधने।।
तरीच सार्थक जन्मा येउन। सत्य सत्य त्रिवाचा।।४३।।

**श्लोक।।**

मुग्दप्रतारणपरायणमुज्जिहीती।
यत्पाटर्वकपटलंपटचित्तवृत्तेः।।
जिर्यत्फपप्लवमवश्यमिहाप्यकृत्वा।
नापथ्यभोजनमिवामयमायतो तत्।।५६।।

**टीका ।।**

वंछा धरुनि परधनाची। प्रवृत्ती न सरे कदा मानवाची।।
संख्या कोण करिल तयाची। दुखराशीस।।४४।।
परवंचनासि चित्तलंपट। निरंतर वसे मनी कपट।।
दुर्धर दुःख तयानिकट। वसतसे सदा।।४५।।
इहलोकी म्हणती हा दुष्ट। परलोकी न तुठे कष्ट।।
हे जाणोनि वचन स्पष्ट। त्यजावी माया।।४६।।
अज्ञान जनासि ठकवावया। बहूत दाखवी कपटमाया।।
दुर्गती दुःखशृंखला पाया। पडे न हे कळे।।४७।।
कपट धरुनि ह्दयांतर। परजनासि पाडी शीतर।।
नर्कादि दुःख दुर्धर। न चुके कदा।।४८।।
कपट करूनि नाडि तो जन दुजे। संचय होय पापबिज।।
तत्फळ भोगणे लागे सहज। न चुके कदा।।४९।।
अहो जेविता अन्न अपत्य। दुःख भोगवि नाना विपत्य।।
पाहा पाहा दृष्टांत सत्य। लोकप्रसिद्ध।।५०।।
मक्षिका भक्षिली जरी न हून। पाहा तेचि क्षण करवि वमन।।
तैसा परवांछा करिता मन। दुःख होय क्षणात।।५१।।
अथवा जेविता अन्न अजिर्ण। रोकडा अनर्थ होये मरण।।
तैसे होय दुःख दारुण। माइकपणे ते।।५२।।
जैसे औषध चूकता अनुपान। प्राण जाय न लगता क्षण।।
तैसे माया कौटाल्य गुणे। कृत पुण्य नाशे।।५३।।
अपत्यासि न चुके रोग। माइका न चुके दुर्गति भोग।।
हे व्याख्यान जाणोनि वेगे। त्यजावे कपट।।५४।।
माया त्यजिल्याविण कदाकाळी। न सुट संसारदुःखाची साकळी।।
या कारणे संति सदा काळी। टाळिली माया।।५५।।
जयासि मोक्षाचे कारण। तरी त्यजावे माया कपट गुण।।
सर्व बोधाची जाण खुण। प्रमाण मानावी।।५६।।

जो साधन कार्यासि लंपट। तरि त्यजावे माया कपट।।
स्वर्ग मोक्षासि जावया वाट। अन्य गोष्ट नाही की।।५७।।
ऐसे बोलिले केवळज्ञानि। हे वचन धरुनि दृढ मनि।।
निःकपट असावे स्वस्त सदनि। निरंतर।।५८।।

इति श्री मायाकपटकषाय निरूपणन्नाम त्रयोदशोध्यायः।। १३।।

मंगळं माहा।। श्री।। श्री।। छ।। छ।।

* * *

# चतुर्दश अध्याय

।। श्री कुंतुनाथाय नमः।।

हे माया कपट ऐकोन। हर्षेडुल्लति अनंद मन।।
कर जोडोनि श्रोते जन। पुन्हा पूसते जाहाले।।१।।
दाखउनि मायाकपट गुण। पावन केले स्वामी आम्हा कारण।।
बुडता काडिले सागरातून। जाहालो सनाथ।।२।।
आता लोभ कषाय महा दुष्ट। ऐसे बोलतातित संत स्पष्ट।।
काय दुर्गुण ते करावे प्रगट। श्री गुरुराया।।३।।
तव श्री गुरु कृपा पाळुन। बोले मधुर प्रिय वचन।।
ऐका स्वस्त करूनिया मन। सार्थ करा आपुले।।४।।

**श्लोक।।**

य दुर्गाटविमटंति विकटं क्रामंति देशांतरं।
गाहंते गहनं समुद्रमथनं क्लेषांकृषेः कूर्वते।।
सेवंते कृपणं पतिं गजघटा संघट्ट दुःसंचरन्।
सर्पंती प्रथनं धनांधितधियः स्तल्लोभविस्फूर्जितं।।५७।।

**टीका ।।**

हा लोभ कषाय माहाकष्ट। मारी कर्मचक्राचे चपेटे।।
अनादि संतान हान सुटे। साधुवाचोनि कोण।।५।।
मुंगीमात्रादीक जंतुसी। लोभ न सुटेचि पापाराशी।।
भोगवि दुर्धर पापराशी। जन्मवारासी पाहो।।६।।
ह्रदइ प्रवेशता लोभ लुब्ध। नेत्र असता करवि अंध।।
हिंडवि घोरारण्य बंध। स्वार्थाकारणे।।७।।
द्रव्य असलिया आरण्यात। जाता प्रत्यक्ष होय अपुला घात।।
प्रवेश करु जाय तयात। नेणे आशा जिवाचि।।८।।
हिंडवि जैसा श्वानापरि। फिरवी जैसा नानापरि।।
निचाघरी करवी चाकरी। अर्थासाठी।।९।।

महाविषम समुद्र गहन। जाय तेथे द्रव्य आशा करुन।।
महाक्लेश भोगूनि धन। साधन करि लोभी।।१०।।
लोभ महा अयासाचे मूळ। नीच आरंभ करवी सकळ।।
लोभासमान अन्य खळ। नाही नाही त्रीजगी।।११।।
सर्व दुःखासि कारण लोभ। अहीर्णिसी इछी लाभ।।
क्षणोक्षणी उठवी क्षोभ। हृदय कळी।।१२।।
कृपण रायाचा करवि शेवक। निरंतर करवि अर्थ धाक।।
लाभ विवीध दुःखदायक। अंतर शोक न तुटे।।१३।।
अशक्य मदगजाची दाटणी। प्रवेश न करी तेथे कोणी।।
लोभ संचरता अंतःकर्णी। जाय निभ्रांत।।१४।।
धरिता अर्थाची लालुची। आशा न पाहे जिवित्वाची।।
चिंता न करी अपपराची। हारवि अर्थ।।१५।।
महामत्तगजाची दाटणी। प्रवेश न होय कापे धरणी।।
अर्थ इंछूनि अंतकर्णी। महारण्य प्रवेशे।।१६।।
महा शैन्याचे उटति भार। शस्त्र घाइ पडति शूर।।
तेथे न भीय लोभी नर। होये चूर द्रव्यार्थ।।१७।।
लोभी न धरी देहाची आशा। अर्थासाठी पड फाशा।।
व्यथा वाडवी दुराशा। नाश होती प्राण।।१८।।
अनेक उपाये त्यजावा लोभ। तेणे लोपूनि जाय सर्व क्षोभ।।
प्राप्त होय मोक्ष लाभ। त्वरीतचि काळी।।१९।।

**श्लोक।।**

मुलं मोहद्रुमस्य सुकृताभोरासंकुंभोद्भवा।
क्रोधाग्नी तरणीप्रतापतरणी उच्छादने तोयदा।।
क्रीडासद्मकलेर्विवकशशिनः स्वर्भानुरापन्नदी।
सिंधुः कीर्तिलतकलापकलभो लोभः पराभूयतां।।५८।।

**टीका।।**

लोभ सर्व दुःखाचे मुळ। यउनि झटती बाधा सकळ।।
यालागी करावे नीर्मूळ। सुखाभिळासी।।२०।।
मोहद्रुमासी समूळ अधार। लोभ धरातळ सुंदर।।
विवीध मोहिनीचे अंकुर। उटति ते ठाया।।२१।।
जरी असो सुकृत अंबुराशी। लोभ अगस्ती क्षणात शोषी।।
लोभासमान पापराशी। अन्य नाही दुजा।।२२।।
जैसे क्रोधाग्नीस सर्पण बळकट। मीळता कोरे खैराची काष्टे।।
वरीवरि शिचीता घृत उत्कृष्ट। प्रबळ होय अग्नी।।२३।।
तैसी क्रोधाग्नीसी अद्रु( ?)ति पूर्ण। लोभ कषायवन सर्पण।।
जव जव वाढे वासना तृण। न त(तृ)प्त होय।।२४।।
प्रताप सूर्याची बहुत कीर्ण। लोभ मेघडंबर पाडी अवर्ण।।
लोपुनि जाय अंतकर्ण। पडे आंधार।।२५।।
लोभ कलहाचे क्रीडामंदिर। स्वइछा ख(खे)ळति नाना वीकार।।
या कारणे त्यजावे सत्वर। साधुजनानि।।२६।।
विवेक शशी प्रकाश पूर्ण। शोभति विवीध शांत कळा कीर्ण।।
लोभराहु पाडी अवर्ण। क्षण लागता।।२७।।
लोपुनि टाकी विवेक सगुण। उटवि नाना प्रकारचे दुर्गुण।।
सर्व जीववधाचे कारण। लोभाविण नाही।।२८।।
अपत्य महानदीसि साटवण। लोभ सिंधूवाचुनि दूसरा कोण।।
नाही शोधिताहे त्रिभूवन। लोभावितरिक्त।।२९।।
निरंतर वाहाती नदीचे पूर। काय तृप्त होय तो सागर।।
तैसा लोभसागरा दुःखनीर। न तृप्त होय।।३०।।
कीर्तिलताचा विस्तार सकळ। लोभ बाळ शुंडाल करी निर्मुळ।।
स्वछंदे अपकीर्ति खेळे। तरावयासी।।३१।।

लोभ अज्ञान विषम अजगर। गिळीता त्रैलोक्य अर्थहीन पुरे।।
की सागरासी सकळ नीर। तयापरी लोभ।।३२।।
लोभ दुःखाचे आगर। नाना विपत्तिचा सागर।।
विवीध उपाय युक्ती चतुर। करु नित्य जावा।।३३।।
लोभ त्यजिल्याविना सौख्य येक। न मिळे केलिया उपाय अनेक।।
या कारणे करुनि विवेक। त्यजावा लोभ।।।३४।।
जाळसा सौधाचा अग्र सकळ। तैसा जाणावा हा उपदेश।।
यावाचूनि न तुटे पाश। संसारदुःखाचा।।३५।।
लोभ त्यजिता लाभे परमार्थ। साधूनि येति सकळ अर्थ।।
हा सारांश तात्पर्यार्थ। त्यजावा लोभ।।३६।।

**श्लोक।।**

निःशेषधर्मवनदाहविजृंभमाणैः।
दुःखौघभस्मनि विदर्पकीर्तिधूमेः।।
वाडंधनेंधनसमागमदीप्यमाने।
लोभांनले शलभतां लभते गुणौघः।।५९।।

**टीका।।**

सकळ धर्माचे आराम। नाना सद्गुणी विराजे स्तोम।।
स्वर्गादि मोक्षफळ अनुपम। भव्यजना देतसे।।३७।।
अता येकेक धर्माचे वर्णन। न वर्णवे सहस्र जिव्हे करून।।
मा कोण वर्णि येक जिव्हेन। कवि धरातळी ३८।।
जिनेंद्र बोलिले दिव्य वाणी। धर्म सांगीतले दशलक्षणी।।
ऐकोनि तरले कित्तेक प्राणी। अगणीत भावीक।।३९।।
उत्तम क्षमादी मार्दव। विवीध सौख्यदायक अर्जव।।
तैसाचि सत्य महापर्व। उत्तमोत्तम।।४०।।
सौच संयम अणी तप। त्याग अकिंचन्याही माप।।
सहजी स्मरता हरती पाप। यया धर्मासी।।४१।।

ब्रह्मचार्य धर्मरत्नखाणी। उपमा देता न य दिनमणी।।
प्राप्त होता मोक्षमणी। ब्रह्मचर्या धर्में।।४२।।

हे धर्म जाणावे दशलक्षण। पुराणी पाहावे याचे विस्तीर्ण।।
स्वभावे होता याचे स्मरण। महाविघ्ने पळती।।४३।।

या दशविध धर्माचे वन निर्मळ। दहन करि लोभ दावान्नळ।।
मग नाना सौख्याचि पुष्पेफळ। कैसेनि राहाती तेथे।।४४।।

धर्मदहनाचे वनात। लोभ भस्म रुपी भासत।।
क्रोध गार्धभ लोळत। तया ठायासी।।४५।।

विवीध दुःखाच्या दीसती राशी। स्वइछा लोळावया राषभासी।।
ठाव वीस्तीर्ण पापराशी। लोभ दीशे जाणा।।४६।।

अपकिर्तिचा उठे धूम। जगभरित व्यापे व्योम।।
ज्ञानन(ने)त्रासि पाडि भ्रम। विश्राम कैचा तेथे।।४७।।

धनसंचय ईछा इंधन। अग्नीस जैसे न पुरे शुष्क तृण।।
तदुपरि लोभी नराचे मन। धनकांक्षा न तृप्त।।४८।।

लोभ दावानळाचे ज्वाळ। दहन होती सद्गुण सकळ।।
सदा वसे पापधूळ। तया ठायासि।।४९।।

पाहोनिया दिपाचा रंग। प्रत्यक्ष दहन होय पतंग।।
तैसा लोभाग्नीचा स्पर्शता अंतरंग। दहती गुण।।५०।।

उपमातीत गुण येकेक। असंख्यात गुणिता न पूरे लोक।।
स्वर्गापवर्ग फळदायक। केवळज्ञानादि।।५१।।

ऐसे अनुपम्य गुण उतुंग। लोभासंगे होती पतंग।।
अर्थ ध्याने होती भंग। गुण संग देखा।।५२।।

ला(लो)भ काय न करी अनर्थ। हे शोधूनी पाहवे अंतरात।।
जरि साधने परमार्थ। तरी त्यजावा लोभ।।५३।।

**श्लोक।।**

जातः कल्पतरुः पुरः सुरगवे तेषां प्रतिष्ठां गृहं।
चिंतारत्नमुपास्छितं करतले प्राप्तो निधिं संन्निधौ।।
विश्वं वश्यमवश्य सुलभाः स्वर्गापवर्गश्रयो।
ये संतोषमशेषदहनं हंसां बुधं बिभ्रते।।६०।।

**टिका।।**

लोभ त्यजिल्यावाचूनी जिवास। कदापि न होय संतोष।।
या कारणे बुद्ध जनी अशेष। वर्जिता लोभ।।५४।।
विवीध उपाय सज्जन पुरुषे। लोभ त्यजोनि संतोष।।
सर्व दोशाचा होय नाश। यका क्षणात।।५५।।
सकळ दोषसमुदाय दावान्नळ। पेटला लोभ कषाय वात प्रबळ।।
तो विझवावया महा मेघ जळ। संतोषाविण नाही।।५६।।
संतोष असावे सर्व काळ। चित्त होउ नेदावे विकळ।।
तेणे प्राप्त होति वस्तु सकळ। सहज स्वभावे।।५७।।
हृदय संतोष धरिती जे नर। तयापुढे राहाति कल्पतरुवर।।
जे इछीतार्थ पदार्थ सार। पुरति स्वभावे।।५८।।
सहजी आसता समाधान। बळे प्रवेशे कामधेनु सदन।।
मग का इछावे अन्य धन। हेचि ध्यान मुख्य।।५९।।
संतोष सर्व सुखाचि खाणी। करतळीचा राहे चिंतामणी।।
अशोक तरु तया अंगणी। तिष्टति सदा।।६०।।
संतोष परम सुख समाधी। समीप वसति नवनीधी।।
दरिद्र न दिसे स्वप्नीही कधी। संतोष धरता।।६१।।
मनि धरीताची संतोष। स्वभावे होय विश्व वश्य।।
या कारणे त्यजावे अशेष। लोभ कषाय।।६२।।
सुलभ होय स्वर्गापवर्ग। तुठोनि जाति घोरोपसर्ग।।
न करिता अयास मुक्तिमार्ग। प्राप्त होय संतोष।।६३।।

अनेक ऐश्वर्याचा योग। प्राप्त होय विवीध भोग।।
स्वभावे हरति सर्व रोग। संतोष गुणे।।६४।।
चित्त होय समाधान। वृधी होय सहज ज्ञान।।
दलन होय तम अज्ञान। अपुल्या स्वभावे।।६५।।
विवीध युक्ति करुनि मन। राखावे सदा समाधान।।
साध्य होति सकळ साधन। पाहा गुण संतोष।।६६।।
सकळ साधनाचे हेचि सार। जप तप अनुष्ठानासि अधार।।
संतोष चित्त राहे स्छिर। तोची थोर उपाय।।६७।।
संतोषे होय चित्त शुद्ध। ऐसे बोलिले अनादि बुध।।
याचे उपाये जाहाले सिद्ध। अन्य बोध नाही।।६८।।
या कारणे त्यजावा लोभ। संतोषे होय सहजचि लाभ।।
सकळ गुणाचे मंदिर शोभे। संतोष गुण।।६९।।
निर्लोभ बोधाचि जाली सिमा। तया गुणासि नाही उपमा।।
प्राप्त होय मुक्तीरमा। निष्काम होता।।७०।।

इति श्री लोभकषायनिरूपणं न्नाम चतुर्दशोध्यायः।।

मंगलं महा।। श्री।। श्री।। श्री।। श्री।। छ।।

* * *

## पंचदश अध्याय

।। श्री अरनाथाय नमः।।

पुन्हा नमूनि गुरुचरन। श्रोती पुसिले कर जोडुन।।
स्वामी कृतार्थ जालो ऐकोन। च्यारी (क)षाये।।१।।
आता दुर्जन हे माह(ा)खळ। ऐसे बोलती शास्त्र सकल।।
हे सांगावे आम्हासि निर्मळ। कृपासागरा।।२।।
कृपा उपजोनि अंतरात। गुरु बोले वचनामृत।।
म्हने ऐका स्वस्त करुनि चीत। जिनवचन सुधा।।३।।
दुर्जनत्व टाळावें त्वरित। नातरि होइल आपला घात।।
ऐका सांगतो दृष्टांत। हे त्याहूनि उत्तम।।४।।

**श्लोक।।**

वरं क्षिप्तं पानी कुपित फानीनो वक्र कुहरे।
वरं झंपापातो ज्वलनदल कुंडोविरचितः।।
वरप्रासः प्रांतप्तः पदि जठरार्विनिहितो।
नजन्पदैर्जन्यं दविपदां सप्रविदुषा।।६१।।

**टिका।।**

जरि कुपित सर्पाचे मुखात। अज्ञानपणे घातला हात।।
तरि मृत्यु न चुके कदा त्वरित। परि हेही उत्तम।।५।।
परि नको ते दुर्ज(न)गुण। जन्मोजन्मी दुःख दारुण।।
सर्पदंश येकदा मरण। होय तत्रापी।।६।।
दुर्जनत्वापेक्षा अती उत्तम। प्रदिप्त अग्नीकुंड विषम।।
त्यामाजी उटी(डी) टाकावी प्रेम। नको दुर्गुणापरी ते।।७।।
अग्नी क्षणमात्र करी दहन। भवभवी जाळी गुण दुर्जन।।
याकारणे वर्जावे भल्या पुरुषान। दुर्जनत्व शीघ्र।।८।।
झडकरी उदरामाजी सबळ। घालूनि घेतला जरि बळे।।
तेही उत्तम येके वेळे। दुर्गुणापेक्षा।।९।।

येकदा होइल ते मरण। भवभवांतरि हरवी प्राण।।
नर्कादि दुःख अति दारुण। होती दुर्जनत्वे।।१०।।
हे अवघेचि बरे येकवेळ। परि वायीट दुर्जनत्व खळ।।
दुर्जनत्व सर्व दुःखासी मुळ। हे टाळावे आधी।।११।।
सकळ विपत्तिसि मंदिर। विवीध दुःखाचा सागर।।
अनंत क्लेशाचे अंकुर। लहरा उटती।।१२।।
घालावया सर्पमुखी हात। नातरि करावा गिरिपात।।
परि नको दुर्जनत्व घात। जन्म जन्मांतरी।।१३।।
उडी घालावी अग्नीमाजी। तीव्र शस्त्र घालावे काळजी।।
सर्व अपदासी व्हावे राजी। परि ते नको।।१४।।
विवीध उपाय विद्वज्जने। त्याजिला असे दुर्जन गूण।।
चित्त करूनि समाधान। बैसले स्वस्त।।१५।।

**श्लोक।।**

सौजन्य मवविद घाति यश स्वयं च।
स्वश्रेयसं च विभवं च भवक्षयं च।।
दौर्जन्यमावहसेयत्कुमते तदर्थं।
धन्यं दवंदि शति तज्जलसेकसाध्यं।।६२।।

**टिका।।**

दुर्जनत्व गुण टाकावे सकळ। धरावे सज्जनत्व निर्मळ।।
स्वभावेचि जाय पापमळ। निर्मळ होय।।६३।।
सौजन्य येषाचे संचय। सर्व इछितार्थ सिधि होय।।
दलन होति सर्व अपाय। उपाय अन्य नाही।।१७।।
सौजन्य सद्गुणाचे मंदिर। मीत्र होती सुरासूर।।
मग काय न होय इतर। सौजन्य गुणे।।१८।।
कीर्ति व्यापे त्रिजगभरित। अपकीर्ति सोडोनि जाय त्वरित।।
लक्ष्मी सांग काम करित। तयाचे मंदिरी।।१९।।

स्वर्गादि सुखाचे वैभव। प्राप्त होती आपुले स्वभाव।।
सजनत्व धरिता अंतर्भाव। दुर्भाव न राहे।।२०।।
धरिता सौजन्यविचार। सर्व जगा होय प्रियकर।।
रावरंकादिक हो सार। प्रिय करिती।।२१।।
अनंतानंत भवसागर। आदि अंत नाही पार।।
अगणीत दुःख निरंतर। भोगवी जीवासी।।२२।।
लक्ष चौऱ्याशीचे फेर। आनंत कोटी येरझार।।
ह(दु)स्तर विषाब्धी घोराघोर। याचा पार न कळे।।२३।।
यया दुःखाब्धीचा क्षय कारका। इतर नाही आणिका।।
सहजी स्वभाव हरउनि शोका। पुण्यपाक करी।।२४।।
अंतरि धरिता सौजन्य गुण। भवदुःख होव्य विदारण।।
सर्व सुखाचे कारण। सजनत्व पाहे।।२५।।
सौजन्य उपजवी सुमती। स्वभावेचि नासे कुमती।।
अलस लाभ होय प्राप्ती। सजन गुणे।।२६।।
कोणे येके कारणे सुद्ध मन। करावे अनेक उपाय करून।।
जेणे निरूपी लागे ध्यान। तेचि साधन करी।।२७।।
विवीध धान्याचे अंकुर। वध(र्ध)ती वर्षती मेघ नीर।।
तीव्र पेटता वैश्वा(न)र। दहन होती सर्व।।२८।।
तैसे वर्षता सौजन्य शांत नीर। वर्धती सद्गुण सकळ अळंकार।।
पेटतां दौर्जन्य वैश्वानर। भस्म होती सद्गुण।।२९।।
सर्व शुभोदयासि कारण। अहो ऐका सज्जनत्व गुण।।
हे दिव्य वाक्य प्रमाण। मानावे सर्व।।३०।।

**श्लोक।।**

वरं विभववंद्यता सुजनभावभजा नृणां।
मसाधुचरिता न पुनरुर्जिताः संपदः।।
कृषत्वमपेशोभते सहजमायतौसौंदरं।
विपाकविरसानतुखयदुःसत्र भवास्छूलता।।६३।।

**टिका।।**

स्वल्पकाळे भोगूनि कष्ट। भवांतरि होय जगा श्रेष्ठ।।
विश्वजनासि करि तुष्ट। तो महापुरुष।।३२।।
दुर्जनत्व धरुनि शरिरी। वर्त्ततसे जो संसारी।।
तो जाणावा दुराचारी। असो धनवान।।३३।।
धनाढ्य होउनिया दुर्गुण। न टाकी कदा अविचारपण।।
त्यापेक्षा उत्तम मरण। परि वाचणे नको।।३४।।
सम्यक्त्वयुक्त होउनि मरण। ते जाणा सुखासि कारण।।
परि धनवंत होउनि वाचणे। नको दुर्जनत्व।।३५।।
दुर्जनत्व उपार्जुनि धन। जरि जाला कुबेरासमान।।
तरि तो नर जाणावा पुण्यहीन। राज्य मान असोका।।३६।।
द्रव्यहीन जाला जरी सज्जन। तरि तो दिसे शोभायमान।।
परि न शोभतो दुर्जन। असो धनपती।।३७।।
होउनि पुण्यविपाकाविरहित। प्राचिन्न कर्म भोगवी संचित।।
पुढे दुःखासि नाही अंत। दुर्जनपणे।।३८।।
नको नको रे थोरपण। असलीया दुष्ट दुर्जन गुण।।
बरवे तयाहूनि लाहानपण। कष्ट कोन भोगी।।३९।।
प्राचित्त कर्म जाला वरिष्ट। सौख्य भोगी सर्वा श्रेष्ठ।।
विश्वामूखी जाला नष्ट। दुर्जन गुणे।।४०।।
होउनि अशूभ कर्माचा उदय। धनधान्यादि करवी लय।।
सज्जनपणे वंद्य होय। सकळ जनासी।।४१।।
सुजनत्वे लाभे सुधर्म। दूर सोडोनिया जाय अधर्म।।
पुढे संचोनिया पुण्य कर्म। शीव शर्म भोगी।।४२।।

**श्लोक।।**

नाब्रूते परदूषणं परगुणं वक्त्याल्पमप्यन्वहं।
संतोष वहते परद्रुधुपरा बाधासु दते शुच।।

स्वश्लाघ्यं न करोति नोझ्नैतेनयं नौचित्यमुल्लंघयं।
त्यक्तोप्यप्रिथमक्षमानचरयत्येतश्चरित्रं सतां।।६९।।

**टीका ।।**

आता सुजनत्वाचे लक्षण। ऐका सांगतो याची खुण।।
जेणे शुद्ध होय अंतकर्ण। सर्व गूण वर्धती।।४३।।
न उच्चारी पराचे दोष। उत्तम गुणाचि येइ विशेष।।
अहो तोचि की महापुरुष। जाणा सज्जन।।४४।।
किंचीत न करी परदूषण। मुखे उच्चारी उत्तम गूण।।
दयेने द्रवे अंतःकर्ण। अहिर्णीसी।।४५।।
परापवाद स्वल्पमात्र। काडी कदा पुण्यपात्र।।
अत्र परत्री जगमित्र। तो पवित्र सज्जन।।४६।।
प्रत्यक्षी पाहिला जरी दुर्गुण। यत्ने करि तयासि आवर्ण।।
उच्चार न करी गेलिया प्राण। तो पुण्यभूतरि।।४७।।
पाहोनि अन्य जनाचे ऐश्वर्य। संतोष मानी जगदाश्चर्य।।
तो जाणावा सज्जन वीर्य। जगा प्रीय तोचि की।।४८।।
स्वल्प सद्गुण आसलिया पराचे। तरी आखंड उच्चारी वाचे।।
ना मन दुर्गुणाचे। कदाकाळी सज्जन।।४९।।
पाहोनि पराचा मोहत्साव। अंतरि उपजे संतोष भाव।।
ऐसा सज्जनाचा स्वभाव। ऐका गुणी जन।।५०।।
पाहोनि अन्य जनाचा खेद। अंतरी अनुकंपा हाय सहृद।।
कवळूनि निवारी खेद। तो पुण्य पुरुष।।५१।।
वाढवी आपुले महिमान। अन्य जनाचा वर्धवी मान।।
सहजी होय पुज्यमान। त्रिजगामाजी।।५२।।
करणी करुनिया आपण। वाढवी दुज्याचे महिमान।।
महा येषासि होय सदन। तो पुण्यपुरुष।।५३।।
करुनि झाकी परोपकार। दुजयाची महिमा वाढवी थोर।।
तोचि जाणावा सज्जन नर। सर्वा थोर तोचि की।।५४।।

नय विनययुक्त निति। दृढ धरिया आपुले चित्ती।।
वर्त्ततसे तो सन्मती। अनुकंपा भावे।। ५५।।
नुलंघे कदा योग्य चरित्र। होउनि सर्व जनासि मित्र।।
तोषवी इष्ट स्वजन गोत्र। तो पुण्यपात्र देखा।।५६।।
तत्रापी ऐकिले जरि दुर्वचन। तरि न होय क्षोभायमान।।
सदा स्वस्त करुनि मन। समाधान राहे तो।।५७।।
कोणे येके कारणे कोप। न करि कदा क्षमारूप।।
शांतभावे लोपउनि ताप। स्वस्तनू पराहे।।५८।।
हे संचिताच चरित्र। ऐकता होती कर्ण पवित्र।।
विवीध पुण्य साचे विचित्र। शुद्ध क्षेत्र तेचि की।।५९।।
जरि असे शुद्ध लक्षण। तेचि जाणावे संत सज्जन।।
धन्य धन्य तो नर निधान। यया त्रिजगात।।६०।।

इति श्री सौजन्यगुण वर्णनं न्नाम पंचदशोध्यायः।।१५।।

छ।। श्री।। छ।। मंगल माहा।।मंगल।। छ।।

****

# षोडश अध्याय

।। श्री महतिय नमः।।

हे ऐकोनि सौजन्य गुण। श्रोते होउनि समाधान।।
अग्री उभे कर जोडोन। स्वानंद भावे।।१।।
बुडता भवसागरी यया। कृपेने तारिले गुरूराया।।
पवित्र करुनि सोडिली काया। अम्हा सर्वाते।।२।।
आता सांगावे पुढे उपाय। हा संसारदुःख तुटोनि जाय।।
जेणे केवळज्ञान प्राप्त होये। तोचि उपाय सांगा जी।।३।।
मुनि म्हणे ऐका येकचित्त। हे जिनवाक्य दिव्यामृत।।
जेणे तुटोनि जाय श्रांत। तेचि निति ऐकावी।।४।।
करावा गुणीजनाचा संग। तेणे शुद्ध होय अंतर।।
भावे पातके होती भंग। सत्संगतीने।।५।।

**श्लोक।।**

धर्मं द्वास्तदयो शतश्रुत नव्यो वृतं तत्रमतः पुमान्।
काव्यं निःप्रतिभः स्तपःसमदयाशून्योल्पमेदश्रुतं।।
यस्त्वालोकमलोचनश्चलमना ध्यानं च वांछत्यसौ।
यः संग गुणि विमुंचविमतिः कल्याणमाकांक्षती।।६५।।

**टिका।।**

कोणी येक नर बुद्धिहीन। स्वइछा आचरे दुर्मन।।
गुणिजनाचा संग सोडून। दुर्ध्यान वनी हिंडे।।६।।
दुर्लभ सापडला नरदेह। मूढ गुणी संग न इंछी पाहे।।
बळे दुर्गतीस होत आहे। बळकट भाजन।।७।।
गुणिसंग वर्जुनि दुर्गुण। दुर्मती इछीतसे कल्याण।।
सहजी दुर्गतीस कारण। अपोआप होय।।८।।
अंतरी नाही दया शर्म। मनि इछी विवीध धर्म।।
अकस्मात येउनि अधर्म। प्राप्त होय स्वभावें।।९।।

सदा विस्मृत्ती होय चित्त। मनामाजी व्रतं इछित।।
प्रमाद दोषे होय भ्रांत। चळवी व्रतासी।।१०।।
मुळीच असे सतीहीन। काव्य कविता इछी मन।।
तैसा गुणीसंग सोडून। पुण्य इछिती।।११।।
क्रोधादिक पायासि नाही शम। सर्व इंद्रियात नाही दम।।
तप इछीतसे अनुपम। मतीमंद तो।।१२।।
मती नाही स्वल्पमात्र। पढावया इछी सकळ शास्त्र।।
यापरि सोडुनि सद्गुण पात्र। इछी परत्र सौख्य।।१३।।
लोचन नाही गर्भांध। वस्तु अवलोकन पाहे विवीध।।
तेण अधिक होय खेद। जिनबोध न होये।।१४।।
सदा मन असे चंचळ। उठति विकल्प कल्लोळ माळ।।
आणी ध्यान इछीतसे निर्मळ। ऐसा खळ ऐका।।१५।।
ही ऐसी असक्य अनुष्टाने। कदाकाळी न होती साधने।।
तैसीच गुणी संगा वाचून। साधने न होती।।१६।।
यालागी संत साधुजन। क्षण न राहाती गुणिसंगावाचून।।
गुणि संगी समाधान मन। निरंतर राहाती।।१७।।
गुणिसंगासि करावा यत्न। त्यजावा दुर्जन संग प्रयत्ने।।
जेणे लाभे सम्यक्त्वरत्न। तोचि यत्न करावा।।१८।।
ऐका सकळ धान्याचे सार। असावे गुणी संगी निरंतर।।
प्राप्त होय मोक्षनगर। अखंड सौख्य।।१९।।

**श्लोक।।**

हरति कुमति भीते मोहं करोति विवेकतां।
वितराति रती सूंते नीतं तनोति विनीततां।।
प्रथयति यशे दत्ते धर्मव्यापाहति दुर्गती।
जनयति नृणां किन्नांभिष्ट गुणोत्तम संगमः।।६६।।

**टिका।।**

करिता गुणोत्तमाचा संगम। हरोनि जाय बुद्धीश्रम।।
प्राप्त होती गुण उत्तम। संगतीने तयाचे।।२०।।
ग्राम थिल्लरीचे उंदक। स्पर्श न करिती उत्तम लोक।।
गंगाजळी मिळता निक। पवित्र होय सर्व।।२१।।
तैसा कोणी येक गुणहीन अपात्र। गुणिजनसंगे होय पवित्र।।
सकळा वंद्य होय सुपात्र। सर्व जगामाजी।।२२।।
मोहांधकाराचा होय नाश। हरोनि जाय अज्ञानक्लेश।
सज्ञानसूर्य होय प्रकाश। सहज स्वभावे।।२३।।
गुणिसंगी उपजे विवेक। हरोनि जाती संताप शोक।।
नमस्कारिती सर्व लोक। तया संगतीने।।२४।।
निजरूपी होय रती। नाश होउनि जाय कुमती।।
सद्गुणी अधिक वाढे प्रिती। गुणि संगतीने।।२५।।
उत्पन्न होय शुद्ध मती। सर्व संक्लेशाची तुटे संगती।।
हृदई क्षीर होय समती। गुणी संग प्रतापे।।२६।।
सदा उपजे विनय गुण। नम्रता होय अंतकर्ण।।
न्याय निति अवघे प्रमाण। घडोनि येती।।२७।।
कीर्ति व्यापे त्रिजगभरीत। अपकीर्ति दलन होय त्वरित।।
संग इछीती सज्जन समस्त। गुणी संग प्रभाव।।२८।।
प्राप्त होती सकळ धर्म। नाश होउनि जाय अधर्म।।
गुणिसंगे होय पुण्य शर्म। त्रिजगामाजी।।२९।।
प्रितिने शेविता गुणिसंगाप्रती। शीघ्र दलन होय दुर्मती।।
अवचिता लाभे शभ गती। प्रभाव संगाचा।।३०।।
गुणोत्तमाचे संग महिमाने। साध्य होती सकळ साधने।।
मंत्रतंत्रादि विधिविधाने। अवघे साधिती।।३१।।
गुणिजन संगे मानवासी। संचय होती पुण्याच्या राशी।।
मार्ग होय मोक्षसुखासी। मग काय न होय।।३२।।

तुटोनि जाय अवधी चीता। लाभ होय ध्यान यकाग्रता।।
जाण सर्व सुखासि मुख्यता। संगे गुणिजनाचे।।३३।।
पुरउनि यती मनोरथ। अभीष्ट सिद्धी सकळ पदार्थ।।
गुणिसंगे लाभे परमार्थ। मग काय न होय।।३४।।

**श्लोक।।**

लब्धं बुद्धिकलापमापदमपाकर्तुं विहर्तुं पथे।
प्राकिर्तिमासाधुतां विधिवतां धर्मं समासेवितं।।
रोदु पापविपाकमाकलयुतं स्वर्गाप गंश्रयं।
चित्वं चित्तसमेहसे गुणवातां संगतदगेकरु।।६७।।

**टीका ।।**

गुणीजनसंगावाचूनि अन्यथा। शुभोदय न मिळे सर्वथा।।
मग (स)द्गुणप्राप्तिची कथा। स्वप्नी वार्ता दिसेना।।३५।।
या कारणे होउनि निसं(ग)। करावा गुणी जनाचा संग।।
विशुद्धि होय अंतरंग। होती भंग पातकें।।३६।।
मना इछीसी जरि दुर्बुद्धि। कळा कुशळताना विधी।।
प्राप्त व्हावी जरि सकळ समृधी। तरि साधी हेचि हो।।३७।।
जरि वाछीसी सकळ संपदा। नासूनि जाय सर्व आपदा।।
लक्ष असे जरि परमपदा। संग धरि गुणिचा।।३८।।
आरे इछीसी जरि सन्मार्ग। विदारण होवे घोरोपसर्ग।।
प्राप्त व्हावे स्वर्गापवर्ग। तरी करी ऐसे।।३९।।
जरि वांछीसी येशकीर्ति। प्रख्यात नाम गुणगण भर्ती।।
प्रसिद्ध रूप दिव्य मूर्ति। इछीसी जरी।।४०।।
नासूनि टाकावे दुर्जनत्व। इछिसी जरि सुजनत्व।।
प्राप्त व्हावे जरी परमतत्व। तरि ऐसे करी।।४१।।
उत्तम धर्माचा असे अभिळाष। दोषराशीचा व्हावा नाश।।
निरंतर इछिसी जरी सुजनत्व। तरि ऐसे करी का।।४२।।

पापकर्माचा व्हावा निरोध। प्राप्त व्हावा उत्तम बोध।।
इछिसी जरि उपयोग शुध्ध। तरि साधी सत्संग।।४३।।
स्वर्गापवर्गाचे वैभव। प्राप्त व्हावे अपुले स्वभाव।।
दरिद्र कुसंगाचे नाव। न राहे जवळी।।४४।।
अरेरे मना हेही कारण। जरी इंछीसी यया प्रमाण।।
तरी सद्गुणी जस घट्टण। करी नीत्यानीत्य।।४५।।
गुणी संगी हेही सकळ। घडो नयेती अवघी फळे।।
सहजी जाउनी पापसळ। होय नीर्म(ळ) आंतर।।४६।।
आंगीकरावे गुणी संग। पापकर्माचा होय भंग।।
सहजी शुध्ध आंतरंग। गुणी संगी होय।।४७।।
हा जाणे न तात्पर्यार्थ। गुणी संगी करावा यथार्थ।
येणेची साध्य होय परमार्थ। सहज स्वभावे।।४८।।

**श्लोक।।**

हीमती महीसाभोजे चंडानीत्य दयांबुधी।
द्वीरदलीदमारामक्षमा श्रृती वज्रती समीधति।।
कुगत्यग्नौ कंदत्पनीतीलतासु यः।।६८।।
कीमभीलपती श्रीयः श्रीयःसनी सनीगर्गु संगमे।।४८।।

**टिका।।**

गुणहीनाचा करीता संग। पुढा कर्माचा होय भंग।।
क्लेश खळंबळे अंतरंग। हीनसंगे करुनी।।४९।।
अवचीता झटती येउन पाप। कृत सुक्रताचा होय लोप।।
स्वभावेची होय संताप। गुणहीण संग।।५०।।
गुणहीनाचे संग करुन। नास होउन जाय समाधान।।
स्वभावे होय मानहीन। कुश्चीत संग।।५१।।
जै मात्रा सेवीता रोगीयान। नंतर केले आपत्य भाजन।।
मग काय पुसावे सजीवन। जाये प्राण स्वभावे।।५२।।

माहा सामर्थ्य वीकसीत कमळ। हीम तुषार जै सैवाळ।।
तैस हीन संगी हृदयकमळ। वीकळ होय।।५३।।
इंद्रीयदमनाचे वनात। उपशेम तरु नाना शोभत।।
दुर्गुण संग गज उन्मत। टाकी उपडोनि।।५४।।
क्षम पर्वत महा वुतंग। सीघ्र करावया तयासी संग।।
वज्र गदा नीगुनी संग। आती तीव्र जाण।।५५।।
कुगुती माहा हुताशन। हीन संगी समीधा घृत शीचन।।
कदा न होय समाधान। दुर्गुण संगाग्नी।।५६।।
आन्याय लतासी समीप। दुर्गुणी संग वीस्तीर्ण मंडप।।
तीनी लोपुन जग व्याप। दुर्गुण लता।।५७।।
ऐसा नीर्गुणीचा संगम। जाळुन टाकी गुणगण आराम।।
मग तेथे कैचा सौकी वीश्राम। तव्यालायासी।।५८।।
उदयबुद्धीची मेघडंबर। प्रशस्त व्यापुन गगन भर।।
उदलुन टाकी यकसर। दुर्गुण माहावात।।६०।।
याकारणे ज्ञानवंतान। कुसंग सोडुन द्यावा त्वरेन।।
तरीच होय समाधान। सजेन संगे।।६१।।
गुणीसंग धरावा बळकट। तरिच मोडे कुगतीची वाट।।
नीजरुपी होईल भेट। सजन संगे।।६२।।
द्यास आभीळास वैभवाचा। तरी संग त्यजावा दुर्जणाचा।।
आता प्रीयत्व गुणीजनाचा। करावा संग।।६३।।
भंगुन जाय कर्मचक्र। प्राप्त स्वधर्मचेक्र।।
स्वाभावे वंदी त्रीभुवन चक्र। प्रभाव संगाचा।।६४।।
ईती श्री सुक्तमुक्तावळी ग्रंथ गुरुसीशे संवाद।।
गुणीसंग नीरोपन नाम षोडशोध्यायः।।
छ।। श्री।। श्री।। मंगल महा ।। छ।।

* * *

## सप्तदश अध्याय

।। श्री नेमीनाथाय नमः।।

बुडता आपार भवसागरात। कृपेने तारिले स्वामी देउनि हात।।
सांगुनि सद्गुणसंगाची मात। तरिले स्वामी।।१।।
आता पुढील सांगा विवेक। जेणे हृदयकमळ होय पाख।।
चतुर्गुती भ्रमणचक्र चुके। दुःख शोक न राहे।।२।।
मुनि म्हणे ऐका विचार। जे निरोपिले आदि परमेश्वरे।।
जेणे चुके चौऱ्यांसी फेरे। तेचि सांगतो।।३।।

**श्लोक।।**

आत्मानं कुपथेन निर्गमयीतुंथः शूकला खायते।
खायते कृत्याकृत्यविवेकं जीवीतहतौ यः।।
कृछ स पार्यते यः पुण्यं दुमषहूखंडनविधौ स्युर्जत्कवारायते।।
तं लुप्तं वृतमुद्रमिंद्रियगणं जीत्वा शुभायद्भवः।।६९।।

**टिका।।**

सहजि स्वरूपि लावावे मन। होति सर्व ईंद्रिय शक्तिहीन।।
हेचि जाणावे ईंद्रियदमन। अन्य ध्यान नाही की।।४।।
इंद्रियगण मत्त कुंजर। उपडोनि टाकीति पुण्य तरुवर।।
मग कैसेनि राहे सारासार। विचारयुक्ति तेथे।।५।।
जैसा दुष्ट अश्व महाखोडी। असक्य मार्गा नेउनि पाडि।।
अजिंक कुपात घाली उडी। इछा मोडी बैसकाची।।६।।
नर्का दुर्गतिकारणे। न्यावया दुष्ट वाजि इंद्रियेगण।।
देखत देखता पाडी नेउन। विषयवनात।।७।।
स्वविषयासि धावे गज। मन सर्वास साह्य होय सहज।।
सौख्य दाखउनि दुर्मति काज। सहजचि होय।।८।।
स्वइछा सोडितो मन। विषयवनि बैसे जाउन।
नर्कादि दुःखासि सचगार।(सत्यंकार) धना देउनि घेइ बळेचि।।९।।

कार्यकार्य विवेक संजीवन। नासावया कृष्ण सर्फासमान।।
इंद्रियगण महादुर्जन। क्रूर विषोरग।।१०।।
तोडावया पुण्य तरूवर। तीवृ वज्रकुठार।।
इंद्रियगणासम निसित हत्यार। नाही नाही अन्य।।११।।
विविध मुद्रा सधनाचा नाशक। इंद्रियगण महापावक।।
दह(न)करी अवघा विवेक। इंद्रिय अनळ।।१२।।
यालागी जीतावे इंद्रियगण। तरीच होति सकळ कारण।।
नातरि होती अपहरण। शुभ कारण अवघी।।१३।।
इंद्रिय जितीलीयावाचुन। न होय कदा समाधान।।
या कारणे महा साधुजन। जितेंद्रिय जाहले।।१४।।
इंद्रिय जितिताचि सकळ। शुद्ध होय हृदयकमळ।।
सर्वकाळ शुभमंगळ। होउनि येति सर्व।।१५।।
या कारणे ज्ञानवंताने। सदा जिंतुनि अपुले मन।।
निजरूपी होउनिया लिन। स्वस्त असावे।।१६।।

**श्लोक।।**

प्रतिष्टायं निष्टां नयति नयनिष्टां विघट्य।
त्यकृत्याश्वाश्वा दत्ते मतिमत पसे प्रेम तनुते।
विवेकत्सेक यदि विदलयते च विपदं।।
पदं तद्दोषाणां करणनिकरुंवकुरवशं।।७०।।

**टिका।।**

कोणी येक पुरुष रत वरिष्ट। प्रतिष्टा वाढवुनि जाहले श्रेष्ठ।।
जगा मान्य महा श्रेष्ठ। उत्कृष्ट पुण्य असो।।१७।।
इंद्रियासी क्षणेक होता वश्य। प्रतिष्टा हरोनि साचे दोष।।
अपहास्य होउनि पुण्यनाश। स्वरितचि काळी।।१८।।
जगामाजी म्हणति हा दुष्ट। दुखरासि भोगवि कष्ट।।
इंद्रियगणासमान नष्ट। अन्य नाही प्रसिद्ध।।१९।।
जेणे नष्ट होउनि जाय मती। अवचिता यउनि विघ्ने झटति।।
शीच उपजति नयनिती। मत हस्ती इंद्रिय।।२०।।

विवेक उदयाचि वृद्धि। विवीध उत्साहाची रिद्धी।।
जेणे साध्य सकळ सिद्धी। निधी नववीधी।।२१।।
इंद्रिय उन्मत करी दारुण। करि सर्व विवेक विदारण।।
प्रत्यक्ष करिती प्राण हरण। क्षण न लगता।।२२।।
क्षणोक्षणी देतसे अपदा। क्लेश खेद उठवी सदा।।
दहन करी सर्व संपदा। इंद्रिय दावान्नळ।।२३।।
सर्व दोशासि महा सदन। अवघे कुकर्मासि निधान।।
करावया पुण्यकर्माचे दलन। कारण इंद्रिय।।२४।।
चित न राहे कदा स्छीर। सदा विषयवनामाजी फीरे।।
विविध दुःखाचे अंकूर। निरंतर उटति।।२५।।
जयासि सुखाचा अभीळास। तेणे इंद्रिय समोह करावा वश्य।।
सहजी स्वभावे जाति दोश। भवनाशे होय।।२६।।
मंत्र तंत्रादिक साधन। अथवा नानाविधि विधान।।
इंद्रिय जीतीलीयावाचुन। न साध्य होती।।२७।।
दानपुजादि होम हवन। ध्यान मौन्यादि अनुष्ठान।।
जितिलीयावाचुनि इंद्रियगण। न फळा यति।।२८।।
करावे इंद्रियाते अधिदमन। तरीच होति अवघी साधने।।
फळा येति अवघी साधने। सहजी स्वभावे।।२९।।
सहजी सुखाचा अनुभव। मनासि नित्यानित्य दावित जावे।।
तरिच विषयसुखाचा अभाव। स्वभावेचि होय।।३०।।
सारांश जाणा तात्पर्यार्थ। इंद्रिय जींतावी हा निश्चितार्थ।।
तरी प्राप्त होय परमार्थ। मग अनर्थ काय।।६१।।

**श्लोक ।।**

दंता केनमगा रज्ञ्यतु विधि प्रागल्य श्यमभ्यस्यतां।।
।त्स्वतर्वमाश्रमश्रममुपादतां तपस्तष्यतां।।
श्रेयःकंजनिकंजभंजनमहावातन्न चेंद्रिद्रियं व्रातं।
जेंतु भवैति भस्मनि हुतं जानीति सर्वं तताः।।७१।।

**टिका।।**

कोणी येका प्रमत्त जनान। निरंतर धरीले जरी मौन्य।।
तै सर्व इंद्रिय जायावाचुन। वृथा श्रम दिसे।।३२।।
अथवा सोडुनि बैसला घर। उपसर्ग साहतसे दुर्धर।।
इंद्रियजयावाचुनि सार। कष्ट पार दिसति।।३३।।
अहो कोणी येके कारण। जरी केले विवीध अनुष्टान।।
तरि न जिंतिता इंद्रियगण। दुःखकारण सर्वासि।।३४।।
विवीध अभ्यास साधन। अनेक प्रकार असन।।
इंद्रियगण जिंतिलीया विण। वृथा कष्ट पाहे।।३५।।
घोर अरण्य करूनि वास। साधन साधीतसे सायास।।
इंद्रिय जितिलीयाविण अशेष। बळे फास गळ्यासि।।३६।।
अथवा केला शास्त्राभ्यास। तर्कादि पढे रात्रंदिवस।।
इंद्रिय जिंतिलियाविण कैसे प्राप्त होय बोध।।३७।।
दुर्धर केले तपाश्चरण। बाह्याभ्यंतर विधीप्रमाण।।
नाही जितीली यींद्रियगण। दुःख दारुण होय त्या सकळे।।३८।।
ऐश्वर्य बिंधुजळ। कमळपत्रावरि देति डाळ।।
इंद्रियगण वाहुटुळ। करि नाश क्षणात।।३९।।
विवीध उत्साहाचा उल्हास। शोभे जैसा फुलला फळस।।
इंद्रिय धुकरी नाश। क्षणामाजी।।४०।।
अम्रवृक्षाचा पुष्पाभार। विनाश करी हिमतुशार।।
तैसे इंद्रियगण समस्त कुंजर। सद्गुणभार नाशी।।४१।।
जितिले नाही इंद्रियव्रात। तरि व्यर्थचि हे श्रम समस्त।।
भस्म होमाची जाली रित। न होति स्वकार्य।।४२।।
जैसे पाणी घुसळीता सायास। लोणी न लागे कदा हातास।।
तैसे व्यर्थ अवघे आयास। निष्फळ जाणा।।४३।।
इंद्रिय जिताविं हा अभिळाष। तोचि करावा नित्य अभ्याश।।
सर्व कार्यसिद्धी तयास। स्वभावेचि होति।।४४।।
या कारणे साधुजन। जयवंत जाहले इंद्रिय जिंतुन।।
सिद्ध जाहली सर्व साधने। सर्व लोक प्रसिद्ध।।४५।।

हे ऐकोनिया जिनवचन। इंद्रि जिंतावा ज्ञानवंताने।।
निजरूपि लाउनि मन। स्वस्त ध्यानि बैसावे।।४६।।

**श्लोक।।**

धर्मध्वंसदुरेणभ्रमरसा वारिणमापत्यथा।।
लंकर्मिणशर्मनीर्मितकलापारेणमेकांततः।।
सर्वान्नीनमनात्मनि नमनं भूत्यंतीनमिष्टीयथा।
कामिनं कुमताध्वनिनमजयन्नक्षामक्षेमभाक्।।७२।।

**टिका।।**

धर्म विध्वांसवया धुरंधर। मुख्य जाणावे इंद्रियप्रकार।।
यालागी वश्य करावे सत्वर। ज्ञानवंतानी।।४७।।
जंतुसि रक्षावया मेघजळ। ते अभ्र विदारी वात सकळ।।
तैसे इंद्रियगण खळ। धर्म निर्मुळ करीत।।४८।।
नातरी सुर्यासि अवरण। घाली जैसे अत्र(भ्र) परिपुर्ण।।
तैसे ज्ञानभानुसि इंद्रियगण। अवरण पाडी।।४९।।
इंद्रियासि वश्य होता क्षणेक। नासुनि जाय अवघा विवेक।।
हृदयकमळलतासि पडे शोक। तत्क्षणी।।५०।।
अग्निप्रताप जैसा जळान। हरिला न लागता यक क्षण।।
तदुपरि जाणा इंद्रियगण। नासति विवेक।।५१।।
परपरिणामासि कारण। तु मुख्य जाणा इंद्रियगुण।।
अहो जितिलियावाचुन। अत्मकार्य न होय।।५२।।
अपत्य पदासि मुख्य मार्ग। सोसावया नर्कादि घोरोपस्वर्ग।।
कारण जाणा इंद्रियवर्ग। जितावया लागी।।५३।।
दुःखदायक परममित्र। निरंतर भोगवी ईह परत्र।।
इंद्रियगणासम अपात्र। नाही नाही त्रिजगी।।५४।।
दुःखासी भीतसे कोण। सुख इछीतसे जरी मन।।
तरी इंद्रिय जीतावी त्वरेने। भंजन होय दुःख।।५५।।
जैसा घातक मित्र दाखवि हीत। सेवटी करी प्राणघात।।
तैसेचि जाणा इंद्रियव्रात। अत्मघात करी।।५६।।

अमेष लाउनिया गळास। जळी टाकुनि धारी मछास।।
प्रत्यक्ष होय जीव नाश। हे न कळे तया।।५७।।
तैसे इछीता इंद्रियसुखासी। प्रत्यक्ष दुःख होय जिवासी।।
अंति भोगणे दुःखरासी। हे न चुके कदा।।५८।।
जे अत्महितासि अकारण। मुख्य जाणा इंद्रिय गण।।
ते वर्जावे शाहणपणे। बुधजनानी।।५९।।
येका इंद्रियासी पशु येक। वश्य होता जिवासि मुके।।
मग पाचा इंद्रियानी कैसे चुके। प्राणघात।।६०।।
पाहा दृष्टि पाहता पतंग। भस्म जाहला दिपासंगे।।
मग पंच विषय करतील भंग। हे आश्चीर्य काय।।६१।।
नाद विषयासि कुरंग। वश्य होता प्राणभंग।।
नातरि नागसुरासि भुलला नाग। जाहला वियोग देहाते।।६२।।
येक स्पर्श विषयासि वश्य जाहला। पाहा प्रत्यक्ष गज बळी बंदी पडिला।।
नीच संग कार्य करी वहीला। जाहला पराधीन।।६३।।
वश्य होउनि गंध विषयासी। भ्रमर पडीला पंकज फासी।।
प्रत्यक्ष मुकला प्राणासी। जगप्रसीध।।६४।।
स्वइछा खेळे जळचर। रसनेंद्रियालागी पडे बाहीर।।
जळाविण शोषुनि मरे। न मीळे नीर तया।।६५।।
येकेक विषयाची ऐसी परी। मग पाचा विषयास सापडला जरी।।
शोधुनि पाहावे अंतरी। काय थोरी राहील।।६६।।
या कारणे विवीध उपाय। करुनि जितावे अवघे विषय।।
नाहीतरी न चुकती अपाय। काही करुनि।।६७।।
हे जिनवचनामृत। दृढ धरुनिया मनात।।
जिंतावे सकळ इंद्रियात। तरीच मुक्त होय।।६८।।

ईति श्री इंद्रियदमननिरूपण नाम सप्तदशोध्यायः।।१७।।

श्री।। श्री।। श्री।। श्री।। छ।। छ।। छ।।

* * *

## अष्टादश अध्याय

।। श्री वितरागाय नमः।।

ऐकोनिया इंद्रियदमन। श्रोते होउनि समाधान।।
पुढे पुसावया कर जोडुन। उद्योक्त जाहले।।१।।
विनये प्रार्थुनि श्रीगुरुसी। म्हणती बुडता तारीले या जिवासी।।
अता कृपा करूनि पुण्यराशी। सांगा उपाय येक।।२।।
काय करावे ग्रहस्ताश्रमाने। कैसे जतन करावे हे धन।।
हे सांगावे कृपा करून। श्री गुरुराया।।३।।
मुनि म्हणे ऐका जिनवचन। धन न राहे केली जतन।।
या कारणे करावे दान। सत्पात्रालागी।।४।।

**श्लोक।।**

निमंगळतिनी मगव नितरां निप्रेव विष्कंभते।
चैतन्यमंदिरे वपुष्यति मदं धुमं वदंतद्वता।।
चापल्यं चपलेव चुंबति दवं ज्वालेव तृष्णां नय–
त्युल्लासं कुलटांगनेव कमला स्वैरं परिभ्राम्यति।।७३।।

**टिका।।**

दान करिता वर्धेधन। साध्य होती सकळ साधन।।
पात्रापात्र पारखुन। दानधर्म करावा।।५।।
हा जाणावा ग्रहस्त मार्ग। येणेची लाभे स्वर्गापवर्ग।।
दलन होति दुर्गापसर्ग। अन्य मार्ग नाहीच।।६।।
लक्ष्मी न राहे कदा स्छीर। पुण्य सरताची होय दुर।।
यालागी करावा सत्वर। दयादान धर्म।।७।।
वर्षाकाळी नदीचा पूर। भरोनि जाय दोनि तीर।।
शरत्काळी मागे सरे। तद्वत लक्ष्मी।।८।।
निद्रा व्यापिता लोपे ज्ञान। निमिष्यात करी अचेतन।।
तैसे ऐश्वर्य जाय लोपुन। पुण्य सरलिया।।९।।

तत्रापि लक्ष्मी असे घरि। भ्रांति पाडी नेत्रावरी।।
भिक्षूक राहिला असे द्वारी। तरि नेत्रा दिसेना।।१०।।
याकारणे असावे सावध। दान करावे त्रिकर्ण शुद्ध।।
होउन येकदा धनांध। पाहो जाइल धन।।११।।
जैसा मधुपान करवी भ्रांत। ऐश्वर्य मद करवि तद्वत्त।।
मग पुण्य पुण्य सरता बैसे स्वस्त। दीन होउनि।।१२।।
या कारणे करावे दान सत्पात्री। तेणे पुण्य न सरे इह परत्री।।
वश्य होय सर्व धात्री। सुपात्रदाने।।१३।।
जैसे धूर लागता डोळियासी। समीपची न दिसे तयासी।।
तेचि परि होय धनांधासी। न दिसे पुढे।।१४।।
अकाशी चमके जैसी चपळा। तैसी चंचळ जाणा कमळा।।
विलंब न करावा सत्पात्रा। ध्यावया दान।।१५।।
जैसी दावाग्नीची ज्वाळा। न तृप्ति त्रुण इंधन सकळा।।
तैसी तृष्णा वाढवि कमळा। न तृप्त होय।।१६।।
जळ बुद्बदा जैसा क्षणभंगुर। तैसीच लक्ष्मी अस्छीर।।
यालागी असे तो बर। करावे दान।।१७।।
जैसी चपळ कुटिला सुंदरा। तेचि परी जाणा इंदिरा।।
करावे सुपात्रि दान त्वरा। अस्छीर जाणोनि।।१८।।
नाही भरवसा या धनाचा। म्हणोनि सत्पात्र लागी वेचा।।
हे सत्य सत्य जाणा त्रिवाचा। करा हो दान।।१९।।
जाणा हा सारांष तात्पर्य। न राहि कदाही कदाही ऐश्वर्य।।
याकारणे पाहोनि पात्रे वर्य। करावे दान।।२०।।

**श्लोक।।**

दयादा स्पृहयंति तस्करगणा मुष्णाति भूमिर्भुजो।
गृहंती छलमाकलय्युद्रूत भृगू भस्मीकरोति क्षणात।।
अंभः प्लावयते क्षितौ विनिहीतं यक्षा हरंते हटा।।
दुर्वृतास्तनया नयंति निधनं धिग्बव्हदीने धनं।।७४।।

**टीका।।**

तत्रापि पूर्वसुकृत करून। संचय जाहले जरी धन।।
ते हरावया इछीती बहू जन। अपुलाले स्वार्थ।।२१।।
दायादे इछीती घ्यावया भाग। समध नसता झटो लाग।।
नातरि करिती प्राण वियोग। धनाकारणे।।२२।।
अथवा बाधा करिति तस्कर। चोरुनि नेहति द्रव्य सारे।।
मारुनि टाकीती मुले लेकुरे। तया धनासाठि।।२३।।
भूपति इछी बळे वर्म। म्हणति याणे केले निच कर्म।।
द्रव्य हरोनि नेति अधर्म। विविध बाधा करी।।२४।।
ईतुकीयातुनि चुके जरी। नंतर अग्नीची होये स्वारी।।
भस्म करि क्षणामाझारी। न राहे तिळांश।।२५।।
अथवा हरण करी उदक। वृथा दवडीले म्हणति लोक।।
सरता पुर्व पुण्यपाक। अकारण जाय।।२६।।
नातरि होत देश विपति। जागा न देइ कटाक्षेती।।
मग मरण पाउनि चाहाति। दुर्गति होय।।२७।।
झाकुनि ठेविता धरणीते। हरण करति यक्ष भूते।।
लाउ न देती कदा हात। तया द्रव्यासी।।२८।।
नातरि पुत्र जाहाला भ्रष्ट। सकळ वस्तु करे नष्ट।।
नीच ठाइ वर्ति दुष्ट। हा हा कष्ट होय की।।२९।।
या या सर्व जनासी वैर। धन दुःखवी सकळाचे अंतर।।
स्वसुखासी होउनि दुर। फेरे पाडी भवाते।।३०।।
धिग धिग हे जळो धन। या कारणे अरी होती सज्जन।।
सर्वत्राचे दुखवे मन। मानहीन करी की।।३१।।
यालागी ज्ञानवंतान। वेचावे सत्पात्रासि धन।।
सर्व सुखासी निधान। तेणेचि होय।।३२।।
न कळता सरोनि जाय पुण्य। नंतर सकळ वस्तू होती शुन्य।।
स्त्रिया पुत्रादिक पाहती अन्य। न राहति जवळी।।३३।।

अलस्य न करावा या कारण। जवळि असता करावे दान।।
नातरि होउनि दीन वदन। पाहावे लागे।।३४।।
नाही अयुष्याचे प्रमाण। निमिष्यामाजी येइल मरण।।
मग जधील तेथे राहे धन। न ये सांगाते।।३५।।
सिघ्र पेरावे संचित धन। हे परलोके होये साधन।।
सुपात्रासि करावे दान। त्रिकर्ण सुद्धि।।३६।।

**श्लोक।।**

नीचस्यापि चरचटू निरचयंत्यायाति नीचैर्न्नतिं।
शत्रोरण्यगुणात्मनोपि विध धरत्युच्चैर्गुणोत्कीर्तनं।।
निर्विदं न वदंति किंचिदकृतं ज्ञस्यापि सेवा कृमे।
कष्टं कि न पनस्विनोपि मनुजाः कुर्वंति वितार्धिनः।।७५।।

**टिका।।**

द्रव्य अभिळासी जो का नर। तो होउनि निचाचा किंकर।।
नीच कार्य करी निर्भर। द्रव्याकारणे।।३७।।
न पाहे शुभाशुभ न्याय। करि नीचासि विनय।।
निच कृत्य करी संचय। नेणे सोय कदापी।।३८।।
प्रिय वचन बोले निचासी। चटोरपणे सेवि अहीर्णिसी।।
द्रव्य इछुनिया मानसी। दासी सेवा करी की।।३९।।
वानि नीचाचे गुणस्तवन। कीर्ति वारवाणी धूर्त मने।।
दुर्बुद्धि इछुनि अंतरी धन। सेवा करी निचाची।।४०।।
दुर्गुणासि म्हणे हा सगुण। प्रसंषा वाढवि धूर्तपणे।।
मैत्री दाउनि द्रव्य हारण। इछीतसे सदा।।४१।।
कधि न पाहे साधुकडे। निरंतर राहे निचापुडे।।
पाहा द्रव्यार्थि होउनि वेडे। मतिमूढ मानव।।४२।।
घरी आले जरी संत। नमस्कार न करी तयाते।।
द्रव्यार्थी निचापुढे धावत। अहीर्णिसी।।४३।।

तत्रापि जरि असे वैरी। तयासि म्हणे हा हीतकारी।।
द्रव्य इछुनिया अंतरी। परममित्र म्हणे।।४४।।
गुणहीन असे जरि नष्ट। तयासि म्हणे हा गुणाधिक श्रेष्ठ।।
द्रव्यासाठी होय भ्रष्ट। करि कष्ट नष्टाचे।।४५।।
न देइ साधुसी अभ्युत्थान। निचासमोर जाय धाउन।।
प्रिय वाक्य करि सन्मान। धनाच्या अभिळाष।।४६।।
किंचित् कार्य न करी जरी। तयासी म्हणती परोपरी।।
धनाचि आशा धरोनि अंतरी। उपचारी तयाते।।४७।।
निःशंकपणे सेवा निचाचि। करिता लाज न धरी निचाची।।
विश्वामुखी होय तयाची। निंदाची सदा।।४८।।
मी कोण करितो हे काय। हा विवेक तया कदा न होय।।
द्रव्य साचवावे हा उपाय। दिवा रात्रि इछी।।४९।।
जरी असे उत्तम चित। द्रव्य इछा असे मनात।।
प्रार्थना करी निच पुरुषाते। न लाजे कदा।।५०।।
धनाची इछा आसलीया बळकट। मग काय न करी नीच कष्ट।।
देखत देखता होउनि भ्रष्ट। इष्टार्थ पूरवि।।५१।।
द्रव्याचा अभिळाष असता चिती। ते निच कृत्यासी कदा न भीती।।
या कापणे अती प्रिती। अर्थावरी नसावी।।५२।।

**श्लोक।।**

लक्ष्मीः सर्प नीचमर्नवपयः संगादिपां भोजनि।
संसर्गादिवकंटकाकुलपदा न क्वापि दते पदं।।
चैतन्यः विषसंनिरोधेरीव नृणां मझ्यासयत्यंजसा।
धर्मस्छान वियोजनेन गुणीभीः भ्राद्यंतदस्याफलं।।७६।।

**टीका।।**

जरि द्रव्य संचविले गुणी जनानी। तरी पालावे सत्पात्रदानी।।
नातरी निष्फळ केले साचउनी। काग भक्ष जैसा।।५३।।

जेवि अम्र फणादि फळ। सेविती साधू सज्जनादि सकळ।।
उदंड लागे लागोनि निंबफळ।। निष्फळ जैसी।।५४।।

संचइले जरी बहूत धन। न करीता सत्पात्री दान।।
व्रथा दिसे शोभायमान। अर्कफळ जैसे।।५५।।

कमळा क्षिरसागरकन्यका। निचाघरि प्रवर्तेनिका।।
गुणहिन अथवा नपुसका। मंदिरी खेळे।।५६।।

पुर्व सुकृत असे निचाचे। तेथेचि जाउनि लक्ष्मी साचे।।
उदंड दूध शुकराचे। काय पुढे उपयोगी।।५७।।

मीळता क्षारनिधीत शुद्ध जीवन। करिता न ये प्रचनकी अच्मन।।
तैसे निचावाइ असो निधन। कारणी न पडे।।५८।।

कमळलाताच काट जरी। पाइ लागता न थरे धरेवरी।।
तैसे लक्ष्मी न थरे क्षणभरी। झडकरी जाय।।५९।।

विष प्राशिता मनुष्यान। सवेचि होय अचेतन।।
तैसे न साहे पुण्यावीना। धनधान्यादीक।।६०।।

या कारणे गुणीजनानी। धन वेचावे सत्पात्रदानी।।
नातरी होइल थोर हाणी। सुगति हीताची।।६१।।

जाणा देह क्षणभंगुर। संपति संपति अवघीही विनैश्वर।।
क्षणमात्र न करावे अंतर। दयादानधर्मासी।।६२।।

सुपात्री दान करोनि निर्मळ। उत्तम वृक्षाचे घ्यावे फळ।।
संतोषति अन्य जंतु सकळ। तेचि फळ सेउनि।।६३।।

गुणीजनानी संचितार्थ। सुपात्री देउनि व्हावे सुकृतार्थ।।
दवडु नये फळ व्यर्थ। मानव जन्म।।६४।।

तत्रापि केला जरी अलस्य। अयुष्य नासे निमिष्यानिमिष्य।।
केव्हा जाइल हा जीवहंस। हे न कळे काही।।६५।।

अथवा पुण्य नष्टता जाये धन। मग कैसेनि करावे धर्मदान।।
नातरि न मीळता साधुसज्जन। व्यर्थ धन जाहले की।।६६।।

संन्निध असेल जरी संत। तरि सानकुळे न होय चित।।
अथवा अंतराय कर्म पाडी भ्रांत। उन्मत वात होय।।६७।।
सारांश योग्य गुणीजनात। द्रव्य पेरावे सुक्षेत्रात।।
फळला मानवजन्म तयात। नाही तरि निष्फळ।।६८।।

**श्लोक।।**

चरितं चिनुते धनोतिविनयं ज्ञानं न भुय्युनंती।
पुष्णाति प्रशमं तपः प्रबलयत्कल्लासयत्यागमं।।
पुण्यं कंदलयत्यीघं दलयति स्वर्गादधाति क्रमा।
निर्वाणं श्र्यमत्तनोति हितं पात्री पवित्रं धनं।।७७।।

**टिका।।**

द्रव्य वेचिता सत्पात्रासी। सर्व शुभोदयाची होय रासी।।
अधिकारी होय सर्व सुखासी। तो पुण्यमुर्ती।।६९।।
जै सुक्षेत्रि पेरिता बीज निर्मळ। प्राप्त होय उत्कर्ष फळ।।
तैसे सत्पात्रदानि सकळ। होति शुभोदय।।७०।।
सुक्षेत्री निक्षेपिता वस्तु पवित्र। विस्तारे बहु शुभ चरीत्र।।
स्वये होउनि पुण्यपात्र। विचित्र सौख्य भोगी।।७१।।
जे परिता उत्तम क्षेत्री बीज। तेचि फळ होय तयासि सहज।।
सेवा करिती राजाधीराज। दानप्रभावे।।७२।।
वर्धत होति विनय गुण। अर्जन पर जन मनोधारण।।
विश्वजनासि प्रियाभिरमण। सुपात्रदान होय।।७३।।
सुर्योदइ जाय अंधार। तैसे अज्ञान मिथ्या हरे।।
उदय होय ज्ञानभास्कर। प्रचूर सत्पात्रदान।।७४।।
क्रोधादी कषाय होति शम। दलन होय अनादि श्रम।।
सुपात्रदाने हरति भ्रम। संसारदुःखाचा।।७५।।
तये गुणाची होय वृद्धी। सन्निध तिष्ठति सकळ रिधि।।
सुपात्रदानी वस्तु त्रिशुधी। योजीता होय।।७६।।

परमागमाचा होय उल्हास। वर्धेनिजात्मगुणी अभ्यास।।
करिता सुपात्री दान संतोष। जाती दोष स्वभावे।।७७।।
सर्व पुण्याच्या होति राशी। क्रूर देवता होती दासी।।
स्वधन वेचिता सुपात्रासी। पापराशि नाशति।।७८।।
दुष्कर्माचे होय दलन। पुष्टति सर्व वीधीविधान।।
पवित्र पात्री विचिता धन। नाना साधने होति।।७९।।
अयास न करिता लाभे स्वर्ग। स्वभावेचि पळती घोरोपसर्ग।।
साध्य होती दुर्घट दुर्ग। पात्रदान प्रभावे।।८०।।
भोगोनि विषय सुरवासी कारण। शुभाशुभाचे करोनि हरण।।
क्रमे क्रमे लाभे निर्वाण। पात्रदान प्रभावे।।८१।।
सत्पात्रासी वस्तु योजिता। सर्व शुभाची होय उदयता।।
संपूर्ण चंद्र उदय होता। भरती येई सागरा।।८२।।
या कारणे गुणी जनानी। धन वेचावे सत्पात्र दानि।।
सकळ सुखाचा होउनि धणी। अक्षय सुख भोगी।।८३।।

**श्लोक।।**

दारिद्र्यं नत मीक्षते न भजते दौर्भाग्य मूळं षते।
नाकीर्ति न पराभवो भिलशते न व्याधिरास्कंदते।।
दैन्यं नाद्रियते दुनोति न धरः क्लेशंति नैवापदः।
पात्रे यो विनयत्यवनर्थदलवं दानं निदानं श्रया।।७६।।

**टिका।।**

सकळ ऐश्वर्यासि निधान। सुभ मंगळासि येक स्छान।।
करीता सुपात्रासी दान। सर्व मान्य तो होय।।८४।।
विवीध अनर्थासि दलन। अनादि शुभ कर्माचे गलन।।
सुपात्रदानि योजिता धन। वर्धमान जगात।।८५।।
अहो सुवस्तुस पात्रापुढे। अर्पिता पुण्य जोडे रोकडे।।
दरिद्र न पाहे तयाकडे। जाय भडकोनि।।८६।।

सुपात्रासि वस्तु अर्पिता योग्य। स्पर्श न करि कदा दुर्भाग्य।।
अहीर्णीसी न सोडी सौभाग्य। तया पुरुषासी।।८७।।
अपकिर्ति न अवलंभे कदा। येश कीर्ति व्यापे सदा।।
सुपात्री वस्तु अर्पिता सदा। जाय बाधा पळोनि।।८८।।
सुपात्रि दान करीता सुभावे। स्वप्नातही न दिसे पराभवे।।
इछीतार्थ पुरति स्वभावे। तया मानवाचे।।८९।।
पात्रि दान करिता त्रिसुद्धी। न पाहे तयासि कदा व्याधी।।
वर्धमान होय शुद्ध बुद्धी। पात्रदान प्रभावे।।९०।।
आहो कोणि येक मानवान। सुपात्रदानी योजीता धन।।
दैनत्व सिघ्र जाय पळोन। न राहे पुडे।।९१।।
सुपात्री योजिता वस्तु निचय। ह्रदइ न वसे तयाचे भय।।
सर्व विरिष्ट होउनि निर्भय। अक्षय सुख भोगवि।।९२।।
सुपात्रि याजिता विशेष। अपदा न करिती तयासि क्लेश।।
सुखार्णवि होये संतोष। सदा सर्वदा।।९३।।
सत्पात्रासि वस्तु विशेष। देता सर्व अशुभाचा होय नाश।।
दुःख शोकादिक क्लेश। अशेष न राहति।।९४।।
या कारणे चतुर्विध। दान करावे त्रिकर्ण शुद्ध।।
तरिच लाभे स्छान निर्बाध। हाचि बोध सर्वासि।।९५।।
हा जाणोनि तात्पर्यार्थ। सुपात्रदानि योजावे स्वअर्थ।।
हाचि जाणावा धर्मार्थ सार्थक जन्माचे।।९६।।

**श्लोक।।**

लक्ष्मि कामयते मति मृगयति कीर्तिस्तमालोकिते।
प्रीतिश्चुंबति सेवते सुभगतां नीरोगतां निलींगति।।
श्रेयः संहरतिर्भ्युपैति वृणुते स्वर्गापभोगस्छिती।
मुक्तीर्वाछति प्रत्ययछति पुमान् पुण्यार्थमर्थं निजं।।७७।।

**टिका।**

ऐका कोणी येक पुरुषान। मनि पुण्यहेतु धरुन।।
सत्पात्री वेचावे धन। निजभक्तिभावे।।९७।।
गुणि जनि उपार्जिले वित। सुभावे पेरील्या सुक्षेत्रात।।
सकळ सौभाग्य होय प्राप्त। पात्रदान प्रभावे।।९८।।
लक्ष्मी इछीतसे मानसी। नीसिदिनी राहावे तयापासी।।
भोगोपभोगाच्या राशी। भोग उतराया।।९९।।
मति धुंडाळिती तयासी। अखंड ह्रदइ राहावयासी।।
सुचना जैसी सुर्योदयास। अरुणोदयपुर्व।।१००।।
निरसोनि जाय कुमतीत। प्रकाश होय सुमति उत्तम।।
तुटोनि जाय अज्ञान भ्रम। पात्रदान करुनिया।।१।।
कीर्ति पाहे तयासी हरुष। अपकीर्तिचा होय नाश।।
देशेदेशी पसरे येश। विशेष पात्रदाने।।२।।
प्रिति अनंदे चुंबिती। प्रीय होय विश्वाप्रती।।
असुर देवादि सेविती। पात्रदान प्रतापे।।३।।
सेवा इछिती सौभाग्यता। समिप न राहे दुर्भाग्यता।।
उतम वस्तु पात्री इछीता। सकळ भाग्य लाभे।।४।।
उल्हास अरोग्यता येउन। प्रमे(मो)दे देतसे अलिंगन।।
उतम पात्रि वेचिता धन। स्वकष्टार्चि(र्जि)त।।५।।
रोग न राहे तयापासी। देखोनि दूर पळे तयासी।।
भाजन होय सर्व सुखासी। सत्पात्रदाने।।६।।
उदय होति सकळ ऐश्वर्य। संपुर्ण पर्याप्ती सौंदर्य।।
होउनि सकळामाजी वर्य। साम्राज्य भोगी।।७।।
अहो स्वर्गभोगाच्या स्छिती। भावे तयासी इछीती।।
भोगभुमी मार्ग लक्षिती। अहीर्णिशी तया।।८।।
मुक्ति वंछिति निरंतर। न सोडि कदा तया चाकर।।
होउनि संसार दुःखा इतर। सुख सागर भोगी।।९।।

पुण्य निमित्त कारण। सुपात्रि योजीता धन।।
शुद्ध करूनिया वाङ्मन। होय स्वस्छान सुखाली।।१०।।
हे ऐकोनि गुणीजनानी। अशा धरु नये किमपी मनी।।
संचितार्थ वेचावे सत्पात्र दानी। आहे तोपर्यंत।।११।।

**श्लोक ।।**

तस्यासन्नारनीरनुचरिकीर्ति रुत्कंठिताश्रीः।
स्निग्धा बुद्धि परिचयपरा चक्रवर्तित्व लक्ष्मी।।
प्राणौप्रास त्रिदिकमलकामुक्तिसंपत्।
सत्यक्षे त्र्यावपतिविपुलं वितयः बीजः निजाका।।७८।।

**टीका**

अहो कोणी येक गुणीजन। कूशळ उपाये संचविले धन।।
तरी ते पेरावे पाहोनि स्छान। पवित्र भुमीमाजी।।१२।।
तव शिष्य म्हणे जे स्वामी। सांगावी माते पवित्र भूमी।।
पुण्यसंचय होय नेमी। उपाय ऐसा सांगा।।१३।।
गुरु वचन बोले पवित्र। ऐकावी अता सप्त क्षेत्र।।
पुण्य लाभे श्रवणमात्रे। तेचि पात्र सांगतो।।१४।।
जिनप्रतिमा जिनागारे। जिनशास्त्र अध्यात्म सारे।।
रुषिगणादि संग च्यार। सप्त क्षेत्रे जाणा ही।।१५।।
त्या भुमीमाजी पेरिता धान। पीक होय अचंबा गहन।।
प्राप्त होति निधी निधान। पात्रदान प्रतापे।।१६।।
या भुमीमाजी वस्तु निर्मळ। पेरीता पीक होय विशाळ।।
विवीध पुण्याची येति फळे। सकळ अभ्योदय।।१७।।
प्रीतीदेवी असे समीप। वर्तवी विश्वासी प्रीयरूप।
कठोर भावाचा करवी लोप। प्रीय देवता पाहे।।१८।।
कीर्तिदेवि हिंडे मागे। जिकडे जाय तिकडे संगे।।
सुवस्तु पेरीता यथासांग। सप्त क्षेत्रामाजी।।१९।।

लोकत्रयाची संपति। अति उल्हासे सेविती।।
करुणाभावे सुपात्राप्रति। देता दान निरवेद्य।।२०।।
आइका श्नेह वर्तेबुद्धि। न सोडुनि जाय तयासी कधी।।
अहीर्णिसी तीष्टति सिद्धी। तया पुरुषाजवळी।।२१।।
साम्राज्य लक्ष्मी वरचेवर। प्रियत्वे करितसे उपच्यार।।
जवळीच राहे निरंतर। न सोडि कदा।।२२।।
कर्तळी आहे स्वर्गरमा। पुन्ह पुन्हा पाहे पुरुषोत्तामा।।
म्हणे नीच गतिची जाहलि सिमा। याया पुरुषाची।।२३।।
मोक्षरमा इछीत निरंतर। धन्य धन्य म्हणे प्रियकर।।
करुनि घालावा कंठि हार। या सद्गुण मणिचा।।२४।।
ऐका सर्व अभ्योध्य। सकळ मंगळाचा उदय।।
सप्तक्षेत्रि करिता लय। संचित धनाचे।।२५।।
स्वकष्ट उपार्जिले धन। सप्तक्षेत्रि पेरीलेया वाचुन।
सार्थ नव्हे द्रव्य मेळउन। उपाया अन्य न केलिया।।२६।।
या कारणे ज्ञानवंताने। सप्तक्षेत्री वेचावे धन।।
सार्थक करावे जन्मा येउन। ना तरी व्यर्थ।।२७।।
पुर्वकृत सुकृत फळे। प्राप्त होति वस्तु सकळ।।
पुन्हा पुण्यार्थि पेरावे निर्मळ। सप्तक्षेत्रामाजी या।।२८।।
जोवरि असे पुण्य साहे। तोवरि पेरावे लवलाहे।।
सरता जाइल काही न राहे। हे सत्य सत्य।।२९।।
दान करावे चतुर्विध। आहार अभय अणी औषध।।
शास्त्रदाने करावे बोध। भव्य जिवासी।।३०।।
जयासि पुण्याचे कारण। तरि नवविधा भक्ति सप्त गुण।।
पवित्र पात्रि करितार्पण। उत्तम वस्तुचय।।३१।।
धा(दा)तृ पात्र विशेष दान। जरि मिळता दोघे समान।।
प्रत्यक्ष ते क्षणी वर्षेधन। होती पंचाश्चर्य।।३२।।

करूनि पात्रापात्र विचार। सुपात्री पेरीता वस्तु सार।।
अतीषय पुण्यफळ प्रचुर। निर्भर पीक होय।।३३।।
ऐका जगप्रसिध दृष्टांत। स्वातीबिंदु सिपि सिंपल्यात।।
पडता मोतियेकी कालुयेकात। पाहा प्रत्यक्ष।।३४।।
तोचि बिंदु कमळपत्रात। मौक्तिकासम टाळ देत।।
तृणपत्रावरील त्वरित। नासोनि जाय।।३५।।
सर्पामुखी होय विष। प्रत्यक्ष करी प्राणनाश।।
अन्य ठाइ पडता अशेष। व्यर्थची जाय।।३६।।
याचि परि पाहावे बरे शोधुनी। पात्रात्री विशेष गुण।।
सुपात्री वेचावे उत्तम धन। सारांष खुण हेची।।३७।।
त्रुण घालीता गाइसी। सवेचि क्षीर देइ तयासी।।
क्षीर पाजीता सर्पासी। वीष होय प्रत्यक्ष।।३८।।
यापरि अनेक देता दृष्टांत। ग्रंथ वाडत जाय बहुत।।
यालागी स्वल्पची केले निरोपित। पाहावे यातची।।३९।।
द्रव्य असलीया ग्रहस्तानी। निर्लोभ वेचावे पात्रदानी।।
नातरि होइल थोर हाणी। न राहे द्रव्य।।४०।।
दान संसारामाजी हार। सुख भोगवि उतरोत्तर।।
नातरि वर्जोनीया लौकर। तप करावे सुखे।।१४०।।

इति श्री दानफल नीरूपणं नाम अष्टादशोध्यायः।।

मंगल महा श्री।। श्री।। श्री।। श्री।। श्री।। छ।। छ।। छ।।

* * *

## एकोणविंशतीतम अध्याय

**।। श्री नेमीनाथाय नमः।।**

भयचकीत होउन मन। पूसते जाहले श्रोते जन।।
स्वामी केले आम्हासी पावन। दाखविला मार्ग।।१।।
ऐकोनि दानाचे महिमान। जाहले पवित्र समाधान।।
अता पुढे काय साधन। ते सांगावे स्वामी।।२।।
तीर्थेश्वरादीक समर्थ। संसार सांडुनि जाले निग्रंथ।।
काय अधीक अस अर्थ। ते यथार्थ सांगावे।।३।।
तव हस्य वदन बोले मुनि। बाप हो तपाचरणाची ऐका काहणी।।
संसारदुःखाची होय धुणी। क्लेश स्वप्नी न राहे।।४।।
संसारी जरि सुख जाडे। तरि का सेविले गिरीकडे।।
चक्रादि संपती होउनि गाढे। का वेढे म्हणावे।।५।।
सांगता तपाश्चरणाची महिमा। त्रिजगि तयासि नाही उपमा।।
परि वचनार्थी दृष्टांत सिमा। सांगतो स्वल्प।।६।।

**श्लोक।।**

यत्पुर्वार्जितकर्मशैलकुलिशं यत्कामदावानलं।
ज्वालज्जालजलं यदुक्तकरणग्रामाहेमत्राक्षरं।।
यत्प्रत्यूहतमःसमूहदिवसं यं लब्धिलक्ष्मीलता।
मूलतद्विधं यथाविधीतपः कुर्वीत वितं स्पृहः।।७९।।

**टीका ।।**

पूर्वसंचित कर्म महापर्वत। विविध दुःखबीज वसे तयात।।
तव वज्रगदा अत्यद्भुत। करी घात तयाचा।। ७।।
सद्गुणगणाचे तरु सकळ। दहन करि काम दावान्नळ।।
तपाचार महामेघजळ। करी निर्मुळ तयाचे।।८।।
इंद्रियगण दुष्ट भुजंग। क्षणोक्षणी डंकीति अंग।।
करावया तयाचे विषभंग। तप गरुड मंत्र।।९।।

महाविघ्नाचा तमांधकार। दुःख भोगवि अति दुर्धर।।
विदारी तयासी भास्कर। तपाचार पाहा हो।।१०।।
कोणी येक तपाचारे निर्मळ। ते लब्धिलताचे मुळ।।
विवीध सौख्याची पुष्पफळे। येताति तेथे।।११।।
बाह्याभ्यंतर द्विवीध। तप करावे त्रिकर्ण शुद्ध।।
तेणेची प्राप्त होय निजबोध। अलभ्य लाभे।।१२।।
परिग्रहा त्यजोनि उभयत। तप करिता निस्पृहत्व।।
प्राप्त होय परमतत्व। प्रभाव तपाचा।।१३।।
अनुशन अणी अवमौदर्य। वृतिपरिसंख्या रस त्यागवर्य।।
विवीक्त सैनासन कायाक्लेशार्य। बाह्याचार तप।।१४।।
अनुसन म्हणिजे निराहर। करावे अपुल्या शक्त्यानुसार।।
साधन कार्य सारासार। सर्व घडोनि येति ।।१५।।
संख्या करावि पदार्थाची। अमुक वस्तु अथवा ग्रामाची।।
वना ग्राम गल्ली मंदिराचि। करावि संख्या।।१६।।
करावा पंचरसाचा त्याग। अथवा येक दोन वर्जावे निःसंग।।
दुष्कर्माचे होती भंग। यया तपाने।।१७।।
युक्त करावे व्यसनासन। जंतु रक्षावे दया करून।।
सर्व पुण्यकर्म संपादन। तेणेचि होति।।१८।।
कायाक्लेश तपाचार। निसंग करावे शुद्ध अंतर।।
क्षुधा तृषादि शीतोष्ण थोर। दुर्धर साहावि।।१९।।
हे जाणावे बाह्यतप। अवघे दुष्कर्म याणे लोपे।।
नाग नर सुरादि पुण्यरुप। प्राप्त होय याणे।।२०।।
येकयेक तपाचा विस्तार। करिता वाडे ग्रंथ थोर।।
या कारणे स्वल्प विचार। सांगीतला येथे।।२१।।
आता ऐकावे अंतर तप। प्रायश्चित विनय सद्गुणरूप।।
वैयाप्रति अणी स्वाध्याय तप। नाही माप ध्यानासी।।२२।।

उत्सर्ग तप नाही गणीत। जरि केले वीधीयुक्त।।
तरि त्वरीतची होय मुक्त। अगमोक्त करिता।।२३।।
उठता कुबुद्धिचा अंकुर। उपडूनि टाकावा सत्वर।।
तेचि प्रायश्चीत तपाचार। अंतरी पाहावे।।२४।।
काही येक होता अपराध। उच्चारावे गुरुसन्निध।।
तद्योग प्रायश्चीत्त बोध। ऐकोनि करावे।।२५।।
पंचगुरुसि करावे विनय। निजगुरुसि तोचि उपाय।।
सम्येज्ञानादि रत्नत्रय। विनयभाव असे।।२६।।
श्रेष्ट संगाची वैयाप्रति। सेवा सत्कार कूशळ युक्ती।।
तत्वाध्यायन शुद्धमति। करित असावे।।२७।।
सर्व चित्ताचा निरोध। तोचि जाणावे ध्यान शुद्ध।।
ध्यान तपाचा हाचि बोध। बोलिले मुनि।।२८।।
काया वाङ्मनाचा योग। न स्पर्शता आलीत्य निःसंग।।
ते जाणावे कायोत्सर्ग। अंतर तप।।२९।।
हे जाणा तप द्विविध। बाह्याभ्यंतर द्वादश भेद।।
पद लाभे अव्याबाध। त्रिशुद्धी करिता।।३०।।

**श्लोक।।**

यस्मद्विघ्नपरंपरा विघटति दास्यं सुराः कूर्वते।।
कामः शाम्यतिंद्रियगणः कल्याणमुत्सर्पते।।
उन्मीलंति महर्धयः कलयति द्दसंचयः कर्मणः।
स्वाधिनं त्रिदिवं शिवं त भवती श्लाघ्यं तपस्तेनकी।।८०।।

**टीका।।**

अनंतानंत भवसंतान। परंपरि अंतराय कर्म गहन।।
महाविघ्नाते करिल दहन। तप माहा सामर्थ।।३१।।
अहो कोणी येके कारणे। तपाचरिता शांत गुण।।
दास्य करिती सुरासुरगण। मग कोण न करी।।३२।।

तपाश्चरणाचे महिमे। उपशमे होय तीव्र कर्मे।।
सर्व शांत गुणाचे अराम। स्वभावेचि होय।।३३।।
दम शमन होति इंद्रियगण। प्रगट होति उत्तम गूण।।
सर्व सुखासी कारण। तयाविण नाही।।३४।।
तप अचरताचि प्रबळ। उदय येती सर्वेमंगळ।।
शेवा करि महा काळ। तपबळे करूनि।।३५।।
बुद्धि औषधादी महावृद्धी। अनंत गुणाची समृधी।।
तपबळे सकळ सिधी। प्राप्त होती।।३६।।
विवीध कर्माचे समुदाय। क्षणक्षणी करिती अपाय।।
येकचि सरे दलन होय। तप महात्म।।३७।।
स्वर्गादि सुखाचे प्रकार। स्वाधीन होती निरंतर।।
(अ)हमिंद्रादि पदासि सचगार। तपाचार धन।।३८।।
तपाश्चरणासि द्यावया साक्ष। त्रिजगामाजी नाही दक्ष।
प्राप्त होय तेणे मोक्ष। मग काय न होय।।३९।।
काय श्लाघ्यता न करि तप। उदय होय ज्ञानदीप।।
लाभ स्वभावे स्वस्तरूप। तपप्रभावे।।४०।।

**श्लोक।।**

कांतारं नयती तरोज्वयुतं दक्षो दवाग्नि विना।
दावाग्निं न यथा परः शमयितुं शक्तो विनांभोधरः।।
निश्रांतः पवनं विना निरशितं नान्यो यथांभोधरं।
कर्मोघं तपसा विना किमपरं हर्तुं समर्थ तथा।।८१।।

**टिका।।**

दुर्धर कांताराचे दहन। कोण करि दावाग्निवाचुन।।
तैसे कर्म अवघे तपसाविण। अन्य कोण जाळी।।८४।।
जरि पेटला दावान्नळ। तो कोण विझवि मेघावेघळे।।
तैसे तपावीण कर्म सकळ। कोण करि शांत।।४२।।

अति वर्षेजरि मेघजळ। कल्होळ करि जन सकळ।।
अहो तो कोण वार्याविगळ। निरशी पाहो।।४३।।
तैसे अनादि कर्माचे संतान। क्लेश भोगवी जीवालागून।।
कोण करी तयाचे निर्शन। तपावाचुनिया।।४४।।
समस्त कर्माचे प्रकार।दुःख भोगवि वारंवार।।
करावया विदारण येकसरे। तपावितर नाही।।४५।।
नाग नर सुरादिक थोर। भोगती कर्मचक्राचे फेरे।।
तपावाचूनि समर्थ इतर। नाही नाही अन्य।।४६।।
करावया कर्मचक्राचे खंडण। तपावितरिक्त नाही कोण।।
सदा सेवीती देवगण। कारण हेची।।४७।।
यालागी महामहा समर्थ। राज्य टाकोनि जाहले निग्रंथ।।
साधिले तपाचार परमार्थ। मुक्त जाहले कित्येक।।४८।।
देव तयाचे होति किंकर। निर्बंध चाले राज्यभार।।
कोणी न करिती तयासी वैर। यया धरातळी।।४९।।
ऐसे सोडोनि राज्यभार। तेही जाहले दिगांबर।।
सुखे साधुनीया तपाचार। मुक्त जाहले अनंत।।५०।।

**श्लोक।।**

संतोषः स्छुलमूलः प्रशम परिकरस्कंदबंदप्रपचः।
पंचाचारौद्ये शाखा स्फुरदभयशालसंपत्प्रवालः।।
श्रद्धांभःपूरसेकाद्दिपुलकुलबलैश्वर्य सौदर्यभोगः।
स्वर्गादीह्मासिपूर्वीः शवपदफलदः स्यातपः कल्पवृक्ष।।८२।।

**टिका।।**

ऐका तपश्चरण कल्पवृक्ष। इछितार्थ सौख्य द्यावया प्रत्यक्ष।।
तप त्रिजगामाजी दक्ष। अन्य साक्ष नाहीची।।५१।।
तप संतोषवृक्षाचे मुख्य मूळ। सम्यक्त मुळ्या पसरती सकळ।।
संतुष्ट अंकूर दिसे विशाळ। न ये तुळीता अन्य।।५२।।

प्रसम समुदायाचा संग। प्रशस्त तरू वाढे प्रपंच बंध।।
विशाळ शांत गूण शोभे शुद्ध। उपमा अतुल्य।।५३।।
पंचाचार शाखा उतुंग। विवीध चरित्र यथासांग।।
समीती गुप्त्यादि नाना अंग। शोभे सुंदर।।५४।।
उपमा परिवार शाखाचे प्रकार। सकळ गुणी विराजिती सुंदर।।
उपमा देता न ये भास्कर। अप्रतिराजीत।।५५।।
अभय कोमळ परत्र राजिति। अभय देताती भाविकाप्रति।।
नाभि नाभी होईल मुक्ति। सांगति यापरी।।५६।।
शीलसंपतिचे पल्लव। विलसती सुंदर स्वभाव।।
जना सुचविति परत्र वैभव। स्वभाव हाची।।५७।।
श्रद्धा स्वभावगुण उदक। पिउनिया तरुष्ट विवेक।।
जे इछितार्थ सौख्यदायक। नाग नर सुरा।।५८।।
विपुल सौंदर्य भोगोपभोग। कुल बल ऐश्वर्य सर्व संग।।
स्वर्गादि संपति यथासांग। पुष्पे शोभती।।५९।।
अनुपम्य सुखाचे मोक्षफळ। तरुवर माथा देत ढाळ।।
उपमा देता त्रिभुवनी सकळ। न मिळे कधी।।६०।।
ऐसा तपाचार कल्पवृक्ष। सकळ शुभ मंगळ उभय पक्ष।।
न कळुनि अज्ञजन अदक्ष। जाहला अभव्य।।६१।।
या कारणे ज्ञानी जन। तप करूनिया शुद्ध मन।।
परमामृत भावना भाउन। सुख सदन पावले।।६२।।

ईति श्री तपाचार निरूपणन्नाम एकोनविंशतीमो अध्यायः।।

मंगलं महा।। श्री।। श्री।। श्री।। श्री।। छ।।

* * *

# विशंतीतम अध्याय

श्री जिननाथाय नमः।।

तव इतुकीयानंतर। श्रोती जोडुनि दोनी कर।।
स्वामी तपाचा महिमा थोर। नाही पार तयाचा।।१।।
अता आत्मभावना महापवित्र। ऐसे बोलती सर्व शास्त्र।।
काय असे तेथे विचीत्र। कृपामुर्ति सांगीजे।।२।।
मुनी बोले करुणावचन। सोपे नव्हे बा अत्मज्ञान।।
ते सर्वामाजी महागहन। तेचि स्छान मोक्षाचे।।३।।

**श्लोक।।**

निरोगी तरुणीकटाक्ष तमिव त्यागव्यपीतप्रभौ।
सेवाकष्टमिवोपरोपणमिवांभोजन्मनामश्मनी।।
विष्वग्वर्षमिवोषरक्षततळिदानार्हदर्चातपः।
स्वाध्यायध्ययनादिनिः फलमनुष्टानं विना भावना।।८३।।

**टीका।।**

उभय माहि निचे संतान। जरि जाहले असेल गलन।।
तरि प्राप्त होइल ते ज्ञान। ना तरी दुर्लभ।।४।।
नाना साधन ही सकळ। भावना इतर ही निष्फळ।।
जैसी जाणा सावरिचि फळे। केळासमान दीसति।।५।।
सर्व सुखाचे कारण। सकळ सारासार पूर्ण।।
योगी जनाचि निज खुण। भावना तत्व।।६।।
जैसे कुटिल स्त्रीचे कटाक्ष चपळ। वैराग्यापुढे होति निष्फळ।।
तैसे भावनाविणे सकळ। वीफळ जाणा।।७।।
कृपण प्रभुचि सेवा येकनिष्ट। करीता होति वृथा कष्ट।।
तैसे भावनाविना उपाय श्रेष्ठ। निष्फळ पाहे।।८।।
बहुत उपाय करुनि कुशळ। पाषाणावरि वोपिता कमळ।।
अवघे कष्ट होति निष्फळ। तद्वत जाणा।।९।।

क्षारभूमिवरि सकळ। निरंतर वर्षेमेघजळ।।
वृथाचि होय निष्फळ। तृणबीज न वोपे।।१०।।
जे परमतत्व भावना इतर। दानार्दि देवार्चा तपाचार।।
ते सर्व कष्ट जाणा निसार। संसार न चुके।।११।।
अथवा स्वाध्याय अध्यायन। नातरि नाना विधिविधान।।
व्यर्थ श्रम भावनावाचुन। कणाविण फोल।।१२।।
या सर्वासि अधार येक। परमात्मा भावना अलोली(की)क।।
अहीर्णिसी अभ्यास विवेक। पुन्ह पुन्हा करावा।।१३।।

**श्लोक।।**

सर्व ज्ञिप्सति पुण्य विप्सति दयां दित्सत्यंघं मिप्सति।
क्रोध दित्सति दान शील तपसां सापल्यमादित्सति।।
कल्याणोपचयं चिकीर्षति भवांभोदेस्तटं लिप्सते।
मुक्तिस्त्रे परिलप्सते यदि जनस्तद्भावयेद्भावनां।।८४।।

**टीका।।**

अहो कोणी येक जन भाविक। उपाय इछा असे जरि अनेक।।
तरि करावा शीघ्र विवेक। तत्वातत्व विचार।।१६।।
सुज्ञानाचा व्हावा प्रकाश। ऐसे इछी जरी मानस।।
तरी भावना स्वभावा विशेष। प्राप्त होय तयाने।।१७।।
उदंड पुण्याचा संचय। निच कर्माचा व्हावा क्षय।।
ऐसे जरी इछी उपाय। तरी भावि तत्व।।१६।।
क्रोध मान माया लोभ हे च्यार। नासुनि जाय येकसरे।।
ऐसे इछी जरी अंतर। तरी भावना भावी।।१७।।
सफळ व्हावे कृत दान। कृत शीलादि संपादने।।
नाना अनुष्टानादि साधने। तरी भावना भावी।।१८।।
अथवा इछी विवीध जय। द्रव्य भावादी नाना तप।।
तरी भाविगा निजस्वरूप। हरति ताप भवाचे।।१९।।

सकळ कल्याणाचा उदय। व्हावा ऐसीच इछा होय।।
तरि करा हो भावना उपाय। उत्साह होय सर्व।।२०।।
पार व्हावा भवसागर। ऐसी इछा असे जरि तर।।
भावना भावावी निरंतर। तरीच पार होय।।२१।।
अभीळाष असे मोक्षसुखाचा। क्षय इछी संसारदुःखाचा।।
तरि शुद्ध करुनि काय मन वाचा। भावना भावि।।२२।।
भावना भावावि भाविकजने। तरि सफळ होति सर्व साधने।।
अवघी क्रिया सफळ होउन। येति स्वाभावे।।२३।।
नातरि अवघीच होति निष्फळ। याग यज्ञादि पुजा सकळ।।
जैसा अर्भकाचा जाणा खेळ। तदुपरि सर्व।।२४।।

**श्लोक।।**

विवेक वनसारीणीं प्रशम शर्म संजीवनीं।
भवार्णवमहातरीं मदनदावमेघावलीं।।
चलाक्षमृगवागुरी गुरुकशायशैलाशनी।
वीमुक्तीपथवेसरी भजत भावना किं परैः।।८५।।

**टीका।।**

सकल अनर्थाचा नाश। दलन व्हावे अवघे क्लेश।।
ऐसे इछी जरि मानस। तरि भावना भावी।।२५।।
विवेक मला सिंपावया पाट। शुद्धोदक प्रवाह वाहे निट।।
अनंत गुण राजिती दाट। भावना आरामी।।२६।।
उपशम गुणासी स्छान एक। उपशांत होति दुर्भाव अनेक।।
स्वाधीन सुख प्रदायक। भावना पाहो।।२७।।
उतरावया संसारदुःख जलधी। निवृती व्हावी सर्व उपाधी।।
अत्मभावना परमसमाधी। यानपात्रासमान।।२८।।
मदन तिष्ट दावान्नळ। भस्म करी सद्गुण सकळ।।
शम करावया हे मेघजळ। निर्मळ भावना।।२९।।

चंचळ इंद्रियमृगगण। विदारिती व्रत नेमादि महागुण।।
तत्पायासी सकळ बंधन। भावना महापाश।।३०।।
दुर्धर कषाय महानाग। क्रोध मान माया लोभ तुंग।।
त्याते करावयासि भंग। वज्रगदा भावना।।३१।।
मोक्षमार्गी चालावया वेगे। विश्वभार घेता न भागे।।
अप्रतिबळी जात्या तुरंग। निःसंग भाना।।३२।।
द्यावयासि भावनासि दृष्टांत। उपमा नाही त्रिजगात।।
परि सुचविले किंचित। जाना ते बोधावया।।३३।।
ऐसी भावना अनुपम। सहजी भाविता निरसे भ्रम।।
काया करावे वृथा श्रम। तयाविण अन्य।।३४।।
भावना इतर अनुष्टान। अथवा केले विवीध दान।।
भावनावीण प्रतिमापूजन। प्रयोजन काय।।३५।।
भावना भावि स्वस्त चिते। विवीध उपाय करून युक्त।
तरीच प्राप्त होईल त्यासी मुक्त। नातरि दुर्लभ।।३६।।

**श्लोक।।**

घनं दतं वितं जिनवचनमभ्यस्तमखिलं।
क्रियाकांडं चंडं रचितमवनैसुप्तमसुवृत।।
तपस्तिव्रं तत्पचरणमपचीर्णं चिरतरं।
न चे छेते भावस्तुषुवपवनवत्सर्वमफलं।।८६।।

**टिका।।**

धन अनर्घ्य वस्तुविधीत। सर्वहि केले जरी दत।।
तरी भावनावीण व्यर्थ समस्त। मुक्त न होय कदा।।३७।।
जिनागम अभ्यास सर्वकाळ। पढे जरी शास्त्र सकळ।।
तरि ते जाणावे निष्फळ। भावनाविण।।३८।।
तीव्र तनु मन प्रचंड। त्रिकाळ करि क्रियाकांड।।
तरी भावना विना निष्फळ मुंड। शिरावीण जैसे।।३९।।

निरावर्ण भूमीवर। निसिदिनि जे सोडूनि वैर।।
सर्वही निष्फळ भावना इतर। निरार्थक।।४०।।
चारीत्र पाळीजे निर्मळ। पवित्र व्रत महाकुशळ।।
भावना विना दया सकळ। निष्फळ तेचि।।४१।।
विवीध तप करी चिरंतन। कायाक्लेशादि दंडण।।
धरुनि बैसे जरी मौन्य। तरि न फळती।।४२।।
आत्मा भावनेनिण सकळ। ही आवधी जाणावी नीष्फळ।।
शीणमात्रे येती फळे। संतोष न होय।।४३।।
कष्ट करुनिया बहुत। कोंडा पेरिला जरि शेतात।।
तरि काय फळ येइल त्याते। पाहावे शोधुनी।।४४।।
भावीक जन ऐका सर्व। भावना भावी त्यजोनी गर्व।।
हे सर्व पर्वामाजि पर्व। सर्व तोषदायक।।४५।।
हे ऐकोनि श्रोते जन। भावे पुस्ती कर जोडुन।।
स्वामी सांगावे कृपा करून। भावना रूप।।४६।।
तव मुनी ब(बो)ले दिव्य वाणी। भावना न सापडे शास्त्र स्त्रिपुराणी।।
ते शोधावे अंतःकर्णि। स्वसंविती बळ।।४७।।
काया मी म्हणउनि जाणणे। हे तो बहिरात्माचे लक्षण।।
कायावेगळे मी अहे कोण। हीच खुण जाणावि।।४८।।
काया नाशीवंत जड अस्बीर। ऐसि बोलति लाहन थोर।।
मग कैसे म्हणावे मी शरीर। हा विचार पाहावा।।४९।।
आत्मा अनादि अनेश्वर। उत्पन्न होती जाती शरीर।।
परि जैसा तैसा निरंतर। आखंडचि आहे।।५०।।
**श्लोक।।**
आनादिनीदनं दृव्यं स्वपर्याय प्रत्यक्षणं।।
उन्मज्जंतीन्निमंजंती जलकल्लोलवज्जले।।८७।।

**टीका।।**

आयुष्य कर्माचे अवसानी। आत्मा जाय शरिर टाकोनि।।
हे तो दिसे सर्वा लोचनी। प्रत्यक्ष पाहावे।।५१।।
मी तरी नव्हे हे शरिर। शोधु लागे अभ्यांतर।।
तोचि सर्व कल्पविचार। अंतरात्मा जाण।।५२।।
संकल्प विकल्पाचे तरंग। ज्ञानबळे वर्जिता भंगे।।
उठती दिसती नाना रंग। होति स्वभावे।।५३।।
जे जे दिसते सर्व मुर्त। आत्मा अविनाश असे अमुर्त।।
दृश्य पदार्थ नाशे तूर्त। निज वस्तु उरे।।५४।।
वर्जिता होय जितके इतर। ते जाणावे अवघे पर।।
दष्टा शाश्वत निरंतर। राहे आपण।।५५।।
मग मीच पाहे तो परवस्तुस। सर्वापासुनि परता असे।।
हा सर्व कल्पाचा नाश। ज्ञानरूपी मुरावा।।५६।।
वृत्ती उठवी विकल्पापा(चा) अंकुर। ती नीज स्वरुपी येउनि मुरे।।
स्वस्त भावे ज्ञाप्ती उरे। निर्विकल्प स्वभावे।।५७।।
विकल्प आणी निर्विकल्प। कोण जाणतो उभयरुप।।
तोचि परमात्मस्वरुप। अपणची असे।।५८।।
पच शरीराचा विचार। जे निरोपिले अदि परमेश्वर।।
ग्रंथ पाहुनि सिधांत सार। समजुनि घ्यावे।।५९।।
सकळ शरिराचा साक्ष। होउनि सर्वात निरापेक्ष।।
निज निरंजन रूपी दक्ष। अक्षइ आसावे।।६०।।
सकळ शरिर अचेतन। औधारीक वैक्रीयक अहरकान।।
कैसे समजावे तैजस कार्मणान। स्वचैतन्यरूप।।६१।।
या लागीति सर्व निर्ष्पायोजन। याचा जाणता सचेतन।।
हेचि पाहावे अधी शोधुन। परम समाधीत।।६२।।
शरिर न जाणति अपुले रुप। याचा दृष्टा अपण ज्ञानरूप।।
न ये ते स्वभावे निजरुप। असे आलीत्य।।६३।।

तैसीच जाणा इंद्रियगण। न जाणती अपणासी अपण।।
याचा जाणता अहे कोण। हा पाहावा विचार।।६४।।
मन प्रधान इंद्रियासी। ईंद्रिय न जाणति मनासी।।
मग कैसे पाहावे स्वरुपासी। ईंद्रियज्ञान।।६५।।
ईंद्रियद्वारे वाहे मन। ज्ञान स्वसत्ता लोचन।।
यालागी अतिंद्रि ज्ञान सदन। मुख्य जाणावे।।६६।।
नसे वर्णना गंधररस। विवीध शब्द ना नसे स्पर्श।।
मग काय कारण आसे। इंद्रियाचे।।६७।।
व्यवहार निश्चय रत्नत्रयात। उभयरूपी जाणी तयात।।
अत्मा ज्ञानरूपी वर्तत। स्वसता स्वरूप।।६८।।

**श्लोक।।**

मुढत्रयमदाश्चाष्टौ तथा अनयतः षटु।
अष्टौ शंखदयेस्वैते द्रुद्रोषपंचविंशती।।६।।

**।टिका।।**

मुढत्रयादि पंचवींश। द्रुगमळवर्ज अवशेष।।
।व्यवहारसम्यक्त जिनिंद्र यास। निरोपिले श्रद्धा।६९।।
हे सर्वही जाणा अचेतन। आत्मा येकची सचेतन।।
करीत सर्वाते विवर्जन। स्वसज्ञानबळे।।७०।।
जिवादि सती विस तत्व। याते श्रद्धा निश्चयत्व।।
हाचि भाव सम्यक्त। जिनेंद्र भाषीले।।७१।।
पंचास्तिकाया द्रव्यषट्क। सप्ततत्व नवपदार्थक।।
या सर्व तत्वाते जाणक। सम्यग्दर्शन।।७२।।
यया तत्वाचे अवलोकन। जाणा हे सम्यक्त्वदर्शन।।
ज्ञेय वस्तुचे स्तापन। ज्ञानसम्यक्त्व।।७३।।
याच विधि मार्गक्रमणे। तेचि सम्यक्चारित्राचरण।।
हे गणधरे केले निरोपण। भव्य जीवासी।।७४।।

विषय कषायाचा संग। मन वचन काया योग।।
सज्ञान स्वभाव करण त्याग। तेचि निश्चय दर्शन।।७५।।
निर्विकल्प समाधीबळे। स्वसंवेद्य ज्ञान निर्मळ।।
प्रकाशमय विश्व सकळ। जाणा निश्चय ज्ञान।।७६।।
ज्ञानदर्शन उभयाधार। स्वसुखामृतरससागर।।
घनानंद वर्षेथोर। तेचि निश्चय चरीत्र।।७७।।
यया सर्वात जाणणे। तेचि वस्तु सचेतन।।
परमानंद सुखानुभवन। स्वसत्तारूपे।।७८।।
ज्ञानचेतना असति विवीध। स्वस्वरूपी सर्व होति निषीद्ध।।
स्वस्वरूपी सर्व होति निषीद्ध। येकची वस्तु उरवि शुद्ध।। तो कोण आहे दुजा।।७९।।
या स्वरूपाचा अनुभव। घ्यावा स्वसंवेद्य स्वभाव।।
सहजचि अन्य द्रव्याचा आभाव। स्वभावचि होय।।८०।।
निर्विकार सहजानंद। सकळ बोध लतिका स्कंद।।
निर्द्वंद्व परमानंद। अभेद स्वरूप।।८१।।
अहार अभयादि मैथुन। उभय परिग्रहा स्मृती जनन।।
वृत्यारुपि हलवि पवन। विकार मनाचा।।८२।।
सहजचि स्वरुपी होता लीन। वृत्ति मुरे मागुति यउन।।
अमूर्त अतिंद्रि तेचि ज्ञान। स्वभावेचि राहे।।८३।।
जो दृश्य पदार्थाचा भास। ज्ञायेकपणे होय अभास।।
द्रष्टास्वरूपी प्रकाश। अपणचि अहे।।८४।।
जाणे सर्वही अवस्ताते। अवस्तान जाणति अपणाते।।
ज्ञाइकपण सर्वातीत। अलीप्त राहे।।८५।।
जागृतीस जाणे आपण। जागृती आपणासी नेणे।।
मीचि अहे जागेपणे। हे कोण जाणे दुजा।।८६।।
निद्रा कर्म पाडी भ्रांती। तेची जाणा विसुपुप्ती।।
परि ती नेणे अपणा प्रति। आत्मा साक्षी आसे।।८७।।

स्वप्नावस्छीत नेणे अपण। परि ते सांगतो पुन्हा कोण।।
यापरि सर्वा अवस्छाची खुण। जाणता आत्मा।।८८।।

आत्मा स्वसंवेद्य ज्ञानसम। हे प्रसिद्ध जिनागम।।
हे सत्य मानावे अनुपम। भाविक जनानी।।८९।।

आत्मा ज्ञानमय घनाकार। सकळ तत्वासि आधार।।
केवळज्ञानादी आपार। परीपुर्ण आसे।।९०।।

आत्मा ज्ञानाइतर आसे। तरि सकळ पदार्थ जाणी कैसे।।
ज्ञान आत्माविणे प्रकाश। कैसेनि होय।।९१।।

या लागी जाणावे समान। न होय थोर अथवा लाहन।।
प्रत्यक्ष ज्ञानमय भगवान। हे प्रसिद्ध वाक्य।।९२।।

जैसा स्पटिक मणी निर्मळ। बहुभेद दिसे उपाधीमुळे।।
तेचि उपाधि वर्जिता सकळ। स्वशुद्धचि असे।।९३।।

पराधीन विषयसुख उपाधी। स्वाधीन सुख निरुपाधी।।
अनुभवावे तेचि त्रिशुद्धी। समाधीबळे।।९४।।

हे अनुभविता स्वरुप। स्वभावे वृतीचा होय लोप।।
मग त्या सुखासी नाही माप। अमूप म्हणउनि।।९५।।

या भावनेसी अंतर। पाहु नये निरंतर।।
सकळ शास्त्राचे येक सार। जाणावे हेचि।।९६।।

किंचित भावनेचा विचार। येथे सुचविला सारासार।।
हेचि पाहोनि घ्यावे चतुरे। जनानि सकळ।।९७।।

जयासि पाहीजे विस्तीर्ण अर्थ। ते पाहावा समयसार ग्रंथ।।
त्वरीतचि लाभ होय परमार्थ। भाविक जनासि।।९८।।

ईति श्री भावनानिरुपणन्नाम विंशतीमोध्याय।।२०।।

मंगळं महाश्री।। श्री।। श्री।। श्री।। श्री।। छ।। छ।। छ।।

* * *

# एकविशंतीतम अध्याय

।। श्री वितरागाय नमः।।

भावना भावावया कारण। वैराग्यभाव आसावा पूर्ण।।
वैराग्या इतर दुरितहरण। न होय कदा।।१।।

**श्लोक।।**

यदि शुभरजःपातो दुष्टेंद्रिय द्विरदांकुशं।
कुशकुसुमद्यानमाध्यमन्मनः।
कपिशृंखलाविरतिरमणीलीलावेश्मस्मरज्वरभेषजं।
शिवपथरथस्तद्वैराग्यविमृग्य भावाभवः।।८९।।

**टीका ।।**

विविध कर्माची बहुधुळ। कषायवात भरवि डोळ।।
ते शमावया मेघजळ। प्रबळ वैराग्य।।२।।

दुष्ट इंद्रिय उन्मत गजास। नासीत तीव्र वज्र अंकुश।।
फिरउनि लावी शुद्ध मार्गास। उत्तम वैराग्य।।३।।

कूशल सुमनासी योग्य स्छान। विस्तीर्ण शुद्ध उद्यानवन।।
जन मनोहरा शोभायमान। वैराग्यभुमी।।४।।

अशक्य उन्मत मर्कट। क्षण न थरे धावे विषयवाट।।
अहो वैराग्य शृंखळा बळकट। बंद करी मनाते।।५।।

निवृती बाळीसी सुंदर। प्रमोद खेळावया मंदिर।।
अनंदे क्रीडे निरंतर। वैराग्यसदनि।।६।।

अति दुर्धर मन्मथ ज्वर। उठवि परोपरिचे विकार।।
वैराग्यभाव औषध थोर। उपशम क्षणात।।७।।

त्वरे चालावया मोक्षमार्ग। वैराग्यस्थ अति निसर्ग।
कडोवीकडे चडे दुर्ग। अक्षइ सुख।।८।।

ऐसा वैराग्याचा चमत्कार। आनंत सुखाचा सागर।।
विवेकीयाणी विचार। हाचि शिघ्र करावा।।९।।

मोक्ष न होय वैराग्यावीण। हे जिनवचन प्रमाण।।
हेचि सकळ सुखासी कारण। हा जाणा तात्पर्य।।१०।।

**श्लोक।।**

चंडानिलस्फुरितमद्वयमदर्वाचे।
वृक्षंवृजं तिमिरमंडलमर्कबिंबं।।
वज्रं महेंद्रनिवहं नयते तथाते।
वैराग्यमेकमपि कर्म तथा समग्रं।।९०।।

**टीका।।**

सकळ कर्म विदारणार्थ। नाही वैराग्याइतर समर्थ।।
हा जाणोनि तात्पर्यार्थ। स्विकारावे वैराग्य।।९१।।
प्रचंड पवनावाचुन। न होय मेघडंबरदलन।।
तेचि वैराग्यावाचुन। कर्मदलन न होय।।१२।।
वनवृक्षाचे दहन। कोण करी दावाग्नीवाचुन।।
तैसे वैराग्या इतर कर्म भीन्न। अन्य कोण करी।।१३।।
घोर अंधार व्यापिता रजनी। कोण विदारी सुर्यावाचुनि।।
तदुपरि प्रबलतर मोहनि। अन्य कोण नासी।।१४।।
उतुंग पर्वत समस्त। भिन्न न होति वज्रगदा विरहीत।।
तद्वत विना वैराग्य मद पर्वत। कोण नाशी दुजा।।१५।।
घोर कर्म अति दुस्तर। हींडवि चतुर्गतिचे फेरे।।
तयाचा करावया संव्हार। वैराग्य इतर कोण।।१६।।
संसारदुःखाचे असे भय। सकळ कर्माचा करावा क्षय।।
परिरेसी इछा होय। तरि करावे वैराग्य।।१७।।
मन इछी समाधान। पाहीजे सकळ सुखाचे स्छान।।
प्राप्त व्हावे येकाग्र ध्यान। तरी करावे वैराग्य।।१८।।
जरि नसे लौकीक चाड। तोडावे दुःखाचे सागडे।।
मग का धरावा याचा पाड। नाशिवंत देहाचा।।१९।।

उपाय नाही या वितर। यालागी स्विकारावे वैराग्य सार।।
नातरि कदा न चुकति फेरे। स्वदुखाचे।।२०।।

**श्लोक।।**

भोगान् कृष्णभुजंग भोगविषयान् राज्यं रजःसंन्निभं बधून्।
बंधनबधनानि विषयग्रामं विषान्नोपमं।।
भुतिभुति सहाधरां त्रुणतुलस्त्रैणं विधित्वा त्यजेन।
नेश्वासशक्ती मनविलोहि लभते मुक्ती विरक्तः पुमान्।।९१।।

**टिका।।**

ऐसा वैराग्यपर आसे जो नर। तोचि पाविजे मोक्षनगर।।
नातरी भोगवि कर्मचक्रफेरे। घोराघोर जलधी।।२१।।
उदास आसावा सदा भाव। स्व(सं)योग वियोग कर्म स्वभाव।।
देहभोगासी इतर व्हावे। ज्ञानबळे करुनि।।२२।।
शरीरभोग कृष्णसर्पासमान। दृश्यमात्र करी अचेतन।।
चिरंजीव व्हावे आलींगोन। कैसे न घडे।।२३।।
प्राचिन्न कर्म हो राज्यभार। हा दुष्कर्माचा परीकर।
नर्कादि दुःख घोराघोर। न चुकति कदा।।२४।।
इष्टमित्रादि बंदुवर्ग। हे तो भावभवांतर दुःखदुर्ग।।
बळकट बधनाचा उपसर्ग। येणेचि होति।।२५।।
विषय समोह विष दारुण। मधुरान्न मिश्रिता रुचि कारण।।
परि कैसा वाचे प्राण यातुन। जाणावे यापरी।।२६।।
हे अश्वर्य भस्मासमान। सुटता दुष्कर्म वात गहन।।
क्षण न लगता जाय उटोन। न राहे काही।।२७।।
तृण तुछ न राहे स्छीर। तैसा जाणा स्त्रिसुखाचा विकार।।
पाडी स्वाधीन सुखासि अंतर। न राहे कदा।।२८।।
यापरि जाषो(णो)नि ज्ञानियान। त्यजावा अभिळाष शुद्ध मने।।
ऐसे वैराग्य संपादुनि सज्जन। तोचि भोगी मोक्ष।।२९।।

नैराश्ये वैराग्य संपुर्ण। तेचि मोक्षसुखासी कारण।।
जया निमानिले हे प्रमाण। तोचि पती मोक्षाचा।।३०।।

**श्लोक।।**

जिनेंद्रपुजा गुरुष युपास्ती। सत्वानुकंपा शुभपात्रदानं।।
गुणानुरागः कृतिरागमस्य। नृजन्मवृक्षस्य फलान्यमुनी।।९२।।

नरजन्म दुर्लभ गुणरत्नराशी। आवचिता लाभला जरि जिवासि।।
तरि या सुत्रोक्त व्हावा उपाश्यी। नातरी निष्फळ।।३१।।

जिनेंद्रपुजा शक्त्यानुसार। त्रिकाळ करी जो कोणी नर।।
जैसा चंद्रकीर्णासी चकोर। तदुपरी लक्ष्मी।।३२।।

निजगुरुभक्तीसि तत्पर। सेवा करि जो निरंतर।।
तत्पादपंकजासी भ्रमर। धन्य धन्य नर तोच की।।३३।।

दुःखीत देखोनि परजिवासी। व्याकुळ मने अपुले मानसी।।
अनुकंपा पुण्यराशी। तयासीच नाव।।३४।।

सुभ पात्रासि सन्मान। नित्य देतसे च्यारी दान।।
निरंतर असे समाधान। धन्य धन्य तोचि की।।३५।।

गुणीजनासी प्रियकर। दुर्गुणापासुनि होय इतर।।
नित्य करीतसे सारासार। संसार दूरि तोचि।।३६।।

प्रमाण मानि जिनवचन। सदा परमागम अवलोकन।।
सकळ जनासि सज्जन। तोचि म्हणावा।।३७।।

अहो नरजन्म महाकल्पवृक्ष। सुरासुर उरगाधिसी दक्ष।।
विविध ऐश्वर्य पुष्प साक्ष। मोक्षफळ शोभत।।३८।।

सफळ जाहला नरजन्म। पुरला मनोरथ गळला काम।।
प्राप्त जाहले शिवसुखधाम। अनुपम्य स्छान।।३९।।

हे परमामृत दिव्य वचन। भक्ति पात्री सज्जनान।।
प्रासुनि व्हावे समाधान। निरंतर।।४०।।

**श्लोक।।**

त्रिसंध्य देवार्चं विरचय चयं प्रापय यश।
श्रियः पात्रे दानं नयविनयमार्गं नय मनः।।
स्मरक्रोधादयारिन् दलय कलय प्राणीसु दयां।
जिनोक्तं सिद्धातं शृणु वृणजवान् मुक्तिकमलां।।९३।।

**टीका ।।**

मनुष्यजन्मासि येउन। पाहावे ह्यायोपायरेधून।।
सर्व दुष्कर्म ते वर्जुन। करावा शुभोपाय।।४१।।
त्रिसंध्या करिता देवार्चन। होय दुष्कर्माचे भंजन।।
अभ्योदय भोगोनि तो सज्जन। मुक्त होय त्वरीत।।४२।।
येकाग्र मने करीता जप। पापकर्माचा होय लोप।।
दुरिततमासि हाचि दीप। उपाय सोपाचि।।४३।।
परिक्षुनिया शुद्ध क्षेत्र। ऐश्वर्य पेरावे पवित्र।।
संसारगरळासी हाचि मंत्र। अन्य उपाय नाही।।४४।।
हेतू उपजावा मनात। लीन व्हावे स्वस्वरूपात।।
संसारी व्हावयासी मुक्त। हाचि उपाय।।४५।।
नयनिति शुभोय स्वर्ग। सोडु नये विनय सुमार्ग।
साध्य होय स्वर्गापवर्ग। याचि उपाये।।४६।।
कामक्रोधादि अरीजन। सुध मन करावे दलन।।
निजस्वरुपि व्हावे लिन। करावा हा उपाय।।४७।।
दया करावी सर्वावरी। अनुकंपा आसावे अंतरी।।
मग्न व्हावे सुखसागरी। थोर उपाय हाचि।।४८।।
जिनोत्तम आगम सुधारस। करावा नित्यानित्य अभ्यास।।
स्वभावे स्वज्ञान प्रकाश। होईल उपाये।।४९।।
या उपाये चतुर्गतीचि सीमा। जाली सिघ्र मनोरमा।।
प्राप्तीनंतर स्वस्त धामा। असावे स्वस्त।।५०।।

देवपूजादि उपाय सकळ। करिता न चुके कदा मोक्षफळ।।
नातरी नरजन्म तयासी निष्फळ। जाहला पाहा हो।।५१।।
यानंतरे ग्रंथकर्तारे। केला आचार्यसंततिस नमस्कार।।
होउनि तत्पदकमळीचे भ्रमर। सुधारस घेतसे।।५२।।

**श्लोक।।**

अजभयजितदेवाचार्यपटो दयाद्रि।
क्ष्युमणी विजयसिंव्हाचार्य पादारविंद।।
मधुकरसमतां यस्तेनसोमप्रभते।
व्यरचिमुप्राज्ञासुक्तिमुक्तावळीयं।।९४।।

**टीका ।।**

अजितदेव धर्माचार्य। संपुर्ण गुणकीर्ण गुणवर्य।।
पट्टाद्रिवरी उदय सुर्य। मेरु धरै शोभत।।५३।।
द्वादश तप सर्वभोम। शास्त्रसुधाब्धी पूर्ण सोम।।
सर्वजन प्रियाभिराम। शांत धर्म विराजे।।५४।।
विजयसिंव्ह चरणकमळी। मधु कराया सदा काळी।।
सुधारस सेवी हृदयकमळी। बंद्धाजुळी लक्षीत।।५५।।
ऐसा जो सोमप्रभ यतीवर। हा ग्रंथ केला सुद्धासार।।
सुक्तमुक्तावळी सुंदर। नाम प्रवर वीराजे।।५६।।
बोधावया भावीक जन। श्रुतज्ञानाब्धी करूनि मथन।।
सार काडीले निवडून। विविध रत्न बुद्ध जनासी।।५७।।
ईति श्री वैराग्यनिरूपणं न्नाम एकविंशतिमोध्यायः।।२१।।छ।।

।। श्री वितरागाय नमः।।

**श्लोक।।**

कृत्वा हृत्पदपूजनं यतिजनं नत्वा विधित्यगमं।
हित्वा संगम धर्मकर्मरथियां पात्रेशु दत्वा धनं।।
गत्वा यद्रुतिमुतमक्रमजुषां जित्वात्मरात्रीव्रजं।
स्मृत्वा पंचनमस्क्रियां कुरुकरक्रोडस्छमीष्टसुखं।।९५।।

यत्संसोषसुखं जीतीद्रीयवोयचितत: शातता:।
येज्जीवेषु दयालुता यदपीनी: सत्यामृतस्यं संनीधी।।
ज्ञानं सोचेमनार्यसंवीरती च यत्संगती सज्जने।
यीत्येवं परिणाप्रसुंदरफला सर्वेवीवेकां कुरु।।९६।।
भावारण्यमुद्धुयदीजगमीषु मुक्तिनगरं।
तदानीमाकर्षेवीषयविषयवृक्षीवंपुषती।।
यतश्छाया येषां प्रतयती महामोतमचीरा:।
छैचेमुनां दूरीभयतीभजन: शर्मसदनं।।९७।।
प्रशरती यथाकीर्ती क्षुकृपाकरसोदरं। भुदयजननीयाशीस्येती।
यथा गुरुसंतती: कल्पती यथावृद्धीं धर्मकुकर्ममहती।
क्षमकुशलजनने न्याये कायंतपावती वर्तनं।।९८।।
ईति श्री सुक्तिमुक्तावळीण्यंस टीका मऱ्हाष्टभाषा संपुर्णा।।
श्री मंगळं महा।। श्री।। छ।।

### ।। गुरुस्तुति श्लोक।।

नमो नम जीनानंदस्यंदीने माघनंदीने।
जगत्प्रसीद्धसिद्धांतवेधीने चीत्प्रमोदीने।।१।।
सीद्धांतसारसर्वेश्व कोशावांसैकमुर्तये।
नम: श्री माघनंदाख्याविश्ववीख्यातकर्तये।।२।।
यज्ञानतमसालुप्तामार्गोरत्नत्रयात्मक:।
तत्प्रकाशासमर्थाय नमोस्तु कुमुदींदुवे।।३।।
संसारदु:खभीताया स्वात्मोत्थसुखसेवीना।
रत्नत्रयपवीत्रय नमोस्तु कुमुदींदुवे।।४।।
जीनवानयार्णवोद्धूतं रत्नत्रयसुनीर्मलं।
चीत्सदार्चायशोभायां नमोस्तु कुमुदींदुवे।।५।।
ईती श्री गुरुस्तुती।। छ।। शके १७३५ सौम्यनाम
संवत्सरे कार्तिक शुद्धी अष्टमि इंदुवासरे प्रात:काळी

बुदवार दिने।। श्रुतमुक्तावळी मऱ्हाट भाषा टिका संपुर्णमस्तु।।
श्री अयेनापुरपुरद उपाध्ये धामोधरन पुत्र नेमाप
स्वहास्तदिदबरइधानु।।

**श्लोक।।**

जिनाद्वीपाद्यं च गुरुपदातो प्रभेदमस्तु युतशुद्धचीते।।
अन्योन्यरुपमनमंदीराते सेवी सदा शांत सुखार्नवात।।१।।
परोपकाराररतव या वीनोद। केली टीका प्राकृत बाळबोध।।
पंडीत साधुजन हे प्रबुद्ध। शोधूनी लावावे युक्त शुद्ध।।२।।
मंगळं महा।। श्री।। श्री।। श्री।। श्री।। छ।। छ।। छ।।
श्री फलठण नगरि श्री आदिनाथ चेइताले।।
श्री वृशभशेनमुनि श्रुतस्कंमुक्तावलि टीका।
सा रखचंद सूरचंद सात्रदान आपिस।।

**या ग्रंथात नसलेले श्लोक।**

यदशुभरजःपाथो दृप्तेंद्रियद्विरदांकुशं।
कुशलकुसुमोद्यानं माद्यन्मनः कपिशृङ्खला।।
विरतिरमणीलीलावेश्म स्मरज्वरभेषजं।
शिवपदरथस्तद् वैराग्यं विमृश्य भवाभयः।।१।।
नमस्या देवानां चरणवरिवस्या शुभगुरो–
स्तपस्या निःसीमक्लमपदमुपासा गुणवताम्।।
निषद्यारण्ये स्यात्करणदमविद्या च शिवदा।
विरागः क्रूरागः क्षपणनिपुणोऽन्तः स्फुरति चेत्।।३।।
करे श्लाघ्यस्त्यागः शिरसि गुरुपादत्रणमनं।
मुखे सत्या वाणी श्रुतमधिगतं च श्रवणयोः।।
हृदिस्वच्छा स्वच्छा वृत्तिर्विजयी भुजयोः पौरुषमहो।
विनाप्यैश्वर्येण प्रकृतिमहतां मण्डनमिदम्।।३।।
सोमप्रभाचार्यमभा च लोके। वस्तुप्रकाशं कुरुते यथाशु।।
तथायमुच्चैरुपदेशलेशः। शुभोत्सवज्ञानगुणांस्तनोति।।४।।

# पारिभाषिक शब्द

**आगमार्थ** : आगमानुसार केलेला आहे. अकरा अंगे व चौदा पूर्वेया ग्रंथांत आलेला अर्थ.

**आगम सिद्धांत** : आगम ग्रंथात आलेले सर्व सिद्धान्त

**अगस्ती** : अगस्ती ऋषी

**अचोरि महाव्रत** : पंच अणुव्रतांतील तिसरे व्रत.

**अठरा दोष** : भूक, तहान, भय, शोक, आतंक, निद्रा इ. १८ दोष.

**अनंतमती** : एका साध्वी(पवित्र) स्त्रीचे नाव.

**अपाय** : स्वर्ग मोक्षाच्या क्रियांचा नाश करणारी प्रवृत्ती.

**अशुभ कर्म** : जे कर्म पाप उत्पन्न करते ते कर्म.

**अष्टविध** : आठ प्रकारचे (कर्म, मूळगुण, सम्यग्दर्शनाची अंगे)

**अर्हद (अरिहंत)** : ज्ञानावरण, दर्शनावरण, वेदनीय व मोहनीय या चार घाती कर्मांचा त्यांच्या समस्त प्रकृतींसह नाश केलेले मुनी, देव.

**आभ्योदय (अभ्युदय)** : स्वर्गादि सांसारिक सुख.

**उपशम भाव** : कषाय दबून राहणे. काळाच्या मर्यादेमध्ये विकारी भाव दबून राहणे.

**कर्मचक्र** : कर्मांचा समूह, कर्माचा फेरा

**काकताळ न्याये** : कावळा बसताच फांदी मोडणे, हा न्याय

**कुनय** : नयाचा विपरित प्रकार(अंश भेद किंवा गुणभेद करून वस्तूचा एकांगी भागाला स्पर्श करणारे ज्ञान म्हणजे नय).

**कुळमद** : गर्वाचा एक प्रकार (आठ मद- ज्ञान, पूजा, कुल, जाती, बल, ऐश्वर्य, तप व रूप.)

**केवळज्ञान** : या ज्ञानात इंद्रियाच्या साहाय्यतेची अपेक्षा नसते. मोहनीय, ज्ञानावरण, दर्शनावरण, वीर्यान्तराय कर्माच्या सर्वथैव क्षयामुळे अप्रतिहत शक्ती विशिष्ट व निश्चल असल्यामुळे हे संपूर्ण ज्ञान होते. अर्थीजन ज्याच्यासाठी बाह्य व अभ्यंतर तपाच्या मार्गे सेवन करतात ते हे केवलज्ञान होय. म्हणून असाहाय्य -इंद्रियांच्या सहायाशिवाय आत्मशक्तीने होणाऱ्या ज्ञानाला केवलज्ञान म्हणतात. संपूर्ण ज्ञान ते केवल ज्ञान होय.

मोहाचा क्षय झाल्याने, ज्ञानावरण, दर्शनावरण व अंतराय कर्माचा क्षय झाल्याने, केवलज्ञान प्रगट होते. हे प्रत्यक्ष ज्ञान लोकालोकातील समस्त पदार्थांना त्यांच्या समस्त त्रैकालिक पर्यायांसह जाणते.

**खेचर** : (ख म्हणजे आकाश व चर म्हणजे विचरण करणे) आकाशातून विहार -विचरण करणारे व विविध विद्या जाणणारे विद्याधर

**घाति कर्म** : जे आत्म्याच्या गुणांचा घात करतात असे ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय व अंतराय ही चार कर्मे.

**घोरोपसर्ग** : खूप मोठा उपद्रव.

**चक्रधर** : चक्र धारण करणारा, चक्रवर्ती

**चक्रेश्वर** : चक्रवर्ती (जैन मान्यतेनुसार प्रत्येक अवसर्पिणी कालात १२ चक्रवर्ती होतात. )

**चतुःसंघ** : चार प्रकारचा संघ. मुनि-आर्यिका, श्रावक-श्राविका (यती, मुनी, ऋषी, अनगार असे मुनींचे प्रकार)

**चतुर्गति** : चार गती नरकगती. नरक गती, तिर्यंच गती, मनुष्ययगती व देवगती.

**चतुर्विध** : मुनि, आर्यिका, श्रावक, श्राविका असा चार प्रकारचा संघ.

**चतुःकषाय** : चार प्रकारचे कषाय -क्रोध, मान, माया, लोभ.

**जातिमद** : जातीविषयीचा गर्व.

**ज्योतिक्क (ज्योतिष्क)**– देवांचा एक प्रकार

**त्रयोदश चारित्र** : १३ प्रकारचे मुनींचे चारित्र. पाच महा व्रते, पाच समिती व तीन गुप्तीरूप चारित्र.

**त्रिकर्ण** : अंधःकरण, अपूर्वकरण, अनिवृत्तीकरण असे जीवाचे परिणाम (गुणस्थाने).

**तप**– दशलक्षण धर्मातील ७ वा धर्म. धर्मसाधनेसाठी शरीर कष्टविण्यासाठी केले जाणारे १२ प्रकारचे तप. सहा बहिरंग तपे व सहा अंतरग तपे.

**दर्शनिक** : सहा दर्शनांचे ज्ञान असलेला तत्वज्ञ. प्रथम -व्रत प्रतिमाधारी श्रावक.

**द्वादश तप** : बारा प्रकारचे तप

**द्वादश** : बारा, (बारा तपे, किंवा बारा भावना -अनुप्रेक्षा)

**द्विविध** : दोन प्रकारचे (जीव- अजीव)

**धरणीधर (धरणिंद्र)** : भवनवासी देवांपैकी एका देवाचे नाव.

**नय** : आवश्यक भेद वा गुणभेद करून वस्तूचे एकांगी ज्ञान प्राप्त करून घेण्याची प्रक्रिया.

**नरेंद्र** : राजा, चक्रवर्ती

**बल** : मनोबल, वचनबल व कायबल हे बलाचे तीन प्रकार.

**महतिय** : मोठे, महान

**यमनेमाचे** : (यमनियमाचे) व्रतधारण करण्याच्या पद्धती. आयुष्यांता व्रत पालन करण्याचा निश्चय म्हणजे यम व विशिष्ट कालासाठी पालन करण्यासाठीचा निश्चय म्हणजे नियम.

**यंतरदेव(व्यंतरदेव)** : देवांचा एक प्रकार (चार देव- कल्पवासी, भवनवासी व्यंतरवासी व ज्योतिष्क) व्यंतरदेवाचे पुन्हा आठ प्रकार किन्नर, किंपुरूष, महोरग, गंधर्व, यक्ष, राक्षस, भूत, पिशाच.

**रत्नत्रय** : सम्यकदर्शन-ज्ञान-चारित्र

**वासुदेव** : नारायण. जैन साहित्यात नऊ नारायण येतात.

**सप्त तत्व** : जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष.

**सम्यग्ज्ञान** : सम्यग् दर्शना बरोबर असलेले ज्ञान, समीचीन किंवा यथार्थ ज्ञान.

**संव्हानन(संहनन)** : शरीरप्रकृती, शरीराची बळकटी मोजण्याचे परिमाण

**सिता नारी** : एका साध्वी(पवित्र) स्त्रीचे नाव.

**सुदर्शन मेरू** : जंबुद्धिपाच्या मध्यभागी असलेला पर्वत.

**सुनय** : यथार्थ -सम्यक् नय.

**षड् जीव** : षटकायिक जीव. पंचस्थावर व एक त्रस जीव. पंचस्थावर- पृथ्वीकायिक, जलकायिक, अग्निकायिक, वायुकायिक आणि वनस्पतिकायिक जीव. त्रसजीव- दोन, तीन, चार, पाच इंद्रिय असणारे जीव. असे जीवाचे सहा प्रकार.

* * *

# शब्दार्थ

अंबुराशी- अंबु म्हणजे राशी, पाण्याचा साठा असलेला समुद्र.

अर्क-क्षीर-रुचीक

अकिंचन्य- जवळ कोणताही परिग्रह न पाळण्याचे व्रत.

अक्रोध व्रत- क्रोध न करण्याचे क्षमा व्रत.

अर्गळा-अडसर, आगळ, आडणा

अचोरीव्रत - पंचानुव्रतातील तिसरे -अचौर्य व्रत

अर्जव - विनंती. दश धर्मांपैकी तिसरा धर्म.

अर्जउनि- विनंती करून

अजा- बकरी, शेळी

अत्र परत्र- इह-पर लोकी

अदो - अधो, खालचे.

अदत्त- न दिलेले

अद्भु- अद्भुत.

अनर्घ्य- अमूल्य

अनुसंधान- संबंध

अपत्य- अपथ्य. मूल.

अनुपान- औषधास अनुकूल असे पदार्थ मात्रे नंतर घेणे.

अपहास्य- वाईट, हास्यास्पद.

अपहास्यति- अपमान करतात.

अभ्रतुषार- मेघातून बरसणारा हलका पाऊस.

अयास- आयास, प्रयास, प्रयत्न.

अरी- शत्रू.

अरामी- जंगलात.

अरीसंतती- शत्रुपरंपरा.

अवर्ण- वर्णशन, अंधूक

अशेष- संपूर्ण.

अर्हद - अरिहंत.

अही - साप.

अहीर्णिसी- दिवसरात्र.

आनंत कोटी येरझार -अनंत योनींमध्ये भ्रमण.

आयासाचे- प्रयत्नाचे.

आराम- उपवन

आवर्ण- आवरण

आळिकुळे -सर्पांचे समूह.

ईंदात - वेदांत.

ईभ- हत्ती.

इंदिरा - इंद्रायणी, इंद्रपत्नी, शची.

इंदुवासर - सोमवार

उग्री-समोर.

उकरावरि- उकिरड्यावर.

उत्तर सूत्र- जैन आगमातील एक ग्रंथ.

उड(डु)गण- तारासमूह

उदास- तटस्थ, मध्यस्थ.

कर्मांजन- कर्मरूपी अंजन -कालिमा.

करतळात- हाताच्या तळव्यावर.

करी- हत्ती.

कल्पद्रुम- कल्पवृक्ष

क्लेशाचे- चंचलता

कस्तुरी - कस्तुरी सुगंध

काटाल्य- कुटिलता

काळी- समयी

कीर्ण- किरण

कुनय - विपरीत -असत्य -मिथ्या नय

कुपित - क्रुद्ध, रागावलेला.

कुरंग- हरिण.

कुरुंभ-हंडा.

कैरव- कमल.
कोपवाळ- क्रोधवारा.
कोपान्नळ- क्रोधरूपी अग्नी.
कोरे खैराची- वृक्षाचे प्रकार
कौटाल्य- कुटिलता.
खळ- खल, दुष्ट.
खळताची - दुष्टाची.
गव्हारान - गावराण, गावंढळ.
गरिष्ट - जड.
गोत्रि- कुंटुंबीजन.
घनानंद- आनंदाचा मेघ
घोरोपसर्ग-घोर उपसर्ग
चटोर- चटावलेला.
च्यूतसुमन- आम्रमंजरी, आंब्याचा मोहोर.
जळ बुद्बुदा- पाण्याचा बुडबुडा
जात-जन्म
जाव- जोपर्यंत.
जिता- जिवंत
णभांतरि- आकाशामध्ये
तपनी- सूर्य
तरुणी- तरुणी, सूर्य
तीवृ- तीव्रताप
त्रस स्छावर - त्रस व स्थावर जीव.
थिल्लरी- डबके.
दायादे- वारसदार
दावानळ - वणवा
दिनमणी- सूर्य
धुक- धुके
मधुकरी- भृंगी.

धिवर - कोळी, मच्छीमार

नवक- नौका

निरसे- निरसन, निराकरण होणे.

पयोधर - अभ्र, ढग. स्त्रीचा स्तन.

पडळ- पटल, पडदा, झापड

परवनिता- दुसऱ्याची स्त्री

पाख- पाक, शुध्द. पंथ

पाड- इच्छा, समानता.

प्रावर्णाच्या- उत्तरीय वस्त्र, उपरणे, पाघरूण

परि- प्रकार, रीत

परिग्रह- अंगिकार, स्वीकार

पीयूष- अमृत

परत्र- परलोकी

बळी- बलवान

बुद्ध- बुद्धिवान, विचारवान लोक

बैसकाची- बैठक, स्वार

ढाळ- डोलणे, ढाळणे.

भस्मा- भस्म, राख.

भाजन- पात्र

माइकपणा- मायावीपण

भोंदीत- फसवीत

मसि- शाई, कळिमा

मतिवंत- बुद्धिमान

मा- नको.

माईतर- अन्यथा

माइक, ठकसेन- मायावी

माघनंदी - या नावाचे आचार्य

मार्दव - गोडी, मृदुता, कोमलता. दशधर्मांपैकी दुसरा धर्म.

मूर्छा- आसक्ती

मोक्षपुर - मोक्ष-मुक्तिरूपी नगर
नवविध - नऊ प्रकारचे
निशीत- तीक्ष्ण, धारदार
निसित- धारदार
निस्पृह व्रत- अपरिग्रह व्रत
निस्तोष-असमाधान.
नुलंघी- उल्लंघन न करणे
यकसर- एकदा
यानपात्र- जहाज
रत्नत्रय - सम्यक दर्शन, ज्ञान, चारित्र्य
राषभ- गाढव
रभस- बलपूर्वक
लतांगुळी- लाथेचे केट
लोभ- लोभ कषाय दुर्गुण
लोभांबुधि- लोभरूपी सागर
वटजनासी- वाटमारी करणारे लोक
वर्म-कमजोर दुवा
वर्म- अंतरंग
वहुटूळ- वादळ, वावटळ
वृतविधीचे- व्रताच्या विधीचे, व्रत करण्याच्या पद्धतीचे.
वानि- वर्णन करणे
वात- (अहंकाराचा) वारा
वारासी- वारिराशी, समुद्र
वासरमणी- सूर्य
वद - बोलणे
विशोरग- विषारी साप
वीशोरग- उग्रविषाचा सर्प
वोजा- निश्चयपूर्वक
शचिवर- शचीपती, इंद्र

शरत्काळी- शरद ऋतूमध्ये
शीतर- जाळ्यामध्ये
शीचन-सिंचन
शीच - सिंच
शीढ-शिडी
शीव शर्म- सत्य, शारमेने
शुंडाल- सोंडधारी, हत्ती
शैल- पर्वत
श्लाघ्यता- सुख, स्तुती
सत्यकार- बयाणा, आगाऊ रक्कम, संचकार
सनाथ- साधार
सन्नीपात-वात पित्त व कफ यांचा एकदम उद्रेक
समंध- भूतपिशाच
सर्वज्ञागमरस- सर्वज्ञ आगम रस
सरा- वेळा
स्वरूपि- आत्मरूपामध्ये मग्न
स्कंद- समूह
संकुळ- समूळ
संचकार धन- सत्यंकार, आगाऊ रक्कम(अॅडव्हान्स)
संतान- परंपरा
संसारगरळासी- संसाररूपीविष
सुद्धासार- अमृतसारांश
सुनय - सम्यक् सत्य समीचीन नय
सुरगुरू- देवगुरू प्रजापती
सोमप्रभ - आचार्य सोमप्रभ
सौच - उत्तम शोच, दशधर्मातील चौथा धर्म
हमिंद्रादि- अहमिंद्र आदी
हिमतुशार- धुके

* * *

महाराष्ट्री प्राकृत, महाराष्ट्री अपभ्रंश पासून मध्ययुगीन मराठी ते आधुनिक मराठी भाषा आणि साहित्य समृद्ध करण्यामध्ये मराठी जैन साहित्याचे महत्त्वाचे योगदान आहे. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी मध्ययुगीन मराठी जैन साहित्यातील शेकडो हस्तलिखित जैनग्रंथांचे संशोधन आणि संकलन केले आहे. त्यापैकी त्यांनी संशोधित आणि संपादित केलेल्या १७ हस्तलिखित ग्रंथांचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने होत आहे. **'मध्ययुगीन मराठी जैन साहित्यातील दुर्मीळ हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन आणि संपादन'** या प्रकल्पामुळे मध्ययुगीन मराठी भाषा आणि साहित्याच्या अभ्यासाला नवे वळण प्राप्त होणार आहे. अभिजात अशी परंपरागत मराठी यानिमित्ताने वाचकांसमोर येत आहे.

- **डॉ. महावीर प्र. शास्त्री**, सोलापूर




**डॉ. गोमटेश्वर सातगोंडा पाटील**
प्राध्यापक-मराठी विभाग,
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.
Email - gomteshpt@gmail.com


**लेखन व संपादन**

१. मराठी कादंबरी तत्त्व आणि सिद्धान्त, दर्या प्रकाशन-पुणे, २०१२
२. मराठी कादंबरीची उपयोजित समीक्षा, दर्या प्रकाशन-पुणे, २०१४
३. मराठी भाषा सर्जन आणि उपयोजन-(सहलेखक), दर्या प्रकाशन-पुणे, २०१४
४. मराठी जैन साहित्याचे स्वरूप (१८५०-२०००), भारतीय ज्ञानपीठ -नवीदिल्ली, २०१८

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाद्वारे प्रकाशित हस्तलिखित ग्रंथांचे संपादन**

| | | |
|---|---|---|
| ०१. रामायण (४-भाग) | - आचार्य गुणकीर्ती | (इ.स.१४७०) |
| ०२. हरिवंशपुराण (३-भाग) | - महाकवी जिनदासनामा | (इ.स.१४९३) |
| ०३. सुमतिप्रकाश | - कवींद्रसेवक | (इ.स.१५६८) |
| ०४. यशोधरचरित्र | - गुणनंदी | (इ.स.१५८१) |
| ०५. सुदर्शनचरित्र | - वीरदास | (इ.स.१६२७) |
| ०६. श्री आदिनाथ पुराण | - महीचंद्र | (इ.स.१६९६) |
| ०७. शीलपताका | - महाकीर्ती | (इ.स.१६९८) |
| ०८. धर्मपरीक्षा | - विशालकीर्ती | (इ.स.१६८८) |
| ०९. अष्टकर्मप्रकृती | - यादवसुत | (इ.स.१७१८) |
| १०. उपदेशरत्नमाला (२ भाग) | - भट्टारक रत्नकीर्ती | (इ.स.१८१२) |
| ११. धर्मामृतकथा | - दयासागर | (इ.स.१८१३) |
| १२. हनुमंतपुराण | - दयासागर | (इ.स.१८१३) |
| १३. हरिलीळाप्रकाश (२ भाग) | - महाकवी गिरिसुत | (इ.स.१८५०) |
| १४. श्रीपाल चरित्र | - गिरिसुत | (इ.स.१८४८) |
| १५. कर्णामृत पुराण | - नेमाप्पा उर्फ दामोदरसुत | (इ.स.१८०२) |
| १६. सुक्तिमुक्तावली | - मधुकराया | (इ.स.१८१२) |
| १७. पंचपांडवांचे आदिमूल चरित्र | - जैनसुत उर्फ आदिनाथ पंडित | (इ.स.१८४८) |


मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.